12-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-1
SGJ/ SBT/ MAP/ 10:30

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**मुंबईतील उपनगरीय रेल्वेत घडवून आणलेल्या भीषण बॉम्बस्फोटाबाबत**

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय सभापती महोदय, काल मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय गाडयांमध्ये जे भीषण बॉम्ब स्फोट झाले त्यामुळे संपूर्ण मुंबईमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. त्यामुळे आज सभागृहात कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाज करण्यापूर्वी काल घडलेल्या गंभीर बाबीवर चर्चा व्हावयास पाहिजे. तसेच अजून सुध्दा हॉस्पिटल आणि इतर ठिकाणावरुन मृतांचे जे आकडे येत आहेत, ते पाहता या ठिकाणी दुसरी कोणतीही चर्चा या सभागृहात झाली तर ती योग्य होणार नाही, असे मला वाटते. काल घडलेल्या भीषण बॉम्ब स्फोटाची सद्य:स्थिती काय आहे, शासनाने काल घडलेल्या घटनेच्या संदर्भात कोणती उपाययोजना केलेली आहे, कोणते मदत कार्य सुरु केलेले आहे, याची माहिती सभागृहाला होणे आवश्यक आहे. ज्या अतिरेक्यांनी हे बॉम्ब स्फोट घडवून आणलेले आहेत, त्याबाबत शासनाने काय शोध घेतलेला आहे, याचीही माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. आज सभागृहासमोरील पूरक मागण्यावरील चर्चा बाजूला ठेवून या घटनेच्या संदर्भात चर्चा घडवून आणली तर ते जास्त संयुक्तिक ठरेल. त्यामुळे आता आज सभागृहापुढे असलेली पूरक मागण्यावरील चर्चा सुरु न करता कालच्या घटनेच्या संदर्भात सभागृहाला माहिती देण्यात यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. विलास अवचट : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याबद्दल दुमत असूच शकत नाही. परंतु आज पुरवणी मागण्यावर चर्चा करण्यासाठी हे स्पेशल सिटींग आहे. तसेच आता सभागृहात सभागृहाचे नेते, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते, गट नेते उपस्थित नाहीत. त्यामुळे काल घडलेल्या घटनेच्या संदर्भाने ख-या अर्थाने चर्चा होऊ शकणार नाही. तेव्हा सभागृहापुढील अगोदरच ठरलेल्या पुरवणी मागण्यावरील कामकाजाला सुरुवात करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : काल दिनांक 11 जुलै, 2006 रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय गाडयांमध्ये भीषण बॉम्बस्फोटाच्या संदर्भात माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, दोन्ही सदनाचे विरोधी पक्ष नेते व दोन्ही सदनाचे गट नेते यांची संयुक्त चर्चा सुरु आहे. ही चर्चा साधारणत: 11.00 वाजेपर्यंत सपंण्याची शक्यता आहे. आपण कालच्या घटनेच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्याबद्दल आपल्याला हवी असलेली माहिती आणि बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत, त्याची संपूर्ण माहिती सभागृह सुरु होईल, त्यावेळी देण्यात येईल. त्यामुळे सभागृहाची बैठक मी 11.15 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.33 ते 11.15 पर्यंत स्थगित करण्यात आली. )

---------------

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : काल, दिनांक 11 जुलै 2006 रोजी झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या संदर्भात माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, दोन्ही विरोधी पक्ष नेते व गट नेते यांची संयुक्त बैठक अजूनही सुरु आहे. तेव्हा मी सभागृहाची बैठक 11.45 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.16 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी )**

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 11.45 मिनिटांनी दुपारी 1.15 पर्यंत स्थगित करण्यात आली. )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये आम्ही या ठिकाणी प्रस्ताव दिलेला आहे. काल मुंबईमध्ये सायंकाळी 6.15 च्या दरम्यान बॉम्बस्फोटाची घटना घडली आणि त्यामध्ये जवळपास 200 माणसे मृत्युमुखी पडली व जवळ जवळ 650 माणसे जखमी झालेली आहेत. एवढी भयानक घटना घडल्यानंतर आज सभागृहात कोणतेही कामकाज न करता या घटनेसंबंधी चर्चा करावी म्हणून आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो स्वीकृत करावा व चर्चा घ्यावी, अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये एकूण 4 प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य, सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते यांचा आहे. दुसरा प्रस्ताव, सन्माननीय सदस्य, सर्वश्री विनोद तावडे, जगदीश गुप्ता, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, सागर मेघे, प्रकाश शेंडगे यांनी दिलेला आहे. तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील यांचा तर चौथा प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी दिलेला आहे. कालची घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आणि राष्ट्रद्रोही अशा पध्दतीची घटना आहे. या घटनेच्या अनुषंगाने देशाला हादरा बसेल या पध्दतीचे क्रौर्य घडविण्यात आले आणि अशा घटनेविषयी प्राधान्याने चर्चा करण्याची मागणी नियम 289 अन्वये करण्यात आलेली आहे, ती मी स्वीकृत करण्याचे ठरविले आहे. तातडीने ही मागणी पूर्ण करण्याच्यादृष्टीने मी चर्चेला परवानगी देत आहे. प्रथमत: सन्माननीय उपमुख्यमंत्री यांना मी निवेदन करण्यास सांगतो, त्यानंतर कालच्या घटनेत जे मृत्युमुखी पडलेले नागरिक आहेत त्यांना आपल्या सर्वांच्यावतीने मी स्वत: श्रध्दांजली वाहीन आणि त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्याची मी विनंती करीन. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील जे कामकाज आहे त्यामध्ये स्व.वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्तावाचे कामकाज आहे ते आपण उद्या घेऊ.

..2............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MAP/

सभापती.........

आजच्या कामकाजामधील पुरवणी मागण्या, विधेयक हे सर्व कामकाज उद्या, गुरुवार, दि.13 जुलै, 2006 रोजी सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक घेऊन सुरु केले तर आजचे राहिलेले कामकाज जवळ जवळ पूर्ण करु शकू यादृष्टीने मी हे सदनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

..3.....

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MAP/

**दि.11/7/2006 रोजी मुंबई झालेल्या बॉम्बस्फोटांचा निषेध ठराव व मुंबईतील नागरिकांनी दाखविलेल्या अतुलनीय धैर्याबाबत अभिनंदनाचा ठराव**

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबईतील पश्चिम उपनगरात रेल्वेमध्ये काल झालेल्या बॉम्बस्फोटांचा तीव्र निषेध हे सभागृह एकमुखाने करीत आहे. हे बॉम्बस्फोट म्हणजे आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाला दिलेले एक प्रकारचे आव्हान असून एकदिलाने सर्वांनी मिळून त्याचा मुकाबला करण्याची आवश्यकता आहे. या अत्यंत घृणास्पद असलेल्या सर्व शक्तींचा आम्ही निश्चित शोध घेऊ आणि गुन्हेगारांना पकडण्यासाठी शर्थ करु व त्यांना अटक करुन शिक्षाही दिली जाईल. हा निषेधाचा ठराव एकमताने पारीत करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, त्याचबरोबर एवढे मोठे संकट आलेले असतांना 200 माणसे मृत्युमुखी आणि 600 माणसे जखमी झालेले असतांना सुध्दा मुंबईच्या नागरिकांनी दाखविलेल्या अतुलनीय धैर्याबाबत त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मी आपल्यासमोर मांडीत आहे. काल अतिशय कमी वेळेमध्ये बॉम्बस्फोट मालिका मुंबईमध्ये घडविली गेली. त्या रेल्वेलाईनवरुन लाखो लोक प्रवास करीत असतात. वाहतूक थांबविली गेल्यानंतर हजारो माणसांची गर्दी रेल्वे स्टेशनवर होती. माहिमला बॉम्बस्फोट झाल्यानंतर विसाव्या मिनिटाला मी त्या ठिकाणी हजर होतो.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .............

डेडबॉडीज काढण्याचे काम सुरु होते. जखमींना उचलून हॉस्पिटलमध्ये पाठविण्याचे काम सुरु होते. सभापती महोदय, मुंबईच्या नागरिकांना सलमान करावासा वाटतो. "भारत माता की जय" अशा घोषणा देत डेडबॉडीज आणि जखमींना ज्या जिद्दीने मुंबईतील तरुण बाहेर काढण्याचे काम करीत होते ती जिद्द बघितल्यानतर, मुंबईच्या तरुणांचे ते धैर्य बघितल्यानंतर जगातील अतिरेकी संघटनांचे बॉम्ब मुंबईचे धैर्य कमी करु शकत नाहीत, ते मुंबईला कधीही नेस्तनाबूत करु शकत नाहीत. मुंबईतील नागरिकांनी कालच्या घटनेमध्ये जे धैर्य दाखविलेले त्याबद्दल मी मुंबईतील नागरिकांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो. सभापती महोदय, घटना घडल्यानंतर जखमींना हॉस्पिटलमध्ये पोहचविल्यानंतर हा दवाखाना कोणाचा आहे हे न बघता सर्व डॉक्टर जखमींच्या मदतीला धावून आले. दवाखान्यातील स्टाफ आपली डयुटी संपलेली असतांना घरी गेला नाही. सभापती महोदय, अनेक सेवाभावी संस्था लोकांच्या मदतीला धावून आल्या. आपण त्यांना कधीही कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिलेले नाही. संकट काळामध्ये अत:करणापासून एकमेकांच्या मदतीला लोक धावून जातांना दिसत होते. संकट मोठे होते. परंतु एकमेकांना मदत करण्याची जिद्द या संकटावरही मात करील. अमेरिका आणि लंडनमध्ये बॉम्बस्फोट झाले. जगाच्या कानाकोप-यात अनेक ठिकाणी अतिरेकी कारवाया झाल्या. जगातील प्रगत राष्ट्रांना सर्व सुविधा उपलब्ध असतांना पूर्ववत होण्यास आणि त्या धक्क्यातून बाहेर पडायला 8 दिवसापासून 15 दिवसांचा कालावधी लागला. सभापती महोदय, आज रेल्वे व्यवस्थितपणे सुरु आहेत. कोठेही याचा उद्रेक झाला नाही. मुंबईने आपल्या चांगुलपणाचे दर्शन घडवित असतांना महाराष्ट्राने याला साथ देण्याची भूमिका पार पाडलेली आहे. सभापती महोदय, इतकी मोठी घटना घडलेली असतांना मुंबई फक्त 4 तासाच्या आत पूर्ववत करुन अतिरेक्यांनी आणलेल्या संकटाला आम्ही मोजत सुध्दा नाही, हे मुंबईच्या जनतेने दाखवून दिले आहे. ज्या स्वयंसेवी संस्था, जे डॉक्टर्स, जे तरुण या मदत कार्यात उतरले आणि जखमींना मदत केली त्यांचा अभिनंदन करणारा प्रस्ताव मी यानिमित्ताने मांडतो. ही घटना घडविणा-यांचा धिक्कार आणि निषेध, मुंबईच्या नागरिकांचे अभिनंदन, स्वयंसेवी संस्था आणि डॉक्टर्स यांचे आभार व्यक्त करणारे हे तिन्ही प्रस्ताव सभागृहाने मंजूर करावेत, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. खरे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये अशा पद्धतीने अतिरेकी येऊन बॉम्बस्फोट घडवितात. या बॉम्बस्फोटामध्ये 200 लोक मृत्यूमुखी पडले आणि जवळपास 600 च्या वर लोक जखमी झालेले आहेत. बॉम्बस्फोटाची भयानकता एवढी होती की, आयुष्यामध्ये असा नरसंहार बघण्याचा प्रसंग आमच्यावर कधी आला नाही. तो प्रसंग काल आला. आम्ही अनेक ॲक्सिडेंट बघितले, अनेक दंगली बघितल्या. परंतु या बॉम्बस्फोटामध्ये ज्या पद्धतीने माणसे मरण पावली ते खरे म्हणजे मानवतेला काळीमा फासणारे कृत्य होते. सभापती महोदय, 11 मिनिटांमध्ये 7 ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्यानंतर पश्चिम रेल्वेच्या रेल्वे रुळावर हा:हाकार उडाला. आम्ही तासाभराने बाहेर पडलो त्यावेळी मुंबईमध्ये काही घडलेले नाही, अशा प्रकारे जनजीवन सुरळीत झाले होते. रस्ते ब्लॉक झालेले होते. ज्यावेळी आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो त्यावेळी खरी मानवता आम्हाला बघावयास मिळाली.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

जात, धर्म, पंथ विसरून सर्व लोक त्या ठिकाणी मदतीला धावून आले. कोणी पाणी पाजताना, कोणी अन्न देताना, कोणी जेवण देताना आम्ही पाहिले आहे. लोकांना सोडवताना पाहिले आहे. त्या भागात सर्वत्र गाड्या, बसेस बंद झाल्या होत्या. अर्थात सरकारने नंतर 100 बसेसची व्यवस्था केली होती. परंतु मुंबईच्या जनतेने आपल्या मनोवृत्तीचे जे प्रदर्शन घडविले, खरे म्हणजे याची कल्पनाही आपण करू शकत नाही. म्हणूनच मुंबईच्या जनतेचे अभिनंदन केलेच पाहिजे. या मुंबईमध्ये सतत आघात होत असताना, 1993 पासून या आघातांची मालिका सुरू झाली असताना काल पुन्हा पश्चिम रेल्वेमध्ये एकामागोमाग 7-8 बॉम्बस्फोट घडले असताना देखील त्याची दहशत मुंबईमध्ये निर्माण झ ाालेली नाही याचे विशेष कौतुक आहे. हे मुंबईतील जनतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. म्हणून या ठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी, माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मुंबईतील जनतेच्या कौतुकाचा आणि अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो तसेच ज्या अतिरेक्यांनी, ज्या विध्वंसक शक्तींनी या मुंबईला आणि एकूणच महाराष्ट्राला अशांत करण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यांचा मी तीव्र शब्दांमध्ये धिक्कार करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

****

....... एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मुंबईतील जनता, तरूण वर्ग, स्वयंसेवी संस्था, डॉक्टर्स आणि सर्व सामाजिक संस्था यांनी काल जे अलौकिक असे एकजुटीचे सामर्थ्य दाखविले आहे, या मुंबई शहरामध्ये पूर्वी असे बॉम्बस्फोट झाले तसे भविष्यात होऊ नयेत अशी अपेक्षा ठेवून मुंबईतील जनतेने या संकटामध्ये मदतकार्यामध्ये स्वत:ला झोकून दिले आणि काल रात्रभर मदतकार्य या शहरामध्ये चालू होते. सभापती महोदय, काल सायंकाळी 6.20 पासून ही बॉम्बस्फोटांची मालिका सुरू झाली आणि 11-12 मिनिटांमध्ये 7-8 बॉम्बस्फोट झाले. त्यात शेकडो माणसे मृत्यूमुखी पडली तर शेकडो जखमीसुद्धा झाली. संपूर्ण पश्चिम रेल्वेवर जो काही हा धुमाकूळ झाला ते दृश्यसुद्धा न बघवता येण्याइतके भयानक होते. तरीही मुंबईतील जनता स्वस्थ बसली नाही, घाबरली नाही तर ताबडतोब तिने मदतकार्य सुरू केले आणि 4-5 तासामध्ये जणू काही असे काही घडलेच नाही अशी परिस्थिती या शहरात पुन्हा उभी राहिली. याचे संपूर्ण श्रेय हे मुंबईतील जनतेलाच आहे. जात-पात, धर्म, पंथ असा कोणताही भेदाभेद त्यावेळी नव्हता. ज्याला जी मदत पाहिजे ती स्वत:हून, उत्स्फूर्तपणे दिली गेली. ती मदत देखील एखाद्या गोष्टीपुरती मर्यादित नव्हती तर विविध प्रकारची होती. त्यात रक्तदान होते, अन्नदान होते, कोणी पाणी पाजत होते. ज्याला जी जी आवश्यक आहे ती सर्व मदत मुंबईकर जनतेकडून दिली गेली. हायवे वर अनेक ठिकाणी निरनिराळ्या पक्षांचे, सामाजिक संस्थांचे, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते या संकटात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी उभी होती. ज्यांना आपल्या घरी पोहोचण्यासाठी कोठलेही साधन मिळत नव्हते अशांसाठी, त्यामध्ये महिला देखील होत्या, त्यांना मदत करण्यासाठी प्रसंगी रिकामी वाहने थांबवून या या महिलांना, या या माणसांना अमुक ठिकाणी जायचे आहे, कृपा करून तुम्ही त्यांना तेथे सोडून द्या अशी विनंती करून त्यांना मदत मिळवून दिली जात होती. रात्रभर या कार्यकर्त्यांनी झोप देखील घेतली नाही. हे स्वयंस्फूर्त चित्र शासनाला एकच गोष्ट दाखविते आहे की, आम्ही कोठल्याही संकटाला घाबरत नाही, घाबरणारे नाही. मात्र अशा वेळी तुम्ही देखील आम्हाला साथ द्या आणि अशी संकटे लादणारे जे कोणी आहेत त्यांना हे सरकार कसे शासन करणार आहे त्या दृष्टीकोनातून देखील या प्रश्नाकडे मग पाहिले पाहिजे, नव्हे पाहिले जाईल. सभापती महोदय, नंतर या संबंधात नियम 93 खालील प्रस्ताव येणारच आहे. त्यावेळेस मी सगळ्या

....... एफ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

गोष्टींचा उल्लेख करीनच. मात्र एक गोष्ट मला आवर्जून सांगितली पाहिजे की, मुंबईतील जनतेने, मुंबईतील सर्व सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांनी या संकटात जे अतुलनीय मदतकार्य केले, ज्या धैर्याने या संकटाशी मुकाबला केला त्याबद्दल मुंबईकर जनतेचे, येथील डॉक्टर्स लोकांचे, येथील सामाजिक तथा स्वयंसेवी संस्थांचे कौतुक करण्याची नितांत गरज आहे. त्यांचे अभिनंदन करण्यासाठीच या ठिकाणी आज हा प्रस्ताव सदनाच्या नेत्यांनी मांडलेला आहे त्याला अनुमोदन देऊन अशा प्रकारचे प्रोत्साहन येथील जनतेला आपण जरूर द्यावे मात्र त्याचबरोबर आमच्याकडून देखील या बाबतीत कोणत्याही प्रकारची कसूर केली जाणार नाही असे आश्वासन या जनतेला आपण द्यावे एवढेच सांगून आणि हे बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्या विघातक शक्तींचा तीव्र शब्दात निषेध करून मी थांबतो.

***

( यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर. आर. पाटील यांनी काल दिनांक 11 जुलै 2006 रोजी सायंकाळी पश्चिम रेल्वेच्या गाडयांमध्ये एका मागोमाग सात ते आठ बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले त्या संदर्भात सभागृहामध्ये परस्परविरोधी तीन प्रकारचे प्रस्ताव मांडून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यामध्ये पहिली निषेधाची भावना आहे, दुसरी दुखवटयाची भावना आहे आणि तिसरी अभिनंदनाची भावना आहे. अशाप्रकारे तिनही भावना स्पष्टपणे या सभागृहामध्ये व्यक्त करण्याचा दुर्दैवी प्रसंग आपणावर आलेला आहे. कालच्या बॉम्बस्फोटाच्या घटनेमध्ये निषेध कशाबद्दल करावयाचा? हे जे कृत्य घडले आहे ते जगाच्या इतिहासामध्ये लपवून ठेवले होते. लपवून कृत्य करणारी माणसे आणि लपवून केलेले कृत्य, हा तीव्र निषेधाचा भाग समजला जातो. त्यामुळे सभागृहाच्या नेत्यांनी त्या कृत्याचा जो निषेध व्यक्त केला आहे, त्याबद्दल मी सद्‌भावना व्यक्त करतो. आणि अभिनंदन यासाठी केले पाहिजे की, ज्या तऱ्हेने मुंबईतील माणसे या कामी उभी राहिली आहेत, त्यांच्याबद्दल बाहेर जी भावना व्यक्त झालेली आहे तिचा जरुर उल्लेख करतो. इथे कुणी कुणाला ओळखत नाही. ग्रामीण भागातील, शहरी भागातील माणसे एकमेकांना ओळखतात. इथे कुणी कुणाला ओळखत नाही. यापूर्वी झालेले बॉम्बस्फोट आणि काल झालेले बॉम्बस्फोट यामधून मुंबईच्या नागरिकांनी एक गोष्ट सिध्द केली आहे की, आपली जन्मोजन्मीची ओळख असल्यासारखी मदत तत्परतेने ते एकमेकांना करतात. आपल्याला ओळखता येत नाही इतकी त्या मदतीची तीव्रता असते. सर्व प्रकारची मदत त्यांनी केली आहे, तिचे मी वर्णन करीत नाही. म्हणून सारे काही विसरुन त्यांनी तत्परतेने एकमेकांना मदत केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. The show must gp on हे बालगंधर्वांचे वाक्य मला याप्रसंगी वारंवार आठवते. कालच्या घटनेमध्ये मुंबईच्या नागरिकांनी आपल्या मदतीच्या भावनेचा तीव्र आविष्कार दाखवून दिला आहे. त्यासंबंधी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी निश्चितपणे आपल्या अभिनंदनाच्या प्रस्तावामध्ये उल्लेख केला आहे. त्याच्याशी मी पूर्ण सहमती व्यक्त करतो. त्याचप्रमाणे ज्या लोकांनी काल हे भ्याड कृत्य केल्यामुळे जे दुर्दैवी मृत्यू झाले आहेत, त्याबद्दल मी दुखवटयाची भावना व्यक्त करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

----

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी मुंबई महानगरामध्ये जे काल बॉम्बस्फोट झाले, त्याचा तीव्र शब्दामध्ये धिक्कार करण्यासाठी आणि अशा या भीषण परिस्थितीमध्ये मुंबईकर जनतेने, स्वयंसेवी संस्थांनी , डॉक्टर लोकांनी, जो मदतीचा हात या प्रसंगी दिला त्यांचे अभिनंदन करण्यासाठी हा जो ठराव मांडला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसारख्या महानगरीच्या आर्थिक नाडया तोडण्याचा अमानुष प्रयत्न 1993 मध्ये अतिरेक्यांनी केला आणि त्याची पुनरावृत्ती 1993 नंतर काल करण्यात आली. 11 मिनिटांमध्ये सात बॉम्बस्फोट करुन, 200 च्या वर निरपराध लोकांना ठार करण्याचा अमानुष प्रकार काल घडला. केवळ आपणच नव्हे तर जगभरातील सर्व राष्ट्रांनी, सर्व मानवतावादी जनतेने या घटनेचा तीव्र शब्दामध्ये निषेध केला हे याठिकाणी नमूद करावेसे वाटते. अशाप्रकारचे संकट ज्या ज्या देशामध्ये येते त्या त्या ठिकाणी मानवी संवेदनाचा महापूर येतो. अशा अमानुष घटनेचा तीव्र शब्दामध्ये धिक्कार करुन थांबत नाही तर भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, आणि घडविण्याचा कुणी प्रयत्न केला तर त्यांना सर्वसामान्य जनता उध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही हा संदेश कालच्या मुंबईकर जनतेने त्यांच्या कृतीने आतंकवादी, अतिरेक्यांना दाखवून दिला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु.....

सभापती महोदय, जे बॉम्बस्फोटामध्ये बळी पडले, त्यांच्या शरिराच्या चिंधड्या झाल्या, त्यांचे अवयव गोळा करण्याचे काम, जखमी झालेल्यांना हॉस्पिटलमध्ये पोहोचविण्याचे काम, बॉम्बस्फोटामध्ये मरण पावलेल्या लोकांची प्रेते उचलण्याचे काम, तसेच जे बॉम्बस्फोटामध्ये अडकून पडले त्यांच्या घरी निरोप पोहोचण्याचे काम सर्वसामान्य मुंबईकर जनतेने आणि स्वयंसेवी संस्थांनी, डॉक्टरांनी केले हे गौरवास्पद आहे. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे भारतमातेचा जयजयकार करत प्रेते उचलण्याचे कामही लोक करत होते. सर्वसामान्य लोकांसाठी सर्वप्रकारची मदत मुंबईकर जनता आणि स्वयंसेवी संस्था करत होत्या. लोकांना पाणी पाजणे, बिस्कीटे वाटणे एकेका जखमींजवळ पाच-पाच डॉक्टर उपचाराकरिता उपस्थित होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब आमच्याशी बोलत असताना म्हणाले, त्याप्रमाणे मानवतावादी मुंबईकर जनतेचे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील जनता अभिनंदन केल्याशिवाय रहाणार नाही. सर्वसामान्यांचे जीवन विस्कळित न होऊ देता, मुंबईचा गाढा सुरळीतपणे चालेल,अशाप्रकारचा विश्वास या प्रसंगातून दिसून आला. ज्या सर्वसामान्य जनतेने अतिशय भीषण परिस्थितीत जी मदत केली, स्वयंसेवी संस्थांनी मदत केली, डॉक्टर लोकांनी मदत केली, त्या सर्व डॉक्टरांचे आणि मुंबईकरांचे मी अभिनंदन करतो. ज्या अतिरेक्यांनी हा हल्ला घडवून आणला त्यांचा तीव्र धिक्कार करतो. या अतिरेक्यांना शासनाने शोधून काढून त्यांना ठेचून काढावे. कोणाची देशाकडे वाकड्या नजरेने पहाण्याची हिम्मत होणार नाही, अशाप्रकारची भूमिका सरकारने ध्यावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मुंबईतील अतिरेकी कारवाईचा निषेध व्यक्त करणारा ठराव मांडला. तसेच या प्रसंगी मुंबई शहरातील सर्व अबालवृध्द कामगारांनी ज्या पध्दतीने धैर्य आणि माणुसकी दाखविली तिला कोठेही तोड नाही, या सर्वांचे मी अभिनंदन करतो. या अनुषंगाने जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे, त्याला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेब, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेब, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेब यांनी पाठिंबा दिलेला आहे. सदनातील दोन्ही बाजूच्या सर्वच सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिलेला आहे. एकमुखाने हा प्रस्ताव मंजूर झाला, असे मी घोषित करत आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: पश्चिम रेल्वे उपनगरी गाड्यांमधील बॉम्बस्फोटांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांबद्दल शोक प्रस्ताव.

**सभापती** : काल मंगळवार, दिनांक 11 जुलै, 2006 रोजी सायंकाळी 6.00 च्या सुमारास मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरी गाड्यांमध्ये विविध सात ठिकाणी शक्तिशाली व भीषण बॉम्बस्फोट झाले. या बॉम्बस्फोट मालिकेने सारी मुंबई हादरली आणि पश्चिम रेल्वेची वाहतूक बंद झ ााली. या बॉम्बस्फोटांमध्ये अनेक निरपराध व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत. तसेच अनेक व्यक्ती जखमीही झाल्या आहेत. या दुर्घटनेत बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांना सावरण्यासाठी व जखमींना मदत करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच, अशा वेळी सर्वत्र शांतता कशी राहील हे पाहिले पाहिजे. असे आपणा सर्वांना या निमित्ताने मी आवाहन करतो व या दहशतवादी कृत्याचा तीव्र निषेध करुन या हल्ल्यात बळी गेलेल्या निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाच्यावतीने मी पुढील शोक प्रस्ताव मांडतो.

"मंगळवार, दिनांक 11 जुलै, 2006 रोजी सायंकाळी 6.00 च्या सुमारास मुंबई पश्चिम रेल्वेच्या उपनगरी गाड्यांमध्ये विविध सात ठिकाणी झालेल्या शक्तिशाली व भीषण बॉम्बस्फोटांमध्ये बळी गेलेल्या निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 97 अन्वये मांडावयाच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आपण सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांकरिता तहकूब करावे. आमचे म्हणणे कोणी ऐकून घेणार नसतील तर ते योग्य नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांकरिता स्थगित करावे.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज मी 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दु. 1.41 ते 51 पर्यंत स्थगित झाली )

-----

यानंतर श्री. शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 1.50

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी.** : मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय गाड्यांमध्ये झालेले बॉम्बस्फोट

**मु.शी.**: मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय गाडयांमध्ये झालेले बॉम्बस्फोट या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते व इतर यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो .

"ज्याअर्थी काल दिनांक 11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या पश्चिम रेल्वेच्या मार्गावर खार, अंधेरी, माटुंगा, माहीम, मीरारोड या रल्वे स्टेशनवर बॉम्बस्फोट होऊन 200हून अधिक जण मृत्यूमुखी पडले आहेत व लक्षावधी रुपयांची वित्तहानी झालेली आहे, आणि,

ज्याअर्थी, लागोपाठ झालेल्या या स्फोटामागे अतिरेकी संघटनांचा हात असल्याचे स्पष्ट दिसत आहे, आणि,

ज्याअर्थी या स्फोटांमुळे आम जनता भयभीत झालेली आहे, आणि मुंबई शहरात दहशतीचे वातावरण पसरलेले आहे, आणि,

ज्याअर्थी, या घटनेनंतर अशा प्रकारच्या घटना घडण्याचा धोका वाढला आहे व खबरदारीची उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करुन या अतिशय जिव्हाळ्याच्या व ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी."

सभापती महोदय, कालच्या घटनेने 12 मार्च 1993 या दिवसाची आठवण झाली. या मुंबई शहरामध्ये 12 मार्च 1993ला एकाच दिवशी अशा प्रकारचे 12 बॉम्बस्फोट झाले आणि त्यामध्ये जवळपास 250 पेक्षा जास्त माणसे मृत्यूमुखी पडली, हजारो माणसे जखमी झाली आणि एक प्रचंड असा दहशतवाद या मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. असे

. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

म्हणतात की, इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. तब्बल 13 वर्षांनी पुन्हा एकदा या महाराष्ट्रामध्ये इतिहासाची पुनरावृत्ती झाली.. एकेका मिनिटाच्या फरकाने अवघ्या 11 मिनिटांमध्ये जवळपास 7 बॉम्बस्फोट पश्चिम रल्वेच्या उपनगरीय गाडयांमध्ये घडविण्यात आले. वैशिष्ट्य असे की, हे सर्व बॉम्बस्फोट फर्स्टक्लासच्या डब्यांमध्ये घडविण्यात आले.

...नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आणि एका एका मिनिटाच्या फरकाने टाईम बॉम्ब सारखे स्फोट होत गेले. जस जसे एक एक बॉम्ब स्फोट होत गेले तस तसे मुंबई शहर हादरत गेले. कालची घडलेली घटना ही अतिशय भयंकर अशी घटना आहे. माननीय गृहमंत्री नेहमी महाराष्ट्र हा शाहू, फुले, आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे असे सांगत असतात. हे सरकार नेहमी शाहू, फुले, आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन काम करीत असते तसेच या सरकारचे गृहमंत्री माननीय आर.आर.पाटील साहेब तर आधुनिक काळातील संत गाडेगे महाराज आहेत, त्यांचे नैतिक चारित्र्य चांगले आहे असे असतांना मुंबईवर काल जो हल्ला झाला तो केवळ मुंबई, महाराष्ट्रावरच झाला असे नसून हा हल्ला संपूर्ण देशावर झालेला आहे. कारण मुंबई ही या देशाची आर्थिक राजधानी आहे, मुबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे, मुंबई हे महाराष्ट्रातील प्रमुख शहर आहे. मुंबई शहरात बॉम्बस्फोट घडवून आणले तर संपूर्ण महाराष्ट्र दहशतीखाली येतो अशी धारणा आहे. अशा प्रकारे कट-कारस्थान करुन मुंबईत बॉम्बस्फोट घडविण्यात आले. गेल्या दोन वर्षापासून माननीय आर.आर.पाटील हे आपल्या राज्याचे गृहमंत्री म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या संदर्भात नेहमी बोलले जाते की, ते अतिशय कार्यक्षम पध्दतीने गृहखाते चालवितात परंतु कालचीच घटना येथे झ ााली असे नाही तर गेल्या वर्षभरात महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या घटना घडलेल्या आहेत त्यामुळे ती एक प्रकारे मालिकाच तयार झालेली आहे. अशा मालिकांमुळे महाराष्ट्राचे गृहखाते अपयशी ठरलेले आहे हे यावरुन सिध्द होते. त्यामुळे मला असे वाटते की, या देशाची परंपरा आहे की, साधा रेल्वेचा अपघात झाला असतांना त्यावेळी रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे खरे म्हणजे आपण जर संत गाडगे महाराज असाल तर असफल गृहखात्याची जबाबदारी स्वीकारुन माननीय गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मी मागणी करतो. तशीच माझी दुसरी मागणी अशी आहे की, आपल्या मुंबई शहराचे पोलीस कमिशनर श्री. अनामी रॉय हे सतत प्रसिध्दीच्या झोतात असतात, टी.व्ही. समोर असतात, वर्तमानपत्रात असतात. त्यांच्यामुळे जणू मुंबईत सगळीकडे आलबेल चालले आहे अशा थाटात ते नेहमी वावरत असतात, खरे म्हणजे हे त्यांचे फेल्यूअर आहेत. त्यामुळे अशा पोलीस कमिशनरांची आज संध्याकाळपर्यंत बदली झाली पाहिजे अशी माझी दुसरी मागणी आहे.

सभापती महोदय, नरीमन पॉईंट, चर्चगेटचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

परिसर,सी.एस.टी., क्रॉफर्ड मार्केट हा जो भाग आहे तो सरकारी कार्यालयाचा भाग आहे. संध्याकाळी सर्व कार्यालय सुटल्यानंतर या ठिकाणी काम करणारे कर्मचारी, अधिकारी हे चर्चगेट स्टेशन किंवा सी.एस.टी. स्टेशनवरुन उपनगरातील आपल्या घरी जात असतात. सायंकाळी कार्यालय सुटल्यानंतर म्हणजे 6.00 वाजता चर्चगेट स्टेशन आणि सी.एस.टी. स्टेशनामधून सुटणा-या उपनगरीय गाडया खचाखच भरलेल्या असतात. त्यामुळे काल बरोबर 6.24 वाजता पहिला बॉम्बस्फोट खारमध्ये झाला, दुसरा बॉम्बस्फोट एक मिनिटाच्या फरकाने वांद्रे येथे झाला, तिसरा बॉम्बस्फोट एक मिनिटाच्या फरकाने जोगेश्वरी येथे झाला व त्यानंतर एकापोठोपाठ एक असे सात बॉम्बस्फोट झाले. काल मी विधानमंडळातून बाहेर पडलोही नव्हतो तेव्हा पहिला बॉम्बस्फोट झ ााल्याची माहिती मिळाली. त्यानंतर मी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात जाऊन टी.व्ही. चालू केला तेव्हा 15 मिनिटात सात बॉम्बस्फोटाची मालिका झाल्याचे आढळून आले. त्यानंतर मग मृतांचे आकडे समोर आले. पहिला आकडा 40 मृतांचा आला, दुसरा आकडा 50 मृतांचा आला, तिसरा आकडा 70 मृतांचा आला, अशा प्रकारे मृतांचे आकडे समोर येत गेले.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

शेवटी मृतांचा आकडा 200 च्यावर गेला आहे, किमान 600 लोक जखमी झालेले आहेत. मी एक तासामध्ये त्या परिसरात गेलो पण मला ते दृश्य पहावले नाही. मी सुरुवातीलाच बोलताना सांगितले की, अशाप्रकारचा नरसंहार कधी आयुष्यात पहावयास मिळाला नाही. मी माझ्या राजकीय कारकीर्दीमध्ये अनेक अपघात पाहिले, रेल्वे ॲक्सिडेन्ट पाहिले, बस ॲक्सिडेन्ट पाहिले, दंगलीमध्ये मृत झालेल्यांचे शव पाहिले, पण कालचे जे दृश्य होते ते अंगावर काटा उभे करणारे होते. कोणाचे हात तुटलेले होते, कोणाचे पाय तुटलेले होते. एका पोलीस अधिकाऱ्याचा तर कमरेवरचा भाग गेला होता फक्त त्याच्या कमरेला पट्टा शिल्लक होता. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये जखमींना पाहण्यासाठी गेलो होतो. त्याठिकाणी अनेक लोकांच्या हातांचे पंज्यांनी थैल्या भरल्या होत्या. प्रेताला प्रेते चिकटलेली होती. माणसांचे मेंदू बाहेर आले होते. रक्ताच्या थारोळ्यात अनेकजण पडलेले दिसत होते. कोणाचा डोळा गेला होता, कोणाचा हात तुटला होता, कुणाचे पंजे गेले होते, कुणाचा पाय तुटला होता, हे दृश्य उघड्या डोळ्यांनी पहावत नव्हते.

सभापती महोदय, सन 1993 मध्ये जी बॉम्ब स्फोटाची मालिका झाली होती त्यामागील उद्देश हा मुंबई शहराची आर्थिक घडी विस्कळीत करण्याचा प्रयत्न होता, असे मला वाटते. मुंबई शहर खिळखिळे करायचे असा बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्यांचा हेतू होता. मुंबई शहर उद्ध्वस्त करावयाचे असा कट त्यावेळी झाला होता. पण यावेळी जी बॉम्बस्फोटाची मालिका घडवून आणण्यात आली आहे, त्यामागे मुंबई शहरातील लोकांचे खच्चीकरण झाले पाहिजे असा हेतू दिसून येतो. मुंबई शहरात दहशत पसरविली की संपूर्ण महाराष्ट्रात दहशत पसरते अशातऱ्हेने हे बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले आहेत. या बॉम्बस्फोटाची मालिका पाहिली तर एकेका मिनिटांच्या अंतरावर हे बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले आहेत. इतक्या पध्दतशीरपणे हे कृत्य घडवून आणणण्यात आले आहे. मला वाटते की, हा प्लॅन बऱ्याच दिवसांपासून सुरु होता. त्याची ट्रायलही घेण्यात आली असावी आणि ही ट्रायल सक्सेस झाल्यावर अशातऱ्हेने बॉम्बस्फोटाची मालिका घडवून आणण्यात आली आहे. हे साध्या माणसाचे काम नाही. यामध्ये अतिरेकी संघटना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

निश्चितपणे गुंतलेल्या आहेत आणि महाराष्ट्रात तशी पार्श्वभूमीसुध्दा आहे. मुंबई शहरावर हा जो हल्ला झालेला आहे तो फक्त मुंबई शहरावर झाला नसून महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेवर झाला असून महाराष्ट्राला अड्डा बनविण्याचे काम या अतिरेक्यांनी केलेले आहे.

मागील काही घटना पाहिल्या तर संपूर्ण महाराष्ट्र दशहतीच्या छायेत वावरत असल्याचे दिसून येते. दिनांक 6.4.2006 रोजी नांदेड येथे फटाक्यांचा स्फोट होऊन त्यामध्ये दोघाजणांचा मृत्यू झाला. दिनांक 10.5.2006 रोजी 30 किलो आरडीएक्स आणि शस्त्रास्त्रांचा साठा सापडला. दिनांक 13.5.2006 रोजी जळगाव जिल्ह्यातील येवला तालुक्यात 50 हात बॉम्ब आणि 30 जिवंत काडतुसे सापडली. दिनांक 14.5.2006 रोजी मालेगाव येथे 12 किलो आरडीएक्स आणि शस्त्रास्त्रे सापडली. दिनांक 1.6.2006 रोजी नागपूर येथील संघ कार्यालयावर अतिरेक्यांचा होणारा हल्ला नागपूर पोलिसांनी उधळून लावला. दिनांक 18.1.1993 रोजी कांजूरमार्ग-भांडूप लोकलमध्ये बॉम्बस्फोट झाला. दिनांक 17.6.1993 रोजी मुंबई सेंट्रलमध्ये येथे, दिनांक 7.6.1993 रोजी अंधेरी येथे आणि पुन्हा दिनांक 30.7.1993 रोजी मुंबई सेंट्रलमध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर दिनांक 7.9.1993 मध्ये दादर, दिनांक 29.10.19993 मध्ये माटुंगा, दिनांक 23.1.1998 मध्ये कांजूरमार्ग येथे बॉम्बस्फोट झाले. दिनांक 12.2.2002 रोजी घाटकोपर येथे बॉम्बस्फोट झाला त्यामध्ये 3 ठार आणि 38 जण जखमी झाले.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ssp/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित 14:05

श्री.पांडुरंग फुंडकर....

दि.6.12.2002 रोजी मुंबई सेंट्रल येथे, दि.27.1.2003 रोजी विलेपार्ले येथे, दि.17.3.2003 रोजी मुलूंड येथे व दि.25.5.2003 रोजी गेट वे ऑफ इंडिया, झव्हेरी बाजार येथे बॉम्बस्फोट होऊन 46 जण मृत्यूमुखी पडले व 160 जण जखमी झाले. दि.28.7.2003 घाटकोपर येथे बॉम्बस्फोट झ ाला, अशा प्रकारे बॉम्बस्फोटाची मालिका आहे. सन 1993 पासून या महाराष्ट्रावर सतत अतिरेक्यांची आक्रमणे सुरु आहेत. औरंगाबाद, मनमाड आणि नाशिक या परिसरामध्ये आरडीएक्स, स्फोटके सापडली. यावरुन या स्फोटकांच्या माध्यमातून महाराष्ट्रात निश्चितपणे घातपात घडविण्याचा डाव असल्याचे आपल्याला लक्षात येऊ शकते. पोलिसांनी याबाबतीत अंदाज काढले. त्यांच्या अंदाजानुसार अजून आरडीएक्सचा व स्फोटकांचा साठा सापडायचा शिल्लक आहे. एवढया साठयावरुनच मुंबईतील 200 च्यावर माणसे मेली, आणखी शिल्लक आरडीएक्सच्या साठयाचा वापर अतिरेक्यांनी केला असता तर या महाराष्ट्राचे काय झाले असते, याची कल्पनाच न केलेली बरी. राज्य शासनाची यंत्रणा जशी कमी पडते तसे याला केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे निर्णयही कारणीभूत आहेत. केंद्र सरकारने पोटा कायदा रद्द केला. तो का रद्द केला ? कोणासाठी रद्द केला ? जो पोटा कायदा आपण अतिरेकी कारवाया करणाऱ्यांसाठी, देशाला व महाराष्ट्राला उदध्वस्त करणाऱ्या लोकांसाठी तयार केला होता, तो कायदा रद्द करण्याची कारणे काय ? याचे उत्तर माननीय गृहमंत्री महोदय आपण दिले पाहिजे. आज आपण कदाचित पोटा कायदा रद्द केला नसता तर असे बॉम्बस्फोट झाले नसते. मग, आपण कोणासाठी हा कायदा रद्द केला ? कोणाची मते मिळावीत म्हणून हा कायदा रद्द केला ? पोटा सारखा कायदा रद्द करुन आपण अतिरेक्यांना मैदान मोकळे करुन दिले आहे. सभापती महोदय, मी याठिकाणी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याबाबतीत याठिकाणी खरेच मुंबईच्या लोकांचे कौतुक केले पाहिजे. मुंबईच्या लोकांनी काल फारच चांगल्या पध्दतीने मानवतावाद दाखविला. काल झालेल्या बॉम्बस्फोटानंतर अजूनही काही गोष्टी करावयाच्या बाकी आहेत. काल जी प्रेते, मुडदे पडली त्यातील अजून बऱ्याचशा प्रत्यांची ओळख व्हायची आहे, बऱ्याच प्रेतांचे अजून पोस्टमार्टम व्हायचे आहे, बऱ्याचशा प्रेतांचे अजून पत्ते मिळालेले नाहीत, बऱ्याच प्रेतांची विल्हेवाट पाहिजे त्याठिकाणी करणे आवश्यक आहे. ज्याला ज्याला आवश्यक असेल त्याला त्याला औषधोपचार मिळाले पाहिजेत. आपण सर्व दवाखान्यांचा खर्च मान्य केला आहे, परंतु आवश्यकतेनुसार त्या त्या दवाखान्यामध्ये

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

प्रेते ताबडतोबीने पाठविली पाहिजेत. काल कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, केंद्रीय गृहमंत्री व रेल्वे मंत्री याठिकाणी येऊन गेले व त्यांनी काही घोषणा केल्या. गृहमंत्र्यांनी सांगितले की, मुंबईमध्ये जी बॉम्बस्फोटांची मालिका झाली त्याची गुप्तचर यंत्रणेला माहिती होती. त्यांना माहिती होती की, महाराष्ट्रामध्ये काही तरी घडणार आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या गृहमंत्र्यांनी स्टेटमेंट दिले की, आम्हाला याची माहिती नव्हती. माननीय गृहमंत्री महोदय, आपण कधी कधी उपरोधीकपणे बोलता. परंतु आपण कडक बंदोबस्त ठेवावयास पाहिजे होता. अतिरेकी आपल्याला काही सांगायला येणार नाहीत की, आम्ही या या याठिकाणी बॉम्ब ठेवलेला आहे ? एका बाजुला केंद्रीय गृहमंत्री सांगतात की, या मुंबईमध्ये बॉम्बस्फोट होणार असून याची माहिती गुप्तचर खात्याने कळविली आहे, फक्त त्यांनी तारीख कळवली नाही, असे त्यांनी सांगितले. परंतु आपले गृहमंत्री सांगतात की, गुप्तचर यंत्रणेकडून अशी माहिती मिळाली नाही. आपल्यामध्ये समन्वय दिसून येत नाही. केंद्रामध्ये व राज्यामध्ये आपलेच सरकार आहे. असे असतानाही आपल्यामध्ये समन्वय दिसून येत नाही, हे योग्य नाही. आपण आम्हास शांततेचे आवाहन केले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष असेल शिवसेना असेल यांनी राजकीय फायदा उठविण्याचा प्रयत्न केला नाही. अन्यथा, आज आम्हाला मुंबई बंद करता आली असती, निदर्शने करता आली असती, तुमच्या नेत्यांना काळे झेंडे दाखविता आले असते, गृहमंत्र्यांना निदर्शने करुन 'परत जा' म्हणून सांगता आले असते. परंतु, आम्ही या विषयाचे राजकारण केले नाही आणि आम्ही तसे करु इच्छितही नाही. कारण, हे संकट काही एकटया तुमच्यावर, गृह खात्यावर आलेले आहे असे आम्ही मानत नाही तर हे संकट संपूर्ण महाराष्ट्रावर आलेले आहे. अशा प्रकारच्या बाहेरील शक्ती महाराष्ट्राला उद्ध्वस्त करण्याचा किंवा देश उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करणार असतील तर त्यांचा या राज्यातील सत्ताधारी पक्ष असेल, विरोधी पक्ष असेल, महाराष्ट्रातील जनता असेल सर्वांनी मिळून मुकाबला केला पाहिजे, या मानसिकतेचे आम्ही कार्यकर्ते आहोत. अशावेळी शांततेचे आवाहन करणे, जनतेला शांतता राखण्यास सांगणे, मदत पुरवठा करणे, रक्तदान शिबिरे घेणे या सांगण्याच्या गोष्टी नाहीत म्हणून आम्ही राजकारण केले नाही. आपण शांततेचे आवाहन करण्यास सांगितले, आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत. ही परिस्थिती महाराष्ट्रातून ताबडतोब निवळली पाहिजे, मुंबईचे जीवन सुरळित सुरु झाले पाहिजे, दहशत निघून गेली पाहिजे यासाठी विरोधी पक्ष सहकार्य करण्यास तयार आहे. परंतु, हे सहकार्य करण्यासाठी काही गोष्टी आपल्याला या निमित्ताने सांगाव्याशा वाटतात. या मुंबईमध्ये शांतता निर्माण होण्यासाठी मुंबईला टारगेट करणा-या किती अतिरेक्यांवर गेल्या वर्षभरात शासनाने कारवाई केली ? त्या अतिरेक्यांवर कुठल्या प्रकारची कारवाई केली ? त्यांचा कुठल्या प्रकाराने शोध घेतला ? ही मानसिकता या महाराष्ट्रामध्ये वाढू नये म्हणून कुठल्या पध्दतीने कडक कायदा करुन, कारवाई करुन रोखण्याचा प्रयत्न केला गेला ? भिवंडीची दंगल तुम्हाला काय सांगते ? दंगल कशासाठी झाली ? भिवंडीमध्ये मशिदीसमोर पोलीस स्टेशन, एस.पी.कार्यालयाचे बांधकाम सुरु झाले. त्या ठिकाणी पोलीस स्टेशन होऊ नये, एस.पी.कार्यालय बांधले जाऊ नये अशा प्रकारची मागणी एका प्रवृत्तीने केली आणि नुसती मागणी करुन ते थांबले नाही तर 3/4 हजारांचा जमाव एकत्र येऊन 'अल्ला हुँ अकबर' असा नारा देऊन पोलीस स्टेशनचे बांधकाम बंद पाडण्यात आले. तुमच्या पोलिसांना ठेचून मारण्याचा प्रयत्न केला, त्यांनी पोलिसांना ठेचून मारले नाही तर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MAP/

श्री.पांडुरंग फुंडकर..........

त्यांनी तुम्हाला ठेचून मारले, त्यांनी पोलिसांवर हल्ला केला नाही तर या सरकारवर हल्ला केला, असेच म्हणावे लागेल. एवढे करुन ते थांबले नाही तर त्यांनी असा इशारा दिला की, या ठिकाणी पोलीस स्टेशन बांधले जाऊ देणार नाही. ती कुणाची जागा आहे ? गेल्या 50 वर्षापासून पोलिसांच्या ताब्यात जागा असतांना त्या जागेवर अधिकार सांगितला जातो ? दादागिरी केली जाते? नुसती दादागिरीच केली जात नाही तर अशा पध्दतीने दंगल करुन पोलिसांना मारुन सरकारला बांधकामास स्थगिती देण्यास भाग पाडले जाते ? ही मनोवृत्ती कोणाची आहे ? आणि या मनोविकृतीपुढे आपण वाकला ? तेंव्हा आपण या ठिकाणी बांधकाम पुन्हा सुरु करणार आहात की नाही ? की अशा मनोविकृतीला प्रोत्साहन देणार आहात ? या मनोविकृतीच्या दबावाला बळी पडणार आहात का ? त्यांच्या धमकीला बळी पडणार आहात का ? ही धमकी त्यांनी कुणाला दिली आहे ? ही धमकी त्यांनी पोलिसांना नव्हे, एस.पी.ना नव्हे, या राज्याच्या गृहमंत्र्यांना नव्हे तर महाराष्ट्राच्या सरकारला त्यांनी धमकी दिलेली आहे. त्या धमकीपुढे तुम्ही वाकणार आणि मग सांगणार की, हे बॉम्बस्फोट कसे झाले ? बॉम्बस्फोट करण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रात वाढलेली आहे. पोलीस अधिका-यांच्या बदल्या झाल्या. कशा झाल्या ? आपल्याकडे झालेल्या बैठकीत काही लोकांनी त्या ठिकाणी हा मुद्दा मांडला, त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. परंतु, सक्षम पोलीस अधिका-यांची बदली करण्यात आली. ज्यांनी मुंबईच्या बॉम्बस्फोटाचा तपास करुन आरोपी पकडले अशा अधिका-यांची बदली झाली, त्यांना जेलमध्ये टाकण्याची तयारी झाली तर काही अधिका-यांना जेलमध्ये टाकले गेले. ज्या पोलीस अधिका-यांनी दहशतवाद्यांना मारले त्या पोलीस अधिका-यांवर केसेस दाखल केल्या गेल्या.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KGS/ MAP/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 14:15

श्री.पांडुरंग फुंडकर .........

पोलिसांचे मनोधैर्य ठिकाणावर राहील काय ? असे निर्णय आपण करणार असाल तर कसे होईल ? सन 1993 साली मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाला. त्यावेळी जवळपास 124 आरोपींवर खटला दाखल करण्यात आला. त्या खटल्यातील 22 आरोपी फरार आहेत. त्या 22 आरोपींना फरार घोषित केलेले आहे. 13 वर्षापासून हा ऐतिहासिक खटला चालू आहे. आपण अजून किती वर्षे हा खटला चालविणार आहात ? ज्यांनी मुंबई उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, ज्यांनी माणसे मारली अशांवर खटले दाखल करुन जर 13 वर्षे असे खटले न्यायालयामध्ये चालणार असतील तर अतिरेक्यांना असे वाटत असेल की, महाराष्ट्राची भूमी बॉम्बस्फोट करण्यासाठी सुपीक आहे. 13 वर्षे खटल्याचा निकाल लागत नाही. बॉम्बस्फोटातील आरोपी निर्दोष सुटल्याचा निकाल आहे. आरोपी का सुटले याची आपण कधी चौकशी केली काय ? त्याच्या विरुध्द उच्च न्यायालयामध्ये अपिल करण्याचा आपण प्रयत्न केला काय ? यामुळे अतिरेक्यांचा होसला वाढलेला आहे. हिंदुस्तानामध्ये कोठेही गेल्यावर आम्ही स्वाभीमानाने सांगतो की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील माणसे आहोत, आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील माणसे आहोत, आम्ही शाहू महाराजांच्या महाराष्ट्रातील माणसे आहेत. त्यावेळी आम्हाला असा प्रश्न विचारला जातो की, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील माणसे आहात तर तुमच्या महाराष्ट्रामध्ये बॉम्बस्फोट कसे काय होतात ? अतिरेक्यांनी बॉम्बस्फोट करण्यासाठी महाराष्ट्राची भूमी का निवडली ? कारण ही भूमी भुसभुशीत आहे. अतिरेक्यांना असे वाटते की, महाराष्ट्रामध्ये बॉम्बस्फोट केले तर आपण निर्दोष सुटतो म्हणून ते महाराष्ट्रामध्ये बॉम्बस्फोट करतात. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये लादेन झिंदाबादचे नारे दिले जातात. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणा देण्यावर बंदी केली जाते. शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला अशा प्रकारचे कॅलेंडर ज्यांनी काढले त्यांच्यावर केस दाखल करण्यात आली. महाराष्ट्राशी लादेनचा काय संबंध आहे ? अफजलखान महाराष्ट्राचा काय लागून गेला ? क्रिकेटची मॅच जर हिंदुस्तान हरला तर पाकिस्तान झिंदाबादचे नारे दिले जातात. माननीय श्री.आर.आर.पाटील सांगतात की, आमचे गृह खाते फार चांगले काम करीत आहे. कोणत्या मनोवृत्तीला आपण प्रोत्साहन देणार आहात ? कोणत्या मनोवृत्तीला आपण खतपाणी घालणार आहात ? आबा तुम्हाला

...2/-

GRB/ SBT/ KGS/ MAP/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......                14:15

श्री.पांडुरंग फुंडकर .........

कडक व्हावे लागणार आहे. भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना तुम्हाला विरोध करीत नाही. महाराष्ट्रामध्ये अतिरेकी यापुढे बॉम्बस्फोट घडवून आणण्याची हिंमत करु शकणार नाहीत, असा मेसेज जर तुम्हाला द्यावयाचा असेल तर तुम्ही कायद्यामध्ये बदल करा. कायद्यामध्ये तशा प्रकारचा बदल का केला जात नाही ? परवा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडतांना सांगितले की, आपल्या सभागृहापर्यंत अतिरेकी येऊ शकतात. ज्या ठिकाणी आमदार राहतात त्या आमदार निवासामध्ये अतिरेकी आले आणि तेथून निघून गेले. तेथील एखादा अतिरेकी या बॉम्बस्फोटाचा सुत्रधार असू शकतो काय  ? याची आपण चौकशी करा.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 14:20

श्री. फुंडकर .....

अशा पद्धतीने हा महाराष्ट्र चालला तर दरवेळेस आपण अशा प्रसंगांवर येथे चर्चा करतो, आपण त्या चर्चेला उत्तर देताना आम्ही कडक कारवाई करू म्हणून आश्वासन देता आणि परत महाराष्ट्रातील सामान्य माणसांचे मुडदे पाडले जातात, ही परंपरा आपण थांबविणार आहात काय ? हा सवाल या चर्चेच्या निमित्ताने आम्ही, महाराष्ट्रातील जनता, आपल्याला विचारते आहे. सभापती महोदय, आज या ठिकाणी आम्हाला एक पत्र दिले. त्यात या बॉम्बस्फोटाच्या घटनांमध्ये किती माणसे मेली, किती जखमी झाली आहेत. ती कोणत्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्याची माहिती दिली आहे आणि या संबंधात जी बैठक घेतली गेली त्यामध्ये चर्चा करीत असताना आपण शांततेचे आवाहन केले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कोणत्याही चांगल्या गोष्टीसाठी आम्ही विरोधी पक्ष म्हणून आपणास जरूर सहकार्य करू परंतु चुकीच्या गोष्टीचे मात्र आम्ही अजिबात समर्थन करणार नाही, त्यासाठी आपल्याला सहकार्य करणार नाही. या छत्रपतींच्या महाराष्ट्रात 'लादेन जिंदाबाद'च्या घोषणा देणाऱ्यांना पाठीशी घालणार असाल, 'जय भवानी, जय शिवाजी' म्हणणाऱ्यांवर बंदी घालणार असाल, 'पाकिस्तान जिंदाबाद'चे नारे लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याऐवजी त्याकडे कानाडोळा केला जात असेल तर त्यासाठी आपल्याला आम्ही अजिबात समर्थन देणार नाही. अशाच लोकांनी या महाराष्ट्राला खिळखिळे करण्याचा प्रयत्न केला आहे, छत्रपतींच्या या महाराष्ट्रात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला तर ते आम्ही खपवून घेणार नाही, त्याला आम्ही क्षमा करणार नाही. मतांसाठी लांगूलचालन करून अशा समाजविघातक, राष्ट्रविघातक शक्तींवर आपण कारवाई करणार नसाल तर त्याचाही विचार आपण केला पाहिजे. आम्ही कोणत्याही धर्माच्या वा पंथाच्या विरोधात नाही. परंतु ही जी प्रवृत्ती महाराष्ट्रात सध्या फोफावली आहे तिने महाराष्ट्रात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे त्या प्रवृत्तीला कोठे तरी ठोकून काढले गेले पाहिजे. त्यांचे अड्डे उद्‌ध्वस्त केले गेले पाहिजेत. सभापती महोदय, काल या मुंबई शहरामध्ये 7 बॉम्बस्फोट झाले, महाराष्ट्रात त्यासाठी प्रचंड प्रमाणात आरडीएक्सचा साठा असल्याची माहिती पोलिसांच्याच अंदाजाने सांगितली जाते. तर मग आता हा शिल्लक आरडीएक्सचा साठा ते लोक तसाच ठेवणार आहेत का ? तो आपण शोधून काढा आणि ज्यांच्याकडे तो सापडेल, जेथे सापडेल त्यांना तेथेच चिरडून टाका. त्यासाठी कठोर पावले उचलली गेली तरच हा महाराष्ट्र सुरक्षित राहू शकेल. येथील सामान्य माणूस सुखाने जगू शकेल.,

...... पी 2 ...

श्री. फुंडकर .....

अन्यथा रस्त्याने चालावे की नाही, ट्रेनमध्ये बसावे की नाही ही भीती प्रत्येक सामान्य माणसाच्या मनामध्ये निर्माण होणार आहे. या महाराष्ट्रात आज कायदा आणि सुव्यवस्था कोठेही दिसत नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी पुन्हा एकदा मागणी करतो, माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आपण एक चांगला माणूस आहात, तुमची नीतीमत्ता तुम्हाला वाढवावयाची असेल तर तुम्ही गृहखाते फेकून द्या. माझ्या कारकीर्दीमध्ये या महाराष्ट्रात, या मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट मालिका झाली आहे म्हणून मी पदावर राहणार नाही असे ठणकावून सांगा आणि पोलीस आयुक्त श्री.अनामी राय यांची या निमित्ताने आजच्या आज बदली करा अशी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

*****

....... पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आम्हा सर्व सदस्यांचे हे दुर्दैव आहे की, प्रत्येक वेळी या सदनामध्ये अतिशय कठोरपणे महाराष्ट्राची भूमिका, या देशाची भूमिका मांडण्याचा प्रसंग आमच्यावर केवळ येतो आणि आपण त्याचा गैरफायदा घेऊन आम्हाला 'जातीयवादी' असे म्हणता. आता जातीयवादी कोण आहेत याचा शोध घेण्याची वेळ आलेली आहे. खरा जातीयवादी कोण ? जातीच्या नावावर मते मागतात ते जातीयवादी की, जाती-पातींचे, धर्माचे राजकारण करून, एखाद्या समाजाचे, जातीच्या लोकांचे लांगूलचालन करून त्यांची मेहरबानी पाहिजे म्हणून, राज्य आपल्यालाच चालविण्यास मिळावे म्हणून मंत्री पदे देतात ते जातीयवादी की जे राष्ट्राच्या हितासाठी हे जे काही जातीयवादी आहेत, जे देशावर संकटे आणीत असतात वा आहेत त्यांना दूर करा असे सांगणारे जातीयवादी, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, काल एक दुर्दैवी घटना घडली, त्यानंतर एका पाठोपाठ दोन घटना घडल्या. आमचे मित्र कै. वसंत चव्हाण जे आज आमच्यामध्ये नाहीत. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल सदनाचे कामकाज बंद ठेवावे अशी आम्ही आपणास विनंती केली. एक चांगला मनुष्य गेला. या सदनामध्ये त्यांचे काम होते असा मनुष्य गेला. त्यामुळे आपण काल सदनाचे कामकाज थांबविले. त्या अगोदर सोमवारी देखील सभागृहाचे कामकाज बंद झाले. कारण रविवारी काही लोकांनी जो गोंधळ घातला , देवदेवतांच्या मूर्त्यांची विटंबना केली गेली, मॉ साहेबांच्या पुतळ्याला चिखल फासला गेला. त्याबद्दल ज्या प्रतिक्रिया उमटल्या, त्यामुळे सोमवारी कामकाज झाले नाही. कालचा दिवस उजाडल्यानंतर, दुसरी दुर्दैवी घटना घडली आणि बॉम्बस्फोटांच्या मालिकेमुळे आजचा दिवस उजाडला. त्यामुळे आज सुध्दा सभागृहाचे कामकाज होणार नाही. या महाराष्ट्रामध्ये काय चालले आहे? आमचा साधा आणि सरळ प्रश्न आहे की, हे असे कां घडत आहे? आपल्याला कल्पना आहे की, यावेळी रविवारी हा प्रश्न आमच्याकडे आला होता त्यावेळी आम्ही कंठशोष करुन सांगितले होते की, आपण या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन तपास करा. परंतु आपण आव्हान देऊन असे सांगितले की, "आम्ही जर नावे उघड केली तर विरोधक अडचणीत येतील," अशाप्रकारचे भाष्य केले. माझे आपणाला आव्हान आहे की, आम्ही अडचणीत आलो तरी हरकत नाही. तुम्ही ती माहिती जाहीर करुन टाका. त्या प्रकरणाला अशाप्रकारचे वळण देण्याचा प्रयत्न झाला हा अत्यंत दुर्दैवी प्रयत्न आहे. समोर गाढव दिसले तर त्याला गोपाळराव म्हणून नमस्कार करण्याची प्रवृत्ती या सरकारची वाढत चालली आहे. गाढवाला गाढव म्हणावयाचे नाही, अतिरेक्याला अतिरेकी म्हणावयाचे नाही तर त्याला "अल्पसंख्यांक " म्हणावयाचे. आणखी काही नाव देऊन त्याला नमस्कार करण्याची प्रवृत्ती वाढली आहे.कारण आपल्याला सत्ता उपभोगता आली पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि मी उल्लेख केला आहे की, "आबा गृह खाते ही तारेवरची कसरत आहे". असे एक-दोन वेळा बोललो आहे.आपण अनेक गोष्टी बोलता, अनेक गोष्टी करता. परंतु शेवटी अवास्तव निघाले की माघार घेता. त्यामुळे विषयाला न्याय मिळत नाही. महाराष्ट्राच्या गृह खात्यावर आणि कायदा व सुव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. निरनिराळया प्रकारची शस्त्रास्त्रे आणि आरडीएक्सचा साठा मिळाला आणि तो आमच्या पोलीस यंत्रणेने शोधून काढला, तो जनतेसमोर आणला असे आपण अनेक वेळा सांगितले. हा आरडीएक्सचा साठा सापडला आहे, त्यापैकी आणखी काही साठा महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्रातील जनता या आरडीएक्सच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

स्फोटामध्ये मारली जाईल काय? याचा अर्थ आरडीएक्सचा साठा करणारे कोण लोक आहेत याचा शोध घेणार काय? परवा जो प्रकार झाला त्याबद्दल आमच्या मनामध्ये दु:ख आहे. काल सदनामध्ये कोणतेही कामकाज झाले नाही म्हणून मी काल विषय काढला नाही. मला आपल्याला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, आपल्या मंत्रिमंडळातील एक सदस्य निराळे स्टेटमेंट करतात की, या शासनाची शिवसेनेला मदत आहे, म्हणून आपण बंद घडवून आणला. आणि दुसरीकडे आपण म्हणता की, श्री. नारायण राणे यांच्याकडे गुप्तचर यंत्रणा आहे की, कोणती स्पेशल यंत्रणा आहे हे मला माहीत नाही. आणि माननीय मुख्यमंत्री "नारायण, नारायण" म्हणत हा माणूस कुठे आग घालीत सुटला आहे मला माहीत नाही, हे त्यांना तुम्ही जाऊन विचारा असे म्हणाले. या शासनातील तीन मंत्री तीन निरनिराळी स्टेटमेंटस करतात, आणि काल या सदनामध्ये त्यासंबंधी काही उल्लेख होत नाही. हे एकमुखी सरकार आहे का त्रिमुखी आहे? हे समजायला मार्ग नाही. "दत्त" असेल तर चालेल, त्यांच्याकडून काही वाईट होणार नाही. परतु या तिघांकडून वाईट होत आहे. या परिस्थितीमध्ये एकसंघपणा नसेल तर शासनाने घेतलेला कोणताही निर्णय असेल तो एकसंघपणे घेतला नसेल तर त्याला आपण कसे सामोरे जायचे? आणि इतरांनी त्यासंबंधी टीका करावयाची. अशा परिस्थितीमुळे तुमच्या आमच्या महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. भिवंडीचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये उपस्थित केला.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 14:30

श्री.मधुकर सरपोतदार पुढे (सुरु...

मी त्या दिवशीसुध्दा त्यावर बोललो होतो. अमुक एका ठिकाणी पोलीस चौकी बांधायची अशाप्रकारचा शासनाने निर्णय घेतला, त्याप्रमाणे पोलीस चौकीचे काम चालू झाले. सभापती महोदय, मला अशी माहिती मिळाली की, त्या पोलीस चौकीचे भूमीपुजन हे आपल्या हस्ते झालेले होते. त्या ठिकाणी पोलीस चौकी व्हायला पाहिजे म्हणून आपण पुढाकार घेतला, त्यासाठी आमदार, खासदारांचा निधीही दिला गेला. पोलीस चौकी बांधण्याचे काम सुरु असताना कोणी तरी टिक्कोजीराव आबू आझमी संपूर्ण शासनाना आणि महाराष्ट्राला आव्हान देतो की, त्या ठिकाणची जरी शासनाची जमीन असली तरी देखील त्या जागेवर पोलीस चौकी होऊ देणार नाही. माझा असा सवाल आहे की, Mr.Deputy Chief Minister, what message are sending to all these people ? असा मेसेज जात आहे. त्या दिवशी त्यांना विनंती केली की, आमची भूमी असेल तर आम्ही पोलीस चौकी बांधू, असे सांगून त्या ठिकाणचे आपण काम थांबविले. सातबाराच्या उतारा शासनाच्या नावाने आहे, ती जागा शासनाच्या मालकीची आहे. असे असताना, शासन अतिरेक्यांचे म्हणणे स्वीकारते असा त्याचा अर्थ होतो. कोणीही यावे टपली मारुन जावे, कंबरड्यात लाथ घालावी, कोण्ीही यावे, स्त्रीला पळवून नेवून तिच्यावर बलात्कार करावा, कोणीहीही येथे येऊन बॉम्बस्फोट करावेत, तरीही कोणाला काही सजा होत नाही. अशाप्रकारचे चित्र महाराष्ट्रामध्ये दिसत आहे. तुम्ही जरी मानले नाही तरी सगळ्या महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारचा मेसेच जातो आहे. तेच अतिरेक्यांनी ओळखले आणि मुंबईतील जनतेला बळी दिले. एकूण 14 मिनिटांच्या आत सात-आठ ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणले, हा काय प्रकार आहे ? त्यांची अशी हिम्मत कशी झाली ? हे अतिरेकी कोठे लपलेले आहेत ? खार स्टेशनवर बॉम्बस्फोट झाला त्या ठिकाणची आजूबाजूची वस्ती कोणाची आहे ? बांद्रा स्टेशनजवळ बॉम्बस्फोट झाला, त्याच्या आजूबाजूला कोणाची वस्ती आहे ? हे पहाणे गरजेचे आहे.

बांद्रा (पूर्व) या ठिकाणी रेल्वेने तिकीट घर बांधले, परंतु मुंबई महानगरपालिकेने त्यास परवानगी दिली नाही. पण आज बांधलेल्या जागेमध्ये जे कोणी रहातात, ते कोण आहेत ? याचा शोध घेतलेला आहे काय ? कुर्ला स्टेशन परिसरामध्ये, खार रेल्वे स्टेशन परिसरामध्ये, अंधेरी रेल्वे स्टेशन परिसरामध्ये कोण लोक रहातात, याची माहिती घेतलेले आहे काय ? त्या ठिकाणचे सगळेच लोक वाईट आहेत, असे मी म्हणत नाही. परंतु चांगली माणसे वाईट लोकांच्या समोर मान वर करुन बोलत नाहीत. आज बांद्रा रेल्वे स्टेशन परिसरात काय अवस्था आहे, त्या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

कोणाच्या झोपड्या आहेत, याचा कधी विचार झाला नाही. परवा बांद्रा येथील तीन मजली इमारत कोसळल्याची बातमी आली. परंतु ती इमारत नसून बांद्रा स्टेशनच्या शेजारी एकावर एक बांधलेल्या पत्र्याच्या झोपड्या होत्या त्या कोसळल्या. मी जे विषय मांडले ते गृह खात्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत, म्हणून त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझी एक अडचण झालेली आहे, विधानसभेमध्येही याच विषयावर चर्चा चालू आहे. त्या ठिकाणी उपस्थित रहाण्याबाबत मला चिठ्ठी आलेली आहे. मला त्या ठिकाणी जाण्याची आपण परवानगी द्यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रश्नांना कोण उत्तरे देणार ?

श्री.आर.आर.पाटील : निरोप देऊन परत येतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांवर देखील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी आहे. तेव्हा त्यांनी विधानसभेमध्ये या विषयाच्या संदर्भाने उपस्थित झालेल्या प्रश्नांच्या उत्तरे द्यावीत आणि या ठिकाणी या सभागृहाचे नेते म्हणून माननीय उप मुख्य मंत्री यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील विषयाच्या संदर्भात उत्तर द्यावीत.

श्री.आर.आर.पाटील : मी सांगून परत येते.

**उपसभापती** : ठीक आहे आपण सांगून यावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय,  हे जे प्रकार घडतात ते फार लाईटली घेतले जातात. त्याचे परिणाम बॉम्बस्फोट करण्यामध्ये होतात. 12 मार्च 1993 रोजी मुंबईमध्ये 12-13 बॉम्बस्फोट झाले. त्यामध्ये 450 माणसे मृत्यूमुखी पडली, हजारो माणसे अपंग झाली, त्या माणसांची चौकशी झाली आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

त्या माणसांची कोणी चौकशी केली काय ? ते कोठे राहतात ? काय खातात ? त्यांच्या घरची परिस्थिती काय आहे ? याची कोणी चौकशी केली आहे काय ? कालच्या बॉम्बस्फोटामध्ये 683 लोक जखमी झालेले आहेत. ती माणसे कोठली आहेत ? ते कोठे राहतात ? त्यांच्या घरची परिस्थिती काय आहे ? त्यांच्या घरी कोणी कमविणारे आहेत काय ? याची चौकशी कोणी करणार आहे काय ? ते करणार नाही पण जे अतिरेक्यांच्या पाठी फिरतात त्यांना लागेल ती मदत केली जाते. परवा भिवंडीच्या पोलीस गोळीबारामध्ये तेथील दोन माणसे मारली गेल्यावर त्यांना ताबडतोब चेकने मदत करण्यासाठी हे शासन धावले. परंतु त्या ठिकाणी ज्या पोलिसांना ठेचून मारले त्यांना मदत देण्यासाठी 8 दिवस लागले. अद्याप त्यांच्यापर्यंत चेक पोहोचला की नाही, हे माहीत नाही. पोलीस खात्याची पर्वा नाही. यामध्ये पोलीस खात्याचा दोष आहे. या ठिकाणी गृह खाते मजबूत असावयास पाहिजे. हे सर्व ऐकण्यासाठी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील सभागृहात हजर असले पाहिजे. ज्या ठिकाणी उगम होतो त्या ठिकाणी स्वच्छ प्रवाह वाहला नाही तर पुढचा सगळा प्रवाह गढूळ होतो. मूळ प्रवाह स्वच्छ असला पाहिजे. प्रत्येक ठिकाणी भीड ठेवावयाची की, या अल्पसंख्यांकांची मते मिळणार नाहीत. त्यांची मते मिळाली पाहिजेत. लोकशाहीमध्ये मताची राजनीती चालते परंतु ज्यावेळी मताची राजनीती डोक्यावर जाऊन बसते त्यावेळी त्याला आवरण्यासाठी राष्ट्रवादी शक्ती उभी राहते, हे विसरुन चालणार नाही. अशा वेळी राष्ट्रवादी शक्ती उभी राहते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, क्रिकेटच्या मॅचमध्ये जर पाकिस्तान हरला तर या ठिकाणी सुतक पाळणारे लोक आहेत. जर हिंदुस्थान मॅच हरला तर फटाके वाजवून दिवाळी साजरी करणारा मुस्लिम समाज या देशामध्ये आणि या राज्यामध्ये आहे. हे शासनाला माहीत असून त्याबाबत काही बोलण्याची शासनाची हिंमत नाही. शासन कधी असे म्हणत नाही की, हा हिंदुस्थान देश आहे. जर हिंदुस्थान हरला तर तुम्ही दिवाळी साजरी करु शकत नाही. तुम्हाला फटाके वाजविता येणार नाहीत. तुम्ही पाकिस्तान झिंदाबादचे नारे देऊ शकत नाही. असे बोलण्याची या शासनाची हिंमत नाही. कारण मग कोणाच्या बळावर निवडून येणार ? सर्व मुस्लिम समाज अशा पध्दतीचा नाही. या ठिकाणी अनेक चांगले मुस्लिम आहेत. त्यांचे या देशावर प्रेम आहे. ते रोज आम्हाला भेटतात. परंतु या लोकांसमोर त्यांची ताकद काही नाही. त्या बिचाऱ्यांना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. मधुकर सरपोतदार .....

दाबले जाते. सभापती महोदय, समोरच्या बाजूचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही कोठेही असलो तरी ज्यावेळी राष्ट्राच्या विरोधात प्रसंग उभा राहील त्यावेळी आम्ही राष्ट्राच्या बाजूने उभे राहणारे लोक आहोत. राष्ट्र हे मोठे आहे. राष्ट्र राहिले तरच आपण राहू शकतो. आम्ही जे बोलतो ती वस्तुस्थिती आहे. मी जे बोलत आहे ते पूर्ण जबाबदारीने बोलत आहे. मी जे काही बोललो त्यातील अमूक एक गोष्ट चुकीची आहे असे जर आपण दाखवून दिले तर मी माफी मागेन. शेवटी परिस्थितीला सामोरे जाऊन केवळ नाईलाज म्हणून प्रत्येक गोष्ट करावयाची आणि नंतर ती गोष्ट नाकारावयाची असे चालले आहे. तो मी नव्हेच म्हणून उभे राहावयाचे हे फार भयानक आहे. कालच्या बॉम्बस्फोटाच्या बाबतीत सांगावयाचे तर खार आणि बांद्रा स्टेशनमध्ये ज्या जागी बॉम्बस्फोट झाले ती जागा आपण तपासावी. त्या ठिकाणी गाड्या थांबल्या. माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. मी त्यांना पत्र पाठविले आहे. ज्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाले त्या ठिकाणी आरसीसी बांधकाम चालू आहे. ज्या ठिकाणी झोपड्या होत्या, कच्ची घरे होती ती पाडून आरसीसी इमारतीचे बांधकाम काम चालू आहे. याबाबत मी महापालिकेला कळविले. काल महापालिकेचे आयुक्त भेटले. त्यांना मी आठवण करुन दिली की, तुम्ही बेहरामपाड्यामध्ये गेला होता, तेथील इमारत पडली असे तुम्ही म्हणता, त्या ठिकाणी इमारत होती काय ? असे मी त्यांना विचारले.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:40

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

आयुक्तांनी सांगितले की, त्या ठिकाणी 5 मजल्यांची इमारत कोसळली आहे. आता ते तरी काय करणार ? ते त्याला इमारत म्हणणार नाही तर काय 5 मजल्यांच्या झोपड्या म्हणणार ? अशा प्रकारच्या अनेक समस्या तुमच्या समोर आहेत. मी माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांना पत्र लिहिले होते. त्या पत्राबाबत मी त्यांना विचारणा केली त्यावेळी ते मला म्हणाले की, "तुम्ही मला पत्राची प्रत आणून द्या, मी ताबडतोब कारवाई करतो." आम्ही मंत्री महोदयांना पुराव्यानिशी पत्र लिहायचे, त्याकडे त्यांनी लक्ष द्यायचे नाही, विचारणा केल्यावर दुसरे पत्र द्या, ताबडतोब कारवाई करतो, असे सांगायचे, हे काही योग्य नाही. सभापती महोदय, हा राज्य कारभार करण्याची कोणती पध्दत आहे ? ज्यावेळी लोकप्रतिनिधी मंत्री महोदयांना पत्र लिहितात त्यावेळी त्या पत्रावर कोणती कारवाई केली अथवा केली नाही हे त्या लोकप्रतिनिधीला सांगणे मंत्री महोदयांचे कर्तव्य आहे. पण तसे होत नाही. मग कशाला ही मंत्रिपदे तुम्ही भूषविता ? मंत्रिपद हे केवळ उपभोगण्यासाठी नाही. मंत्रिपदाबरोबर काही जबाबदा-याही पार पाडाव्या लागतात. टीका सहन करावी लागते. जो टीका सहन करुन आपल्या कारभारामध्ये सुधारणा करीत नाही तो यशस्वी मंत्री कधीच होऊ शकत नाही, फक्त मंत्रीच राहातो. काल या सदनामध्ये माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके साहेबांचा आम्ही राजीनामा मागितला. प्रा. पुरकेसाहेबांबद्दल आम्हाला व्यक्तिगत द्वेष नाही. जे काही प्रकरण घडले ते आम्ही या सदनामध्ये मांडायचे नाही तर कुठे मांडायचे ? काल घडलेले बॉम्बस्फोट ही वस्तुस्थिती आहे. काल आमचे शिवसैनिक सगळया ठिकाणी रस्त्यामध्ये उभे राहून लोकांना मदत करीत होते. सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव हे जरी आता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये गेले असले तरी तेही अशा प्रकारचे सैनिक आहेत. त्यांचा मूळ पिंड तसा आहे. ...(अडथळा)..

सभापती महोदय, कालच्या बॉम्बस्फोटामध्ये 670 पेक्षा अधिक माणसे जखमी झालेली आहेत. नक्की आकडा किती आहे हे समजलेले नाही. या जखमी लोकांची शासनाने चौकशी केलेली आहे काय ? त्यांची नावांची, पत्त्यांची यादी तयार झालेली आहे काय ? ती यादी तयार झालेली असेल तर त्यांचे नाव आणि पत्ते शासनाने आम्हाला द्यावेत. निदान आम्ही तरी त्यांच्या घरी जाऊन त्यांची विचारपूस करतो आणि अमूक अमूक मदत त्यांना पोहोचवा असे शासनाला सांगतो

..2..

(श्री. मधुकर सरपोतदार..)

शासनाने आपली जबाबदारी पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा वेळी आमचे सैनिक कधीच स्वस्थ बसत नाहीत. आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली त्या बैठकीला मी हजर राहिलो होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी "याबाबतीत तुमचे म्हणणे काय आहे ?" अशी विचारणा केली. माझे म्हणणे मर्यादित होते. आम्ही फक्त मुडदे मोजण्याचे काम करु नये. आमचे 183 लोक बॉम्बस्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेले आहेत. माझे म्हणणे एवढेच की, आमच्या लोकांचे मुडदे पाडणा-या किती अतिरेक्यांचे मुडदे तुम्ही पाडलेत ? किती अतिरेक्यांना गोळ्या घातल्या ? अशा किती अतिरेक्यांचे मुडदे तुमच्याकडे आहेत, ते मला सांगा, आणि हा मेसेज बाहेर गेला तर आणि तरच या अतिरेकी कारवाया कुठे तरी बंद होतील, नाही तर त्या बंद होणार नाहीत.

...नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आपण काय केवळ मुडदेच मोजायचे काम करायचे का ? आपण काय केवळ श्रध्दांजली वाहायचेच काम करावयचे का ? आपली केवळ हीच जबाबदारी आहे काय? माझे एकच म्हणणे आहे की, अशा प्रकारे मुंबई शहरात बॉम्बस्फोट झाल्यानंतर आपण कोणती प्रिव्हेन्टीव्ह ॲक्शन घेतली त्याची यादी आम्हाला द्या, बॉम्बस्फोट होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केलेली आहे याची माहिती आपल्या उत्तरामध्ये येणे आम्हाला अपेक्षित आहे. बॉम्बस्फोट करणारे जे लोक आहेत त्याचा ताबडतोब शोध लावून त्यांना गोळया घाला असे मी माननीय मुख्यमंत्र्यांना सकाळच्या बैठकीत सांगितले होते. ज्यावेळेस इंग्लडंमध्ये अतिरेक्यांनी कारवाई केली होती त्यावेळेस टोनी ब्लेअर यांनी अतिरेक्यांना गोळया घालून मारले. सभापती महोदय, इंग्लडंपेक्षा आपली लोकशाही जुनी नाही. परंतु अतिरेक्यांना ठार मारायची आपली इच्छा शक्ती पाहिजे. पाकिस्तांनातील, बांगलादेशातील लोकांना आपल्या देशांने सांभाळावयाचे आणि त्यांनी आपल्या माणसांनाच मारावयाचे ही लोकशाहीची कोणती पध्दत आहे? मी जेव्हा परेदेशात गेलो होतो व त्यावेळी माझा मुक्काम एका दिवसांनी वाढला होता तेव्हा त्या ठिकाणच्या अधिका-यांने येऊन मला सांगितले की, "तुमचे डिपार्चर आज असले पाहिजे होते". परंतु आपल्याकडे पाकिस्तांनी आणि बांगलादेशी नागरिक येतात आणि आयुष्यभर येथेच राहतात परंतु त्यांना हे शासन कधीही विचारीत नाही की, तुम्ही कधी जाणार? आपल्या येथे हे लोक येऊन आपल्या मुली ते घेऊन जातात. आणि वरुन आपण सेक्यूलरिझमच्या गप्पा मारायच्या? जे अतिरेकी आहेत ते सेक्यूलरिझम आहेत काय ? परवा भिवंडी येथे जी घटना घडली त्या घटनेत दोन पोलिसांना ठेचून ठेचून मारण्यात आले तेव्हा ते सेक्युलेरिझम होते का ? परंतु यासंदर्भात आम्ही काही बोललो तर आम्हाला जातीयवादी ठरवले जाते. आम्ही स्पष्ट बोलतो आणि त्या प्रमाणे कृतीही करतो म्हणून आम्हाला जातीयवादी ठरवले जाते. खरे म्हणजे आपला देश सुरक्षीत रहावा म्हणूनच आम्ही बोलत असतो. आम्ही जी भूमिका घेतलेली आहे तशीच भुमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यामुळेच मुस्लीम धर्म न स्वीकारता बौध्द धर्म स्वीकारला होता. त्यांनी मुस्लीम धर्म न स्वीकारण्याचे कारण म्हणजे हा समाज आपल्या देशाला खाऊन टाकेल, गिळून टाकेल हीच भावना त्यांची असल्यामुळे त्यांनी मुस्लीम धर्म न स्वीकारता बौध्द धर्म स्वीकारला होता.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

ज्यावेळेस आपल्या देशाची फाळणी झाली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती की, हिंदूस्थानातील मुस्लीम लोकांनी पाकिस्तांनात जावे आणि पाकिस्तानातील हिंदूनी हिंदूस्थानात यावे अशी त्यांची इच्छा होती. ज्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई आणि भंडारा येथून निवडणूकीसाठी उभे राहिले तेव्हा त्यांना पाडण्याचे काम याच काँग्रेस सरकारने केले होते आणि आता बाबा साहेबांचे नाव घेणारे लोक काँग्रेस मध्ये जाऊन मांडीला मांडी लावून बसलेले आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल जे वक्तव्य केलेले आहे त्याला माझा आक्षेप आहे. सन्माननीय सदस्य असे म्हणाले आहे की, मुस्लीम आपला देश खाऊन टाकतील, गिळून टाकतील म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुस्लीम धर्म स्वीकारला नाही. परंतु असे वक्तव्य करणे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर अतिक्रमण करणे ठरेल. डॉ. बाबासाहेबांनी जगातील सर्व धर्माचा तौलानिक अभ्यास केला होता व हा तौलानिक अभ्यास केल्यानंतर सर्व धर्म एकच विचाराचे आहेत, केवळ माणसांना माणूसकी शिकवण देणारा धर्म हा बौघ्द धर्म आहे. बौध्द धर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म आहे. या धर्माने कोणाचाही तिरस्कार केलेला नाही. मग इस्लाम असो, खिश्चन असो किंवा कोणताही धर्म असो बौध्द धर्माने कोणाचाही तिरस्कार केलेला नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी )

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे......

इस्लाम धर्म स्वीकारला तर मुसलमान लोक देशाला खाऊन टाकतील म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी इस्लाम धर्म स्वीकारला नाही असे जे वक्तव्य सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी केले आहे ते आक्षेपार्ह आहे. तेव्हा त्यांनी त्यांच्या वक्तव्यामध्ये दुरुस्ती करावी अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इस्लाम, ख्रिश्चन, हिंदू असा कोणताही धर्म न स्वीकारता जगातील सर्वश्रेष्ठ अशा बुध्दधर्माचा स्वीकार केला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती ( श्री.गुरुनाथ कुलकर्णी )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हरकतीच्या मुद्यावर बोलता येत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना कोणकोणत्या धर्माबद्दल काय वाटते ते नोंदवून ठेवलेले आहे. त्यांचे जे काही मत आहे तो या सभागृहातील विषय नाही तर तो अभ्यासाचा विषय आहे. सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करुन त्यावर मतप्रदर्शन करणे हे त्यांच्यासारख्यालाच जमू शकेल, कदाचित प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्यासारख्याला ते जमू शकेल, परंतु माझ्या ते आवाक्याबाहेरचे आहे. "बॉम्ब फुटत राहतील ! " या अग्रलेखात जो उल्लेख केलेला आहे तो मी आपल्या परवानगीने वाचून दाखवितो. " डोक्यात धर्मांधतेची नशा आणि पोटात भुकेचा "बॉम्ब" यासारखी दुसरी खतरनाक क्षेपणास्त्रे जगाच्या पाठीवर नसतील, मुंबईसारख्या शहरात अशा क्षेपणास्त्रांची अतोनात गर्दी झाली आहे. बेस्ट बस पुन्हा एकदा रिकामी करण्याची घटना घडली ती बेवारस प्लॅस्टीकच्या पिशवीत असलेल्या सामानामुळे. त्या पिशवीत डॅा.बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र होते. पोलिसांची तारांबळ आणि राज्यकर्त्यांची घबराट बघून चरित्रातला तो महामानव हसत असेल. कारण "हे असेच घडणार आहे" असा इशारा या महामानवाने 50 वर्षापूर्वीच दिला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत परखडपणे सांगितले होते की, "जर देशाची फाळणीच करणार असाल तर हिंदू व मुसलमान लोकसंख्येची संपूर्ण अदलाबदल करा. एकही हिंदू पाकिस्तानात ठेवू नका आणि एकही मुसलमान हिंदुस्थानात ठेवू नका. एक मुसलमान जरी या भूमीवर राहिला तरी तो संपूर्ण देशाला छळत राहील." हाच त्यांच्या सूचनेचा गाभा होता.

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

पण आमचे राज्यकर्ते पडले धर्मनिरपेक्ष. त्यांनी आंबेडकरांचा इशारा मानला असता तर देशावर ही वेळ आली नसती."

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आता जो उतारा वाचून दाखविला तो "डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इस्लाम" या पुस्तकातील आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला बाकीच्या वादात जावयाचे नाही. डॉ.बाबासाहेब आंबडेकरांचे मूळ वाक्य असे तोडून-मोडून सभागृहात सांगणे हे आक्षेपार्ह आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकेकाळी या सभागृहाचे सदस्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला अग्रलेख मी देखील वाचलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी शेवटची ओळ वाचून दाखविली ती वर्तमानपत्राच्या संपादकाची आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची नाही.

**तालिका सभापती** : जर आक्षेपार्ह वाक्य आढळून आले तर ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, काल मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्याबाबतीत चर्चा चालू असून त्यावर अतिशय गांभीर्यपूर्वक चर्चा झाली पाहिजे. त्याला वेगळे वळण लागू नये, अशी माझी विनंती आहे. काल जो प्रकार घडला, तो अजून संपलेला नाही. अजूनही निश्चित किती माणसे मृत झाली याची माहिती मिळाली नाही. अजूनही बरेच लोक दवाखान्यामध्ये आहेत. त्यामुळे याबाबतीतील चर्चा गांभीर्याने व्हावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : जे अनावश्यक आहे ते रेकॉर्डवरुन काढून टाकले जाईल. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कुठल्या एका समाजाचे नाहीत, ते देशाची प्रॉपर्टी आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल याठिकाणी पूर्ण जबाबदारीने बोलले पाहिजे. आमचे म्हणणे आपण खोडून काढीत असाल तर तो आपला अधिकार आहे. परंतु आपण कृपा करुन सर्व गोष्टींची जाणीव ठेऊन बोलले पाहिजे. जसे, छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण देशाचे होते, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही व्यक्ती संपूर्ण देशाची होती, ती महान शक्ती होती. म्हणून त्यांचा आम्ही उल्लेख केला. तसा उल्लेख करण्याचा आमचा पूर्ण अधिकार आहे व त्याचा आम्ही वापर केलेला आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य आणखी किती वेळ बोलणार आहेत ? कारण, माझ्याकडे जवळपास २१ सन्माननीय सदस्यांची बोलण्यासाठी नांवे आलेली आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : आपण सगळयांनाच बोलू द्यावे. कारण, हा विषय फार गंभीर आहे. या बॉम्बस्फोटामुळे संपूर्ण मुंबईला चटके बसलेले आहेत. याबाबतीत शासनाने वेळीच कडक कारवाई केली असती अथवा या अतिरेक्यांच्या मुस्काटात मारली असती तर त्यांनी अशा प्रकारची दहशत निर्माण केली नसती. त्या अतिरेक्यांना आपण गोळया घालून मारावयास पाहिजे. परंतु याठिकाणी त्यांचे कौतुक होत आहे, अशी परिस्थिती आहे. याबाबतीतील पूर्ण जबाबदारी ही शासनाची आहे. आज महाराष्ट्रामध्ये व मुंबईमध्ये अशा प्रकारच्या घटना सर्रास सुरु आहेत. त्यामुळे याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांनी स्वत:हून राजीनामा देणे आवश्यक आहे. आम्ही त्यांचा राजीनामा मागण्याची वाटही त्यांनी पाहण्याची आवश्यकता नाही. कारण, पाठोपाठ अशा प्रकारच्या

..२....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

घटना घडत आहेत. भिवंडीच्या घटनेमध्ये दोन पोलिसांना ठेचून मारले, पोलीस उपायुक्तांचे दात पाडण्यात आले, ते आज रुग्णालयात पडून आहेत. अशा प्रकारे जो शासनाचा कारभार चालू असून त्यांचे कौतूक होत आहे. जे कोणी शासनाला आव्हान देतात, त्या आव्हानांना सामोरे जाण्याची सरकारची ताकत नसेल तर मग, हे कसले शासन आहे ? आपल्या अशा बोटचेपी धोरणांमुळेच आज अतिरेक्यांची ताकद वाढलेली आहे. या घटनेबाबत आज मी माननीय शिवसेना प्रमुखांची भेट घेऊन बोललो. त्यांनी स्टेटमेंट दिले आहे की, या घटनेमध्ये जे जे कोणी मृत्यूमुखी पडलेले आहेत त्यांनी या शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत व आपल्या मेहरबानीने आम्ही वर पोहचलो, असे सांगितले पाहिजे. सभापती महोदय, गेल्या १६ वर्षांत ११० बॉम्बस्फोट मुंबई शहरात झाले आहेत. याबाबतीत आपण किती आरोपींना पकडले ? किती आरोपींना शिक्षा केली ? बॉम्बस्फोट करणारे कोणी जीपमधून तर कोणी तुरुंगातून पळाले. हे काय चालले आहे ? शासन चालवण्याची ही पध्दत आहे का ? याबाबत आमच्या जनतेचा आक्षेप आहे. अशा दुबळया धोरणांमुळे गृह खाते चालत नाही. त्यासाठी आपल्या गृह खात्याचा दरारा असला पाहिजे. आपण आणखी किती पोलिसांची अब्रू चव्हाटयावर ठेवणार आहात ? आज आपल्या पोलिसांचे असे जे चित्र दिसते आहे, ते केवळ दुबळया नेतृत्वामुळे. त्याचे एवढेच कारण आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

तुमचे अनामी रॉय नुसते मिडियामध्ये स्टेटमेंट देतात पण त्यांचे कर्तृत्व काय आहे ? तुमच्या राज्यात बॉम्बस्फोट होतात आणि तुम्ही मजा मारता आहात, जरासुध्दा तुम्हाला शरम नाही ? तुमच्या हातात संपूर्ण पोलीस खाते असतांना बॉम्बस्फोटाची मालिका होते ? शेकडो माणसे मृत्युमुखी पडतात, जखमी होतात त्याचे तुम्हाला सुख-दु:ख का नाही ? हे काय चालले आहे ? तरी पण तुम्ही राज्यकर्ते ? राज्यकर्ते असे असले पाहिजेत की, त्यांच्या शब्दातून दरारा निर्माण झाला पाहिजे, कृतीमधून दरारा दिसला पाहिजे. कुणावर अन्याय करु नका, पण घेतलेला निर्णय अचूक असला पाहिजे आणि एकदा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची ताकद राज्यकर्त्यांमध्ये असली पाहिजे. नाही तर त्याला अनुशासन म्हणता येणार नाही तर दु:शासन म्हणावे लागेल. तुमचे शासन दु:शासन आहे काय ? कुशासन आहे काय ? कालच आपण भिवंडी येथील दंगलीच्या संदर्भात सभागृहात चर्चा करीत होतो, ती चर्चा संपत नाही तो मुंबई शहरात बॉम्बस्फोट झाले. जो तुमच्या खात्याचा इतिहास आहे तो फार महत्वाचा आहे आणि अतिशय भयानकही आहे. मी सकाळी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला की, 12 मार्च 1993 रोजी जे बॉम्बस्फोट घडले त्यासंबंधीची केस हायकोर्टात सुरु आहे, आजही त्या केसचा निकाल लागलेला नाही, 3 वर्षे झाली, हा निकाल केंव्हा लागणार आहे ? सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, साक्षी पुराव्याचे सगळे काम संपलेले आहे. मग 3 वर्षे झाली हे सरकार काय करीत होते ? दुसरा बॉम्बस्फोट होण्याआधी निकाल द्या, असा शासनाचा दबाव असला पाहिजे. पण आता दुसरा बॉम्बस्फोट झाला, पहिल्या बॉम्बस्फोटाचा निकाल मागे पडला, आता दुस-या बॉम्बस्फोटाचा तपास सुरु, चौकशी सुरु. माणसे मात्र मरत आहेत, मुंबई शहरातील माणसांना कुठल्याही प्रकारची सुरक्षितता तुम्ही देऊ शकला नाही, हेच यामधून सिध्द झाले. ही वस्तुस्थिती आहे काय ? हे तरी जाहीर करा. आमची ताकद नाही, आमचे खाते आम्ही चालवू शकत नाही, आम्ही अतिरेक्यांना शरण गेलो आहेत, असे तरी जाहीर करा. ते सुध्दा तुम्ही जाहीर करीत नाही. शासन नावाची यंत्रणा असते, त्याचा दरारा असतो, 'बोले तैसा चाले त्याची वंदावे पाऊले', अशी अपेक्षा असते. मग कुठे आहेत अबु आझमी ? आता असे सांगण्यात आले आहे की, अबु आझमी यांना 14 दिवस भिवंडीमध्ये जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. मी तर म्हणतो

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार..............

हा माणूस मुंबई शहरातून फिरता कामा नये, इतका हा माणूस कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून धोकादायक आहे. तो तुमच्यावर थूंकतो आणि तुम्ही त्याचे कौतूक करीत आहात. ही काय परिस्थिती आहे ? एक व्यक्ती तुम्हा सगळयांना वेठीला धरु शकते, याला कायदा व सुव्यवस्था समजायची ? माझी एकच विनंती आहे. मी माझे भाषण जास्त लांबविणार नाही. सर्वप्रथम सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा दिला पाहिजे. दुसरी गोष्ट, मुंबईचे पोलीस आयुक्त, श्री.अनामी रॉय यांची बदली झाली पाहिजे किंवा त्यांना राजीनामा देण्यास सांगितले पाहिजे. आयुक्त म्हणून एक मिनिटही ते या ठिकाणी असावयास नको, ही माझी स्पष्ट भूमिका आहे. आणि तिसरी गोष्ट म्हणजे ज्यांनी ज्यांनी बॉम्बस्फोट घडवून आणले आहेत त्यांचा शोध घेतला पाहिजे. आरडीएक्स आणि इतर शस्त्रास्त्र शोधण्यासाठी कोणकोणत्या वस्त्या आहेत, अड्डे आहेत त्याची झडती घेतली पाहिजे. आणि हे जर तुमच्याकडून होत नसेल तर आम्हाला सांगा, आम्ही तुम्हाला दाखवितो की हे सर्व कुठे आहे. सर्व मुस्लिम लोकवस्तीमध्ये कोंबिंग ऑपरेशन करा, त्या वस्तीमधील माणसेच तुम्हाला सांगतील की हे कोण लोक आहेत. ज्या ज्या ठिकाणी स्टेशनजवळ अशा प्रकारचे दहशतीचे अड्डे आहेत ते सर्व मोकळे करा, लोकांना जर मोकळा श्वास घेऊ द्या. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करा. तेवढेच नाही तर ज्या ज्या ठिकाणी बसेसचे स्टॉप आहेत आणि लोकांना थांबण्यासाठी स्टॅण्ड बनविले आहेत त्या ठिकाणी पोलीस संरक्षण देऊन तेथे चालणा-या अशा प्रकारच्या ॲक्टिव्हिटी थांबवा. तुमच्याच शब्दात सांगावयाचे तर या सर्व ॲक्टिव्हिटी 'निधर्मी' लोकांच्या हातात आहेत. 7/8 ठिकाणी बॉम्बस्फोट झ ाले, शेकडो माणसे मेली, शेकडो जखमी झाली, या बॉम्बस्फोटांमागील अतिरेक्यांना शोधा.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ...... 15:05

श्री.मधुकर सरपोतदार ..........

टाईम टेबल कोसळले असले तरी भविष्य काळाची घडी बसविण्यासाठी अतिरेक्यांचा शोध घ्यावा. अतिरेयांचे अड्डे कोठे आहेत हे पोलिसांना माहीत आहे. एम.एम.आर.डी.ए. मधील यंत्रणेच्या माध्यमातून अनधिकृत लोकांना पक्की घरे दिली जात आहेत, ते थांबविले पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की, यासंदर्भातील जे आरोपी आहेत, जे बदमाश आहेत, जे अतिरेकी आहेत त्यांचा शासनाने ताबडतोब बंदोबस्त करुन मुंबईतील नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, कविवर्य राम गणेश गडकरी यांची एक कविता आहे, ती कविता त्यांनी केव्हा लिहिली ते साल मला माहिती नाही. ती कविता अशी आहे की,

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा,
प्रणाम घ्यावा, माझा हा श्री महाराष्ट्र देशा,
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा,
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा,
अंजनकांचन करवंदीच्या काटेरी देशा,
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा,
भाव भक्तीच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा,
शहिरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा.

सभापती महोदय, आता ही कविता दुरुस्त करण्याची वेळ आलेली आहे. एके काळी हे शब्द महाराष्ट्राला प्रेरणा देत होते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, आम्ही फक्त श्रध्दांजलीची भाषणे करावयाची काय ? आणि फक्त मेलेल्यांची शिरगणती करावयाची काय ? आता असे म्हणावे लागेल की, बॉम्बस्फोटाच्या देशा, आर.डी.एक्स. चे साठे असणा-या देशा, बलात्कार होणा-या देशा. एखादा कवी ज्यावेळी राम गणेश गडकरींच्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करील त्यावेळी त्याला हे शब्द बदलावे लागतील अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे. सन 1990 पासून आजपावेतो मुंबई शहरामध्ये 110 बॉम्बस्फोट झाले. दिनांक 20 एप्रिल, 1990 मालाड- 35 जखमी, 20 सप्टेंबर, 1990 रे रोड-5 ठार व 13 जखमी, 20 एप्रिल, 1991 कळवा कारशेड- 1 ठार, 29 एप्रिल, 1991 घाटकोपर - 2 ठार, 8 नोव्हेंबर, 1992 कल्याण- 14 ठार व 5 जखमी, 18 डिसेंबर, 1992 कांदिवली- 10 जखमी, 18 डिसेंबर, 1992 चिंचपोकळी- 5 जखमी, 18 जानेवारी, 1993 कांजूर मार्ग-भांडूप दरम्यान लोकलमध्ये स्फोट .....

यानंतर श्री.सुंबरे ......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

KBS/MAP/MAP/KGS/SBT. श्री. बोरले नंतर --- 15:10

श्री. गडकरी ....

7 जून 1993 - मुंबई सेंट्रल 1 जखमी., 7 जून 1993 - अंधेरी., 30 ऑगस्ट 1993 - मुंबई सेंट्रल., 7 सप्टेंबर 1993 - दादर, 1 जखमी., 29 ऑक्टोबर 1993 - माटुंगा, 39 जखमी., 23 जानेवारी 1998 - कांजूरमार्ग., 24 जानेवारी 1998 - मालाड-गोरेगाव दरम्यान लोकलमध्ये - 1 ठार., 27 फेब्रुवारी 1998 - खार, कांदिवली व विरार., 2 डिसेंबर 2002 - घाटकोपर स्टेशनबाहेर बसमध्ये - 3 ठार, 28 जखमी., 6 डिसेंबर 2002 - मुंबई सेंट्रल., 13 मार्च 2003 - मुलुंड येथे 12 ठार 65 जखमी., 27 जानेवारी 2003 - विलेपार्ले स्टेशनबाहेर 1 ठार 30 जखमी., 28 जुलै 2003 - घाटकोपर पश्चिम येथे 4 ठार 32 जखमी., 25 ऑगस्ट 2003 - गेटवे ऑफ इंडिया येथे आणि झवेरी बजार येथे 34 ठार 114 जखमी. सभापती महोदय, अशा प्रकारे 25 ऑगस्ट 2003 पर्यंतची माहिती मी येथे आणली आहे. त्या पलिकडे गेलो तर आणखी ही संख्या वाढेल. तेव्हा माझा या निमित्ताने प्रश्न असा आहे की, या मुंबई शहरामध्ये आजवर जे 110 बॉम्बस्फोट झाले आहे त्यामध्ये इतकी माणसे मृत्यूमुखी पडली आहेत तर अजून किती बॉम्बस्फोट झाल्यानंतर तुम्ही शुद्धीवर येणार आहात ? आणखी किती मृत्यू झाल्यावर तुम्हाला जाग येणार आहे ? बरे आतापर्यंत या संबंधात जे खटले तुम्ही दाखल केले होते त्यांचे काय झाले आहे ? त्यात किती लोक पकडले गेले, कितींवर कारवाई झाली आहे ? या माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे काय ? सभापती महोदय, 1993 साली झालेल्या बॉम्बस्फोटातील आरोपींबाबत अजूनपर्यंत निर्णय लागू शकत नाही. याला कारण काय आहे ? हे सरकारच याला कारण आहे. आपण या आरोपींवर आरोपपत्र दाखल केले असे सांगितले. त्यानंतर 13 ऑगस्टची घटना झाली. पण या बॉम्बस्फोटासंबंधातील खटल्याचा निकाल अजून लागलेलाच नाही. त्यात टाडा, सीबीआय यांच्यापुढे खटला चालला. त्यानंतर हायकोर्टामध्ये, सुप्रीम कोर्टामध्ये ते पुन्हा अपील करतील. आयुष्यभर हे बॉम्बस्फोट करणाऱ्यांना शिक्षा होणार नसेल तर मेसेज यातून आपण देणार आहात ? सभापती महोदय, आपण मला एक साधा प्रश्न विचारला की, एका वाक्यामध्ये या सरकारबद्दल तुम्हाला काय वाटते ते सांगा. तर मग सांगेन की, चांगले काम करणाऱ्या माणसाला सन्मान नाही आणि वाईट काम करणाऱ्या माणसाला शिक्षा नाही हे या सरकारचे वैशिष्ट्य आहे. सभापती महोदय, या ज्या बॉम्बस्फोटाच्या घडणाऱ्या मालिका आहेत त्यांचा फार मोठा इतिहास आपल्याला माहिती आहे. त्याच्या खोलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काय म्हटले ? 1947

....... झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

सालानंतर काय घडले ? सेक्युलॅरिझम या शब्दाचा अर्थ काय होतो ? हे डावे समाजवादी आहेत त्यांचे डोळे उघडे करणारा हा सारा इतिहास आहे. 'सेक्युलर' या शब्दाचा अर्थ सर्वधर्मसमभाव. छत्रपती शिवाजी महाराज हे या देशातील, इतिहासामधील पहिले सेक्युलर राजे होते. त्यांनी कोठल्याही धर्मियांवर अन्याय केला नाही. ज्यावेळेस कल्याणच्या सुभेदाराची सून छत्रपतींसमोर नजराणा म्हणून पेश केली गेली त्यावेळी आमच्या माँ साहेब इतक्या सुंदर असत्या तर आम्हीही सुंदर झालो असतो असे म्हणून त्यांनी तिचा सन्मान करून, सन्मानाने तिच्या घरी परत पाठविले. असा हा यशवंत, किर्तीवंत, गुणवंत, सामर्थ्यवंत जाणता राजा होता आणि त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये आम्ही आज काय पाहतो ? आपण आजवरच्या मराठेशाहीच्या इतिहासाचा अभ्यास करा, आपल्याला केव्हाही आढळणार नाही की, छत्रपतींच्या राज्यामध्ये एखादी मशीद पाडून तेथे मंदिर बांधले गेले आहे. असे एकही उदाहरण आपल्याला सापडणार नाही. परंतु जगामध्ये आज एक युद्ध सुरू झालेले आहे. हे युद्ध अमेरिकेमध्ये पेटले. कारण काय ? अमेरिकेचे बुश येथे आले. तेव्हा दोन लाख लोक आझाद मैदानावर लाल बावटे घेऊन जमले होते. त्यांनी तेथे बुश यांना विरोध केला. कारण बुश यांनी इराकमध्ये केलेली कारवाई आणि लादेन विरूद्ध सुरू केलेली कारवाई आणि त्याची प्रतिक्रिया येथे उमटली. .....

( यानंतर श्री. सरफरे .... एए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, त्याच्या खोलामध्ये जाऊन अभ्यास करण्याची गरज आहे. कोठल्याही निरपराध हिंदूची हत्या करणारा मुसलमान असेल तर तो सच्चा मुसलमान नाही. आणि कोठल्याही मुसलमानाची हत्या करणारा हिंदू असेल तर तो सच्चा हिंदू नाही. सर्वच मुसलमान दोषी नाहीत. डॉ. अबुल कलाम आझाद यांचा आदर्श आपण मानतो. त्यांचे विचार या कॉंग्रेसवाल्यांनी, राष्ट्रवादी वाल्यांनी आणि नतद्रष्ट समाजवादवाल्यांनी स्वीकारले पाहिजेत. आमची सर्वांची संस्कृती, इतिहास एकच आहे. परंतु मुस्लिम समाजाचे खऱ्या अर्थाने नुकसान कुणी केले असेल तर या कॉंग्रेस नावाच्या महाभूताने केले आहे. 1947 पासून 2005 पर्यंत या समाजाची आपण वाट लावली. त्यांना काय दिले? चहाची, पानाची टपरी दिली, त्यांना कबाडीवाला केले, क्लिनर-ट्रक ड्रायव्हर केले, त्यांना कॉंप्युटर शिकविले नाही.. त्यांना इंजिनिअरींग कॉलेज दिले नाही. जे पाकिस्तानचे अध्यक्ष श्री. परवेज मुशर्रफ यांना समजले ते माननीय श्री. आर. आर. पाटील यांना समजले नाही. श्री. मुशर्रफ यांनी पाकिस्तानमधील सर्व मदरसे बंद केले. त्यांनी सांगितले की, पाकिस्तानमध्ये मदरसे चालणार नाहीत. आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसच्या सेक्युलरवाल्यांनी मदरस्यांचे बोर्ड स्थापन केले. तसा कॅबिनेटचा निर्णय केला. आणि त्यावर माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, मदरश्यामध्ये कोणताही गैरप्रकार होत नाही. त्याठिकाणी दहशतवादाचे शिक्षण दिले जाते हा समज चुकीचा असल्याचे प्रमाणपत्र माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी दिले. रावसाहेब रावबहाद्दर आबासाहेब तुम्ही महाराष्ट्राचा सत्यानाश केला. जे श्री. मुशर्रफ यांना कळले ते तुम्हाला कळले नाही. सर्वच मदरसे वाईट नाहीत. परंतु 90 टक्के मदरश्यांमध्ये फंडामेटालिझम आणि धर्मांधता शिकविली जाते. म्हणून मुस्लिम समाजाला विज्ञान, तंत्रज्ञान, कॉप्युटर शिकवून स्वत:च्या पायावर रोजगार उपलब्ध करुन देण्याचे डॉ. अबुल कलाम आझाद यांचे विचार देण्याचा आपण प्रयत्न केला नाही तर जातीयवाद आणि सांप्रदायिकतेचे विष पेरण्याचे पाप कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केले.हे कशासाठी होत आहे? या मागे व्होट बॅंक पॉलिटीक्स आहे. मला आठवते की, ये कॉंग्रेस वाले हमारे बारे में मुस्लिमों से कहते थे कि ये बी.जे.पी.वाले बहुत खतरनाक है. ये चुन कर आएंगे तो आपको कटवा देंगे, पाकिस्तान में भिजवा देंगे. मारो ठप्पा पंजे पर.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

हे जातीय दंग्याचे चित्र कशासाठी निर्माण केले? आमचे भाजप - सेनेचे राज्य होते त्यावेळी किती दंगे झाले? मोठया मुष्किलीने 3-4 घटना घडल्या. माननीय राज्यमंत्री श्री. मस्के साहेब हे कॉंग्रेसवाले तुमचे कधीही मित्र नाहीत. हे फक्त तुम्हाला वापरुन फेकून देतात. बांधा, वापरा आणि फेकून द्या. एवढाच फक्त उपयोग करुन घेतात. हिंगणघाट मतदारसंघामध्ये आर.पी.आय.च्या उमेदवाराला निवडणुकीचे तिकिट मिळाले होते. त्याठिकाणी श्री. राजू तिमांडे यांना उभे करुन आर.पी.आय. च्या उमेदवाराला यांनी लंबा केला. त्याचप्रमाणे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये देखील माननीय श्री. गवई यांना पाडले, श्रीमती सुलेखा कुंभारे यांना पाडले, श्री. मुकुल वासनिक यांना पाडले, श्रीमती उज्वला शिंदे यांना पाडले, श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांना पाडले. त्यामुळे ते आता निवृत्त झाले. आणि आता मस्के साहेब तुम्हाला देखील संपविले आहे, आणि तुमची निवृत्ती नक्की केली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

सन्माननीय श्री.मस्के साहेबांना सफारी घालायला लावून, काँग्रेसला मत द्या, असे लोकांना सांगायला लावले आणि त्यांच्याकडून मते घेतली. आता त्यांना शिक्षक सेवानिवृत्त होतात त्याप्रमाणे त्यांना पेन्शन घेऊन घरी बसण्यास सांगितलेले आहे. "गरज सरो आणि वैद्य मरो", त्याप्रमाणे श्री.मस्के साहेबांचे केलेले आहे. सभापती महोदय, आता मदरशांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यांना प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यांचे बोर्ड निर्माण करण्याचे कारण काय ? मुस्लीम हे सेक्युलॅरिझम नाहीत काय ? असे म्हटले जाते . परंतु इंग्रजीमये सेक्युलॅरिझमचा अर्थ काय आहे, ते पहावा. त्यामध्ये 'धर्मनिपरपेक्षता' असा अर्थ नाही. 'सर्वधर्मसमभाव' म्हणजे, "Justice with all and appeasement with none". राष्ट्रवादीचा अर्थ काय आहे ? सभापती महोदय, आपण नि:पक्ष आहात. आपल्याला काही गोष्टी पटत नाहीत. परंतु कधी कधी आपली अवस्था अशी होते की, सहन होत नाही आणि सांगता येत नाही. सभापती महोदय, अल्पसंख्यांकाचे तुष्टीकरण, Appeasement of Minorities,म्हणजेच सर्वधर्मसमभाव आहे. 'सेक्युलरिझम'चा अर्थ "समाजवाद" असा आहे. महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांकांना चांगली वागणूक मिळाली पाहिजे, त्यांना तांत्रिक, कॉम्प्युटराईज्ड इ ाान मिळाले पाहिजे. पण त्यांच्यामध्ये अराष्ट्रीय वृत्तीचे लोक असतील, त्यांचे लष्कर-ए-तोयबाशी संबंध असतील, पाकिस्तानचे हस्तक असतील, जातीयवादी असतील त्यांच्या विरुध्द सामना करण्याची आपली तयारी आहे, काय ? त्यांना तसे म्हटले तर त्यांना काय वाटेल ? त्यांची मते आपल्याला मिळाली नाही तर कसे होईल ? शिवसेना प्रमुखांच्या भाषेमध्ये सांगायचे झाले तर त्यांच्या दाढ्या कुरवाळा. तुमचे त्यामागे "Vote Bank" हे राजकारण आहे. परंतु त्याचा परिणाम काय होतो आहे, हे आपण पहातो आाहोत. सभापती महोदय, गृहमंत्री हे फक्त पोपटासारखे बोलतात परंतु त्यांची कृती काही नाही. मागे एकदा रामदास पाध्ये यांच्या बोलक्या बाहुल्यांसारखे ते बोलतात, असे मी म्हणालो, तेव्हा त्यांना त्याचा राग आला. गुजरातचे मुख्यमंत्री श्री.नरेद्र मोदी यांना बऱ्याच शिव्या घातल्या गेल्या. परंतु गुजरातमध्ये बॉम्बस्फोट का होत नाहीत ? त्या ठिकाणी आय.एस.आय.चे हस्तक का जात नाहीत ? याचे कारण त्यावेळेस गुजरात सरकारने खंबीर भूमिका घेतली. नरेंद्र मोदी हे मुसलमानांच्या विरूध्द आहेत, असा प्रचार झाला. परंतु इस्त्रायलमध्ये ते गेल्यानंतर त्यांनी प्रचार माध्यमद्वारे असे सांगितले की, गुजरातचा विकासाचा रेट 15 टक्के वाढलेला आहे, त्या ठिकाणी 24 तास वीज दिली जाते, 30 हजार कोटीचा कृषी माल विकला गेलेला आहे. गुजरातमधील सर्व धर्मीयांना संरक्षण दिले. सगळयांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

न्याय दिला, त्याचा परिणाम नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये 100 टक्के झाला. मुस्लीम लोकांनी त्यांना मते दिली, मुस्लीम नगरसेवक निवडून आले, त्यांनी श्री.मोदींना पाठिंबा दिला. परंतु आपल्याला मुस्लीम समाजाला वर आणावयाचे नाही. त्यांना अशिक्षित ठेवायचे, त्यांच्या समाजाच्या समस्यांना हात लावायचा नाही. कारण हा समाज हुशार झाला तर त्यांच्या सगळे लक्षात येईल, म्हणून त्यांना अशिक्षितच ठेवले, अज्ञानी ठेवले. केवळ त्यांच्या धर्माच्या भावना कुरवाळत ठेवल्या, निवडणुकीमध्ये त्यांचा उपयोग करुन घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातील जमीन भुसभुसीत करुन ठेवली, हे सर्व लक्षात आलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

सभापती महोदय, पोटा कायद्याच्या बाबतीत काय झाले ? आज सकाळी बैठक झाली. आपल्याकडे पोटा कायदा नाही. एनडीए सरकारने पोटा कायदा आणला होता. हा कायदा रद्द करा असे कॉंग्रेसने सांगितले. का ? तर निरपराध व्यक्तीवर हल्ला होऊ नये, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये. ख्वाजाच्या प्रकरणामध्ये काय झाले ? श्री. सचिन वझे व श्री. प्रफुल्ल भोसले यांचे काय झाले ? आतंकवाद्यांशी लढताना त्यांनी गोळ्या झाडल्या. त्यांना जर खुनाच्या आरोपाखाली अटक करणार असाल तर कोणता पोलीसवाला आतंकवाद्यांशी लढणार? मी नेहमी एक गोष्ट सांगत असतो. सरकारने एक काम करावे. मालाफाईड आणि बोनाफाईड मिस्टेक्स कोणत्या हे शासनाने शोधावे. सुईच्या अग्राच्या टोकावर खोट्या तक्रारी करावयाच्या आणि सगळ्यांना संपवावयाचे याबाबतीत सुध्दा पोलीस खात्यामध्ये मोठे राजकारण सुरु आहे. एकमेकांना संपविण्यासाठी वरचे अधिकारी टपलेले आहेत. अशा रीतीने जर आपण चांगल्या अधिकाऱ्यांना जेलमध्ये टाकून शिक्षा देणार असाल, पोलीस खात्यातील एखाद्या पोलीस अधिकाऱ्यांने आतंकवाद्याला गोळी मारली म्हणून त्यांना अशी शिक्षा देणार असाल, आंतकवाद्यांना गोळी मारली म्हणून तुमच्याविरुध्द कलम 307 ची केस चालविणार, असे जर या सरकारचे धोरण असेल तर आतंकवाद्यांबरोबर पोलीस कसे लढणार ? सभापती महोदय, मी विरोधी पक्ष नेता असताना श्री. छगन भुजबळ हे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होते. श्री. विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते. मी आणि श्री. नारायण राणे, आम्ही विरोधी पक्ष नेते होतो. आमची एक समिती होती. ती समिती आताही आहे. आता त्या समितीमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब आहेत. त्या समितीमध्ये माननीय सभापती व माननीय अध्यक्ष आहेत. मानवाधिकार आयोग स्थापन करण्याबाबत केंद्र सरकारने एक कायदा केला. मानवाधिकार आयोगाकडे जाण्याचा अधिकार कोणाला आहे ? बॉम्बस्फोटातील आरोपींना मानवाधिकार आयोगाकडे जाण्याचा अधिकार आहे काय ? या राज्यामध्ये काय चालले आहे ? मानवाधिकार आयोगाचा उपयोग करुन अनेक आतंकवादी, आयएसआयचे लोक आपल्या पोलिसांविरुध्द खटले घालत आहेत आणि काही चांगले पत्रकार त्यांच्यावर लेख लिहून त्यांना ग्लोरिफाय करीत आहेत. मानवाधिकार आयोग पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत कडक ताशेरे ओढतात, त्यांना शिक्षा देतात. मग आतंकवाद्यांशी लढण्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. नितीन गडकरी ......

हिंमत कोण करणार ? आजची जी घटना आहे त्याचे मूळ हे कालच्या आणि परवाच्या घटनेमध्ये नाही. गेल्या अनेंक वर्षापासून आम्ही जे धोरण राबवित आहोत, ज्या प्रकारे आम्ही सरकार चालवित आहोत, आपली जी तुष्टीकरणाची नीती आहे, त्याचा हा परिणाम आहे. कोण हा अबू आझमी ? भिवंडीमध्ये काय झाले ? मला सांगायला लाज वाटते. त्या ठिकाणी भाजीचे तुकडे करावेत त्या पध्दतीने पोलिसांचे तुकडे केले गेले. त्यांच्या हातापायांचे तुकडे केले गेले. हवालदार श्री. गांगुर्डे हा दलित समाजाचा होता. तो नाशिक, देवळाली भागात राहणारा होता. त्याला पाडून त्याचे तुकडे केले गेले. त्याचे डोळे काढले, त्याचा मेंदू बाहेर काढला. केवढी ही क्रुरता ? त्यानंतरही अबू आझमी म्हणतात की, ती शासनाची जागा आहे, हे मला माहीत नाही. कायद्यामध्ये काय आहे हे माहीत नाही. सातबारामध्ये काय आहे, हे माहीत नाही. एकच गोष्ट माहीत आहे की, त्या जागेवर फक्त कब्रस्तान होईल. दुसरे आम्ही बांधू देणार नाही. मी या सरकारला मर्द सरकार म्हणतो. षंढ सरकार म्हटले तर रागावतील. नपुंसक सरकार म्हटले तर चिडतील. त्या ठिकाणी पोलीस स्टेशन बांधण्याकरिता माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब यांनी कोणाच्या विनंतीवरुन पैसे दिले ? माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेब यांना विनंती केली की, आमचे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी तुमच्या आमदार निधीतून पैसे द्यावेत. पैसे मागणारा कोण, तर या राज्याचा गृहमंत्री. पैसे देणारे कोण, तर या सभागृहाचे माननीय उपसभापती. या राज्याचे उपमुख्यमंत्री चुकीच्या जागेवर पोलीस स्टेशन बांधण्याकरिता आपल्या माननीय उपसभापतींना पैसे मागू शकतील काय ? सभापती महोदय, आपण याचे उत्तर द्यावे. त्या ठिकाणी सगळे कायदेशीर आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 15:30

(श्री. नितीन गडकरी...)

एवढे करुनही स्वत:ला मर्द म्हणविणारे सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांना 8 दिवसांची मुदत दिलेली आहे. परंतु मी खात्रीने सांगतो की, 8 नाही तर 80 दिवसांची मुदत दिली तरी त्याठिकाणी पोलीस स्टेशनचे काम होणार नाही. कारण तुमचे सरकार मर्द आहे. या सरकारमध्ये तेवढी हिंमत आहे काय ? त्यामुळे लोक अबू आझमीच्या मागे जातात. अबू आझमीने सांगितले, "आता आम्ही गोटे मारले, उद्या गोळ्या मारु." अशा वेळी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव, तुम्ही काय करणार ? समोर औरंगजेब चालत आला तर नेताजी पालकर काय करणार ? मी सांगू इच्छितो की, पर्स आणि पर्सन यामध्ये पर्सन महत्वाचा, पर्सन आणि पार्टी यामध्ये पार्टी महत्वाची, पार्टी आणि फिलॉसॉफी यामध्ये फिलॉसॉफी महत्वाची. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना माझे भाषण आवडत आहे, त्यांना माझे विचार पटत आहेत. परंतु मजबुरी का नाम... त्यामध्ये त्यांचा काही दोष नाही. पण हे जेव्हा हिरवे फडके घेऊन पाकिस्तान झिंदाबादचे नारे देतील त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव हे मर्दुमकी दाखवून बाहेर आल्या शिवाय राहाणार नाहीत. पण आता त्यांच्या रक्तामध्ये काही भेसळ झाली असेल तर माहीत नाही. भिवंडीची जी घटना घडली त्याबाबत शासनाची कायदेशीर बाजू असतानाही शासनाने कठोर भूमिका घेतली नाही. त्यामुळे त्यांनी नंतर काय केले ? तर शिवाजी पार्क येथील हनुमान आणि गणपतीच्या मूर्तींची विटंबना केली आणि मॉंसाहेबांच्या चेह-याला काळे लावले. हा नियोजित कट होता. हा प्रकार झाल्या बरोबर शिवसैनिक आणि भाजपच्या कार्यकर्त्यांचा उद्रेक झाला. लोक रस्त्यावर आले. पोलिसांच्या गाड्या चौकाचौकामध्ये लावल्या गेल्या. तेवढीच वेळ साधून अतिरेक्यांनी मुंबईत आरडीएक्स घुसविले. शिवाजी पार्कची घटना घडली, पोलीस दुसरीकडे गुंतलेले आहेत हे पाहून अतिरेक्यांनी आरडीएक्स मुंबईमध्ये आणून मुंबईतील उपनगरीय रेल्वे गांड्यामध्ये टाइमर लावून सात बॉम्बस्फोट घडवून आणले. केन्द्रीय रेल्वेमंत्री श्री. लालू प्रसाद यांनी घटनास्थळांना भेट दिली. 2003मध्ये आरपीएफच्या कायद्यामध्ये सुधारण करण्यात आली. "Amendment to RPF Act has been made with the objective of legally empowering RPF to provide protection and safeguard to passengers and their luggage, to enable to take steps for prevention of offences against

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

passengers and empower to uphold any person who is likely to indulge in such offences. It also empowers RPF to arrest and prosecute any person who commits any such offences under section 179 of the RPF Act. The object stated in the Act is to ensure security of the passengers." हा कायदा 2003साली पास झाला. पोलीस उपायुक्त श्री. पटनायक यांनी असे सांगितले की, आम्ही तेथे पोहोचू शकत नाही. आम्हाला रेल्वेच्या आवारात जाण्याचा अधिकार नाही.

...नंतर श्री. भोगले..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 15:35

श्री.नितीन गडकरी.........

वाह रे अधिकार! तेथे प्रेतांचा खच पडला, रक्ताच्या थारोळ्यात लोक पडले, लोक सैरावैरा पळत होते आणि महाराष्ट्राचे पोलीस अधिकारी सांगत होते की, आम्ही जाऊ शकत नाही. 2003 मध्ये ॲक्ट झाला. मग दोन वर्षे तुम्ही झोपला होता का? केंद्र सरकारला का सांगितले नाही. आजपर्यंत मुंबईमध्ये मुलुंड, घाटकोपरला बॉम्बस्फोट झाले. केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्हाला कल्पना आहे. आधीपासून कल्पना होती, अशा प्रकारच्या मोठया घटना होणार आहेत. मी स्वत: दूरदर्शनवर ऐकले. पण सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगितले की, मला याची कल्पना नाही. हे शासन गंभीर आहे का? काल मला अतिशय वाईट वाटले. सभागृहामध्ये जेव्हा भिवंडीच्या घटनेसंबंधी चर्चा झाली आणि शिवाजी पार्कमध्ये जी घटना घडली तेव्हा सरकारची तीन तोंडे महाराष्ट्राच्या जनतेने बघितली. सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी सांगितले की, या घटनेबाबत शिवसेना व भारतीय जनता पक्षाला राज्य सरकारचे प्रोत्साहन आहे. ज्या सरकारमध्ये ते मंत्री आहेत. दुसरी बाब म्हणजे सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, जास्त बोलायला लावू नका, चौकशी झाली तर तुम्ही अडचणीत याल, पश्चातापाची पाळी येईल. कोणाला धमकी देता? होऊ द्या दूध का दूध आणि पानी का पानी. आम्ही परिणाम भोगायला तयार आहोत. केवळ पॉलिटिकल स्टेटमेंट केले. हिंमत असेल तर सांगा. होऊ द्या चौकशी. कोण नराधम यामागे आहेत, असले घाणेरडे प्रकार करणारे जे कोणी असतील ते बाहेर येऊ द्या, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करा. आम्ही त्याचे समर्थन करतो. आमच्यातील असतील तर आमच्यावर सुध्दा कारवाई करा. का सांगत नाही? मुख्यमंत्री महोदय तिसरेच सांगतात. ते आम्हाला सगळयांना बोलावतात. सगळा महाराष्ट्र एक आहे. सगळयांनी मिळून संकटाचा मुकाबला केला पाहिजे, कठीण परिस्थिती आहे, सगळयांना जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. सभापती महोदय, कालपर्यंत तीन-तीन दिशेने बोलत होते. प्रेसला मुलाखती देत होते. या घटनेला कोण जबाबदार आहे? आहे का हिंमत? मुख्यमंत्र्यांनी सन्माननीय महसूलमंत्र्यांना सांगितले पाहिजे, खबरदार असे बोलू नये. त्यांना दिल्लीतून आशीर्वाद आहे. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी त्यांना फिटवायचे ठरविले आहे. त्यांना लंबे करायचे ठरविले आहे. मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना दोष देत नाही. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेसने पोलीस स्टेशन्स बी.ओ.टी.तत्वावर राष्ट्रवादी पक्षाच्या लोकांना दिली आहेत.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

हे मी म्हणत नाही. या बाबत खुलासा होऊ द्या. त्यांना बी.ओ.टी.तत्वावर पोलीस स्टेशन्स दिली आहेत. त्यावर सन्माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, तुम्ही प्रथम शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय तुमच्याकडे आहे.... सभापती महोदय, मी चुकलो. ते असेही म्हणाले की, बी.ओ.टी.तत्वावर पोलीस स्टेशन्स दिली नाहीत, ऑक्शनमध्ये काढली, लिलावात काढली. हा या सरकारमधील समन्वय आहे, हा यांच्यातील सौहार्द आहे, हे यांच्यातील सहकार्य आहे. तुझे माझे जमेना, तुझ्याविना माझे करमेना अशी परिस्थिती आहे. बदल्या, ट्रान्सफर, शाळा, कॉलेजे, बी.एड, इंजिनिअरिंग कॉलेज, लक्ष्मीदर्शन, प्राथमिक शाळा असेल, मार हात! सभापती महोदय, या सगळया महाराष्ट्रामध्ये जे धोरण या राज्य सरकारने राबविले त्याचा परिणाम म्हणून मुस्लिम आतंकवादी संघटनेचे फावले आहे. सरकार कठोर भूमिका घ्यायला तयार नाही. त्यांच्यावर कारवाई करावयास तयार नाही. हज हाऊसमध्ये एक मुल्ला पकडला गेला. त्याचे नाव इमाम मौलाना याहा बक्ष असे आहे. 17 जुलै, 2006 रोजी त्याला अटक झाली. मुंबईतून पैसा गोळा करुन काश्मीरमधील अतिरेक्यांना हा पोहोचवित होता. याच्यावर काय कारवाई झाली? मी जेवढे आरोप याठिकाणी केले त्या केसीसचे काय झाले हे तोंड वर करुन सांगण्याची हिंमत या सरकारमध्ये आहे का? काय झाले हज हाऊसमधील मुल्लाचे? त्याचा पासपोर्ट कसा होता? त्यांना का संरक्षण देता? मताच्या राजकारणाकरीता? गुबगुबीत पांढ-या टोप्या घातल्या, खीर खायला घातली म्हणजे मते मिळणार का? कितीही टोप्या घाला, ती मते कॉंग्रेसची आहेत. कॉंग्रेसचे लांगूलचालन आहे. राष्ट्रवादी हा पक्ष टोप्या धालण्यात एक्स्पर्ट आहे. ही पांढरी गुबगुबीत टोपी वेगळी आहे. तुम्ही इतर टोप्या घाला. यांना संरक्षण द्या म्हणून शिष्टमंडळ भेटले. राष्ट्रवादीच्या लेटरहेडवर अर्ज केला गेला. हा निरपराध आहे, त्यांना सोडून द्या म्हणून सांगण्यात आले. म्हणून कारवाईच्या संदर्भात प्रकरण वर जाते त्यावेळी मग ती कारवाईची धार बोथट होते. जेवढया लोकांवर अराष्ट्रीयत्वाचे गुन्हे होते, आय.एस.आय.चे आरोप होते त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रावते माहिती देतील, मी त्याचा उल्लेख करीत नाही. बॉम्बस्फोटामध्ये ज्यांनी मदत केली ते राष्ट्रवादीचे कार्यकर्ते होते याची माहिती त्यांच्याजवळ आहे. त्यांना तुम्ही सांगितले, काहीही करा, आम्ही सत्तेत आलो पाहिजे. आमची सत्ता कायम राहिली पाहिजे. हिंदुस्थान खड्डयात गेलातरी चालेल, तुमची 10 ते 15 टक्के मते मिळाली आणि आम्ही सत्तेत आलो म्हणजे झाले.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

शाळा,कॉलेज, बी.एड, डी.एड, बाजार मांडला आहे, लक्ष्मीदर्शन सुरु आहे. महाराष्ट्रात गोरगरीब, सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांची मदत घेतली, त्यांना वापरुन सोडून दिले. सभापती महोदय, हे जे सुरु आहे, भुसभुशीत जमीन निर्माण केली त्याचा हा परिणाम आहे. मी जेवढे आरोप केले त्याचा खुलासा झाला पाहिजे. महाराष्ट्रामध्ये 3000 मदरसा सुरु आहेत. अधिकृत आणि अनधिकृत किती आहेत? त्यापैकी 500 मदरसा केवळ मुंबईमध्ये आहेत आणि या मदरसांमध्ये 2 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सभापती महोदय, 5000 शिक्षक आहेत. हे मदरसा पाकिस्तानमधील मुशर्रफ साहेबांनी बंद केले. याठिकाणी आंतकवाद्यांना शिक्षण दिले जाते त्याकरीता पाकिस्तानमध्ये मुशर्रफ साहेबांनी मदरसा बंद केले. तुमच्या राष्ट्रवादी पक्षाची ट्युबलाईट कशी लागली? तुम्ही मदरसा बोर्ड तयार केले. या सगळयांना नियमित करुन सर्टिफिकेट देत आहात. हे राज्य कुठे चालले आहे? हे राज्य कोणाचे आहे? केवळ निरपराध हिंदू मेले त्यांच्याबद्दल बैठक घ्यायची आणि श्रध्दांजली अर्पण करुन मेलेल्या प्रेतांची संख्या मोजायची एवढेच काम चालले आहे. जर आम्ही शांतता आणि संयम सोडला तर आम्हाला जातीयवादी, सांप्रदायिक म्हणून म्हटले जाईल. हे छुपे युध्द आहे. पाकिस्तानने भारताविरुध्द छेडलेले छुपे युध्द आहे. बांगलादेशी, पाकिस्तानी नागरिक हजारोंच्या संख्येने याठिकाणी येत आहेत. अल्लाचे नारे देत आहेत. क्रिकेटची मॅच झाली की, पाकिस्तान झिंदाबादचे नारे लावले जातात. पोलीस स्टेशनची जागा शासनाची असेल, 7/12 वर लिहिले असले तरी देखील आम्ही पोलीस स्टेशनचे काम बंद केले.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

आणि त्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळणारे सांगतात की, आम्ही कागदपत्रे तपासून आठ दिवसात निर्णय घेऊ. आता आठ दिवस होऊन गेले आहेत मग आपण का नाही त्यासंदर्भात निर्णय घेतला ? आपण सांगावयास पाहिजे होते की, आम्ही कागदपत्रे तपासली आहेत, कायद्याच्या दृष्टीने सर्व बरोबर आहे, ती जागा पोलीस स्टेशनचीच आहे त्यामुळे त्याच जागेवर पोलीस स्टेशन बांधले जाईल आणि पोलीस स्टेशन बांधायला कोणी विरोध केला तर त्याचे हात कलम केल्याशिवाय राहणार नाही. अशी धमक आपण कधी तरी दाखवा. परंतु सभापती महोदय, अशा प्रकारची हिंमत मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री कधीही दाखविणार नाहीत.

सभापती महोदय, अमेरिका आम्हाला सेक्यूलरिझमच्या गोष्टी सांगते परंतु हाच अमेरिका पाकिस्तानला लढावू विमाने विकत आहेत. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, भारतात कोणीही यावे, आणि टिचकी मारुन जावे. यह कहना कि आओ, यह मंदिर सब के लिए खुला है, यहां कोई भी आ सकता है, मारो हमें लात, लूटो हमारे देश को, फिर भी हम आपको गले लगाएंगे. सब भूमी गोपाल की. हे काय चालले आहे? असेच जर चालले तर हा प्रश्न कधीही सुटणार नाही. आम्ही आज राजकारणात आहोत, उद्या राहणार नाही, आज आमदार आहोत, उद्या राहणार नाही परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र, हिंदूस्थान हा राहणारच आहे त्यामुळे या गोष्टीचे आपण भान ठेवले पाहिजे. सभापती महोदय, हिंदुस्थानने फाळणी भोगली आहे, फाळणीत लाखो कत्तली पाहिलेल्या आहेत, फाळणीत रक्ताचे पाट वाहतांना पाहिलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी डॉ. बाबासाहेबांच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत त्यामुळे त्या मुद्यांचा मी येथे उल्लेख करणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत. परंतु मुंबईत काल जे बॉम्बस्फोट झाले, त्या पार्श्वभूमिवर मुस्लीम समाजातील जे मुस्लीम आतंकवादी आहेत ते मुस्लीम समाजातील लोकांना अतिरेक्याची शिकवण देतात, मदरशात अतिरेकी शिकवण देतात, आय.ए.एस., लष्करे तोयबा आणि सिमी सारख्या संघटनांना पाठिबा देतात, मनमाड, मालेगाव, औरंगाबाद येथे जे स्फोटके पकडले जातात, त्याच्याशी ज्या लोकांचा संबंध आहे अशा लोकांना हे शासन मोकळे सोडते त्यामुळे अशा सरकारकडून आम्ही काय अपेक्षा करावी. अशा डरपोक, नामर्द सरकार कडून आम्ही काय अपेक्षा करावी ? जे अतिरेकी आहेत, जे भारतात राहून पाकिस्तानच्या घोषणा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ...

देतात, जे आतंकवाद पसरवितात, अशा लोकांना शूट अँड साईट केल्याशिवाय अशा प्रकारची कामे थांबणारच नाहीत. परंतु आम्ही कितीही बोललो "पुढे पाठ मागे सपाट " असे या शासनाचे धोरण आहे. आम्ही कितीही बोललो तरी हे सरकार अशा अतिरेक्यांच्या संदर्भात कोणतीही कारवाई करीत नाही. आम्ही फक्त या सभागृहात शोक प्रस्ताव मांडायचे, श्रध्दांजलीचे प्रस्ताव मांडायचेच काम करावयाचे का हा माझा सवाल आहे ? मुर्दाडासारखे जीवन जगण्यापेक्षा असे जीवन न जगणे चांगले, त्यामुळे माझी या शासनाला विनंती आहे की, हिंदू हे सहिष्णू आहेत, आपला महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर चालत आहे. सर्व मुस्लीम दोषी आहेत, अतिरेकी आहेत असे मी कधीही म्हणणार नाही परंतु आय.एस.आय., तोयबा, सिमी सारख्या संघटनां, हिंदूस्थानात राहून पाकिस्तानच्या जिंदाबादच्या घोषणा देणा-या या लोकांना शूट ॲट साईट केल्याशिवाय आपल्या येथील दहशवतवाद संपणार नाही. परंतु असे करण्यास आपली हिंमत नाही. आपण कितीही पोपटासारखे बोलत असालात तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे माननीय आर. आर. पाटील साहेब आपल्या देशात रेल्वेचा अपघात झाला होता, त्यावेळेस रेल्वे मंत्र्यांनी राजीनामा दिला होता तसेच विमान अपघात झाला होता त्यावेळेस कै. लालबहाद्दूर शास्त्रीजींनी राजीनामा दिला होता, हा आपल्या देशाचा इतिहास आहे. त्यामुळे कालच्या बॉम्बस्फोटात जे शेकडो निरपराध लोक मृत्यू पावले आहेत, त्याची जबाबदारी घेऊन आर.आर.पाटील आपण राजिनामा दिल्याशिवाय आता पर्याय राहिलेला नाही. आपण या ठिकाणी केवळ मताचे राजकारण करीत आहात त्यामुळे या खुर्चीवर बसण्याचा आपल्याला मुळीच अधिकार नाही. आपण योग्य प्रकारे कारभार करीत नाही त्यामुळे आपण ही खुर्ची खाली करा, दुस-या चांगल्या लोकांना त्या खुर्चीवर येऊ द्या. आज हिंदूस्थानातील सहिष्णू हिंदू लोकांच्या सहनशिलतेचा अतिरेक झालेला आहे. त्यामुळे हे सहिष्णू लोक मंत्रालयात घुसल्याशिवाय राहणार नाहीत. ज्यावेळेस हे लोक मंत्रालयात घुसतील व आपले कार्य पार पाडतील त्यावेळेस आम्हाला जातीयवादी, देशद्रोही असे नाव ठेवू नका. मुस्लीम आतंकवाद शिकविणा-या मदरशांना परवानगी देणारे आर.आर.पाटील साहेब, मुल्ला मौलवींना साथ देत आहेत.

यानंतर श्री. अजित...

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

तसेच जेवढे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये जे दोषी होते त्यांना या सरकारने सजा केलेली नाही. संजय दत्तसह 124 आरोपीसह कोणावरही कडक कारवाई या सरकारने केलेली नाही. तेव्हा माझी मागणी आहे की, दिनांक 11 जुलै 2006 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या मालिकेची जबाबदारी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी स्वीकारावी आणि मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, काल, दिनांक 11 जुलै, 2006 रोजी मुंबई शहरात जी बॉम्बस्फोटाची मालिका झाली त्यामध्ये जवळपास 200 जणांचा मृत्यू झालेला आहे. हा एक पूर्वनियोजित, पध्दतीशीर हल्ला होता. हा पहिलाच हल्ला नाही तर यापूर्वी देखील अशाप्रकारचे हल्ले झालेले आहेत त्याचा पाढा याठिकाणी वाचून दाखविण्यात आला. हा शेवटचा हल्ला आहे असेही नाही. यापुढेही अशातऱ्हेच्या घटना घडू शकतात. आज याठिकाणी त्या संदर्भात चर्चा होत आहे. माझी अपेक्षा होती की, आपण सर्वजण मिळून या प्रश्नावर सखोल अभ्यास करुन काहीतरी मार्ग शोधून काढू, दुर्दैवाने.......

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे तो निंदाव्यंजक प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव निंदाव्यंजक होऊ शकत नाही असे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्यांचे भाषण होणार असेल तर त्यांनी भाषण करु नये अशी माझी विनंती आहे. त्यांनी या प्रस्तावाचे समर्थन करावे किंवा त्यास विरोध तरी करावा.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मला या प्रस्तावाचे समर्थन किंवा विरोध जे काही करावयाचे आहे ते मी करणार आहे. परंतु या प्रस्तावाच्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे विचार मांडले....

श्री.दिवाकर रावते ( बसून ) : हा काय वाह्यातपणा आहे.

कर्नल सुधीर सावंत : मी वाह्यातपणा केलेला नाही.....

**तालिका सभापती** : वाह्यातपणा हा शब्दप्रयोग कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटांच्या संदर्भात देशद्रोही कारवाया करणाऱ्यांविरुध्द निंदाव्यंजक प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. हा निंदाव्यंजक प्रस्ताव आहे. सरकारच्या निंदेचा प्रस्ताव नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी निंदाव्यंजक प्रस्तावावर बोलावे, आम्ही काय बोललो याचे उत्तर त्यांनी देऊ नये. त्याचे उत्तर माननीय गृहमंत्री देतील. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी निंदाव्यंजक प्रस्तावावर बोलावे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्मानीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याठिक्‌ाणी नियम 93 अन्वये प्रस्ताव आला होता, परंतु आपण नियम 97 अन्वये चर्चा सुरु केलेली आहे. त्यामुळे सभागृहात दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांना त्यांचे मत मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मला अपेक्षा होती की, सर्वजण मिळून सरकारला एक दिशा देण्याचे काम करु शकलो असतो.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 15:55

कर्नल सुधीर सावंत...

परंतु दुर्दैवाने या चर्चेचा राजकीय आखाडा झाला. आपण याठिकाणी श्री.राणे, श्री.विलासराव देशमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नांवे घेऊन प्रश्न उपस्थित केले. त्यांचा बॉम्बस्फोटाशी काही एक संबंध नाही. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, या घटनेमागचे मूळ काय आहे, त्याची पार्श्वभूमी काय आहे, हे का घडत आहे याबाबतीत आपण विचार केला पाहिजे. असे असते की, एक विहीर असते त्यामध्ये एक बेडूक असतो त्याला वाटते की, ही विहीरच एक जग आहे, त्याला बाहेरचे काहीच दिसत नाही. त्यामुळे असे उत्तर याठिकाणी येते. आपण निर्णय देऊ शकत नाहीत. या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा होण्याच्या दृष्टीने मी गेल्या चार वर्षापासून विनंती करत होतो की, नियम 189 अन्वये या सदनाची एक समिती करावी. कारण हा विषय फक्त महाराष्ट्रापूरता मर्यादित नसून हा विषय कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीतीलही नाही, हा विषय इंटरनल सेक्युरिटीचा आहे. या गंभीर घटनेमध्ये 200 लोकांची हत्या झालेली आहे, उद्या पाच हजार लोकांची हत्या होईल. त्यामुळेच मला याठिकाणी सर्वांना विनंती करावयाची आहे की, याचे गांभीर्य ओळखून सर्व सदस्यांनी पुढे जाण्याच्या दृष्टीने, या महाराष्ट्रामध्ये कसे वागले पाहिजे, राज्य सरकार, केंद्र सरकार आणि लोकांनी एकत्रित बसून अशा आव्हानांना तोंड देण्याच्या दृष्टीने सारासार विचार केला पाहिजे. ही लढाई गेल्या तीस वर्षापासून चालू आहे, ती आजची नाही. गेल्या तीस वर्षापासून ज्यावेळी सोव्हीएत संघामध्ये अफगाणिस्थानचे सैन्य घूसले त्यावेळी अमेरिकेने लादेनला जीवंत केले, तालिबानला निर्माण केले, आयएसआयला निर्माण केले. हे सर्व अमेरिकेने निर्माण केले. या हिंदुस्थानमध्ये हिंदू-मुस्लीम यांच्यामध्ये दंगली घडवून आणून या देशामध्ये परत एकदा फाळणी करण्याचा हा कुटील डाव होता. त्याचे परिणाम आज आपण सर्वजण पाहत आहोत. कालच्या घटनेमध्ये 200 लोक मरण पावले असून तोही या कुटील नितीचाच एक परिणाम आहे. मुंबईत 1993 साली आणि आज अशा प्रकारचे बॉम्बस्फोट झालेले आहेत. पार्लमेंटवर हल्ला झाला, त्याचे प्रशिक्षण अतिरेक्यांना अफगाणिस्थानमध्ये देण्यात आले होते. अफगाणिस्थान आणि पाकिस्थानच्या बॉर्डरवर अतिरेक्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशिक्षण घेऊन अतिरेकी पाकिस्थानमधून काश्मीरमध्ये आले आणि मग त्यांनी दिल्लीमध्ये येऊन भारताच्या सर्वोच्च पार्लमेंटवर हल्ला केला. त्यामुळे ही छोटी गोष्ट नाही. त्यामुळेच मला विनंती करावयाची आहे की, आज जो अशा प्रकारचा हल्ला झालेला आहे, तो कोणी केला ? आजच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

हल्ल्यामध्ये 200 लोक मेले आहेत. त्यामध्ये लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-महंमद या संघटना आहेत. याठिकाणी मी आठवण करुन देऊ इच्छितो की, त्यावेळचे माननीय अर्थमंत्री श्री.जसवंत सिंग यांनी मसुदला कंदारला सोडले. त्याचवेळी जैश-ए-महंमद याने हल्ला केला. त्यामुळे याबाबतीत आपण कोणी राजकारणाची भाषा करु नये. ज्यावेळी कारगीलचे युध्द करण्यात आले त्यावेळी आमचे सैनिक म्हणत होते की, आम्ही समोरुन का लढायचे, आम्हाला मागून हल्ला करण्याची परवानगी द्यावी. कारण, त्यावेळी दहशतवादी शिखरावर जाऊन आमच्या सैनिकांवर मशीनगणच्या माध्यमातून हल्ला करीत होते. परंतु त्यावेळी एनडीए सरकारने मागून हल्ला करण्याची परवानगी दिली नाही. त्यामुळे याठिकाणी आपल्याला दहशतवाद्यांविरुध्दच्या लढाईबद्दल काही बोलण्याचा काही एक अधिकार नाही. याठिकाणी मला राजकीय विषय आणायचा नव्हता, परंतु दुर्दैवाने तो आणावा लागला. याठिकाणी राजकीय संदर्भातून एकमेकांवर आरोप करुन हा प्रश्न सुटणार नाही. कारण याला चार भाग आहेत. या प्रश्नाच्या बाबतीत लढायचे असेल तर त्याला चार भागातून पहावे लागेल. त्यातील पहिला म्हणजे, या ज्या दहशवादी संघटना आहेत, त्या कोणत्या आहेत ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...........

Terrorist is a fish in the water. Terrorist is a fish in the sea. समुद्रातील हे मासे कसे हेरणार ? हे फार कठीण आहे, एवढे सोपे नाही. अमेरिकेतील 9/11 च्या घटनेमध्ये 4 विमाने हायजॅक करण्यात आली आणि वर्ल्ड ट्रेड सेंटर उद्ध्वस्त करण्यात आले. नागपूर येथे आरएसएसच्या मुख्यालयावर हल्ला करणा-या दहशतवाद्यांना पोलिसांनी पकडले. या ठिकाणी झ ालेला हल्ला निकामी करण्यात आला. या कामी पोलीस यशस्वी झाले. आज पोलिसांचे जे काम आहे ते जितके शक्य आहे तेवढे ते करीत आहेत. परंतु, गेल्या काही वर्षात ही सर्व पोलीस यंत्रणा आपण मारुन टाकलेली आहे. गेल्या काही वर्षात पोलिसांना ज्या पध्दतीने वागविलेले आहे त्यानुसार त्यांची ताकद आपण नष्ट केलेली आहे. हे एका सरकारने नाही तर एनडीअे असेल, कॉंग्रेसचे असेल सर्व सरकारांनी केलेले आहे, तुम्ही आम्ही केलेले आहे आणि याची जबाबदारी या सदनात बसलेल्या सर्वांची आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : सन्माननीय सदस्य, कर्नल सुधीर सावंत यांना मी विनंती करतो की, त्यांनी कृपया विषयाला धरुन बोलावे. या ठिकाणी चर्चेला जो प्रस्ताव आलेला आहे त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांनी बोलावे, तेवढेच रेकॉर्डवर घेतले जाईल. The Hon. Member should confine his speech to the subject.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य, कर्नल सुधीर सावंत यांनी सन्माननीय श्री.जसवंत सिंग, एनडीअे सरकार यांचा उल्लेख केलेला आहे. एनडीअे सरकारने पोटा कायदा केल्यानंतर यांच्याच सरकारने तो रद्द केला. हा कायदा का रद्द केला हे देखील त्यांनी मांडले पाहिजे. अतिरेक्यांसाठी हा कायदा करण्यात आला होता. पण सन्माननीय सदस्य आपल्या भाषणात एनडीअे सरकारने अतिरेक वाढविला, असे सांगत आहेत. सन्माननीय सदस्यांना श्री.जसवंत सिंग आणि एनडीअे सरकारचा उल्लेख येथे करता येणार नाही, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी कॉंग्रेसवर हल्ला केला. परंतु, आमच्या पक्षाच्या दोन पंतप्रधानांनी या देशासाठी रक्त दिलेले आहे आणि विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आम्हाला राष्ट्रवाद काय असतो, हे सांगत आहेत. स्वर्गीय



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत.............

इंदिरा गांधी यांनी देशासाठी आपले प्राण दिले. कशासाठी दिले ? दहशतवादाशी लढतांनाच दिले ना ? मी माझ्या भाषणात या विषयाला राजकीय आखाडा बनवू नका म्हणून सांगत होतो. परंतु, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा आमच्या पक्षावर टिका केलेली आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, कर्नल सुधीर सावंत यांच्या मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणी जो विषय चर्चेला आहे त्यासंदर्भात त्यांनी आपली मते मांडावीत, असे मी अनेक वेळा आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे. आपल्याला जेवढे बोलावयाचे असेल तेवढे आपण बोला, परंतु, विषयाला धरुन बोला, एवढीच विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी फक्त एवढीच विनंती करतो की, दहशतवादाचा मुकाबला आपल्याला 4 पातळीवर करावा लागेल. पहिली म्हणजे दहशतवादी संघटनांविरुध्द लढाई. दुसरी पातळी म्हणजे, दहशतवादी संघटना या संघटित गुन्हेगारांवर अवलंबून असतात. या देशामध्ये दहशतवादी संघटना मुंबईला लक्ष्य करीत आहेत, त्यांचे मुंबई हे टारगेट आहे. कारण, मुंबई हे संघटित गुन्हेगारांचे कॅपिटल आहे. संघटित गुन्हेगार दहशतवादी संघटनांमार्फत आपली दहशत बसवित आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. हा लढा दहशतवादी विरोधी करतांना संघटित गुन्हेगारांविरुध्द देखील केला पाहिजे. तिसरी बाब म्हणजे, मनी लॅण्डिंग. दहशतवादी संघटनांना संघटित गुन्हेगारांकडून प्रचंड मोठया प्रमाणावर पैशांचा पुरवठा होत आहे. मुंबईमध्ये अनेक फ्रंट कंपन्या आहेत. दहशतवाद हा संघटित गुंन्हेगारांच्या पैशावर निर्माण झाला आहे. महाराष्ट्र टाईम्स आणि लोकसत्तामध्ये श्री.यादव यांनी दिल्लीमध्ये जेट एअरवेजमध्ये दाऊद इब्राहिमचा पैसा आहे, असा आरोप केलेला आहे. हा पैसा कोठून आला, याचा पाठपुरावा आपण केला का ?

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ...... 16:05

कर्नल सुधीर सावंत ..........

याबद्दल कोणी चर्चा केली काय ? मुंबईतील फिल्म इंडस्ट्री संघटीत गुन्हेगारांच्या पैशावर उभी आहे. आपण त्यांच्या विरुध्द काय करतो ? त्यामुळे गुन्हेगारीतून निर्माण होणारा पैसा हा गुन्हेगारांपासून तोडणे .......

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत आपण विषयावर बोलावे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी माझे बोलणे बंद करु काय ? मी विषयावरच बोलत आहे. मी अंतर्गत सुरक्षेचा विषय मांडत आहे. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्या. सन्माननीय सदस्य बोलतांना आमच्या पक्षावर टीका करतात. आम्ही बोललो तर आपण सांगता की, विषयाला धरुन बोला. हे कसे काय चालेल ? ते वाटेल ते बोलतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : आपण विषयावर बोला. आपल्याला विषय सोडून बोलता येणार नाही. मी तुम्हाला अनेक वेळा सांगितले की, तुम्ही विषयावर बोला. तुम्ही विषय सोडून बोलू नका.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण मला माझा विषय मांडण्यासाठी संरक्षण द्या. दुस-या सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत आपण विषयाला धरुन बोलावे. अजून ब-याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा मुद्दा एकच होता. हा लॉ ॲण्ड ऑर्डरचा प्रश्न नाही. हा इंटरनल सिक्युरिटीचा प्रश्न आहे. मी आपल्याला चार पैलू सांगितले. एक दहशतवादा विरुध्द, दुसरा संघटीत गुन्हेगारी विरुध्द, तिसरा मनी लँडींग विरुध्द आणि चौथा गुन्हेगारांना गुन्हेगारीतून निर्माण होणा-या पैशापासून तोडण्याची यंत्रणा उभी केली पाहिजे. मी सन 1993 साली मनी लँडींग विरुध्द कायदा करण्याची मागणी केली होती. सन 2005 मध्ये केंद्र सरकारने मनी लँडींगचा कायदा पास केला. राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आहे. साऊथ अमेरीका कोठे आहे ? साऊथ अमेरिकेतील कोकेन तेथून मुंबईमध्ये येते. 1 किलो हेरॉईनची किंमत

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ..........

मार्केटमध्ये 1 कोटी रुपये आहे. त्यातून प्रचंड पैसा गुन्हेगारांकडे येतो आणि तोच पैसा दहशतवाद्यांना हत्यार विकत घेण्यासाठी मिळतो. या दहशतवाद्यांचे संपूर्ण जगभामध्ये नेटवर्क आहे. ज्या पद्धीतने गुन्हेगारीतील पैसा गुन्हेगारांना मिळतो, दहशतवाद्यांना मिळतो, तो आपल्याला तोडावा लागेल. त्यासाठी आपल्याला यंत्रणा उभी करावी लागेल. कारण ती यंत्रणा आज आपल्या पोलीस दलाकडे नाही. इकॉनॉमिक क्राईम ब्रँचचा इन्चार्ज डी.सी.पी. आहे. मुंबईसारख्या राजधानीमध्ये तो मनी लँडींग विरुध्द लढू शकतो काय ? ड्रग्ज ट्रॅफिकींग शाखेचा इंचार्ज कोण आहे, तर एक डी.सी.पी. आहे. नारकोटीक्स ब्रँचचा इन्चार्ज डी.सी.पी. आहे. त्याची काय ताकद आहे ? काहीच नाही ? सभापती महोदय, जर विघातक शक्ती विरुध्द आपल्याला ख-या अर्थाने लढा द्यावयाचा असेल तर केंद्र आणि राज्य सरकारच्या गुप्तचर संघटना, सुरक्षा संघटनांना एकत्र मिळूनच लढावे लागेल. सन 1993 साली मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाला त्यावेळी मी 90 खासदारांच्या सहया घेऊन सी.बी.आय. द्वारे चौकशी करण्याची मागणी केली होती. त्याचे कारण असे आहे की, हा राज्य पातळीचा विषय नाही. हा राष्ट्र पातळीचा विषय नाही. हा आंतरराष्ट्रीय पातळीचा विषय आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. दहशतवादी येतो कोठून ? दहशतवादी अफगाणीस्तानातून मुंबईमध्ये येतो. महाराष्ट्र पोलीस काय करणार आहे ?

यानंतर श्री.सुंबरे ......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/MAP/SBT/KGS/MAP. श्री. बोरले नंतर --- 16:10

कर्नल सावंत .....

आणि हा दहशतवाद म्हणजे terrorism is fish in the water, जणू पाण्यातील मासे आहेत. इंटेलिजंट फेल्यूअर म्हणतो आपण. पण महाराष्ट्र पोलिसांकडे काय आहे ? आपल्याकडे जी क्राईम ब्रँच आहे त्यातील ज्या ज्या लोकांनी, पोलीस अधिकाऱ्यांनी संघटित गुन्हेगारी विरोधात लढा दिला, ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी दहशतवाद्यांना कंठस्नान घातले ते पोलीस अधिकारी एक तर तुरूंगात आहेत नाही तर निलंबित आहेत किंवा त्यांच्यावर त्या संबंधात चौकशी सुरू आहे. त्यामुळे साहजिकच पोलीस अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होणार. तेव्हा पोलिसांचे मनोधैर्य वाढवावयाचे असेल तर त्यांना आपणास मजबूत करावे लागणार आहे, त्यांच्या पाठी सरकार उभे आहे याची खात्री त्यांना द्यावी लागेल. सभापती महोदय, ज्यावेळेस ह्यूमन राईट ॲक्ट पार्लमेंटमध्ये आला होता त्यावेळेस त्यांनी त्यात सैन्याला देखील घातले होते. पण मी त्याला विरोध केला आणि सांगितले की, असे केल्याने या देशाचा अंत होईल. तेव्हा पोलीस दल इंटेलिजन्स बरोबर काम करते तेव्हा त्यांना अनेक बरीवाईट, बेकायदा अशी कृत्ये करावीच लागतात. त्यासाठी प्रसंगी त्यांना गुन्हेगारांशी संबंध ठेवावाच लागतो. ही गोष्ट लक्षात न घेता, त्यांचे गुन्हेगारांबरोबर संबंध आहेत म्हणून जर आपण त्यांना तुरूंगात टाकणार असाल तर आपले पोलीस दल टिकणार नाही. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचा सरासरी विचार आपण करू या. कारण मुंबई ही सर्वांचे प्रथम टार्गेट आहे. ज्याप्रमाणे लंडन, माद्रिद ही मोठी शहरे आहेत त्याप्रमाणे मुंबई ही दक्षिण आशियातील सर्वात मोठे स्थळ आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी त्यांच्या काळामध्ये राज्यात, या मुंबईत रस्ते बांधले, पूल बांधले पण या मुंबईला खऱ्या अर्थाने गरज आहे ती सुरक्षिततेची. दहशतवादी तुमच्यावर हल्ला करीत राहणार आणि त्यावर तुम्ही काही करू शकणार नाही तर मग याचा काहीही उपयोग नाही. सभापती महोदय, मी गेली चार वर्षे या सदनामध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी मागणी अनेकदा केली आहे पण दुर्दैवाने त्यावर चर्चा होऊ शकली नाही. हा विषय घेऊन आपण विस्ताराने चर्चा केली पाहिजे. आपले पोलीस दल संघटित करण्यासाठी आपण विचार केला पाहिजे कारण आज आपले पोलीस दल ब्रिटीशांनी स्थापन केलेल्या संघटनेवर आधारित आहे. It is not equipped to fight internal security, it is not equipped to fight terrorism. कारण त्यांच्याकडे काही साधनेच नाहीत. मुंबई पोलिसांकडे आज एक तरी हेलिकॉप्टर आहे काय ? तुम्ही न्यूयॉर्क, वॉशिंग्टन येथील पोलीस दलाकडे 30-30 हेलिकॉप्टर्स

...... केके 2 ...

कर्नल सावंत ....

आहेत आणि आमच्या पोलीस दलाकडे एक चांगली जीप देखील नाही. अशा परिस्थितीत संघटित गुन्हेगारांकडे काय काय असते ? त्यांच्याकडे एके 47 बंदुका, आरडीएक्स सारखी स्फोटके. आता हे आरडीएक्स पीठासारखे असते, पावडर असते. ते कशा तर वळतात आणि मग त्याला एक डिटोनेटर लावता येते त्यात कठीण असे काही नाही. त्यात मेटलचा एकच भाग असतो. त्यामुळे दहशतवादी माणसे ते सहजगत्या कोठेही घेऊन जाऊ शकतात. काल जे बॉम्बस्फोट झाले ते एकाच वेळेस एक दोन मिनिटांच्या फरकांनी 8 ठिकाणी झाले. एखाद्या ब्रीफकेसमध्ये आरडीएक्स ठेवून डिटोनेटर लावले असणार आणि त्याला पुन्हा एखादे टायमर लावले असेल किंवा रिमोट वर ते कंट्रोल केले असणार. याचाच अर्थ ते दहशतवादी हे स्फोट झाले तेव्हा तेथून जवळपासच कोठे तरी असणार. तेव्हा त्यांचा शोध आपण घेतला पाहिजे. कोण दहशतवादी आहे हे आपण शोधून काढले पाहिजे. हे दहशतवादी निर्माण होतच राहणार. कारण त्यामागे लोकांचा आक्रोश असतो. आपण विचारता की, या दहशतवाद्यांची इतकी हिम्मत कशी काय झाली ? अहो, आज तर त्यांनी अशी अनेक आत्मघातकी पथके निर्माण केलेली आहेत. त्यांची हिंमत आपण अजमावू शकत नाही. मी श्रीनगर येथे कारगिलला गेलो होतो. तेथे सैन्यदलाच्या तळावर त्यांनी त्यांच्या आत्मघातकी पथकातील माणसे पाठविली होती. त्यापैकी एकाने आपल्या सैन्याच्या तळावर घुसून स्वत:ला उडवून घेतले. म्हणजे ते केवळ प्रशिक्षितच आहेत असे नाही तर ते मोटीवेटेड देखील आहेत. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... एलएल 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

प्राण देण्यासाठी तयार असलेले म्हणून ते फार घातक आहेत. ते मुंबईमध्ये पोहोचण्यापूर्वी त्यांना पकडले पाहिजे, त्यांची माहिती घेतली पाहिजे, त्यांना गोळया घातल्या पाहिजेत. अनेक वर्षापासून हे काम हे लोक करीत आहेत. म्हणून मी या निमित्ताने विनंती करतो की, केवळ या विषयावर चर्चा करुन भागणार नाही तर या सदनाच्या सदस्यांची एक समिती नेमली पाहिजे. ज्याप्रमाणे माजी सैनिकांची समिती नेमली आहे, त्याप्रमाणे या विषयाचा कायम स्वरुपी अभ्यास करण्यासाठी नेमली पाहिजे. माननीय श्री. नवलकर साहेबांच्या अध्यक्षतेखाली होम डिपार्टमेंटची सब्जेक्ट कमिटी नेमली होती. त्यावेळी अनेक विषयावर अभ्यास व चर्चा करण्यात आली होती. त्या समितीने शासनाला ज्या शिफारशी सादर केल्या त्याबाबत पुढे काहीही झाले नाही. अशाप्रकारे नेमण्यात आलेल्या स्थायी समित्यांची पध्दत बंद करण्यात आल्यामुळे फार मोठे नुकसान झाले आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, हा दहशतवाद पाकिस्तान करीत असेल, अमेरिका करीत असेल, आणखी कुणीही करीत असेल याची आपल्याला माहिती नाही. परंतु या देशाला दुर्बल करण्यासाठी अशाप्रकारचे दंगे आणि घातपात करण्याची प्रक्रिया ही पूर्वीपासून सुरु आहे. अशा संघटनेविरुध्द लढण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना एकत्र यावे लागेल. हा सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर विषय असल्यामुळे तो राजकीय विषय होऊ शकत नाही. हा इंटरनॅशनल सिक्युरिटीचा विषय आहे. त्याकरिता आपण एकत्र येऊन लढले पाहिजे. कारण शेवटी तुमचे सरकार असो किंवा आमचे सरकार असो परंतु यंत्रणा तीच आहे. त्यामुळे काही फरक पडणार नाही. त्यामुळे तुम्ही काय किंवा आम्ही काय कुणीही असले तरी कार्यपध्दती एकच आहे. दाऊद इब्राहीमला आपण पोटा लावला आणि त्याच्याविरुध्द चार्जशीट दाखल केली तरी त्याच्या दहशतीमुळे त्याच्याविरुध्द साक्ष देण्यासाठी कुणीही पुढे येणार नाही. त्यामुळे त्याला कुणीही शिक्षा करीत नाही. अशाप्रकारे तुमचा कायदा दुर्बल झाला आहे. जर आपल्याला दहशतवादाविरुध्द लढावयाचे असेल तर त्याकरिता या देशामध्ये प्रिव्हेंटीव्ह डिटेंशन लॉ असला पाहिजे. आज महाराष्ट्रामध्ये मोक्का आहे. त्यामुळे बऱ्याच गोष्टी पुढे आल्या आहेत त्या लपविण्याचा प्रश्न नाही. सद्या जो पोटा कायदा आहे त्यामध्ये सुधारणा करण्यात आली पाहिजे. आणि जे निरपराध लोक आहेत त्यांना शिक्षा होता कामा नये, अशापध्दतीचा प्रिव्हेंटीव्ह डिटेंशन लॉ आपण केला पाहिजे. कायद्यामध्ये बदल करुन आपण अशाप्रकारे प्रोटेक्शन मॅकेनिझम केले पाहिजे. आज ज्याच्याकडे बन आहे, धन आहे, अशी व्यक्ती जर दहशतवाद करीत असेल तर त्या व्यक्तिविरुध्द जबानी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

देण्यासाठी कुणीही पुढे येणार नाही. ड्रग ट्रॅफिकींग होते, त्याबाबतीत नायजेरीयन माणसाला पकडण्यात येते, स्ट्रीटमधील ड्रग घेणाऱ्याला पकडण्यात येते, परंतु जो किंग पिन आहे, ज्याचे धागेदोरे अमेरिकेत असतील तर त्याला पकडण्याची हिंमत आपल्यामध्ये नाही. त्याकरिता संबंधित कायद्यामध्ये आपल्याला आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. या चर्चेच्या निमित्ताने या मुद्दयांचा देखील आपण अभ्यास केला पाहिजे. याकरिता सर्वांनी एकत्रितपणे विचार करुन सिस्टीम बनविली पाहिजे. अशाप्रकारचा दहशतवाद मुंबईमध्ये पुन्हा घडू नये, आणि या दहशतवादाविरुध्द, संघटीत गुन्हेगारीविरुध्द लढण्यासाठी सर्व माननीय सदस्यांनी एकत्रित विचार करुन अशाप्रकारच्या निंदणीय कारवाईचा विरोध केला पाहिजे, संघर्ष केला पाहिजे. या देशामधील येणाऱ्या पिढीला आपण काय शिकविणार आहोत? ते शिकविण्याची जबाबदारी या सरकारची आणि या सदनातील सर्व माननीय सदस्यांची आहे. त्यासंबंधी आपण काही सुधारणा केली तर येणारी पिढी आपल्याला दुवा देईल असे मला वाटते. असे या संदर्भात मी माझे मनोगत व्यक्त करतो. धन्यवाद.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी आपले विचार व्यक्त करतांना या विषयासंबंधी अभ्यास करण्याकरिता या सभागृहाची समिती नेमण्यासंदर्भात सूचना केली आहे. या सभागृहामध्ये विविध प्रकारच्या आयुधांचा वापर करुन चर्चा करता येते, त्याप्रमाणे माननीय सदस्यांना आवश्यक वाटयास त्यांनी अर्धा तास चर्चेच्या आयुधाचा वापर करुन सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी, आणि या विषयासंबंधी जरुर चर्चा करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कर्नल सुधीर सावंत यांनी याठिकाणी जी सूचना केली आहे, त्या संदर्भात मला नियमातील तरतुदीचा उल्लेख करावासा वाटतो. माननीय सदस्यांकडून कोणत्याही विषयासंबंधी मतप्रदर्शन केले जाणे ही बाब मी स्वागतार्ह समजतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

परंतु पुन्हा हा विषय सभागृहासमोर आला आहे, असे मत आहे. यिम 97 अंतर्गत चर्चेच्या संबंधात म्हटलेले आहे की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या एखाद्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास, ज्या बाबीसंबंधी चर्चा उपस्थित करावयाची असेल ती बाब स्पष्टपणे व नेमकेपणाने निर्दिष्ट करणारी लेखी सूचना सचिवांकडे देता येईल.

परंतु, संबंधित बाबीवर चर्चा उपस्थित करण्यासंबंधीची कारणे नमूद करणारी स्पष्टीकरणात्मक टिप्पणी त्या सूचनेला जोडण्यात आलेली असेल :

तसेच, त्या सूचनेच्या पुष्ट्यर्थ किमान इतर दोन सदस्यांनी तीवर सही केलेली असेल." त्याप्रमाणे सूचना दिलेली आहे, पुढे म्हटलेले आहे की, "ज्या सदस्याने सूचना दिली असेल त्याच्याकडून व मंत्र्यांकडून, सभ्ांपतींना आवश्यक वाटेल अशी माहिती मागविल्यानंतर ती बाब विधान परिषदेत लवकर उपस्थित करण्यात यावी इतकी निकडीची व पुरेशी महत्वाची आहे अशी सभापतींची खात्र्जी झाली तर त्यांना ती सूचना दाखल करुन घेता येईल," तसेच आपण प्रोसिजर पूर्ण केलेले आहे. पुढे म्हटलेले आहे की, " आणि सभागृहाच्या नेत्याश्यी विचारविनिमय करुन ज्या दिनांकास ती बाब चर्चेसाठी घ्यावयाची तो दिनांक ठरविता येईल आणि परिसिथतीनुसार त्यांना उचित वाटेल त्यापमाणे अडीच तासांहून अधिक नाही इतका वेळ चर्चेसाठी देता येईल.

परंतु, त्या बाबीची चर्चा करण्यासाठी अन्यथा लवकर संधी मिळणार असल्यास, सभापतींना सूचना दाखल करण्यास नकार देता येईल." तो आपला अधिकार आहे.

सभापती महोदय, नियमाप्रमाणे माननीय सभापतींनी ज्या सूचना आल्या होत्या, त्या वाचून दाखविल्या, त्या कोणी सूचना दिलेल्या होत्या त्यांचाही त्यांनी उल्लेख केला. सनमाननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सूचना दिली तीही माननीय सभापतींनी वाचून दाखविली. पुढे नियम 99 मध्ये म्हटलेले आहे की, सभ्ांगृहापुढे मतदानासाठी कोणताही औपचारिक प्रस्ताव असणार नाही. ज्या सदझस्याने सूचना दिली असेल त्यास लहानसे दिवेदन करता येईल व मंत्री त्यास संक्षिप्त उत्तर देतील. ज्या कोणत्याही सदस्याने सभापतींना पूर्व सूचना दिली असेल त्या सदस्यांस चर्चेत भाग घेण्याची परवानगी देता येईल. परंतु पूर्व सूचना दिलेल्या सदस्यांस, चर्चेत भाग घेण्याची संधी दिल्याखेरीज तो चर्चेत भाग घेणार नाही." सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, सन्माननीय सदस्य मेजर सुधीव सावंत हे मिलिटरी मॅन म्हणून बोलणार हे अपेक्षित होते. त्याप्रमाणे ते बोलले. त्यांनी चर्चेत भाग घेतला. राष्ट्रीय आपत्ती समजून त्यांना बोलायला दिले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

असेल. परंतु जो नियम आहे, त्याला बाजूला करुन त्यांना बोलण्याची परवानगी दिली असेल तर ते बरोबर नाही.

**The Panel Chairman** : This is by convention.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल मुंबईमध्ये गंभीर अशाप्रकारची धटना घडल्यानंतर या घटनेच्या संदर्भात समोरच्या बाकावरील एकाही सन्माननीय सदस्यांनी या विषयाची सूचना दिली नाही, याचे आम्हाला आश्चर्य वाटते.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97,98,99 वाचून दाखविला. शेवटचे वाक्य महत्वाचे असल्यामुळे त्या विषयी बोलणे त्यांना उचित वाटले नाही. परंतु मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, पूर्व सूचना दिलेल्या सदस्यांच्या नंतर बाकीच्या सदस्यांना बोलण्यास मिळेल,अशाप्रकारचे संकेत आहेत.

सनमाननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात नोटीस दिली नसल्याचे सांगितले. परंतु सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना नियम 97 अन्वये स्थगन प्रस्तावाची नोटीस देता येत नाही.

यानतंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

ही सत्तारुढ पक्षाची अडचण असते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम वाचून दाखविला. त्यासंदर्भात आपण निर्णय दिलेला आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, एखादा विषय सभागृहात आल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. आपण निर्णय दिल्यामुळे मी या विषयावर बोललो नाही पण एखादा प्रस्ताव सभागृहासमोर आल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना त्यावर बोलण्याचा अधिकार असतो.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आज ही अत्यंत महत्वाची चर्चा या सभागृहात घडविली जात आहे. या चर्चेसाठी आम्ही मागणी केली होती. या चर्चेमधील गांभीर्य जाऊ नये हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मी या चर्चेमध्ये पुनरावृत्ती करु इच्छित नाही किंवा त्याच त्याच मुद्यांवर मी चर्चा करावयास मागत नाही. सभापती महोदय, जे आरडीएक्स येते ते कोणत्या मार्गाने येते ? कोठून येते ? याबाबत मी आणि या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, आम्ही अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले. श्री. अनंत तरे हे आज गॅलरीमध्ये उपस्थित आहेत. जेएनपीटीमध्ये मोठ्या प्रमाणावर आरडीएक्स येते. त्याची चर्चा आम्ही अनेक वेळा सभागृहामध्ये केली. कोकण किनारपट्टीवर अनेक ठिकाणी बेकायदेशीररित्या आरडीएक्स उतरविले जाते आणि तेथून मुंबईमध्ये आणि संपूर्ण देशामध्ये त्याचे वितरण होते. त्याची चर्चा अनेक वेळा या सभागृहामध्ये केली. जेएनपीटीमध्ये आपला कंट्रोल नाही. जेएनपीटी हा कस्टम नोटिफाईड एरिया आहे. त्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचा संबंध नाही. त्यामुळे त्या ठिकाणी आपल्याला हस्तक्षेप करता येत नाही असे उत्तर या सभागृहामध्ये दिले गेले. परंतु जेएनपीटीतून, कस्टम नोटिफाईड एरियातून बाहेर पडल्यानंतर त्याची वाहतूक आपल्या एरियातून होते. त्याचे संपूर्ण नियंत्रण आपल्या गृह खात्याकडे आहे. सभापती महोदय, हा विषय मोठा आहे. या ठिकाणी अनेक बंदरे आहेत. वेगवेगळे किनारे आहेत. अनेक मच्छिमारी जेट्टया आहेत. रेतीच्या जेट्टया आहेत. त्या ठिकाणी आपल्या खात्याचे कोणतेही नियंत्रण नाही. आपल्या शासनाने किंवा गृह खात्याने केव्हाही त्याची गंभीर दखल घेतलेली नाही. मोठ्या प्रमाणावर आरडीएक्स उतरविले जाते त्यामुळे मोठे स्फोट होण्याची शक्यता आहे याबाबत या सभागृहामध्ये आम्ही अनेक वेळा चर्चा केली. 1992 साली मुंबईमध्ये जे स्फोट झाले त्यावेळी श्रीवर्धनमध्ये मोठ्या प्रमाणावर आरडीएक्स उतरले होते. श्रीवर्धनच्या आराटीच्या बंदरामध्ये आरडीएक्स उतरले होते. ज्यांनी ते उतरविले त्यांच्यावर गुन्हे दाखल न करता जे गरीब मुसलमान होते, ज्यांचा काही संबंध नाही त्यांना त्यामध्ये गोवण्यात आले आणि त्या प्रकरणाला वेगळी दिशा दिली. जे आरोपी होते ते सुटले. कोर्टामध्ये पुरावे देण्यामध्ये आपण अपयशी ठरलो किंवा आपण कोर्टामध्ये हरलो. ते आरोपी निर्दोष सुटल्यानंतर आपल्या गुप्तहेर खात्याने त्यांच्यावर कोणते लक्ष ठेवले ?

यानंतर श्री. शिगम ...

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:30

(श्री. जयंत प्र. पाटील...)

सभापती महोदय, मागे मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील जे आरोपी सुटले ते आरोपी सध्या कुठे आहेत ? ते काय करीत आहेत ? त्यांचा धंदा काय आहे ? त्यांचा व्यवसाय काय आहे ? याकडे गृहखात्याचे लक्ष नसल्यामुळे कालच्या सारखे बॉम्बस्फोटाचे प्रकार मुंबई शहरामध्ये आणि राज्यामध्ये घडत आहेत. गेल्या आठवड्यात सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, औरंगाबाद आणि मालेगाव याठिकाणी अतिरेक्यांचे अड्डे आहेत. त्याठिकाणी अतिरेकी संघटित होतात. औरंगाबाद आणि मालेगाव याठिकाणी जे अतिरेकी पकडले त्यांच्या संदर्भात केलेल्या तपासाबाबतची अधिक माहिती देण्यास राज्यमंत्री महोदयांनी नकार दिला. सर्वच माहिती स्पष्टपणे सांगू शकत नाही, पण अतिरेक्यांचा धोका मुंबईला देखील आहे असे तपासामध्ये दिसते, असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. तेव्हा त्या तपासामध्ये काय निष्पन्न झाले, हे या सभागृहाला समजणे आवश्यक आहे. मालेगाव आणि औरंगाबादमध्ये पकडलेले अतिरेकी यांच्या बाबतची माहिती, तसेच त्यांच्या ड्रायव्हरने दिलेला जबाब, तसेच अतिरेकी कारवायांशी कोणाकोणाचे लांगेबांधे आहेत याबाबतची त्या अतिरेक्यांकडून उघड झालेली माहिती या सा-या गोष्टी आम्हाला सांगितल्या पाहिजेत. काल अतिरेक्यांनी मुंबईतील उपनगरीय रेल्वेमधील फर्स्ट क्लासच्या डब्यांमध्ये एकापाठोपाठ एक असे 7 बॉम्बस्फोट घडवून आणून आमच्या लोकांचे मुडदे पाडले. अशा गोष्टी घडत असतील तर आमचे गृह खाते काय काम करीत आहे, असा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे रेल्वे प्रशासनाच्या अधिकाराखालील आवारामध्ये कोणतीही घटना घडली तरी त्याबाबतीत राज्याच्या गृह खात्याला कोणताही हस्तक्षेप करता येत नाही. पण मी हे सांगू इच्छितो की, बान्द्रा रेल्वे स्टेशन तसेच माटुंगा रेल्वे स्टेशनचे आवार सोडून अन्य ठिकाणी या गृह खात्याचेच अधिकार आहेत ना ? मग रेल्वेमध्ये आरडीएक्स ठेवताना हे अतिरेकी राज्याच्या गृह खात्याच्या अधिकारामध्ये असलेल्या जागेतूनच गेलेले आहेत ना ? त्यामुळे गृहखात्याला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. हे जे आरडीएक्स आणले जाते ते शोधून काढण्याची कोणती यंत्रणा शासन उभी करणार आहे ? हे आरडीएक्स समुद्र मार्गेच येते. एअरपोर्टच्या ठिकाणी असलेल्या सुरक्षेव्यवस्थेमुळे हे आरडीएक्स विमानमार्गे येऊ शकत नाही. आपल्या राज्याला 740 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

समुद्र किना-यावर बाहेरुन आरडीएक्स येणार नाही हे पाहाण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही. मी एक बंदर व्यावसायिक आहे. म्हणून मी हे सांगू इच्छितो की, समुद्र किना-यावर सक्षम अशी यंत्रणा असली पाहिजे. कस्टमची यंत्रण आहे. परंतु ती फक्त नोटीफाइड् बंदरावर आहे. परंतु अनेक बंदरे अशी आहेत की ती कस्टम नोटीफाईड नाहीत. तेव्हा याबाबतीत शासन कोणती खबरदारी घेणार आहे, हे या चर्चेच्या माध्यमातून आम्हाला समजले पाहिजे. मालेगाव आणि औरंगाबादमध्ये अतिरेक्यांचे अड्डे आहेत. काही लोकप्रतिनिधींनी या अतिरेक्यांच्या संघटनांना फंड देखील दिलेला आहे.

(**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील............

काही लोकप्रतिनिधी आपला फंड कुठेही वितरित करतात. जयंत पाटील अलिबागचे आहेत, त्यांचा नागपूर आणि औरंगाबादशी काय संबंध आहे? आपले पोलीस खाते काय करीत आहे? ती संस्था कोणती आहे? त्या ठिकाणी काही चांगले काम होते, चांगली शिकवणूक दिली जात असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. राज्य शासन याला कशी परवानगी देते. आमदार किंवा खासदार जो फंड देतात, त्या कामाचे एस्टीमेट तयार होत असताना त्यावर आमचे नियंत्रण आहे. आम्ही कोणाला फंड द्यायचा हे आम्हाला माहिती आहे. त्याबाबत नियम ठरवून दिले आहेत. मी कोणालाही फंड देऊ शकत नाही. म्हणून याचे मूळ शोधून काढले पाहिजे. तपास करीत असताना जर त्यामध्ये आम्ही गुंतलेले असू तर तपास पूर्णपणे होणार नाही. ही चर्चा सुरु असताना मी दोन वेळा हस्तक्षेप केला होता. या चर्चेचे गांभीर्य राखले पाहिजे. राजकारण जरुर करावे. राजकारणावर चर्चा करण्यास सभागृहास बराच वेळ आहे आणि संधी देखील आहे. पण आज या सभागृहाकडून जनतेची वेगळी अपेक्षा आहे. या चर्चेच्या माध्यमातून महाराष्ट्राची आणि मुंबईची जनता वेगळया भावनेने पहात आहे. म्हणून माझी कळकळीची विनंती आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी भाषण करताना अनेक उदाहरणे दिली. मी त्या उदाहरणांची पुनरावृत्ती करणार नाही. त्याचे मूळ गृह विभागाला माहिती आहे. गृह विभागाने कुठे तपास थांबविला हे त्यांनाच माहिती आहे. मालेगावमध्ये जी घटना घडली त्यामध्ये आरोपींनी दिलेला जबाब, ड्रायव्हरने दिलेल्या जबाबामध्ये त्यांनी सांगितले आहे. गृह विभागाने सांगितले की, आमदार निवासामध्ये अतिरेकी येऊन गेले. येथपर्यंत सांगितले जाते आणि तपास थांबतो. पुढे या प्रकरणाचे काय झाले? उद्या आम्ही आमदार निवासात रहायचे की नाही हे ठरविण्याची वेळ आलेली आहे. मी अनेकदा या सभागृहात सांगितले की,आमदार निवासात आमदारांव्यतिरिक्त कोणीही राहू नये. आमच्या लॉबीमध्ये व पॅसेजमध्ये 200-200 माणसे झोपलेली असतात. ते राजकीय कार्यकर्ते वाटत नाहीत. अशा व्यक्ती आमदार निवासामध्ये झोपलेल्या आढळून येतात. माझ्या या मताशी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य सहमत होतील. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचे चेहरे लगेच ओळखता येतात. मंत्रीमहोदय बंगल्यांमध्ये राहतात आणि आम्ही आमदार निवासामध्ये राहतो. या संदर्भात मी माननीय सभापती महोदयांकडे पत्र दिले आहे. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितले की, विधानभवनामध्ये देखील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...........

आरडीएक्स येऊ शकते. त्यांचे या संदर्भातील ज्ञान अधिक आहे. त्यामुळे हे विधानभवन सुध्दा उडविले जाऊ शकते. या संदर्भात शासनाची जी यंत्रणा आहे, चेकनाके आहेत त्याठिकाणी योग्य तो तपास होतो की नाही या वादाचा मुद्दा आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, या विधानभवनामध्ये मी कोणतीही गोष्ट आणू शकतो. आपली सुरक्षा यंत्रणा सक्षम नाही. विधानभवनामध्ये जर ही परिस्थिती असेल तर बाकीच्या यंत्रणेची काय परिस्थिती असावी?

सभापती महोदय, मालेगाव आणि औरंगाबादमध्ये जे अतिरेकी सापडले त्या संदर्भात सहा महिन्यापूर्वी सभागृहात माहिती दिली गेली की, या अतिरेक्यांपासून मुंबई शहराला धोका आहे. मग मागील सहा महिन्यात शासन काय करीत होते? सभागृहाच्या रेकॉर्डवर ही माहिती आहे. सभागृहात सहा महिन्यापूर्वी सांगितले असल्यामुळे सहा महिन्यात काय कारवाई झाली हे या चर्चेच्या माध्यमातून सभागृहाला कळले पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

आपले अधिकारी कसे आहेत, सहा महिन्याच्या काळात या अधिका-यांनी कोणता तपास केला ? कोणत्या अधिका-याने काय तपास केला याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. मंत्री, आमदार सुध्दा टी.व्ही. वर स्टेटमेंट देत नाही अशा थाटात आपले अधिकारी टी.व्ही. वर तो-यात स्टेटमेंट देत असतात. आपले अधिकारी ज्या प्रकारे स्टेटमेंट देत असतात त्यामुळे आम्ही आमदार आहोत की कोण आहोत अशी शंका येते. आपण या ठिकाणी आश्वासन दिले होते की, सहा महिन्याच्या आत यासंदर्भातील संपूर्ण माहिती सभागृहाला देण्यात येईल त्यामुळे आपण या सहा महिन्यात काय तपास केला याची संपूर्ण माहिती सदनाला मिळणे आवश्यक आहे. आपण या ठिकाणी सांगितले होते की, या अतिरेक्यांनी जो दारुगोळा बाळगला होता त्याचा धोका आपल्याला राज्याला होणार होता. त्यामुळे यासंदर्भात गृहविभागाच्या सक्षम यंत्रणेने काय माहिती गोळा केली याचीही माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. काल जी घटना घडली ती अतिशय दुर्दैवी अशी घटना होती. त्यामुळे आपली यंत्रणा कशा प्रकारे काम करीत आहे हे आपण या ठिकाणी माहिती दिली तर आम्हाला समजू शकेल. तसेच पुढील काळात असे प्रकार होणार नाहीत यासंदर्भात आपण कोणती कार्यवाही केलेली आहे याचीही माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आपण सुरक्षीत आहोत, हे शासन चांगले आहे असे महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला वाटले पाहिजे. परंतु हे शासन कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या प्रकारे सांभाळते असे मात्र जनतेला दिसत नाही. सभापती महोदय, मी आज आमदार निवासातून विधानमंडळाकडे यावयास निघालो तेव्हा रस्त्यामध्ये लोक आपल्या शासनकर्त्याबद्दल अत्यंत वाईट बोलत होते, विधान भवनातील कर्मचारी, अधिकारी खासगीत सुध्दा शासनाबद्दल वाईटच बोलत होते. या शासनाचा आमदार म्हणून माझ्या सारख्या आमदाराला फार वाईट वाटते. या शासनाचा पार्ट अँड पार्सल म्हणून मला लाज वाटते. माननीय सुधाताई या ठिकाणी मी जे काही बोलत आहे ते बोलतांना मला चांगले वाटत नाही. सर्वसामान्य माणसाच्या शासनाबद्दल ज्या प्रतिक्रिया आहेत त्या चांगल्या नाहीत. माझ्या कार्यालयात 10-15 वर्षे काम करणा-या पाच महिला काल पश्चिम रेल्वेनेच गेल्या होत्या परंतु या महिला जर एक मिनिट अगोदरच्या लोकलमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

बसल्या असत्या तर या महिला बॉम्बस्फोटात मारल्या गेल्या व असत्या. ज्यावेळेस या महिला माझ्या कार्यालयातून घरी गेल्या, ज्यावेळेस बॉम्बस्फोटाची मालिका समजली तेव्हा मला आणि माझ्या कुटुंबियांना रात्रभर झोप आली नाही. मी चर्चगेट स्टेशनमध्ये गेलो त्या ठिकाणी असणा-या प्रवाशांना पाणी, बिस्कीट, चहा वाटून त्यांची सोय करण्याचा प्रयत्न केला. कालच्या घटनेत स्वयंसेवी संघटनांनी फार चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे. परंतु कालच्या घटनेमध्ये आम्हाला शासन काम करतांना कोठेही दिसले नाही, शासन यंत्रणा आम्हाला कोठेच काम करतांना दिसली नाही. शासनाचे अधिकारी काम करतांना दिसले नाही. स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांनी जी कामे केलेली आहे ती फार चांगल्या प्रकारे केलेली आहेत. ज्या लोकांनी काहीही प्रशिक्षण घेतले नाही अशा लोकांनी खूप चांगले काम केलेले आहे. त्यामुळे या महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला वाटले पाहिजे की, हे सरकार आमचे संरक्षण करते, आमच्या सुखदु:खात शासन सहभागी आहे असे दिसले पाहिजे आणि त्यादृष्टीनेच आपण आपली यंत्रणा उभी करीत असतो. या ठिकाणी मी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते या शासनाने गांभीर्याने घेतले पाहिजेत. राज्याच्या, जनतेच्या संरक्षणाच्या दृष्टीने जे मुद्दे उपस्थित केलेले आहे ते शासानाने गांभीर्याने घेतले पाहिजेत. या ठिकाणी कालच्या घटनेच्या संदर्भात अजून बरेच सन्माननीय सदस्य आपले विचार व्यक्त करणार आहेत, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, या चर्चेमध्ये सहभागी होताना प्रथम मुंबईकरांच्या हिम्मतीला, त्यांनी दाखविलेल्या धैर्याला आणि संयमाला मी सलाम करतो. कारण हा केवळ अतिरेक्यांचा हल्ला नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला होता. परंतु मुंबईकरांनी या हल्ल्यानंतर अपार माणुसकीचे दर्शन घडविले. हिंदू-मुस्लिम आणि सर्वच धर्माचे लोक एकत्र येऊन जखमींना हॉस्पीटलमध्ये नेण्याचे काम करीत होते. मृत पावलेल्यांच्या घराचा शोध घेत होते. गेल्या वर्षी 26 जुलै रोजी निसर्गाने जो प्रकोप घडविला त्यावेळी देखील अशा अपार माणुसकीचे दर्शन मुंबईकरांनी घडविले होते. यावेळी अतिरेक्यांनी हल्ला केला होता. असे असताना सुध्दा मुंबईतील नागरिक ज्या पध्दतीने एकत्र आले तसा हौसला सभागृहातील सदस्यांनी घेण्याची गरज आहे. सभापती महोदय, राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. ही जबाबदारी पार पाडण्यात शासनाला अपयश आलेले आहे असे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. शासन अपयशी ठरले आहे हे त्यांनी मान्य केले पाहिजे. मी टीका करत आहे अशातला भाग नाही. हल्ले वारंवार होत असतात, परंतु ज्या पध्दतीने पोलीस यंत्रणा राबत आहे ते पाहता पोलीस अतिरेक्यांचा बंदोबस्त करतील असे मला वाटत नाही. मला खात्री आहे की, ज्यांनी हा हल्ला घडवून आणला ते आता सीमेपार निघून गेले असतील. आता याची चौकशी सुरु होईल. पोलिसी खाक्या वापरला जाईल आणि झोपडपट्टीतील जे निरपराध लोक आहेत त्यांच्यावर अत्याचार सुरु होईल. जे मुख्य गुन्हेगार आहेत त्यांना हात लावायचा नाही आणि जे निरपराध लोक आहेत त्यांना त्रास द्यावयाचा, असा पोलिसांचा कारभार आहे. अशाप्रकारचे हल्ले वाढत आहेत ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. अशाप्रकारचे हल्ले करुन लोकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न अतिरेकी करीत आहेत. तुमच्या आमच्यात फूट आहे म्हणूनच अशाप्रकारचे हल्ले होत आहेत. सभापती महोदय, भिंवडी येथे पोलीस चौकी उभारण्यास गेले एक वर्षभर विरोध होत होता. हा प्रश्न जर त्याचवेळी टेबलावर सोडविला असता तर पुढील रामायण घडले नसते. हा प्रश्न जाणीवपूर्वक चिघळत ठेवला. तेथील लोकांचा पोलीस चौकी उभारण्यास का विरोध आहे हे जर समजून घेतले असते तर जी घटना घडली ती घडली नसती. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. दोन पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. आपल्यापुढे 1992-93 चा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

इतिहास आहे. किती अतिरेक्यांच्या पोलिसांनी मुसक्या बांधलेल्या आहेत ?. गोळ्या घातल्याने दहशतवाद मिटेल या भ्रमात सरकारने राहता कामा नये. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांच्या काही वक्तव्याशी मी सहमत आहे. काही वक्तव्याशी सहमत नाही. आज शासनाकडे दहशतवाद्यांशी मुकाबला करण्यासाठी कोणती अत्याधुनिक यंत्रणा आहे ? दिल्लीपेक्षा मुंबई शहर जर टार्गेट असेल तर त्यासाठी मुकाबला करण्यासाठी जी यंत्रणा असावयास पाहिजे ती यंत्रणा आपल्याकडे नाही. याचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात द्यावे. राज्यांतर्गत दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. सभापती महोदय, दिनांक 12 मार्च 1993 रोजी मुंबईत बॉम्बस्फोटाची मालिका झाली होती. त्यानंतर दहशतवादी निघून गेले होते. त्यांचे पोलिसांबरोबर कोणते संबंध होते हे आपणा सर्वांना माहीत आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 16:50

श्री.कपिल पाटील...

मघाशी माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले की, रायगड आणि उरणमधील निरपराध गरीब मुस्लिमांवर, मच्छीमारांवर ज्याप्रमाणे पोलिसांनी अत्याचार केले व त्यांच्यावर आरोप केले, तशा प्रकारचा त्रास वा उद्योग मुंबईमध्येही होऊ शकतो. त्यामुळे मला याठिकाणी इशारा द्यावयाचा आहे. गृह खात्याने याबाबतीतील आपली नेमकी दिशा सांगितली पाहिजे. कालच्या घटनेनंतर मुंबईकरांनी अतिशय चांगल्या प्रकारचे धैर्य दाखवून लोकांना इस्पितळात दाखल करण्यासाठी जात होते. त्यावेळी इस्पितळामध्ये काही त्रुटी दिसून आल्या. ज्यावेळी जखमी लोकांना भगवती रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यावेळी त्याठिकाणी सीटीस्कॅन मशीन नव्हती. महापालिकेच्या इस्पितळात अशा प्रकारच्या दहशतवादी कारवायांना तोंड देण्यासाठी ज्याप्रमाणे पोलिसांची यंत्रणा सज्ज होती, त्याचप्रमाणे आरोग्याची यंत्रणाही सज्ज असणे आवश्यक आहे. आपल्याकडे कुठे तरी स्वयंसेवी संस्थांच्या फुटक्या ॲम्ब्युलंस धावत होत्या, त्या वेळेवर पोहचूही शकत नव्हत्या. आपल्या इस्पितळांत सीटीस्कॅन मशीन नसल्यामुळे जखमी लोकांना खाजगी इस्पितळात नेण्यात आले, त्यामध्ये बराच वेळ लागल्यामुळे बऱ्याच जणांचे जीव गेले. यामध्ये जो वेळ गेला त्यामध्ये अनेक लोकांच्या मृत्यूंची संख्या वाढली. आज महापालिकेच्या सर्वच इस्पितळांची दुर्दशा आहे, त्याबाबत अनेकवेळा सभागृहामध्ये चर्चा झाली परंतु आजच्या प्रसंगीही आपण याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे डॉक्टर भरपूर असताना परंतु आपल्याकडें पुरेशा यंत्रणा व साधनसामुग्री उपलब्ध नसते. आपल्याकडील जी सरकारी इस्पितळे आहेत, त्याकडे आपण सातत्याने दुर्लक्ष करीत असतो. त्यामुळे ही सर्व इस्पितळे आपण इएम्ससारखी सुसज्ज करणे आवश्यक आहे. आपण असे जर केले तर आपत्काळात त्याचा नागरिकांना फायदा होतो. मुंबईकरांनी याठिकाणी निशस्त्र अहिंसेच्या मार्गाने जे उत्तर दिले त्याचा पाठ शासनाने आणि सभागृहाने घेण्याची अत्यंत गरजेचे आहे. असे न करता जर आपण द्वेषाचे राजकाण करणार असाल तर भूसभूसीत मातीतून अशा प्रकारे अतिरेकी डोके वर काढणारच. मघाशी भिवंडीच्या व शिवाजी पार्क येथील घटनेचा उल्लेख करण्यात आला. मघाशी माननीय गडकरी साहेबांनी जो उल्लेख केला नेमकी तशीच संधी आज अतिरेक्यांनी साधलेली आहे. त्यामुळे द्वेषाचे राजकारण

..2..

श्री.कपिल पाटील...

संपविण्याची जबाबदारी ही शेवटी सरकारचीच असून त्यातून धडा घेण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे, याबाबतची दखल शासनाने व सभागृहाने घ्यावी, एवढेच मला याप्रसंगी सांगावयाचे आहे. धन्यवाद.

------

...3...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आजच्या या चर्चेच्या निमित्ताने आताच माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मुंबईकरांच्या अभिमानाचा व त्यांनी दाखवलेल्या धैर्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे मीही याबाबतीत मुंबईकरांच्या धैर्यशीलतेला मनापासून दाद देऊन माझ्या भाषणाला सुरुवात करतो.

सभापती महोदय, आपण सगळयांनीच कालच्या घटनेमध्ये राजकीय द्वेष किंवा इतर गोष्टी विसरुन आपल्याला जे करता येईल ते करण्याचा प्रयत्न केला. कालच्या घटनेमध्ये मला जे आढळून आले ते मी याठिकाणी चर्चेच्या निमित्ताने मांडणार आहे. त्यानंतर देशद्रोही कारभाराबाबत मला जे अनुभवयास मिळाले त्याबाबतीतील मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. कालच्या घटनेच्या माध्यमातून मुस्लिमांचा मानवतावाद म्हणून काल त्यांचे मदत करण्याच्या दृष्टीने हात पुढे आले. त्याचवेळी धर्मांध मुस्लिमांचे स्फोटक देशद्रोही काम करणारे हातही आपल्याला पुढे आल्याचे पहावयास मिळाले. हा जो याठिकाणी आपल्याला मुळात फरक दिसतो तो मी हिंदुस्थानी आहे या भावनेतून व्यक्त केला.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

पण दुर्देवाने ही भूमिका समोरच्या सत्तारुढ पक्षालाच नको असेल तर मग शंभर कौरव आपल्या मर्दुकीने जे निर्माण करतात ते पापही आपल्या डोक्यावर घेऊन या शासनाला फिरावे लागेल, तो दोष दुस-याचा असणार नाही. मुंबईकरांमध्ये धैर्य आहे, स्वयंसेवी संस्थांनी पुढे येऊन काम केले, डॉक्टर आले, हे घडत असतांना मुंबईमध्ये आणखी एक इतिहास घडला, औषध विकणा-या दुकानदारांनी आपल्या दुकानातून तातडीने फुकट औषधे पुरविण्याचे काम केले, त्यावेळी त्यांनी धंदा बघितला नाही. कालपासून मतभेद बाजूला जाऊन सर्वांनी काम केले याचा उल्लेख मी सुरुवातीला केला आहे. कुणी अन्न देत होते, पाणी देत होते, कुणी प्रवासाची व्यवस्था करीत होते, नाहीच जमले तर घरी राहा म्हणून आग्रह करीत होते. बेस्ट प्रशासनानेही काल उत्कृष्ठ सेवा दिलेली आहे, त्या बेस्ट प्रशासनाचे खास कौतुक या ठिकाणी झाले पाहिजे. बेस्टने जवळ जवळ 300 ते 400 बसेस पुरविल्या आणि हजारो नागरिकांची गैरसोय कशी दूर होईल याची काळजी त्यांनी घेतली. ट्रकवाल्यांनीही मदत केली. रिक्शा, टॅक्सी यांचा मात्र मर्यादित अनुभव आला. रक्तदानासाठी रांगा लागल्या आणि हे तर या मुंबईचे खास वैशिष्ठय आहे की, असा प्रसंग आल्यानंतर रक्तदान करण्याकरिता नागरिक बाहेर पडतात. कालच्या घडलेल्या घटनेने काय शिकविले असेल तर मुंबईवर असे कितीही प्रसंग आले तरी ही मुंबई उभी राहिल आणि अतिरेक्यांना त्यांच्या इराद्यामध्ये सफल होऊ देणार नाही. हा जो धडा मुंबईकरांनी दिला आहे त्याबद्दल त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या घटनेचे विश्लेषण कसे करावे ? कारण, या घटना पाचविला पुजल्यासारख्या झालेल्या आहेत. राजकारणाकरिता नव्हे, भेद निर्माण करण्याकरिता नव्हे, झ ालेल्या चुकांचा पाढा वाचल्यानंतर पुन्हा भविष्यात चूक होणार नाही याची काळजी घेण्याकरिता या शासनाला आम्ही आमच्या भाषणातून सांगत असतो. प्रत्येकाची सांगण्याची आपआपली शैली असते. वरमी घाव बसल्याशिवाय माणसाला आपण करीत असलेली चूक जाणवत नाही. या घटनेचे वर्णन माननीय शिवसेना प्रमुखांनी केले, त्यांची दोन वाक्ये मी या ठिकाणी वाचून दाखविणार आहे. माननीय शिवसेना प्रमुखांनी अत्यंत मार्मिक वर्णन केले आहे. सन 1992 सालापासून काल झ ालेल्या घटनांपर्यन्त किती बॉम्बस्फोट झाले याचा पाढा विरोधी पक्षनेत्यांनी

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते...........

वाचला, सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी वाचला आणि काही अंशी सन्माननीय श्री.मधुकर सरपोतदार यांनी वाचला. 'निषेध' हा शब्द आता परवलीचा झाला आहे. शिवसेना प्रमुख असे म्हणाले की, "दिल्ली व महाराष्ट्रातही काँग्रेस आघाडीचे सरकार आहे. या दोन्ही सरकारांना बॉम्बस्फोटात मेलेल्यांचे लाख लाख धन्यवाद." तुमच्या कर्तुत्वामुळे का होईना आज जगातून आम्ही सुटलो, असेच त्यांना म्हणावयाचे होते. त्यांनी पुढे असेही म्हटले की, "मुंबईतील रेल्वे गाडयांत जे स्फोट झाले व त्यात निरपराध माणसे मारली गेली, त्यांना सहानुभूती दाखविण्यासाठी आता सोनिया गांधी, देशाचे गृहमंत्री शिवराज पाटील व रेल्वेत हे स्फोट झाले म्हणून रेल्वेमंत्री लालू यादव मुंबईला येत आहेत, हे सर्व लोक मुंबईला आले म्हणून जे मेले त्यांना मोठीच हिंमत आणि धीर मिळणार आहे. कदाचित आपल्या मागे कोणीतरी आहे म्हणून त्या मृतात्म्यांना बरे वाटेल." त्यांनी हे जे सर्व सांगितले आहे ते जरी उपरोधाने सांगितले असले तरी त्याचा अर्थ समजण्याएवढे आपण सज्ञान आहोत. या स्फोटामुळे मुंबई पोलीस आणि दहशतवाद विरोधी यंत्रणेच्या अपयशाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. आजच्या चर्चेचे हेच मर्म आहे. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या मालिका दुर्दैवाने का वाढत चालल्या आहेत ? हा खरा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बोरले..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ..... 17:00

श्री.दिवाकर रावते ..........

रेल्वेच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेर स्फोट झाला. मुंबई सेंट्रल आणि मुलुंड स्थानकात स्फोट झाला. रेल्वे हद्दीमध्ये स्फोट होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो कायदा वाचून दाखविला तो कायदा आम्हाला आताच कळला. राज्याच्या पोलिसांना रेल्वेच्या हद्दीमध्ये जाता येत नसेल, रेल्वेच्या हद्दीमध्ये जाऊन काही तपास करता येत नसेल आणि आर.पी.एफ. काही बघणार नसेल तर आम्हाला हे कळले नाही की राज्याचे गृहमंत्री एवढे अज्ञानी कसे ? काल माननीय गृहमंत्री टी.व्ही. समोर आले. सभापती महोदय, असे असेल तर माननीय गृहमंत्र्यांचा आणि अनामी रॉय यांचा राजीनामा का मागावा हा माझ्यासमोर प्रश्न आहे. आर.डी.एक्स. कोणी तरी आणले असेल किंवा कोणत्या तरी वाहनाने ते आले असणार. आबा घोषणा फार करतात. ते अविचाराने घोषणा करतात. आबा महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आहेत. संपूर्ण महाराष्ट्र तुमच्या खांद्यावर डोके ठेवून निर्धास्त असावा असा गृहमंत्री असला पाहिजे. काल त्यांनी असे सांगितले की, रेल्वेमध्ये पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे आम्ही लवकरात लवकर पोलिसांची संख्या वाढवू. आबा तुमचा काही संबंध नाही ? रेल्वे पोलिसांची संख्या वाढविणे तुमच्या हातामध्ये नाही. मी हे ऐकत होतो. माननीय मुख्यमंत्री त्यांच्या दालनामध्ये या परिस्थितीचा आपण सर्वांनी मिळून मुकाबला केला पाहिजे असे सांगत होते. त्यावेळी त्यांच्या दालनामध्ये आपण हे सांगितले. मला एका गोष्टीचा खेद वाटतो की, महाराष्ट्राचे गृहमंत्री टी.व्ही. समोर येतात आणि जनतेला सांगतात की, जे घडले त्याची आम्हाला माहिती नव्हती, गुप्तचर यंत्रणेला देखील माहिती नव्हती. नंतर काही वेळाने केंद्रीय गृहमंत्री मिडीयासमोर सांगतात की, झालेल्या घटनेची नोंद आमच्याकडे आहे. ही घटना कोणी घडविली त्याची आमच्याकडे माहिती आहे. आम्ही याची योग्य ती दखल घेऊन निश्चित स्वरुपात पावले उचलू. महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांकडे आम्ही कोणत्या केविलवाण्या दृष्टीने पहावे ? राज्याचे गृहमंत्री म्हणतात की, आम्हाला काही माहिती नाही आणि केंद्रीय गृहमंत्री म्हणतात की, आमच्याकडे माहिती आहे. त्यांना या पदावर राहण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे त्यांचे त्यांनीच ठरवावे. आबा तुमची परंपरा जपण्याकरीता तुम्हाला लाल बहादूर शास्त्री बनावे लागेल. तुमची उंची तेवढीच असल्यामुळे तुम्ही ते बना, असे कालची बालमी सांगते. सभापती महोदय, दिनांक 11 मे, 2006 रोजीच्या महाराष्ट्र

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ..... 17:00

श्री.दिवाकर रावते ..........

टाईम्स या वृत्तपत्रामध्ये "रेल्वेची सुरक्षा मजबूर होणार" अशी बातमी आलेली आहे. समीर मणियार या पत्रकाराने ही बातमी दिलेली आहे. त्या बातमीमध्ये असे म्हटलेले आहे की, मुंबईची लाईफलाईन असलेल्या मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या उपनगरी सेवेचा लाभ घेणा-या 50 लाखाहून अधिक प्रवाशांच्या सुरक्षेसाठी छत्रपती शिवाजी टर्मिनस, दादर, कुर्ला टर्मिनस, चर्चगेट व मुंबई सेंट्रल येथे क्लोज सर्किट टीव्ही यंत्रणा येत्या सहा महिन्यात कार्यान्वित होईल. पुढे असे म्हटलेले आहे की, ही यंत्रणा येत्या दहा दिवसात कार्यान्वित होईल. सध्या रोज रात्री प्रत्येक स्टेशनच्या परिसराची छाननी करुन, लोकल सेवा बंद असण्याच्या काळात स्टेशन परिसरात कोणालाही प्रवेश दिला जात नाही. तसेच, लोकलच्या रेकसाठी विविध यार्डात पुरेशी निगराणी ठेवली जाते. हे सर्व काम गुप्त पध्दतीने पण निश्चित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केले जात आहे. सभापती महोदय, गुप्त काम वर्तमानपत्रामध्ये छापले जाते. आम्ही कोणती व्यवस्था केलेली आहे हे अतिरेक्यांना सांगितले जाते.

यानंतर श्री.सुंबरे ............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. बोरले नंतर --- 17:05

श्री. रावते ....

अशा हास्यास्पद गोष्टी आहेत. काल मुंबईत सातच बॉम्बस्फोट झाले. खरे तर अधिक होऊ शकले असते. हे सगळे असेच आहे. सभापती महोदय, या सगळ्या बॉम्बस्फोट मालिका आहेत त्याबाबत आपण वृत्तपत्रात आलेली माहिती वाचली असेलच. 1993 साली जे बॉम्बस्फोट झाले त्या प्रकरणाचे काय झाले ? त्यात कोणाला शिक्षा झाली आहे काय ? हे कसे सरकार ? हे कोण मंत्री ? कशासाठी निवडून येतात ? कशासाठी आपण येथे घटनेच्या पुस्तकाची शपथ घेता ? तुमच्यावर जनतेची कसलीही जबाबदारी नाही का ? त्या जनतेसाठी काहीच करण्याची तुमची इच्छा नाही का? 1993 सालच्या बॉम्बस्फोट प्रकरणातील खटले अजूनही चालले आहेत. त्यातील अबू सालेमला तुम्ही पोर्तुगालहून पकडून येथे आणले आहे. पण तेही त्याला फाशी द्यायची नाही या अटीवर. खरे तर तुम्ही म्हणायला पाहिजे होते की, माझ्या देशामध्ये माझा कायदा चालणार, नव्हे तो चाललाच पाहिजे. माझ्या देशाच्या सुरक्षिततेसाठी मी नियम करीन त्याप्रमाणेच सर्व चालेल. आता तुम्ही अबू सालेमला फाशी देणार नाही या अटीवर, पोर्तुगाल सरकारकडे लेखी लिहून देऊन येथे आणले आहे. मग कशाला इंटरपोल आणि कसले आंतरराष्ट्रीय सलोखा. त्या अबू सालेमला हे माहीत आहे, 100 टक्के माहीत आहे की, काहीही झाले तरी मला येथे काहीही होणार नाही. तो येथे आल्यानंतर जाहीरपणे सांगतो की, मला माझ्या प्रेयसीला भेटायचे आहे आणि हे आपण जाहीर करता आहात. काय आमची गृहखात्याची यंत्रणा आहे ? त्या बॉम्बस्फोट प्रकरणाचे काय होणार आहे ते दिसते आहे. त्यातील काही आरोपी मेले आहेत तर काही परागंदा झालेले आहेत. काही बेपत्ता आहेत. आपल्या पोलीस आयुक्तांनीच माहिती दिली आहे की, निरनिराळया प्रकरणातील एकंदर 176 हजार आरोपी बेपत्ता आहेत. असो. सभापती महोदय, 1993 साली बॉम्बस्फोटाचा परिणाम झालेले शिवसेना भवन आता पुन्हा नव्याने उभे रहाते आहे. या बॉम्बस्फोटाच्या विषयावर बोलताना माझ्या भावना फार तीव्र आहेत. केवळ काल हे बॉम्बस्फोट झाले म्हणून नाही तर मी माझ्या घरामध्ये त्याचे परिणाम सोसले आहेत. 10-15 सेकंदांचा फरक पडला नसता तर आज माझी पत्नी आणि माझा मुलगा माझ्याबरोबर नसता. त्याचे असे झाले की, 1993 मध्ये सेंच्युरी बाजार जवळ जो बॉम्बस्फोट झाला त्यावेळी माझी पत्नी आणि मुलगा काही कागदपत्रांची झेरॉक्स करण्यासाठी म्हणून गेले होते. जेथे बॉम्बस्फोट झाला तेथे जवळच ते उभे होते. त्यावेळी का कोण जाणे पण माझ्या मुलाला ज्यूस प्यावासा वाटला म्हणून ते तेथे गेले होते आणि त्याने

..... व्हीव्ही 2 ..

श्री. रावते .....

त्यासाठी ऑर्डर देखील दिली पण काही तरी कारणाने त्याने आपल्या आईला आग्रहाने बाजूला नेले. त्यासाठी ते वळले आणि ते उभे होते त्याच्या जवळच बॉम्बस्फोट झाला आणि त्यात ज्यूस घेऊन येणारा ठार झाला. माझ्या पत्नीच्या मानेमध्ये त्या स्फोटातील छरे गेले होते आणि मुलगा त्या स्फोटातील रक्तातील प्रेते भरत होता. अशा परिस्थितीत त्याची आई त्याचा शोध घेत होती. त्याचा परिणाम आयुष्यभर राहतो. आपण विचार करा, पाच सेकंदाचा फरक झाला असता तर माझ्या जीवनामध्ये आज मी पत्नी आणि मुलगा गमावला असता. 1993 साली हा बॉम्बस्फोट कोणी आणि कसा घडविला ? मी तर ऐकून आहे की, त्यावेळी हे अतिरेकी महापालिकेतील नगरसेवकांना गोळ्या घालून मारण्यास निघाले होते. पण ते या स्फोटामध्ये गुंतले होते. हे सगळे माहीत असताना, या मुंबईवर अतिरेक्यांचा डोळा असल्याने आता सन्माननीय कर्नल सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील बोलल्याप्रमाणे सरकारने या अतिरेक्यांच्या विरोधात लढणारी यंत्रणा सक्षम करायला पाहिजे. ही यंत्रणा सरकारने तेव्हापासूनच केली असती तर आज ती त्या मानाने अधिक सक्षम झाली असती. परंतु आजही ती आपण निर्माण केलेली नाही. या संपूर्ण प्रकरणामध्ये 'रेड ॲलर्ट' सहजतेने दिला जातो. हा 'रेड ॲलर्ट' म्हणजे काय हे मला अजूनही कळलेले नाही. सभापती महोदय, घाटकोपर रेल्वेस्थानका बाहेर बॉम्बस्फोट झाला होता. विशेष करून 6 डिसेंबरला मुंबईमध्ये भीमसैनिकांची मोठी गर्दी होत असते आणि त्यावेळी येथील मुंबईकरांच्या पोटात गोळा उभा राहतो. कारण हे सारे भीमसैनिक चैत्यभूमीवर मोठ्या संख्येने येत असतात आणि अशा वेळी दहशतवादी मुंबईत बॉम्बस्फोट घडवून आणतील की काय ही भीती सर्वांच्या मनात असते. .....

( यानंतर श्री. सरफरे ....डब्ल्यूडब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, सोमवारी 6 डिसेंबरला मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाच्या बाहेर मॅकडोनाल्ड रेस्टॉरंटमध्ये धमाका झाला. त्यामध्ये 30 जण घायाळ झाले. त्यावेळी आयुक्तांनी "रेड अलर्ट"चा इशारा जाहीर केला. परंतु हा "रेड अलर्ट" चा इशारा अतिरेक्यांनी खरा करुन दाखविला. मुंबई सेंट्रल स्थानकाबाहेर त्यांनी योजनाबध्द रीतीने रक्ताचे सडे पाडून दाखविले. हे "रेड" म्हणजे लाल रक्ताचे सडे पाहून पोलीस व राज्य शासनाने आता तरी "अलर्ट" व्हावे अन्यथा हे रक्ताचे सडे पडत राहतील व त्या चिखलात मुंबईकर शेवटचे आचके देताना दिसतील. अशाप्रकारचा इशारा त्यावेळी वर्तमानपत्राच्या माध्यमातून, अग्रलेखातून देण्यात आला होता. "पोलिसांनाही दोष देता येणार नाही. त्यांचे काम सुरुच असते."रेड अलर्ट" चा इशारा देतांना ते जनतेला सावधगिरीचा इशारा द्यायलाही विसरत नाहीत. म्हणजे रेल्वे किंवा बसमधील कोणत्याही बेवारस वस्तूला हात लावू नये, संशयास्पद व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलिसांना कळवावे. जनता त्यांच्या कर्तव्यात कधीच कसूर करीत नाही. पण असे "फोन कॉल्स" आल्यावर प्रत्येक ठिकाणी धावण्या इतपत यंत्रणा पोलिसांपाशी उपलब्ध आहे काय? गेल्या आठ दिवसात पोलिसांना असंख्य फोन आले. त्यामुळे पोलिसांची तारांबळ उडाली. "मेकर टॉवर्स" या इमारतीत तर कोणीतरी जेवणाचा डबा विसरला व तोच बॉम्ब आहे असे समजून संपूर्ण इमारत रिकामी करुन बॉम्बशोधक पथकास बोलाविण्यात आले. बॉम्ब निकामी का होत नाही म्हणून पोलीस अधिकारी स्वत:च्याच डोक्यावरचे केस उपटू लागले. तेव्हा त्या डब्यातून कामगाराच्या आई किंवा पत्नीने दिलेल्या चटणी-भाकरीचा स्वाद दरवळू लागला. जेवणाच्या डब्यालाही आता बॉम्बचेच महत्व प्राप्त झाले आहे". याठिकाणी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भातील अग्रलेखाचा एक भाग वाचून दाखविला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार जर सांगितले तर त्यामुळे आपण अपमानित होऊ नका. प्रत्येक गोष्टीमध्ये आपण राजकारण करु नका.

सभापती महोदय, अफरोज हे प्रकरण काय आहे? त्याला आपण आतंकवादी म्हणून पकडला. अमेरिकेच्या इमारतीवर जसे विमान आदळण्यात आले त्याप्रमाणे लंडन मध्ये विमान घेऊन जाऊन तो विमान कोसळविणार होता. आणि त्याकरिता त्याने ऑस्ट्रेलियामध्ये ट्रेनिंग घेतले होते. त्यासंबंधी तपास करण्याकरिता आपले पोलीस अधिकारी ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये पथक घेऊन गेले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

त्यावेळी आपले पोलीस आयुक्त सपत्निक इंग्लंडमध्ये तपास करण्याकरिता गेले. अफरोज प्रकरणामध्ये तो दोषी आहे की नाही हा माझा विषय नाही. तो अतिरेकी होता की नाही हा देखील विषय नाही. तो कां सुटला? त्याला 90 दिवसांची चार्जशीट दिली नाही म्हणून तो सुटला. एवढा बेशरमपणाचा कारभार करीत असाल तर ही यंत्रणा आपल्या देशाला किती घातक होईल? अतिरेकी पकडल्यानंतर टी.व्ही. च्या कॅमेऱ्यासमोर बसून मोठमोठया गर्जना कशासाठी करता? टी.व्ही.चॅनलला मुलाखत देतांना केवढे मोठे घबाड मिळाले? अफरोज हा आंतरराष्ट्रीय किर्तीचा दहशतवादी असून अमेरिकेतील इमारतींवर विमान आदळविण्यात आले त्याप्रमाणे तो इंग्लंडमध्ये विमान घेऊन जाणार होता. अशा दहशतवाद्याला पकडले म्हणून आपण गमजा मारल्या. ज्या वेळी दिल्ली येथे माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली पोटाच्या संदर्भात बैठक झाली होती.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

त्याच वेळेला दोन दिवस अगोदर पोटा काढून टाकला. आफरोज हा भुरटा चोर आहे, असे दाखविण्यात येऊन त्याच्यावर पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही. जनतेच्या पैशातून त्यांचे पगार होतात, परंतु तेच पोलीस अधिकारी अधिकाराचा दुरुपयोग करुन आरोपी श्री.अफरोजवर चार्जसीट दाखल करत नाहीत, म्हणून त्यांना सोडून दिले जाते. त्यांच्यावर पोलीस विभाग काहीही कारवाई करत नाही. असा भयानक प्रकार झालेले आहेत. खरोखर आपल्या माणसांबद्दल बोलण्याची आपल्याला लाज वाटते. ते कसे बेजबाबदार आहेत, त्याचे उदाहरण द्यायचे तर 6 डिसेंबर 1999 मध्ये बाबरी मशीद पाडण्याच्या निषेधार्थ संभाजीनगर येथे नेहमीप्रमाणे त्यांनी उच्छाद मांडला. त्यांनी दगडफेक झाली. त्याना प्रतिकार करणे हे पोलिसांचे काम आहे, पोलिसांना ट्रेनिंगमध्ये जे काही शिकविले असेल, त्याप्रमाणे ते कृती करत असतात. त्या ठिकाणी मुस्लीम समाजाकडून मोर्चा काढण्याचा प्रयत्न झाला. त्या ठिकाणचे पोलीस आयुक्त श्री.श्रीपाद कुलकर्णी यांनी दंगल होण्याची शक्यता ओळखून त्यांचा मोर्चा अडविला. लगेच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. त्यांना रजेवर पाठविण्यात आले. त्यांच्यावर एक सदस्य चौकशी समिती नेमली. एवढयावरच मोर्चेकरी थांबले नाहीत तर त्यांचा राजीनामा घ्यावा अशाप्रकारची त्यांनी मागणी केली. भिवंडीच्या दंगलीमध्ये पोलिसांचा कोथळा काढला, डोळे फोडले, एवढेच नाही तर या धर्मांधांनी पोलीस लाईनमध्ये जाऊन पोलीसांच्या मॉ, भगिनींचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या घरातील भांडीकुंडी बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला. हे सगळे झाल्यानंतर या राज्याचे गृहमंत्री त्या ठिकाणी गेले असता, सगळे धर्मांध त्या ठिकाणी जमले. त्यांच्याकडे गृहमंत्र्यांनी आपण सहकार्य मागितले. ...आम्ही हिंदू आहोत, आम्ही देशाला बांधिल आहोत. या देशातील प्रत्येक माणूस हिंदू आहे. देशाला हिंदू संस्कृती आहे. परंतु ते जातीयवादी सगळे गाडीच्या भोवती जमले. आमच्या गृहमंत्र्यांनी त्यांच्यासमोर हात जोडले, गुडघ्यावर बसून त्यांना नमस्कार करुन त्यांची माफी मागितली. हे आपले राज्यकर्ते. सरकारमध्ये दीनदुबळे पाठीचा कणा नसलेले मंत्री असतील तर ते त्यांच्या छाताडावर बसतील नाही तर काय होईल ? त्याचे त्यांना काही वाटत नाही. त्या ठिकाणी दांडके, काठ्यांचा काही उपयोग केला नाही. आम्ही एका मुलाला अटक केली म्हणून त्याला सोडल्याशिवाय आम्ही जाणार नाही, असे सांगितले असता, मद्यांध केंद्रीय मंत्र्यांचा कोणी तरी नातेवाईक आमच्या अंगावर येतो.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्या ठिकाणी टिअर गॅस सोडला. मी माननीय गृहमंत्र्यांना विचारतो. ज्यावेळी परिस्थिती हाताबाहेर जाते त्यावेळी लाठीचार्ज केला जातो. लाठीचार्ज केल्यानंतर परिस्थिती आटोक्यात येत नसेल तर टिअर गॅस सोडतो. परिस्थिती त्यांच्याही पलीकडे गेली तर गोळीबार करतो. ही पध्दत आहे. त्या ठिकाणी एकही दगड आला नाही. माझ्यासमोर पाच राऊंड फोडले. मी स्वत: त्यांचा हात धरला आणि त्यांना थांबविले. काहीही झालेले नाही असे मी त्यांना सांगितले. काल आम्ही पोलिसांवर हल्ला केला असता तर काय केले असते ? पोलिसांना ठार मारणारे सुध्दा भिवंडीमध्ये बदनाम होत नाहीत. आमचा एक हात पडला असता तर तुम्ही आम्हाला काय केले असते ? कसले आर. आर. पाटील ? काय गृहमंत्री आहेत ? तुम्ही कोणाचे तुष्टीकरण करीत आहात ? तुम्ही कोणाची चाटत आहात ? भिवंडीमध्ये जी दंगल झाली, त्या ठिकाणी जे घडले त्यामध्ये स्वत:चे मंत्रीपद गृहमंत्री कब्रस्तानमध्ये गाडून बसलेले आहेत.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छिते की, आपण शब्द जरा सांभाळून वापरावेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मी एकही असंसदीय शब्द वापरणार नाही असा शब्द दिलेला आहे. हा आमचा संताप आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील काल अशा पध्दतीने बोलले. समोरुन दगड मारला. ते मुस्लिम होते. तो दगड तुमच्या अधिकाऱ्यांच्या डोक्यात पडला. तशी नोंद आहे. ते रक्तबंबाळ झाले. शिवसैनिकांनी दगड मारला असे त्यांनी गृहीत धरले. तुमचा दगड सोन्याचा का ? असे आम्हाला ते हिणवतात. तुमच्या पोलिसांना ठेचून मारले. त्यांचा कोथळा बाहेर काढला. त्यांचे डोळे काढले. त्यांचे हात तोडले. मोगलांच्या काळात जसे चालावयाचे तशी तुमच्या पोलिसांची क्रुर थट्टा केली. त्याचे काही वाटत नाही. एक दगड पडल्यावर तुमचा दगड सोन्याचा का आणि त्यांचा चांदीचा का ? असे विचारले जाते. आमच्या गणपतीची मूर्ती उखडली.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या ज्या काही भावना असतील त्या त्यांनी व्यक्त कराव्यात परंतु त्यांनी अशा पध्दतीचे वक्तव्य करु नये. हे शब्द त्यांनी परत ध्यावेत. आपण त्यांना समज द्यावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, लाज, शरम हे चांगले शब्द आहेत. मराठी भाषा येत नसेल तर त्यांनी दुसरे पर्यायी शब्द सुचवावेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगू इच्छिते की, शब्द जपून वापरावे असे मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना अगोदरच सांगितले आहे..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, असे असेल तर मी माझे भाषण थांबवितो.

**तालिका सभापती** : शब्द जपून वापरावेत असे मी आपल्याला सांगितले आहे. आपल्या भाषणामध्ये असंसदीय शब्द आले असतील तर ते तपासून रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येतील. असंसदीय शब्द नसतील तर ते काढण्यात येणार नाहीत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे आहे ते त्यांनी म्हणावे परंतु....

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी खाली बसून कॉमेन्ट्स करु नयेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी खाली बसावे.

श्री. विनायक मेटे : सन्माननीय सदस्यांना पूर्णपणे मोकळीक मिळाली असे समजू नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया या ठिकाणी बसलेल्या आहेत. मी तुमची मोकळीक कशासाठी मागू ?

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

माननीय तालिका सभापती महोदय, मी आपणास विनम्रपणे विचारु इच्छितो की, आपण "लाज" या शब्दाला पर्यायी शब्द सांगावा.

**तालिका सभापती** : कोणत्या अर्थाने तो शब्द वापरलेला आहे यावर ते अवलंबून आहे.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, "लाज" या शब्दला पर्यायी शब्द मला सापडला. आमच्या राज्याचे माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील उर्फ आबा यांना जनाची नाही तर मनाची वाटली पाहिजे ना ? सन्माननीय सदस्य बोललात ते फार महत्वाचे आहे. लष्कर-ए-तोयबामध्ये एक कोड ऑफ कंडक्ट आहे. अतिरेक्यांनी कसे वागावे हे त्यामध्ये सांगितलेले आहे. पोलीस अधिका-यांवर जास्तीत जास्त आरोप करा, पोलीस अधिका-यांना जास्तीत जास्त कसे गुंतवून ठेवता येईल हे पहा, पोलीस यंत्रणेचे नीतिधैर्य खच्ची केल्यानंतर मग आतंकवादी कारवाया करण्यास सोपे जाईल. एकदा पोलिसांचे नीतिधैर्य खच्ची झाले की, मग ते तुमच्या नादी लागणार नाहीत. अशा प्रकारची लष्कर-ए-तोयबाची कोड ऑफ कंडक्ट आहे. पोलीस यंत्रणेच्या, सरकारच्या उणिवा दाखवून देणे हे आमचे कर्तव्य आहे आणि त्या दाखवित असताना समोरचे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे मला अडथळा करीत आहेत, याचा अर्थ लष्कर-ए-तोयबाची कोड ऑफ कंडक्ट इथेही लागू आहे की की काय ? अशी मला शंका येते.

श्री. विनायक मेटे : माझी अतिरेक्यांशी तुलना करणे, माझ्यावर हेत्वारोप करणे योग्य नाही. हे शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावेत.

**तालिका सभापती** : अशा प्रकारची तुलना अयोग्य असेल तर ती रेकॉर्डवरुन काढून टाकली जाईल. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 17:30

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, अवश्य आम्ही ज्यावेळेला आमचे विचार मांडतो, त्यावेळेला स्पष्ट शब्दात सांगतो की कोणत्याही सदस्यांचा हेत्वारोप करण्याचा हेतू नसतो. या सदनामध्ये आल्यानंतर माझे सहकारी सदस्य आहेत ते निर्दोष असणार याची खात्री असल्यामुळे जनतेमध्ये त्यांच्या नावाने काही चुकीचे जाऊ नये म्हणून मुद्दा मांडला. व्यक्तिगत निंदानालस्ती केली तर त्याला आक्षेप घेतला जातो. सदनाकडून माझी एवढीच अपेक्षा होती की, सरकारने निवेदन करुन त्यांना मुक्त करावे. असे मी जे म्हणालो, ते सरकारने केले नाही. सभापती महोदया, पोलीस महासंचालकांनी म्हटले आहे की, विदेशी शक्ती घातपातामागे असण्याची शक्यता आहे. आमदार निवासामध्ये कोणी अतिरेकी येऊन गेले असतील तर त्यांची कसून चौकशी होईल. परंतु महाराष्ट्रात घातपात घडविण्याच्या कटामागे विदेशी शक्ती असल्याचे डॉ.पसरिचा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. अतिरेकी आमदार निवासामध्ये दोन तास थांबले होते अशी माहिती एका आरोपीने दिली आहे. हे पोलिसांचे स्टेटमेंट आहे. अशी माहिती एका आरोपीने दिली आहे. या संदर्भात बोलताना डॉ.पसरिचा पुढे म्हणाले की, याची जरुर आम्ही चौकशी करु. जसे हे सरकारने जाहीर केले, तो सरकारचा प्रश्न आहे. सभापती महोदया, अतिरेक्यांची तयारी कुठपर्यंत असते? हा कट वर्षभर शिजत होता. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, जफ्रुद्दीनच्या चौकशीमधून वर्षभरापासून अतिरेकी कारवाया सुरु असल्याचे समोर आले आहे. लष्कर-ए-तोयबाच्या जैनुद्दीन अन्सारीचा जफ्रुद्दीनशी जवळचा संबंध असून तो पाकिस्तानातील अतिरेक्यांशी सतत संपर्कात असे. सप्टेंबर, 2005 मध्ये जफ्रुद्दीन आणि त्याच्या साथीदारांना भेटण्यासाठी नेपाळमध्ये गेलेल्या सय्यद जुबेर, महम्मद मुझफ्फर आणि तनवीर अशा तिघांना पकडण्यात आले, त्याच्या आधारे जफ्रुद्दीनला अटक करण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे हा कट वर्षभर सुरु होता अशी माहिती पोलिसांसमोर आली. पोलिसांना वर्षभर कट शिजत होता हे समजले होते. मोठया प्रमाणात आरडीएक्स पकडण्यात आले. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी वृत्तपत्रांना पोझ दिली. स्टेनगन हातात घेऊन बघितल्या, आरडीएक्सचा पुडा हातात घेऊन बघितला. कशासाठी हे करता? अर्धे आरडीएक्स मिळाले, अर्धे आरडीएक्स कालच्या स्फोटामध्ये वापरले. अजूनही शिल्लक असण्याची शक्यता आहे. या सदनामध्ये तुम्ही-आम्ही सगळे सदस्य बसलो आहोत. त्या राष्ट्रघाती कटाच्या विरोधात बोलायला आम्ही उभे राहिलो आहोत. अशा वेळेला तू-तू, मी-मी कशाला करायचे? सरकारमध्ये जे गृहमंत्री म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 17:30

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.दिवाकर रावते...

काम पहात आहेत त्यांची ही नैतिक जबाबदारी आहे. व्यक्ती म्हणून आम्ही त्यांच्याविरुध्द बोलत नाही. जर ते गृहमंत्री म्हणून सभागृहात बसले असतील आणि त्यांची जबाबदारी असेल, ती जबाबदारी त्यांनी पार पाडली नसेल तर आम्ही सभागृहात ज्या भूमिका मांडत आहोत या संपूर्ण जनतेच्या प्रतिक्रिया आहेत. रात्री दीड वाजता मला फोन आला. बोलणारा इतक्या शिव्या घालत होता, मला नाही. कोणाला शिव्या घालत होता? बोरीवलीपर्यंत मला पोहोचायचे आहे. रात्रीचा दीड वाजला, वांद्र्याला अडकलो आहे. ती व्यक्ती फोनवर जे काही बोलली ते मी याठिकाणी कोट करु शकत नाही. या सरकारवर संताप का? ती व्यक्ती माझ्या परिचयाची आहे म्हणून रात्री मला त्यांनी फोन करुन उठविले. फोनवर सांगितले की, मला माफ करा. आम्ही संताप कोणाकडे व्यक्त करायचा? लोकांचा अशा प्रकारे संताप असेल आणि तो आमच्या माध्यमातून आम्ही याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला तर कृपा करुन रागावू नका. या जनतेच्या भावना आहेत. आम्ही आमदार जनतेचे प्रतिनिधी आहोत. जनतेच्या प्रक्षुब्ध भावना या सभागृहामध्ये तीव्रतेने मांडल्या तर किमान यापासून त्यांचे सांत्वन तरी होते. आमच्याकरीता कोणीतरी प्रयत्न करीत आहे आणि सरकारला गदागदा हलवून सांगत आहे, तुम्ही अपयशी ठरला आहात. भविष्यात तरी अपयशी ठरु नका. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे पोलिसांनी म्हटले की, कोंबिंग ऑपरेशन केले जाईल, गेट लावले जातील. हे सर्व घडते की नाही? एका ओळीत हे सर्व भीषण स्फोट झाले. त्यामुळे सन्माननीय गृहमंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आज सकाळी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सांगण्यात आले..........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कालच्या घटनेच्या संदर्भात जनतेला विश्वास दाखवायचा असेल तर संध्याकाळपर्यंत रॉय यांची बदली झाली पाहिजे. अशी कृती दिसली नाही तर ते चांगले होणार नाही. तुमच्यामध्ये जर नैतिकता शिल्लक असेल तर बारबालांसारखे जे अपयश आपल्या पदरात आले तसे या प्रकरणात चालणार नाही. त्यामुळे या प्रकरणात ठोस कृती करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आता तरी आपण आपली खुर्ची खाली करा. बॉम्बस्फोटातील आरोपींना अजूनपर्यंत सजा लागलेली नाही. बॉम्बस्फोटातील आरोपी सुटलेले आहेत. आपल्याकडे लोक वेगळया अपेक्षेने पाहत आहेत. त्यामुळे नैमिक जबाबदारी म्हणून माननीय गृहमंत्र्यांनी राजिनामा देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कालच्या घटनेच्या संदर्भात लोकांच्या ज्या तीव्र भावना होत्या त्या भावना मी येथे व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भावना व्यक्त करीत असतांना मला कोणाला दुखवावयाचे नव्हते. त्यामुळे या ठिकाणी मी ज्या तीव्रतेने भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याचे आपण स्वागत करावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) माननीय सभापती महोदय, या ठिकाणी मी काही मनोगत व्यक्त करणार आहे तसेच पोलीस यंत्रणेच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित करणार आहे. त्या मुद्याच्या संदर्भातील उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी द्यावे अशी विनंती आहे. मघाशी मी बाहेर गेलो असतांना आपल्या राज्याचे पोलीस महासंचालकांची लाईव्ह प्रेस कॉन्फरन्स चालली होती. यामध्ये त्यांना विचारण्यात आले होते की, कालच्या घटनेच्या संदर्भात आपल्याला अतिरेक्यांचे काही धागे दोरे मिळाले आहेत का? त्यावर त्यांनी सांगितले की, मुंबई पोलिसांना आपण सुपर मॅन समजता का? तुम्ही मुंबई पोलिसांकडून अशी कशी अपेक्षा करता? मुंबई पोलीस हे काही सुपर मॅन नाहीत. सभापती महोदय, अगोदरचे पोलीस अधिकारी मग ते वाकटकर असोत, पेंडसे असोत त्यांनी कशा प्रकारे अशा घटनेच्या संदर्भात शोध लावला याची आम्हाला माहिती आहे. 18 तासात त्यांनी तपास कसे लावले याचीही आम्हाला माहिती आहे. आपल्या मुंबई पोलिसांची अगोदर स्कॉटलँडयार्डच्या पोलिसांशी तुलना होत होती परंतु आताचे मुंबई पोलीस सुपर मॅन तर सोडा पण साधे माणूस सुध्दा आहेत की, नाही अशी शंका येते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी माँ साहेबांच्या पुतळयाच्या विटंबनेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या प्रकरणाच्या संदर्भात कोणती उपाययोजना करण्यात आलेली आहे, कोणाला अटक करण्यात आलेली आहे हे न सांगता गृहमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये तुम्हाला पश्चाताप होईल, तुम्ही कसे अडकाल हे सांगितले परंतु या घटनेमुळे अजून काय घडू शकते याबद्दल ते काहीही बोलले नाही. मॉ. साहेबांच्या पुतळा विटंबनेच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी राजकीय भाषण केले. विरोधी पक्षाला काहीही बोलत बसल्यामुळेच पुढच्या घटना घडलेल्या आहेत. या बोलण्याचा पश्चाताप कोणाला होत आहे तर सरकारला नसून जनतेला होत आहे. कारण जनतेला आता वाटायला लागले आहे की, आपण अशा नाकर्त्या सरकारला निवडून दिले नसते तर अशा घटना घडल्याच नसत्या. मुंबई पोलीसांच्या ऑफिसची रचना गेल्या वर्षा दीड वर्षात चालली आहे त्याबाबत मला खेदाने म्हणावे लागत आहे की, मुंबई पोलिसांची इमेज आता पब्लीसिटीकडे जाणारी आहे ती परफॉर्मन्सकडे जाणारी नाही. आमचे गृहमंत्री हे आता मिडीया ड्रिव्हन झालेले आहेत. आता कर्तृत्ववान अधिकारी बाजूला पडलेले आहेत. मोमीन नावाच्या

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. भोगले ... 17:35

श्री. विनोद तावडे....

अधिका-याचे खब-या म्हणून चांगले संबंध होते परंतु त्याचे अंडरवर्ल्डच्या लोकांशी संबंध असल्या कारणाने त्याच्यावर कारवाई करण्यात आली तसेच हायकोर्टाने प्रफुल्ल भोसले आणि इतर पोलीसांच्या संदर्भात निर्णय दिला होता. यासंदर्भात राज्य शासनाने सुप्रिम कोर्टात जाण्याची आवश्यकता होती परंतु शासन सुप्रिम कोर्टात गेले नाही त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य खचले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

तुम्ही सुप्रीम कोर्टात का गेला नाहीत ? यापुढे दंगली करणाऱ्यांना गोळ्या घालू, अशाप्रकारचे वक्तव्य करता येते, तर मग प्रफुल्ल भोसले प्रकरणात शासन सुप्रीम कोर्टात का गेले नाही ? जसे गँगवार चालते, तसे पोलिसांमधील वॉरला हे राज्य शासन खत पाणी घालत आहे. सभापती महोदय, विक्रोळी कोर्टातील एका मॅजेस्ट्रीटने पोलिसांसंबंधी त्यांच्या जजमेंट काय म्हटले आहे, ते वाचल्यास आपली झोप उडेल. अतिरेक्यांच्या सापळयात आपले राज्यकर्ते कशाप्रकारे सापडले आहेत, याची माहिती त्या जजमेंटमध्ये दिलेली आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याविरुध्द कारवाई केली जाते. त्यांनी जे जजमेंट आहे त्यातून हे सरकार शहाणे होणार आहे काय ? माननीय गृहमंत्र्यांनी कायदा करुन डान्सबारिवर बंदी आणली ही चांगली गोष्ट आहे आणि ते व्हावयास पाहिजे होते. माननीय गृहमंत्र्यांनी आय.पी.सी.खाली किती आरोपिंना अटक करण्यात आली, यासंबंधीची माहिती दिल्याचे कधी आठवत नाही. परंतु केवळ इमेज निर्माण व्हावी म्हणून एकामागून एक अशी वक्तव्य करायची. सभापती महोदय, गृह मंत्रालयाकडे फाईल्स येत नाहीत म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना पत्रकारांसमोर झाप झाप झापायचे आणि मग दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्राच्या चौकटीत फोटो छापून आणावयाचा, ही बाब कोणत्याही मंत्र्याला शोभा देणारी नाही. श्री.काटकर यांना आय.बी.मध्ये गेल्या महिन्यापासून पोस्टींग नाही. ॲन्टी टेररिस्ट स्क्वॉडमध्ये डी.आय.जी.लेव्हलच्या दोन जागा गेल्या सहा महिन्यांपासून रिक्त आहेत. जर या रिक्त जागा वेळेवर भरल्या नाहीत तर आरडीएक्स शस्त्रसाठा कोढून येतो या बाबींवर लक्ष कोण ठेवणार ? सभापती महोदय, आज मुंबई पोलीस क्राईम ब्रँच ही ट्रेनिंग सेंटर म्हणून मानली जाते. त्याठिकाणी काम करणाऱ्या पोलिसांनी गुन्हेगारांना शोधून काढले पाहिजे अशी अपेक्षा नसते फक्त मलमपट्टी केली म्हणजे सर्वजण खूष असतात. त्यामुळे लोअर स्टाफाचे मनोधैर्य खचत आहे. कोणाच्यातरी सांगण्यावरुन पोस्टींग होणार असेल तर पोलिसांनी काम कसे करायचे ? जे चांगले आहे त्यास चांगले म्हणावयास पाहिजे. सभापती महोदय, सोलापूरमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी पकडलेल्या आरोपिंना "पोटा" लावण्यात आला होता. सोलापूर येथून शोध घेत घेत पोलीस मुंबईतील मुंब्रा येथपर्यंत आले, परंतु नंतर आरोपी सापडले नाहीत. सोलापूर येथे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

बॉम्बस्फोट झाला या घटनेला आता जवळपास अडीचवर्षे झालेली आहेत. बॅरिस्टर अंतुले यांनी सांगितले की, जर त्या आरोपिंना "पोटा" लावला तर श्रीमती उज्ज्वला शिंदे कशा निवडून येणार ? मग 92 जणांवरील पोटा काढण्यात आला. त्याची कॅसेट इलेक्ट्रानिक मीडियाने दाखविली होती. सोलापूर येथील बॉम्बस्फोटाचे आरोपी अजूनही सापडले नाहीत, कोणावरही अजून केस झालेली नाही.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 17:45

श्री.विनोद तावडे...

एका प्रामाणिक अधिकाऱ्याने त्याचे धागेदोरे मुंब्रापर्यंत आणून ठेवले होते, परंतु त्याबाबतीतही पुढे काहीच झाले नाही. अशी जर आपली मानसिकता असेल तर या पोलीस खात्याला अशा प्रकारच्या नेतृत्वाची अपेक्षा नाही. यातून जनतेलाही न्याय मिळणार नाही. श्री.पसरिचा यांनी प्रेस कॉन्फरंसमध्ये सांगितले की, यामध्ये बाहेरचे कनेक्शन असून ते लोकल कनेक्शनशिवाय असे करु शकत नाहीत. मग, ते कसे प्राप्त होते ? मालेगांवमध्ये ज्यावेळी मोर्चा निघाला त्यावेळी हवालदाराने प्रत्येकाचे स्वत:चे नांव लिहून घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळी प्रत्येकांनी "बिन लादेन" अशा प्रकारचे नांव घेतले. त्याबाबतीत आपण काय केले ? ज्यावेळी जॉर्ज बुश भारतात आले त्यावेळी जी तोडफोड झाली त्याबबातीत काय केले ? किती जणांवर केसेस दाखल झाल्या ? आज सरकार नावाची चीज अस्तित्वात आहे की नाही ? आपण शिवाजी पार्क येथील घटनेच्या बाबतीत टिअरगॅस टाकले. परंतु आपण ज्यावेळी तोडफोड करण्यात आली त्यावेळी काहीच केले नाही. त्याबाबतीत आपण कोणावर गुन्हे दाखल केले ? कोणाला पकडले ? आपण अशा प्रकारे विशिष्ट समाजाच्या लोकांचे लांगूलचालन करता. आपण असे वागल्यामुळेच त्यांना पाठिंबा मिळतो, असे त्यातील विशिष्ट लोकांना वाटत असते. विरार येथील जिवदानी डोंगरवर नवीन वस्त्या झाल्या असून त्याठिकाणी बांगलादेशी लोक राहतात व त्याच ठिकाणी जिवदानी डोंगरावर आपल्याला लोकल कनेक्शन सापडेल. ज्यावेळी नवीन वस्त्या निर्माण होतात, त्यावेळी हे लोकल कनेक्शन तयार होते. काल रात्री टी.व्ही.वर उशिरा टी.रमन या एक्सपर्टने म्हटले आहे की, हे अल कायदाने केले. जॉर्ज बुशने घोषणा केली होती की, ख्रिश्चन ज्यू आणि हिंदू हे आमचे शत्रू आहेत. त्यावेळी आझाद मैदानावर त्यांच्या इशाऱ्यावर निदर्शने झाली. यामध्ये अल कायदा असेल तर हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोरील नाही तर तो देशाच्या पंतप्रधानांच्या अखत्यारितीतील हा विषय येतो. हा साधा व सोपा विषय नाही. प्रत्येक गाडया हया फास्ट नाहीत, प्लॅटफॉर्म सोडल्याबरोबर बॉम्ब उडाले. त्यामुळे याबाबतीत जर अल कायदाचा कोणी असेल किंवा लष्कर-ए-तोयबाचा कोणी असेल तर त्याचा केव्हा तरी शोध केंद्रातील लोकांना घ्यावाच लागेल. श्री.पसरिचा यांनी असेही म्हटले आहे की, श्रीनगर येथील बॉम्बस्फोटाचा व मुंबईतील बॉम्बस्फोटाचा संबंध आहे. त्यामुळे काश्मिरच्या प्रश्नाचा संबंध मुंबईच्या प्रश्नाशी आहे व

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मुंबईचा प्रश्न काश्मिरच्या प्रश्नासारखा आहे, तर त्यांना माझा असा प्रश्न आहे की, मुंबईच्या माणसाला विचारल्याशिवाय आपण काश्मिरच्या प्रश्नाचा निर्णय लावू शकत नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या अतिरेक्यांना धडा शिकवलाच पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

गेल्यावेळी सन 1993 मध्ये दंगल झाली. माझ्याकडे त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिलेल्या उत्तराची प्रत आहे. 6 डिसेंबरला अयोध्येत जे घडले त्याचा परिणाम म्हणून या दंगली झाल्या किंवा काय, अशी चर्चा त्यावेळी होती. यावेळी तर कोणी कुठला ढाचा पाडला नाही. अयोध्येत काही घडले नाही, यावेळी कुठली मशिद पाडली गेली नाही, मग जे कुणी त्यावेळी डायलॉगबाजी करीत होते की, मशिद पाडली म्हणून मुंबईमध्ये दंगल झाली, आता आम्ही काय पाडले ? कशामुळे मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले ? याचे उत्तर आज त्या लोकांनी देण्याची गरज आहे. शेवटी एवढेच म्हणेन की, काल गुरुपौर्णिमा होती, व्यास पौर्णिमा होती. व्यासांनी राजधर्मात असे सांगितले आहे की, 'राजा कालस्य कारणम्.' परंतु, या ठिकाणी आम्हाला असा राजा मिळाला आहे, इमेज ड्रिव्हन, आणि तो पोलीस खाते चालवित आहे. अशारितीने गृह खाते चालविता येत नाही आणि असे चालविले तर बॉम्बस्फोट होणार नाही तर काय होईल ? जो राजधर्म सांगितला गेला आहे त्याचे पालन करणार नसतील, लांगुलचालन करणार असतील तर अशा घटनांना आपण वेसण घालू शकणार नाही. आज आपण सन 2006 मध्ये आहोत, 1906 साली मुस्लिम लिगची स्थापना झाली, ती एक प्रवृत्ती होती. सन 1906 मध्ये या पक्षाची स्थापना झाल्यानंतर सन 1910 मध्ये झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात असा प्रस्ताव पारित झाला की, "जे जे हिंदुंना अमृत ते आम्हा मुस्लिमांना विष असेल." आज त्या पक्षाची, त्या प्रवृत्तीची शताब्दी साजरी होत आहे. ती शताब्दी, ती प्रवृत्ती ठेचण्यासाठी राजधर्म पाळला नाही तर जनतेचे जे हाल चालले आहेत ते आपण कधीही थांबवू शकणार नाही. काल सगळया ठिकाणी फिरुन काय स्थिती होती ते आम्ही पाहिले आहे. त्या ठिकाणी मुंडके, धड आणि खालचा भाग वेगवेगळा झाला होता. एका मृत व्यक्तिच्या अंगावरील शर्ट मी मुद्दाम आणला होता, सन्माननीय सभापती महोदयांनी परवानगी नाकारल्यामुळे मी तो सभागृहात आणलेला नाही. परंतु, एखाद्या माणसाच्या अंगावरील शर्ट कसा होऊ शकतो हे अशा घटनेमधून दिसून आले. हे सर्व पाहिल्यानंतर खरोखरच आपण कुणाचा अंगिकार करीत आहोत आणि काय पाप केले आहे म्हणून अशा प्रकारचे राज्यकर्ते आम्हाला मिळाले, असा टाहो तेथील मृत तरुणाच्या आई, बहिण, वडिलांनी फोडला होता. त्यामुळे जर आपण पोलिसांना परफॉर्मन्स ओरिएंटेड बनविले नाही तर अशा अजून घटना येत्या काळात होतील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MAP/

श्री.विनोद तावडे.............

आणि त्यामुळे राजकारण बाजूला सारुन चर्चा करावयाची असेल तरी ती करु. परंतु, अशा प्रकारे उपमुख्यमंत्र्यांनी प्रसिध्दी मिळवून काय मिळविले ते आम्हाला माहित नाही. त्यांना हवे असेल तर संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानासारख्या खात्यावर नेमा. But this is not your cup of tea. गृह खाते अशा रितीने सांभाळता येणार नाही, पोलिसांना अशा प्रकारे डिमॉरलाईझ करुन चालणार नाही. प्रसिध्दीसाठी एखादे वाक्य फेकून काही होऊ शकत नाही. खासकरुन पक्षाच्या दबावामुळे बदल्या करण्यात आल्या, या बदल्यांना कठोर विरोध होणार नसेल तर दुर्देवाने हे खाते अशा व्यक्तिच्या हातात असणे योग्य होणार नाही, असे म्हणावे लागेल. आम्ही गृहमंत्र्यांचा राजिनामा मागत आहोत तो यासाठी मागत आहोत. खरे म्हणजे नैतिकतेचा ते आव आणतात, त्यातील 5 टक्के जरी नैतिकता त्यांच्यामध्ये असती तर सर्वपक्षिय सभेत त्यांनी राजीनामा दिला असता. त्यांनी राजीनामा दिला नाही म्हणून आज आम्हाला या ठिकाणी राजीनाम्याची मागणी करावी लागत आहे, एवढेच या निमित्ताने बोलावेसे वाटते.

**सभापती** : अजून 14 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आतापर्यन्त साडेतीन तास या विषयावर चर्चा झालेली आहे. अत्यंत महत्वाचा गंभीर विषय असल्यामुळे मी विशेष बाब म्हणून या चर्चेला परवानगी दिलेली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणाची वेळ कमी करण्याचा प्रयत्न केला तरी चांगली चर्चा होऊ शकेल. त्यादृष्टीने मी आपणा सर्वांना विनंती करतो.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, आज सकाळी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख म्हणाले की, एकाच दिवशी निषेध, दुखवटा आणि अभिनंदन असे तीन शब्द वापरावे लागत आहेत. काल घडलेली घटना चिड आणणारी, संताप देणारी आहे. या विषयावर बोलतांना मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब असे म्हणाले की, निषेध हा शब्द बोथट वाटतो. कारण 200 नागरिकांची हत्या झालेली आहे त्याचा बोथट शब्दाने निषेध करुन चालणार नाही. नागपूरच्या संघ कार्यालयावर हल्ला करणा-या अतिरेक्यांना पोलिसांनी पकडले त्यावेळी पोलिसांचे कौतुक करतांना गृहमंत्री म्हणाले होते की, नागपूरच्या संघ कार्यालयावरील हल्ला करण्याचा डाव पोलिसांनी उधळून लावला. महाराष्ट्राकडे वाकडया नजरेने पाहण्याची कोणची हिम्मत होणार नाही आणि ज्यांना मरावयाचे आहे त्यांनी मुंबईमध्ये, महाराष्ट्रामध्ये यावे, हे माननीय गृहमंत्र्यांचे वाक्य वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे. तुमच्या छाताडावर बसून अतिरेक्यांनी काल 200 लोकांची हत्या केली आहे. माझ्या पूर्वीच्या सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले ते मी पुन्हा मांडणार नाही. परंतु त्याच्या मुळामध्ये जावे लागेल. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी असे म्हटले की, हा विषय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचा आहे. परवा नवाझ शरीफ यांनी एक पुस्तक प्रकाशित केले. त्यांनी त्या पुस्तकामध्ये मुशर्रफ यांच्यावर आरोप केलेले आहेत. सभापती महोदय, अतिरेकी मुंबई शहरामध्ये हल्ले करीत आहेत. स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाची विटंबना झाली, तो इशारा होता. तो इशारा गृहमंत्र्यांनी समजून घेतला नाही. दुर्दैवाने त्याचे राजकारण केले. माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर देतांना आम्हाला पश्चाताप होईल अशी धमकी दिली. मी माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, हिंमत असेल तर चर्चा करा. जर तुमचे सत्य असेल तर आम्ही राजीनामा देऊ आणि तुमचे असत्य असेल तर तुम्ही राजीनामा दिला पाहिजे. राज्यामध्ये काय चालले आहे ? सरकारमधील मंत्री सत्तेसाठी एकमेकांविरुध्द वाटेल ते बोलतात. एका मंत्र्याने असे म्हटले आहे की, हे सारे पाप शिवसेनेचे आहे. यामध्ये पोलीस यंत्रणेचा हात आहे, असेही ते म्हणाले. महसूल मंत्र्यांनी सर्व प्रकारचा विधिनिषेध गुंडाळून धक्कादायक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...........

वाटावे असे बेजबाबदार विधान केलेले आहे. सरकारमधील काही मंडळींची दंगलीला फूस हे विधान दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी ऐकून तरी कसे घेतले ? ते पुढे असे म्हणाले की, सरकारचा निर्णय मंत्रीमंडळातील प्रत्येकाला बांधील असतो, हे संसदीय शासन पध्दतीतील साधे सूत्र मंत्र्यांना समजू शकले नाही हे नवलच म्हणाले लागेल. आपण काय बोलतो आहोत, त्याचे परिणाम सरकारवर आणि त्याच्या विश्वासार्हतेवर काय होतील, याचे भानही त्यांना राहिलेले दिसत नाही.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

इतक्या वाईट पद्धतीने आपण सामोरे जातो. म्हणजे एका बाजूला गोरगरीब निष्पाप नागरिकांची हत्या होते, बॉम्बस्फोट होतात आणि दुसऱ्या बाजूला ... सभापती महोदय, माझ्याकडे अतिशय धक्कादायक अशी काही माहिती आहे ती मी या संदर्भात येथे देऊ इच्छितो. त्याबाबत येथे काही वक्त्यांनी उल्लेख केला आहे. इंटरनेटवर 'अरब न्यूज'मध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "Maharashtra Police keep SIMI Network under surveillance - Pune, 14 June 2006. Following the death of Irfan Moinuddin Attar, the alleged Kolhapur-based Hizbul Mujahedeen terroist, killed in an encounter in Kashmir recently, the police are maintaining a close vigil on the activists of the banned Students Islamic Movement of India (SIMI) in Sangli, Miraj, Aurangabad, Nagpur and Pune, according to K.K. Pathak, the Special Inspector General of Police, Kolhapur range." या 'सिमी'बद्दल या सदनामध्ये जळगावच्या प्रकरणामध्ये मी मागील अधिवेशनामध्ये, मागील टर्ममध्ये बोललो होतो. चाळीसगावामधील प्रकरण सांगितले होते. त्यातील आवश्यक तेवढाच भाग मी आता येथे वाचून दाखवितो. ही सगळी माहिती आय.बी.ने दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "Deputy Chief Minister and Home Minister R.R. Patil speaking at a press conference in the city refuted the allegations that the madrasas were a breeding ground for terrorists." मदरशातून अतिरेकी तयार होतात असा अहवाल त्यांनी दिला आहे तरीही केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, असे काही घडत नाही म्हणून. त्याबाबतीत ते पुढे म्हणतात "Irfan's incident did not mean that the education provided in madrasas was anti-national," Patil said." म्हणजे इरफानच्या बाबतीतील माहिती आली आहे याचा अर्थ असा नाही की, सर्वच मदरशामध्ये अराष्ट्रीय तत्त्वांचे शिक्षण दिले जाते. पुढे असेही म्हटले आहे की, "The Intelligence Bureau of the Federal Government however does not support or concur with the clean chit given to the madrasas by Patil and is of the opinion that the madrasas are being misused by the terrorists."हे आय.बी.चा अहवाल म्हणतो आहे. तरीदेखील आमचे केंद्रीय गृहमंत्री त्याला मान्यता देत नाहीत. "Unhappy with the defense of the

...... 3जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

madrasas by the Maharashtra Government, the officials of the IB have alleged that the Congress lead Democratic Front (DF) government is not taking any risk to upset its minority vote bank." आपली व्होटबँक अपसेट होईल म्हणून हे सरकार याची दखल घेण्यास तयार नाही याबद्दल आयबी ने नंतर नाखुषी व्यक्त केली आहे. "The Maharashtra Government has sealed its ears.." कानात बोळे घातले आहेत ..."to the advice of the IB to monitor the activities of the madrasas, which are being misused by the Muslim terrorist as safe houses" said an IB official." यासाठी सुरक्षित घरे म्हणजे मदरसे असून ते यासाठी वापरता येतात "According to the IB inputs sent to the Home Department in Bombay, it suggested that the madrasas in the districts of Jalgaon, Nashik, Thane, Solapur, Kolhapur, Gadchiroli, Nanded, Aurangabad, Malegaon and Pune should be put under strict surveillance and physical inspection should be carried out of the madrasas. But the Maharashtra Government has failed to follow the advice." सभापती महोदय, शासनाचे अपयश हे आहे की, त्यांनी दिलेल्या आदेश किंवा मार्गदर्शनपर सल्ला देखील फिजिकल व्हेरिफिकेशनसाठीसुद्धा राज्य सरकारने अमलात आणला नाही. पुढे जाऊन त्यांचे असे म्हणणे आहे की, "The report providing statistics of the madrasas outlined that there are more than 3000 madrasas in the state, and majority of the madrasas are illegal and unregistered. The largest numbers of 500 madrasas are in Bombay and half of them are illegal. There are more than 2,00,000 students in the madrasas in the state, who receive training in religion, Arabic and Persian languages from more than 5000 teachers. The IB report states that the education imparted in some of the madrasas are of Talibani culture and breeding ground for wrongly influencing students. The Maharashtra government is hesitant to act on the IB report, fearing that any action now would spark angry reactions from the

....... 3जी 3 ...



श्री. सावंत .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Muslim community and does not want to antagonize the Muslims in view of the forthcoming elections to the local self government bodies, scheduled to be held in December."

( यानंतर श्री. सरफरे ...... 3एच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

उद्या डिसेंबरच्या निवडणुका आपल्यासमोर आहेत. आणि हे सरकार आय.बी. ने दिलेल्या अहवालाकडे दुर्लक्ष करीत आहे. तुम्ही काय करणार आहात? याची तुम्ही दखल घेणार आहात की नाही? आम्ही तुमच्यावर टीका करावयाची की नाही? आम्ही हा सोन्याचा दगड तुमच्याकडे मारला आहे, त्याची मूर्ती करा आणि पूजा करा. मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, हे जे प्रकार घडत आहेत त्याच्या मुळाशी आपण जाणार आहात की नाही? आज मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी सिमीच्या संदर्भात अहवाल दिला आहे. अमरावतीच्या पोलीस आयुक्तांच्या अखत्यारीतील सिटी कोतवालीचा ठाणेदार हा सिमी संघटनेशी संबंधित आहे. त्याच्यासंबंधी अशा सूचना मिळाल्या आहेत की, संबंधित ठाणेदार यास फिल्डमध्ये ठेऊ नये. तरीसुध्दा सिटी कोतवाल सारखे महत्वाचे पोस्टींग देऊन त्याची नेमणूक केली आहे. या लोकांच्या आपण किती दाढया कुरवाळणार आहात? आणि कशासाठी? हा राष्ट्रीय सुरक्षिततेचा विषय असल्यामुळे मी काही महत्वाचे मुद्दे याठिकाणी मांडणार आहे. मी 1996 मध्ये आमदार झालो. त्यावेळी मला मनोरा आमदार निवासामध्ये राहण्याकरिता एक रुम देण्यात आली. त्यावेळी त्या मनोरा आमदार निवास इमारतीच्या खाली एक-दोन झोपडयांच्या रांगा होत्या. आज त्याठिकाणी 6 ते 7 झोपडयांच्या रांगा तयार कशा झाल्या आहेत? हे आपण माझ्यासोबत आल्यास पहावयास मिळतील. एका दिवंगत सन्माननीय खासदारांचे मी याठिकाणी नाव घेत नाही. त्याचप्रमाणे राज्यसभेच्या अभिनेत्री खासदार या देखील या झोपडया पाडू नये म्हणून सतत धावतात. त्याचप्रमाणे कर्नाक बंदरच्या ठिकाणी देखील झोपडया झाल्या आहेत. त्याठिकाणी बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या गोडाऊनमध्ये जाऊन चोऱ्या करण्याचे प्रकार चालतात. बी.पी.टी. आणि जे.एन.पी.टी. मध्ये कोकेनचा साठा पकडण्यात आला आहे. या बंदरावर आरडीएक्स पकडले जाऊ नये म्हणून समुद्रामध्ये बोटीमधुन आरडीएक्स उतरवून ते किनाऱ्यावर आणले जाते. अशाप्रकारे ते किनाऱ्यावर आणून सुरक्षितपणे इतरत्र नेले जाते. सभापती महोदय, गोवंडी आणि मानखुर्दमधील झोपडपट्टीमध्ये मी आपणासोबत पहाणी करावयास येण्यास तयार आहे. वांद्रे येथे पडलेल्या इमारतीबाबत माननीय सदस्य श्री. सरपोतदार दादांनी सांगितले आहे की, ती तीन मजली इमारत नसून 3 ते 5 एकावर एक मजले चढवून बांधलेली झोपडी होती. तेव्हा या झोपडपट्टयांमध्ये कोणते व्यवहार चालतात हे आपण शोधून काढा, या वस्तींमध्ये कोण कोण राहतात ते शोधून काढा. अशा वस्तीमध्ये पोलीस स्टेशन बांधण्यासाठी विरोध केला जातो. माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

काल सांगितले की, निर्मल नगर येथे पोलीस स्टेशन बांधण्यास विरोध करण्यात आला. एन.डी. टी.व्ही. वर माझी मुलाखत घेण्यात आली. त्यावेळी माझ्यासोबत श्री. अबू आझमी आणि श्री. कुमार केतकर होते. मी त्यांना विचारले की, तुमचा विरोध पोलीस स्टेशन बांधण्यासाठी कां आहे? त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. ते म्हणाले की, मी त्याठिक्‍णी शांतता प्रस्थापित करण्यासाठी गेलो होतो. म्हणजे तुम्ही शांतीदूत आहात? त्याठिकाणी शांतता निर्माण करण्यासाठी गेला होता? परवा माननीय मंत्र्यांनी कॉट्रॅडिक्टरी उत्तर दिले की, आठ दिवसामध्ये त्यांनी जागेबाबत पुरावे सादर करावे. आणि त्यानंतर सांगितले की, मिळालेल्या माहितीप्रमाणे आणि तेथील वहिवाटीप्रमाणे त्या ठिक्‍णी पोलीस ठाणे होते. 1958 सालापासून 2006 पर्यंत तुमच्या सरकारची जमीन आहे तर मग तुम्हाला हिंमत कां होत नाही? याला कारण तुमचे बोटचेपे धोरण आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी दोन-तीन मागण्या करणार आहे. या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, धिंडवडे निघाले आहेत. गेल्या आठवडयात पिंपरी-चिंचवड येथील पोलिसांच्या वसाहतीवर हल्ला करण्यात आला आहे. नाशिक येथे एका 14 वर्षाच्या मुलीवर बलात्कार करण्यात आला आहे, बलात्कार करणारे आरोपी पोलिसांना सापडत नाहीत. अशा परिस्थितीत आमच्या भगिनी, मुली या राज्यामधील शाळा-कॉलेजमध्ये गेल्यानंतर त्या सुखरुप घरी येतील की नाहीत अशी भीती त्यांच्या पालकांना वाटायला लागली आहे. अशाप्रकारे हे गृह खाते काम करीत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

आम्ही शिवप्रभूंच्या □वा□ राज्य□रभार □रतो. सुभेदाराच्या सु□ची □□-□रळा□ ओटी भरु□ पाठवि□रे आपले राज्य आहे. परंतु आज रोज □□, दरोडे ,बलात□राच्या घट□ंच्या बातम्या वर्तमा□पत्रामध्ये येत □हीत, असा एकही दिवस जात नाही. अशाप्र□रची आपली आज □यदा व सुव्यवस्थेची परिस्थिती आहे. परवा दूरचित्र वाहि□वरु□ माजी पोलीस संचाल□ श्री.अरविंद इ□मदार यांची मुला□त पहायला मिळाली. त्यांच्या मुला□तीमध्ये त्यां□ ए□ चां□ले मार्मि□ वाक्य वापरले होते की, "आज आमच्या पालिसां□ ड्युटी सोडू□ अं□वर □□वेश घलावेसे वाटत □ही. म□ते पोलीस शिपाई असतील □वा पोलीस इ□पेक्टर असतील. ड्युटीवर येता□ आतमध्ये □□वेश असतो आ□ि वर दुसरा सिव्हील ड्रेस असतो. ड्युटी सुरु झाली □, वरचा सिव्हील ड्रेस ते □ढतात. □रे तर पोलिसां□ त्यांच्या □□वेशामध्येच वावरले पाहिजे. परवा भिवंडीमध्ये ज्या पोलिसां□ मारले त्यावेळेस त्यांच्या अं□वर सिव्हील ड्रेस होता. पोलिसां□ अं□वर ड्रेस असला □, त्याची त्यां□ लाज वाटते. यामध्ये प्रमु□ □ष्ट म्ह□जे त्यां□ त्यांचाच अपमा□ वाटतो. त्यां□ अं□वर ड्रेस असला □ सुर□ि वाटत □ही, लो□ आपल्याला हसतील, पोलीस □रप्ट आहे अशा दृष्टी□□तू□ ते पहातील असे त्यां□ वाटते. तशी त्यांच्यामध्ये मा□सि□ता तयार झालेली आहे. याला आप□ जबाबदार आहोत □य? याचा विचार □रावा. मला वाटते, □हमंत्री स्वतःच स्वतःच्या प्रेमात पडलेले आहेत. श्री.सी.डी.देशमु□ यांच्या□डे पहा□याचा लो□चा दृष्टी□□ वे□ळा होता. स□मा□□य □हमंत्री उस□ अवसा□ आ□□ रेल्वेच्या ट्रॅ□मधू□ चालता□ दिसत होते. आय.बी.□ सां□□ही त्याप्रमा□ □हीही □रवाई □ली □ही, ही □दाची आ□ि चीड आ□□री बाब आहे. आबा, आप□ या प्रसं□ स्वाभिमा□□ आपल्या मंत्रीपदाचा राजी□मा द्यायला पाहिजे.

सभापती महोदय, ए□दा □र्ला, मा□□र्द, □वंडी,भिवंडी या ठि□□च्या लो□ची रेश□□ची □र्ड तपासू□ त्या ठि□□ ए□दा □बीं□ ऑपरेश□ □र□याची वेळ आलेली आहे. □ल मी मुंबई सेंट्रल येथे होतो. तेथू□ मी उलट चर्च□ट□डे आलो. ऑफीसमधील महिला पॅ□□ झालेल्या दिसत होत्या. बॉम्बे सेंट्रलवरु□ चर्च□टला ये□यासाठी दीड तास ला□ला. ए□ही पोलिसांच्या व्हॅ□वर मे□ फो□ साऊंड सिस्टीम बसविलेली दिसू□ आली □ही. लो□□ □ठू□ □□ू□ जाता येईल, हे सुध्दा पोलिसां□ सां□ला आले □ही. दो□ही बाजूं□ रस्त्यावर वाह□ंची आ□ि लो□ंची □र्दी होती. मी शेवटी दो□ सूच□ □रतो. भिवंडीजवळील पडघ्यामध्ये पोलीस अतिरेक्यां□ प□ड□यासाठी □ले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ SBT/ MAP/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु....

असतां□ा तेथील ज□ा□ी□ पोलिसांवर हल्ला □ेला. आरोपी□ा प□ड□्याऐवजी पोलिसां□ा तेथू□ पळू□ यावे ला□ले. या संबंधा□ आप□ □धी अंतर्मू□ होऊ□ पहा□ार आहात □ी □ाही ? दुर्दैवा□ आप□ प्रत्ये□ □ोष्टीमध्ये राज□ार□ □रु □ा□. दं□ली□ ज□ाला घातलेल्या आ□ीत जर □ी□ राज□ार□ाचे पी□ घेत असतील तर त्यां□ा □ाय म्ह□ावे ? अ□्ले□ात असेही म्हटलेले आहे □ी, राज□ार□ातील लो□ पोळ्या भाजू□ घे□्यासाठी संधी शोधत असतात. तो त्यांचा धर्मच असतो. प□ □ो□त्या ध□ीवर □ो□ती पोळी भाजायची याचा विवे□ही मंत्र्यां□ी पाळलेला □ाही. त्याचा मी □िषेध □रतो. मला शेवटी सां□ावयाचे आहे □ी, आता तुमची प्रतिमा मली□ झालेली आहे, तुम्ही राजी□ामा द्यावा, अशाप्र□ारची मा□□ी □रु□ माझे भाष□ संपवितो. ध□्यवाद.

----

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकासे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या लोकांना पाकिस्तानात जावयाचे होते ते पाकिस्तानात गेले आणि पाकिस्तानात जे हिंदू होते, जे सिंधी होते किंवा इतर जातीचे लोक होते ते भारतात आले. त्यावेळी अशी परिस्थिती होती की, कहीं खुशी की शहनाई बज रही थी, कहीं कत्लेआम हो रहा था. जिन मुसलमानों को पाकिस्तान जाना था, वे चले गए. पाकिस्तान से हिन्दू भाई भारत में आए और वे यहां पर शान्ति से रह रहे हैं हैदराबाद में तलवारें चल रही थीं तो कलकत्ता में बम फट रहे थे. ऐसी हालत में महात्मा गांधी कलकत्ता गए. उस समय जवाहरलाल नेहरु और अन्य नेताओं ने विरोध किया और कहा कि आप कलकत्ता मत जाइए. लेकिन महात्मा गांधी ने कहा कि राम और रहीम एक हैं. या देशातील दंगली थांबल्या पाहिजेत म्हणून महात्मा गांधींनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. त्यांना गोळया घालण्यात आल्या. "मजहब नहीं सिखाता, आपस में बैर रखना" असे एका मुस्लिम शायरने लिहिले आहे. या देशामध्ये मुस्लिम राष्ट्रपती झाले तसेच आताही मुस्लिम राष्ट्रपती आहेत. "सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्ता हमारा" अशा प्रकारचे वक्तव्य एका मुस्लिम शायरने केले आहे. 1964 मध्ये ज्यावेळी हिंदुस्थान आणि पाकिस्तानचे युध्द झाले त्यावेळी श्री. अब्दुल हमीद नावाच्या सैनिकाने आपला जीव धोक्यात घालून हवाईजहाज वळविले. इतिहासामध्ये त्याचे नाव अजूनही अमर आहे. कारण या देशामध्ये जे मुस्लिम राहतात त्यांचे देशावर प्रेम आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. खतिब साहेब यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर ते अतिशय शालीन वृत्तीचे वाटतात. ते खरोखर शरीफ आहेत. ते अतिशय सज्जन आहेत. भारतामध्ये असे अनेक मुस्लिम आहेत. पण महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांच्या या महाराष्ट्रामध्ये बॉम्बस्फोट होतात. नागपूर सारख्या ठिकाणी ताजुद्दीन बाबाचा दर्गा आहे आणि हिंदु-मुस्लिम सर्व धर्माचे लोक त्या ठिकाणी जातात. तसेच नागपूरला संघाचे कार्यलय आहे. त्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडविण्याचा प्रयत्न केला जातो. ज्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले त्या दीक्षाभूमीवर दरवर्षी 14 ऑक्टोबरला आणि 6 डिसेंबरला लाखो लोकांचा मेळावा होतो. अशी अनेक तीर्थस्थाने आहेत. परंतु मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी आहे. ही राजधानी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MAP/ MAP/

श्री. रमेश निकोसे .....

उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न अतिरेकी लोकांकडून होत आहे. काश्मीरमध्ये रोजच लोक मारले जातात. रोजच त्या ठिकाणी बॉम्फस्फोट होतात. दिल्लीमध्ये बॉम्बस्फोट व्हावयास लागले. खामगावमध्ये, औरंगाबादमध्ये असे प्रकार होतात. अशा परिस्थितीमध्ये विचार करण्याचे धाडस शासनाने दाखविण्याची गरज आहे. याचे कारण असे की, या देशामध्ये दुर्योधनाच्या वृत्तीची माणसे आहेत. मग हिंदू असो, मुस्लिम असो, पारशी असो किंवा इसाई असो. श्रीकृष्णाने धर्मराज युधिष्ठिरापासून सर्व लोकांना सांगितले की, युध्द नको, युध्दाने प्रश्न सुटत नसतात. परंतु त्यांचे कोणी ऐकले नाही. कर्णाची पत्नी वृषाली हिने कर्णाला जाऊन सांगितले की, तुम्ही लढाई करु नका, तुम्ही सुतपुत्र नसून सूर्यपुत्र आहात असे कुंतीने मला सांगितले आहे. परंतु दुर्दैवाने कर्णाने ऐकले नाही. कोणीही ऐकले नाही. ज्यावेळी युध्द संपले त्यावेळी पाच वर्षाचा बालक गांधारी आणि धुतराष्ट्राजवळ जाऊन सांगतो की, माझे बाबा म्हणत होते की, युध्द संपल्यावर तुला मांडीवर घेऊन बसेन. आता युध्द संपलेले आहे. सगळे शांत झाले होते. सगळीकडे प्रेते पडली होती. त्या पाच वर्षाच्या बालकाला जेव्हा दूर्योधनाजवळ घेऊन जातात तेव्हा 5 वर्षाचा बालक दुर्योधनाला म्हणतो, बाबा, युध्द संपल्यावर तुला मांडीवर घेईन असे तुम्ही म्हणाला होता. आता तुम्ही मला मांडीवर घ्या. त्यावेळी दुर्योधन म्हणतो, अरे, मी तुला मांडीवर का घेऊन शकत नाही याबाबत भीम काकाला प्रश्न विचार. कारण भीमाने दुर्योधनाची मांडी फोडली होती.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:20

(श्री. रमेश निकोसे...)

ही मनोवृत्ती या भारतामध्ये असल्यामुळे अशा प्रकारचे बॉम्बस्फोट झालेले आहेत. मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले. त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा सर्वांनी अभ्यास करणे, त्यांचे विचार समजून घेणे गरजेचे आहे. परंतु तसे होत नाही आणि परिणामी अशा प्रकारची विध्वंसक कृते होताना दिसतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ना.रा.शेंडे आणि श्री. माडखोलकर हे दोन पत्रकार गेले आणि त्यांनी, "हिन्दु समाजाबद्दल तुमची भूमिका काय आहे ?" असे डॉ. बाबासाहेबांना विचारले. तेव्हा डॉ. बाबासाहेबांनी त्यांना सांगितले की, मी धर्मांतर केलेले आहे, मी शांतीचा धर्म स्वीकारलेला आहे आणि त्यामुळे मला हिंदु धर्माच्या विरोधात बोलण्याची अजिबात आवश्यकता नाही. मी माझ्या धर्माचा प्रसार करणार आहे. युध्दाने प्रश्न सुटत नाहीत. या देशाला आता भगवान बुध्दांच्या विचारांची गरज आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय मौलिक विचार प्रगट केले. आमदार निवासामध्ये दोन अतिरेकी येऊन दोन तास थांबले होते. त्याठिकाणी सामान तपासण्यासाठी असलेले इलेक्ट्रॉनिक यंत्र बंद पडलेले आहे. मंत्रालयामध्ये देखील सामान तपासण्यासाठी असलेले यंत्र बंद पडलेले आहे. या विधान भवनामध्ये देखील "मशिन बंद" असा छोटा फलक यंत्रावर लावलेला आहे. हे अतिरेकी देशाच्या सार्वभौम अशा संसदेवर हल्ला करु शकतात, तर मग या विधान भवनावर देखील ते केव्हाही हल्ला करु शकतात. 1993 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील काही आरोपी सुटले आणि काही आरोपींवर केसेस चालू आहेत. अशा प्रकारे या अतिरेक्यांवर केसेस चालविणे हे खरे म्हणजे दुर्दैवच म्हटले पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, आरडीएक्स घेऊन जाणारे, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे घेऊन जाणारे अतिरेकी जेव्हा पकडले जातात त्यावेळी त्यांना तेथेच शूट करण्याचे आदेश माननीय गृहमंत्र्यांनी दिले पाहिजेत. कारण तेच देशामध्ये आज विध्वंस घडवून आणत आहेत. आज या अतिरेक्यांनी पश्चिम रेल्वेच्या गाडयांमध्ये 11 बॉम्बस्फोट घडवून आणले आणि त्यामध्ये 200 पेक्षा अधिक लोक मृत्यूमुखी पडले आणि 500 पेक्षा अधिक लोक जखमी झाले. अशा प्रकारच्या घटनांनी ही मुंबई उद्ध्वस्त होणार नाही यासाठी शासनाने तत्परतेने पावले उचलली पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी मदरशांचा उल्लेख केला. आज मदरशांमधून 2 लाख मुलांना ट्रेनिंग दिले जात आहे. आणखी 20

. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे...)

वर्षात मदरशातील मुले जेव्हा 25 वर्षाची होतील त्यावेळी ती मुले या देशामध्ये किती भंयकर परिस्थिती निर्माण करु शकतील हे सांगता येत नाही. या मदरशांतून त्या मुलांना, तुम्ही भारतीय आहात,हा देश, हा महाराष्ट्र तुमचा आहे, येथील वैभव तुमचे आहे, या देशावर तुम्ही प्रेम केले पाहिजे, अशा प्रकारचे ट्रेनिंग देण्यात यावे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...नंतर श्री. भोगले..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 18:25

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, 18 जानेवारी रोजी सामना या दैनिकामध्ये प्रसिध्द झालेली बातमी मी वाचून दाखवितो. हे बॉम्बस्फोट शासनाच्या बेजबाबदारीमुळे कसे झाले ते सांगतो. ज्यावेळेला हज हाऊसमधील इमामाला पकडण्यात आले त्यावेळेला पोलिसांनी वृत्तपत्रामध्ये जी बातमी दिली ती वाचून दाखवितो. भारतात बंदी घालण्यात आलेल्या संघटनेला मदत करण्याच्या कारणावरुन अटकेत असलेले हज हाऊसमधील इमाम मौलाना याहा बक्ष याला एका राजकीय पुढाऱ्याकडून आर्थिक मदत 50 लाख रुपये मिळाल्याची आमची माहिती आहे. त्याठिकाणी दाऊदचा भाऊ युनूस याच्याकडून मदत देण्यात आली. पुढे असे म्हटले आहे की, या पुढाऱ्यासह मुंबईतील काही व्यापारी, दानशूर लोकांनी 12 लाख, 25 लाख आणि 28 लाख रुपये या इमामाला दिले आणि तीन बँकांची नावे दिली. ज्या तीन अतिरेक्यांना हा इमाम मदत करीत होता त्यांच्याकडून जी माहिती पोलिसांना मिळाली ती 18 जानेवारीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली. जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये मुंबईत गर्दी असणाऱ्या ठिकाणी स्फोट घडविण्याचा या तिघा अतिरेक्यांचा मनसुबा होता. ज्यावेळेला आम्ही गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतो किंवा एखादे विशेषण त्यांना लावल्यानंतर त्यांच्याकडे नैतिकता असती तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे होता. सभापती महोदय, काल ज्या घटना घडल्या त्याठिकाणी आपण गेला असाल, सभागृहाचे अनेक सदस्य गेले असतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीमध्ये गृहमंत्री असे म्हणाले की, अतिरेकी आम्हाला घाबरवू शकत नाहीत. कुठेही मुंबईत उद्रेक झाला नाही. मुंबई शांत राहिली आणि जणूकाही काल काहीच झाले नाही अशा अर्थाने मुंबईचे जनजीवन सुरु झाले. हे त्यांचे शौर्य नाही. शांतताप्रेमी नागरिकांचे धैर्य आहे. याचा अर्थ आम्ही नपुसंक नाही. प्रत्येक स्फोटाच्या वेळी हेच झालेले आहे. राज्यात 110 वेळा स्फोट झाले. आज वेगवेगळया रुग्णालयामध्ये गेल्यानंतर आम्हाला भयंकर दृश्य पहावयास मिळते. आम्ही काल सायंकाळी 7.00 वाजता सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे, श्री.विनोद तावडे यांच्यासह केईएम रुग्णालयात गेलो होतो. त्यावेळेला शिवसेना पक्षाचे माजी महापौर श्री.मिलिंद वैद्य, उपशाखा प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते माहीमच्या वस्त्यांमधील मुस्लिम, ख्रिश्चन समाजाचे कार्यकर्ते होते. 7 शव त्याठिकाणी असे होते, ज्यांचे शीर अस्तित्वात नव्हते. आपण याठिकाणी चर्चा करु. अर्धा तास, पाऊण तासात चर्चा संपेल. परंतु ज्यांच्या घरातील वडिल गेले, नवरा गेला, पुत्र गेला असेल त्यांच्या घरात काय हाहाकार माजला असेल? केईएम रुग्णालयामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

7 शव होती, ज्यांचे हात नाहीत, पाय नाहीत अशा अवस्थेतील ती होती. तेथे एक महिला आपल्या पतीचा शोध घ्यावयास आली होती. ती म्हणाली, माझे पती शरीराने व्यवस्थित आहेत. तिला रुग्णालयाचे डीन म्हणाले की, तुम्ही स्वत: पहा. या 7 बॉडीज वेगवेगळया आकाराच्या आहेत. ती महिला म्हणाली, मी कशी ओळखू. तिने बॉडी ओळखली नाही. सध्याच्या अस्तित्वातील कायद्याप्रमाणे 7 वर्षे ती आपल्या कपाळावरचे कुंकू पुसू शकणार नाही आणि नवराही नाही. आपण या सभागृहाच्या माध्यमातून चर्चा करु. परंतु तिने काय गुन्हा केला? ते पाप तुम्ही केले आहे. पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांचा राजीनामा आम्ही का मागतो? ज्या तीन अतिरेक्यांना पकडले, "they were served a feast of kababs, biryani and sheer korma ordered from a South Mumbai restaurant by their anti-terrorist squad interrogators on the occasion of Id on January 11. The three were also allowed to make calls home in Kashmir and greet family and friends." आणि मग पत्रकारांनी विचारले असता श्री.रॉय यांनी उत्तर दिले की, "What is wrong if they were offered good food on Id. It was their festival and we obliged their request" हा निर्लज्जपणा आहे. एखादा हिंदू असेल, मुस्लिम असेल, त्याला सजा झाली तरी सण असतात अशा वेळेला किंवा 26 जानेवारी, 15 ऑगस्टला कैद्यांना गोडधोड जेवण दिले जाते. जुलैमध्ये लोकांना ठार मारण्याचा ज्यांनी कट केला त्यांना साऊथ मुंबईतील हॉटेल आणि दिल्ली दरबार हॉटेलमधून बिर्याणी मागविता? सभापती महोदय, पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांनी उद्याच्या उद्या बडतर्फ करावे किंवा त्यांनी राजीनामा दिला पाहिजे अन्यथा शासनाने त्यांना सक्तीने रजेवर पाठविले पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, ख्वाजा युनूस हा काही बेकसूर नव्हता. सभापती महोदय, पोलिसांनी टेरेरिस्टला मारले तर त्यांचे चुकले कोठे? परंतु या केसमध्ये श्री. वझे आणि भोसले या पोलीस अधिका-यावर आज खटले चालू आहेत. मुद्रांक घोटाळयात जे अडकलेले आहेत त्याबद्दल आम्हाला काहीही बोलावयाचे नाही. यामध्ये जे लोक अडकलेले आहेत त्यासंदर्भात आम्हाला काहीही वाटत नाही. या प्रकरणात आय.ए.एस. आणि आय.पी.एस. अधिकारी अडकलेले असतांना सुध्दा आम्हाला त्यांच्याबाबत काहीही वाटत नाही. वास्तविक पाहता 12 मार्च, 1993 च्या खटल्याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करीत नाही. जगात एकमेव भारत देश असा आहे की, त्या ठिकाणी कोणीही यावे आणि गुन्हे करुन दुस-या देशात जावे असे घडते. आज सकाळी माननीय गृहमंत्र्यांसमवेत जी बैठक झाली त्यामध्ये विचारण्यात आले की, 3 वर्षापूर्वीच्या केसचे काय झाले? त्यातील आरोपींच्या संदर्भात काय निर्णय झाला? त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, 3 वर्षापूर्वीच्या केसचे साक्षीपुरावे संपलेले आहेत. ही केस आता दिल्ली पोलिसांच्या हातात आहे. परंतु अध्यक्ष महोदय, मंत्रीपदे मागण्यासाठी आपण दिल्लीला 10 वेळेस चकरा मारतात परंतु या केसच्या संदर्भात काय झाले याची साधी चौकशी सुध्दा आपण करीत नाही? परंतु या प्रकरणात ज्या निरपराध माणसांना आपला प्राण गमवावा लागला, हजारापेक्षा जास्त लोक जखमी झाले असे कृत्य करणा-या अतिरेक्यांना फाशी द्या असे आपल्याला सांगता आले नाही. सभापती महोदय, या अतिरेक्यांना फाशीची शिक्षा झाली तर मानवाधिकार संघटना पुढे येतील. या लोकांना कोर्टाने फाशीची शिक्षा दिली तर ते हाय कोर्टात जातील, सुप्रिम कोर्टात जातील, बाहेरच्या देशातील लोक येतील, अपील करतील, माननीय राष्ट्रपतींना फाशीची शिक्षा माफ करण्याच्या संदर्भात विनंती करतील अशा प्रकारे कायद्याचा या ठिकाणी तमाशा चालू आहे. या केसच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सभापती महोदय, ज्यांनी 90 दिवसाचे चार्जशिट दिले, जे या कटात दोषी होते अशा एका सुध्दा अधिका-याला बडतर्फ करण्यात आले नाही. जे लालकृष्ण अडवाणी यांना उडविण्याच्या कटात होते त्यांच्यावर काही सुध्दा कारवाई करण्यात आली नाही. सभापती महोदय, अब्दूल मती याला बेकसूर म्हणून सोडण्यात आले. सभापती महोदय, मला आपण सांगा आज जे कोणी बॉम्बस्फोट

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

करीत आहेत ते एका विशिष्ट जातीचे लोक आहेत, ते मुस्लीम जमातीचे लोक आहेत. एका तरी हिंदु माणसाने मंदिरात स्फोट घडवून आणलेला आहे असे उदारहरण दाखवून द्या. बॉम्बस्फोट करणारे एकजात मुस्लीम आहेत. आम्ही अतिरेक्यांच्या संदर्भात बोललो तर आम्हाला जातीयवादी ठरवले जाते ? घाटकोपरच्या बॉम्बस्फोटातील अब्दुल मतीन याला बेकसूर ठरविण्यात आले. मतीनची जेव्हा सुटका झाली तेव्हा त्याचे हिरो सारखे स्वागत करण्यात आले होते. मुंब-यातील इशरत मेली तेव्हा तेव्हा ती बेकसूर होती, चांगली होती, तिचे अतिरेक्यांशी संबंध नव्हते, बुरखा घातल्याशिवाय ती बाहेर जात नव्हती , वह इनोसेंट थी, गर्दन नीचे झुकाकर चलती थी, वह बहुत शरीफ थी." असे सांगण्यात आले होते. तिच्या दफनविधीच्या कार्यक्रमाला शबाना-कबाना आजमी सुध्दा हजर होती. परंतु ज्यावेळेस तिचे अतिरेक्यांशी संबंध असल्याचे उघड झाले तेव्हा सर्वांचे तोंडें बंद झाली. इशरत मारली गेल्यामुळे तिच्या कुटूंबाला 1 लाख रुपयांची मदत सुध्दा देण्यात आली होती. त्यावेळेस मोठमोठे लोक दफन विधीच्या कार्यक्रमाला हजर होते परंतु काल जो बॉम्बस्फोट झ ाला व त्यामध्ये जे लोक मेले त्यांच्या कार्यक्रमाला मात्र शबाना-कबाना उपस्थित राहिली नाही, सभापती महोदय, 25 ऑगस्ट, 2003 रोजी गेटवे ऑफ इंडिया येथे जो बॉम्बस्फोट झाला होता त्यामध्ये जवळ जवळ 45 लोक मृत्यू पावले होते. या बॉम्बस्फोटात युसुफ पटनी, हनीफ, फरीन यांचा सहभाग होता परंतु या खटला अजून प्रलंबितच आहे. पार्ले येथे जो बॉम्ब्स्फोंट झाला होता त्याचा खटला सुध्दा प्रलंबित आहे. झवेरी बाजारात जो बॉम्बस्फोट झाला त्याचा खटला सुध्दा प्रलंबित आहे. या बॉम्बस्फोटात निरपराध माणसे मारली गेली होती. कालच्या बॉम्बस्फोटात तर कोणाचे हात तुटले, कोणाचे पाय तुटले तर कोणाचे डोके तुटले होते. कालची जी घटना घडली त्या घटनेमध्ये मृत पावलेल्या लोकांचा काही एक संबंध नव्हता, काही एक दोष नव्हता. कालच्या घटनेमध्ये बीजेपी आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी रात्रभर जखमी लोकांची सेवा केली. काल जी घटना घडली त्यावेळी रेल्वे स्टेशनवर स्ट्रेचर सुध्दा उपलब्ध नव्हते अशा परिस्थिती सुध्दा आमच्या कार्यकर्त्यांनी रात्रभर काम केलेले आहे. कालचा बॉम्बस्फोट हा तर फार भयानक होता.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण........

रेल्वेचा पोलादी पत्रा आकाशात उंच उडाला. कोणाच्याही अंगावर वस्त्र राहिले नाही. फक्त अंडरवेअर अंगावर होता अशा अवस्थेत लोक पडून होते. हा मृतांचा आकडा आता 193 च्यावर गेलेला आहे. इतकी भयानक घटना घडली आहे. या घटनेची जबाबदारी स्वीकारुन माननीय गृहमंत्र्यांनी त्वरित राजीनामा दिला पाहिजे. पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांना त्वरित रजेवर पाठविले पाहिजे. याठिक्राणी बॉम्बस्फोट घडवून काश्मिर मिळेल अशी कोणाची समजूत असेल तर ती चुकीची समजूत आहे. फ्रान्समध्ये असे प्रकार होत होते म्हणून तेथे गिलोटीन लावण्यात आले होते.दलित समाजातील लोकांवर अन्याय झाला, त्यांना जनावराप्रमाणे वागणूक देण्यात येते म्हणून त्यांच्या मनामध्ये राग होता आणि त्यातूनच उद्रेक झाला होता. सभापती महोदय, माजी मंत्री श्री.जावेद खान यांनी बैगनवाडीमध्ये बांग्ला देशवासियांना रेशनिंग कार्ड दिले होते, हे शासन शोधून काढणार आहे का ? शासन त्यांना शोधून काढणार नसेल तर त्यांना सत्तेवर राहण्याचा कोणताही हक्क नाही. सभापती महोदय, दिनांक 1 जानेवारी 1990 रोजी नायगाव येथे बॉम्बस्फोट झाला. नायगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये पोलीस कॉन्स्टेबल श्री.चंद्रकांत ज्ञानदेव आव्हाट यांच्या मुलाचा मृत्यू झाला, पण त्यांच्या कुटुंबियांना पाच पैशाची देखील मदत मिळाली नाही. परंतु नुकत्याच भिवंडी येथे झालेल्या गोळीबारात मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपयांची मदत करण्यात आली. माझी मागणी आहे की, मुंबईतील मुसाफिर खाना, मुंब्रा याठिकाणी लष्कर आणून कोबिंग ऑपरेशन केले पाहिजे. त्याठिक्राणी असलेल्या गुन्हेगारांना शोधून काढले पाहिजे, त्यांच्यावर चार्जशीट दाखल केली पाहिजे. सभापती महोदय, पोटा कायदा कोणी रद्द केला ? टाडा कायदा कोणी रद्द केला ? मुस्लिम समाजासाठी पोटा कायदा करण्यात आला होता काय ? सय्यद बुखारी आणि इतर मुस्लिम खासदारांचे शिष्टमंडळ भेटून त्यांनी हा कायदा रद्द करावयास लावला. यामध्ये शिवसेना व भाजपाचे खासदार सोडून त्यांना इतर पक्षाच्या सर्व खासदारांची साथ होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण........

सभापती महोदय, काल जी बॉम्बस्फोटाची मालिका झाली त्यामध्ये जवळपास 200 जणांचा मृत्यू झालेला आहे. दोन्ही सभागृहातील सर्व सदस्यांनी एकेक घर वाटून त्या सर्व मृत व्यक्तींच्या घरात दहाव्यापर्यंत राहिलो तर त्यांच्या कुटुंबाचा आक्रोश, मातांचा आक्रोश आपल्याला समजेल. सभापती महोदय, मी झालेल्या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि माननीय गृहमंत्री यांनी राजीनामा द्यावा व पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांना रजेवर पाठवावे अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझीज ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, काल, दिनांक 11 जुलै 2006 रोजी मीरा रोड, अंधेरी, माटुंगा व अन्य ठिकाणी जे सात बॉम्बस्फोट झाले ते अतिशय भयावह होते. ही अतिशय दु:खदायक व गंभीर घटना आहे. अवघ्या 11 मिनिटांमध्ये दीड मिनिटांच्या अंतरावर एकेके असे एकूण 7 बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले. लोक आपला कामधंदा संपवून घरी परतत असताना हे बॉम्बस्फोट झाले.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.. 18:40

डॉ.एम.ए.अझिज...

200 लोक मरण पावले व 400 पेक्षाही अधिक लोक दवाखान्यात आहेत. याचा निषेध तर आपण करुच परंतु त्याही पलिकडे जाऊन उपचार करण्याच्या दृष्टीने किंवा याबाबतीत कोणत्या भावना प्रकट कराव्यात हेही आपल्याला कळत नाही. नक्कीच यामध्ये टेरेरिस्ट असणार, यात शंका नाही. सभापती महोदय, व्यवसायाने मी डॉक्टर आहे. एखाद्या रुग्णाला तपासून रोगाचे निदान करावयाचे असेल तर जोपर्यंत त्याची कारणे आपल्याला माहिती होत नाहीत तोपर्यंत आपल्याला रोगाचे निदान वा त्यावर इलाज करता येत नाही. आपण आतंकवाद्यास पकडले पाहिजे. सन 2003 मध्ये जालन्याला, परभणीला व पूर्णाला बॉम्बब्लास्ट झाला. त्यावेळी मी त्याठिकाणी गेलो होतो. त्यावेळी पोलिसांनी सांगितले की, यामध्ये अल-कायदाचे लोक आहेत. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आपण त्यांना गोळया घालाव्यात. त्यावेळी 200 लोकांना तुरुंगात ठेवण्यात आले. एक वर्षानंतर सांगण्यात आले की, हे काम या लोकांचे नव्हते. काल घडलेल्या घटनेच्या बाबतीत आज डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांचे टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक स्टेस्टमेंट आले आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, यामध्ये बजरंग दलाचे लोक आहेत. तसेच, नागपूरमध्ये व इतर दोन ठिकाणी जे असे प्रकार झाले त्यामध्येही बजरंग दलाचेच लोक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.एम.ए.अझिज : आपण आजचा टाईम्स ऑफ इंडिया हा पेपर वाचावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बघून बोलावे. सभागृहातील या विषयावरील चर्चा मी ऐकत आहे. एका गंभीर विषयाशी निगडीत असणारी ही चर्चा असून या माध्यमातून राज्याचे व देशाचे अस्तित्व कसे राखले पाहिजे यादृष्टीने आपण याठिकाणी विचार करण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या निमित्ताने अनेक वक्त्यांच्या बाबतीत असे झाले आहे की नकळत बाजूला जाऊन ते मेन ट्रॅकवर आलेले आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांनीही मेन ट्रॅकवर येऊन बोलावे.

डॉ.एम.ए.अझिज : सभापती महोदय, याठिकाणी जे मुद्दे उपस्थित करण्यात आले त्याचा मला खुलासा केला पाहिजे. सभापती महोदय, याठिकाणी टाईम्स ऑफ इंडियामध्ये जे म्हटले आहे ते मी वाचून दाखवतो. "The accused have told investigators that they had carried out the blasts on the instructions from Rajkondwar. These men

...3O-2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

were engaged in bomb making. We are probing about the financier who funded them, said Singh. Investigators said the accused, who were trained on the outskirts of Nanded, knew how to connect devices, timers, switches, gun powder and detonators. The police said that a live pipe bomb, 1.5 kg gunpowder, timers, switches and devices were seized from the spot."

नंतर श्री.रोझेकर...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज........

ही घटना जूनमध्ये घडली आणि त्यावेळी मी सभागृहात सांगितले होते की, या घटनेची चौकशी सीबीआयकडून झाली पाहिजे. परंतु, विरोधी पक्षाच्या एकाही सन्माननीय सदस्याने याचा उल्लेख केलेला नाही.

**सभापती** : आपल्या भाषणात आपण त्या घटनेचा रेफरन्स दिलेला आहे आता आपण मूळ विषयासंबंधी बोलावे, अशी सन्माननीय सदस्य, श्री.अझिझ यांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नांदेडला बॉम्बब्लास्ट झाला नाही. आतापर्यन्त एकही बॉम्बब्लास्ट बजरंग दलाने केलेला नाही.

डॉ.एम.अे.अझिज : सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी कृपया आमचेही म्हणणे ऐकून घ्यावे. तुम्ही आम्हाला कसला अल कायदा सांगता ? तुम्ही अल्पसंख्यांक लोकांसंबंधी बोलला आहात.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.अझीझ, आपण कृपया कालच्या घटनेसंदर्भात आपली मते या ठिकाणी मांडावीत.

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, हे सर्व विषय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले होते, त्याचा खुलासा या ठिकाणी केला पाहिजे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, खुलासा हा शासनाकडून होईल. आम्ही काय बोललो, काय नाही, हे शासनाने सांगावयाचे आहे.

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, मी माझे विचार या ठिकाणी मांडित आहे. माझे विचार या ठिकाणी मांडण्याचा मला हक्क आहे.

**सभापती** : आपला हक्क कोणीही हिरावून घेणार नाही. काल जी भयानक घटना घडली त्याच्याशी निगडित तुम्ही बोलावे, एवढीच आपल्याला विनंती आहे.

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, नांदेड येथे जी घटना घडली त्यासंबंधी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी काहीही सांगितले नाही. विरोधी पक्षनेत्यांनी हे सुध्दा सांगितले पाहिजे की, नांदेडमध्ये काय घडले. सन 2003 मध्ये बॉम्बब्लास्ट झाला त्यावेळी तुम्ही काही बोलला नाही. सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मदरसाचा विषय काढला.

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिझ...........

मदरसाविषयी महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला आहे. मध्य प्रदेशमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे, त्या ठिकाणी त्या सरकारने कशासाठी मदरसा रेग्युलराईज केले ? केवळ आम्हाला या ठिकाणी सांगता की, तुम्ही महाराष्ट्रात मदरसा रेग्युलराईज केले. त्याचप्रमाणे भिवंडी येथे झालेल्या दंगलीच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, शासनाला नियमाला धरुन काम करावे लागते. तेथील जागा ही वक्फ बोर्डाची आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.अझिज यांना मी सांगू इच्छितो की, भिवंडी येथे झालेल्या दंगलीविषयी या सभागृहात ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी आपण बोलला असता तर ते ठीक होते. आज यासंदर्भात बोलणे बरोबर होणार नाही. आजची चर्चा ही कालच्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, ते स्वत: कागदपत्रे बघत आहेत आणि निर्णय घेत आहेत. त्यामुळे त्यावर आपण बोलण्याचे टाळावे.

डॉ.एम.अे.अझिझ : सभापती महोदय, ही घटना घडली त्याविषयी मी अगोदरच बोललो आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि छत्रपती शाहू महाराजांनी जसे अल्पसंख्यांकांना जवळ केले तसे जर आज जवळ घेतले तर अशा घटना घडणार नाहीत. शाहू महाराजांनी अल्पसंख्यांकांसाठी विशेष कक्ष स्थापन केला होता. परंतु, त्यासंदर्भात कोणी बोलत नाही. शिवाजी महाराजांच्या काळात त्यांना अनेक मुस्लिमांनी मदत केली होती. पुन्हा मला हे सांगावेसे वाटते की, अतिरेकी कोणीही असो, अतिरेकी मुस्लिम असू शकतात, अतिरेकी हिंदू असू शकतात, जे अतिरेकी असतील त्यांना गोळया घातल्या पाहिजे. एवढे सांगून मी थांबतो.

-----------------------

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, काल झालेल्या बॉम्बस्फोटाच्या निमित्ताने सभागृहामध्ये चार-साडेचार तास चर्चा सुरु आहे. माझे दुर्दैव असे आहे की, बॉम्बस्फोटातील प्रेते उचलण्याचा दुर्दैवी योग माझ्या नशिबी दोन वेळा आला. सन 1993 मध्ये बॉम्बस्फोट झाला त्यावेळी सुध्दा मी प्रेतांचा खच उचललेला आहे. काल खार स्टेशनमध्ये बॉम्बस्फोट झाला तेव्हा पाचव्या ते सहाव्या मिनिटाला मी तेथे पोहोचलो. तेथील विदारक परिस्थिती मी बघितली. सन 1993 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटापेक्षाही भयानक परिस्थिती काल बघावयास मिळाली. ज्यावेळी बॉम्बस्फोट झाला त्यावेळी ट्रेनमधून लोक बाहेर फेकले गेले. ते लोक विव्हळत होते. त्यांना मदत करण्यासाठी तेथे कोणीही नव्हते. ट्रेनमधून काही लोकांनी उडया मारल्या. बॉम्बस्फोट झाल्यानंतर तेथे जमलेल्या लोकांनी जखमींना रुग्णालयामध्ये नेले. पहिला बॉम्बस्फोट खार आणि सांताक्रुझ रेल्वे स्थानकांच्या मध्ये झाला. तेथे अर्धा-पाऊण तास पोलीस आले नाहीत. छिन्न-विच्छीन्न झालेली प्रेते लोक उचलत होते. रेल्वेकडे स्ट्रेचर नव्हते, रेल्वे पोलीस नव्हते, महाराष्ट्र शासनाचे पोलीस तेथे नव्हते, अॅम्बुलन्स नव्हत्या. मिळेल त्या वाहनामधून जखमींना रुग्णालयामध्ये पोहचविण्यात आले. असे दोन्ही वेळचे विदारक दृश्य मी बघितले आहे. असा प्रसंग माझ्या आयुष्यामध्ये पुन्हा येऊ नये, अशी मी देवाकडे प्रार्थना केली. सन 1993 ची दंगल मी जवळून बघितली आहे. भिवंडीमध्ये घडलेल्या घटनेसंबंधी भाषण करीत असतांना मी म्हटले होते की, मुस्लीम परिसरातील लोक पोलीस चौकीची मागणी करतात. तेथे पोलीस चौकीचे बांधकाम करु दिले जात नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपल्या भाषणात हे सर्व विषय मांडले. मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, अबू आझमींच्या घरावर मोर्चा निघाला त्यावेळी मला एका कार्यकर्त्याचा फोन आला. मी मुस्लीम वसतीमध्ये राहतो. मला सांगण्यात आले की, "अब हिन्दुओं को हम धडा सिखाएंगे." तुम्हाला अतिशय वाईट परिस्थिती दोन-तीन दिवसांमध्ये बघावी लागणार आहे. याचा तुम्ही नीट अर्थ शोधा आणि वरिष्ठांना कळवा. दुस-या दिवशी स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाची विटंबना करण्यात आली. त्या कार्यकर्त्याचे शब्द इतके खरे होतील आणि एवढा नरसंहार मुंबईमध्ये होईल असे मला वाटले नव्हते. आजच्या चर्चेमध्ये विषय आला की, मुस्लीम अतिशय वाईट आहेत असे आम्ही कधीही म्हटलेले नाही.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल परब .........

जे चांगले मुस्लीम आहेत ते अतिरेकी संघटनांशी संबंध असलेल्या मुस्लिमांच्या दबावाखाली आहेत हे मी छातीठोकपणे सांगतो. मी मुस्लिमांच्या वसतीमध्ये राहतो. ते मुस्लीम कशा अवस्थेमध्ये असतात हे मी बघतो. सन 1993 मध्ये दंगल झाली त्यावेळी बेहेराम पाडयाला पोलिसांनी वेढा घातला. तेथे रात्री कोंबिंग होणार होते.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

ते कोम्बिंग त्यावेळेस थांबविण्यात आले. तेव्हा आम्ही स्पष्टपणे सांगितले होते, तेथील काही सज्जन मुस्लिम नागरिकांनीच आम्हाला महिती आणून दिली होती की, आमच्या वस्तीमध्ये बाहेरचे काही लोक आलेले आहेत आणि तेथे वेगवेगळ्या प्रकारची कारस्थाने सुरू आहेत. या साऱ्या माहिती वरून त्यावेळी मुंबईत काही तरी वाईट घडणार आहे असे आम्ही माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगितले होते आणि म्हणून हे सर्च ऑपरेशन तेव्हा सुरू झाले होते. पण असे सर्च ऑपरेशन सुरू झाले की, लगेच त्यावर राज्यकर्त्यांचा स्टे येतो. अशा प्रकारे पोलीस अधिकाऱ्यांचे पूर्णपणे खच्चीकरण करण्याचे काम या राज्यात चालले आहे आणि त्यामुळेच हे असे प्रकार होतात. काल दुर्दैवाची गोष्ट अशी की, बॉम्बस्फोटाची एवढी मोठी घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडली असूनही कोठल्याही प्रकारची पोलिसांची मदत मिळाली नाही. कदाचित त्यासाठी केंद्र सरकारचा कायदा आडवा आला असेल. पण तरीही जमेल तशी मदत शिवसैनिकांनी आणि सामान्य नागरिकांनी त्यावेळी संकटग्रस्तांना केली. बॉम्बस्फोटामुळे अनेकांचे अनेक अवयव इतस्तत: पडलेले होते. काहीचे हात तर काहींचे पाय, काहीचे हाताचे पंजे तुटून पडलेले होते. आमच्या एका कार्यकर्त्याने तर 25 हाताचे केवळ पंजे गोळा करून आणले होते. एका पोलिसाचा तर केवळ पट्टा पडलेला होता आणि हातपाय धडच तेथे नव्हते. अशा वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये सगळी प्रेते पउलेली होती व रात्री तीन साडेतीनपर्यंत ते अवयव, ती प्रेते, धडे बाजूला करता आली नाहीत. ती ओळखताच येत नव्हती. एकमेकांमध्ये ती गुंतून गेली होती. त्यावेळी सगळ्या हॉस्पिटल्सनी मोफत सेवा दिली. मेडिकल शॉप्सवाल्यांनी देखील मोफत औषधे दिली आणि अशा प्रकारे मुंबईकरांनी पुन्हा एकदा आपल्या माणुसकीचे प्रदर्शन जगाला दाखविले. आज आम्ही रक्तदानाचा कार्यक्रम आखला होता. पण ब्लडबँक फुल असल्याने तो कार्यक्रम आम्ही पुढे ढकलला आहे. परंतु मला येथे सांगावयाचे आहे की, पोलिसांना आम्ही वेळोवेळी सावत करतो, दाखवून देतो की, हा हा माणून या या वस्तीमध्ये नव्याने आलेला आहे. पण त्याची दखल घेतली जात नाही. येथे अतिरेक्यांच्या बाबतीत उल्लेख झाला पण एखादा अतिरेकी बाहेरून येतो आणि एखाद्या वस्तीमध्ये राहतो तेव्हा तेथे त्याला आसरा दिला गेल्याशिवाय तो तेथे राहू शकत नाही. पण आज पर्यंत असा आसरा देणारे लोक किती आहेत, त्यापैकी किती पकडले गेले आहेत, कितींना त्याबद्दल शिक्षा झालेली आहे हे काहीही रेकॉर्डवर आलेले नाही. ज्यांनी अतिरेक्यांना आसरा दिला आहे त्यांच्या विरोधात खटला दाखल

...... 3 आर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. परब ......

झालेला नाही. सभापती महोदय, ॲण्टी टेररिस्ट स्क्वॅड आपण निर्माण केले. त्यामध्ये चकमक फेम अधिकारी आपण ठेवले होते. पण आता त्याच अधिकाऱ्यांना काम कोणते दिले असेल तर ते चोरीचे गुन्हे तपासण्याचे काम दिले आहे.एके काळी आपल्या कामाने गुन्हेगारांवर दहशत बसविलेल्या या अधिकाऱ्यांचे सरकारच्या वागणुकीमुळे मनोधैर्य खचलेले आहे. गुन्हेगारांची माहिती मिळविण्यासाठी पोलिसांना गुन्हेगारांबरोबर काही प्रमाणात संबंध हे ठेवावेच लागतात त्या शिवाय त्यांचे काम होऊ शकत नाही. पण तरीही गुन्हेगाराचा टेलिफान नंबर पोलीस अधिकाऱ्याकडे मिळाला या सारख्या छोट्या छोट्या कारणांवरून, ती कारणे शोधून काढून, अशा पोलीस अधिकाऱ्यांवर खटले दाखल करण्यात आलेले आहेत त्यामुळे आज कोठलाही अधिकारी गुन्हेगारांशी संबंध ठेवण्यास तयार नाही. या सगळ्या गोष्टींची दखल या निमित्ताने घेणे गरजेचे आहे. पण त्यामध्ये हे शासन पूर्णपणे अपयशी ठरलेले आहे. त्यामुळे कोठल्याही गुन्ह्यांची उकल होत नाही. गुन्हेगारांवर पोलिसांची दहशत रहात नाही त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा आणि मुंबईच्या पोलीस आयुक्तांची ताबडतोब बदली व्हावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो. धन्यवाद.

****

( यानंतर श्री. सरफरे ..... 3एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये विरोधी पक्षनेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्या संदर्भात मी अत्यंत थोडया वेळामध्ये आपले मनोगत व्यक्त करणार आहे. मुंबईकर जनतेने अशा अत्यंत भयानक अवस्थेमध्ये जे धाडस दाखविले त्या मुंबईतील जिगरबाज जनतेला सर्वप्रथम माझा निळा सलाम. माणसांच्या मासाचा, रक्ताचा चिखल मुंबईतील जनतेने पाहिला. आतंकवादी, अतिरेक्यांचे अत्यंत बिभत्स असे स्वरुप मुंबईतील जनतेने नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्राने व देशाने पाहिले. यामुळे संपूर्ण देश हादरुन गेला. अशापरिस्थितीत मुंबईकर व महाराष्ट्रातील जनतेने ज्या धिरोदात्तपणे व संयमाने परिस्थितीला तोंड देऊन आतंकवादापुढे आम्ही शरणागती पत्करणार नाही आणि "ईट का जवाब पत्थरसे" दिल्याशिवाय राहणार नाही. या भयानक परिस्थितीमध्ये त्यांनी जो कणखरपणा दाखविला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. 11 मिनिटांच्या कालावधीमध्ये पश्चिम रेल्वेच्या सात स्टेशनांवर जे बॉम्बस्फोट झाले त्यावेळी मुंबईकर जनता सर्वप्रकारचे भेदभाव, जात धर्म विसरुन, "तू कोण आणि मी कोण" हे विसरुन त्याठिकाणी मदत करण्यासाठी धाऊन गेली. अशावेळी देखील आमची मुंबई, आमचा महाराष्ट्र आणि आमचा देश माणुसकी विसरला नाही. अशाप्रकारे माणुसकीला जागणारे चित्र या जगाने आणि या देशाने पाहिले. त्याबद्दल सकाळी मी मुंबईतील जनतेचे अभिनंदन केले आहे. याप्रसंगी मदत करण्यासाठी रस्त्यावरील माणूस, सामान्य जनता देखील धावली आहे, डॉक्टर्स धावले आहेत, तरुण मुले धावली आहेत, महिला देखील धावल्या आहेत. आणि या दुःखावर फुंकर घालण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री माननीय श्री. शिवराज पाटील, केंद्रीय रेल्वे मंत्री माननीय श्री. लालू प्रसाद यादव, माननीय श्रीमती सोनियाजी गांधी इत्यादी नेतेमंडळी देखील धाऊन आली. विरोधी पक्षाची नेते मंडळी देखील धावली. परंतु मंत्रालयामध्ये बसणारे अधिकारी आपल्या मोटारींमध्ये स्टाफला घेऊन त्याठिकाणी मदत करण्यासाठी धाऊन जायला पाहिजे होते. परंतु ते धाडस त्यांनी दाखविले नाही ही दुर्दैवाची बाब आहे. मंत्रालयामधील अधिकारी आपल्या पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या नवीन मोटारींमध्ये स्टाफला घेऊन जनतेसाठी धाऊन गेले असते तर आमच्या जनतेचा मंत्रालयातील अधिकाऱ्यांवरील व या सरकारवरील विश्वास वाढला असता.दुर्दैवाने त्यांना ही सुबुध्दी सुचली नाही. माननीय श्री. सरपोतदार दादा आपण म्हणालात ते बरोबर आहे. आम्ही किती दिवस या माणसांचे मुडदे मोजणार आहोत? केवळ श्रध्दांजली वाहण्याचे काम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

करावयाचे कां? या देशामध्ये आणि या राज्यामध्ये प्रत्येक प्रसंगाच्या वेळी असे विचारण्याची पाळी आली आहे.

सभापती महोदय, आम्ही किती दांभिक आहोत? आपल्या खोटारडेपणाचा आणि दांभिकपणाचा आता ऊत आला आहे. देशभक्तीचे मुखवटे धारण करुन देशाला काळिमा लावण्याची कृत्ये केली जातात हे सत्य आपल्याला नाकारता येणार नाही. कोकणच्या किनाऱ्यावर आरडीएक्स सापडले याबाबत माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले. त्यामध्ये किती सरकारी अधिकारी सामील होते? The whole system is corrupt, असल्यामुळे हे सर्व प्रकार याठिकाणी होत आहेत. 12 मार्च 1993 रोजी मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले व त्यामध्ये 250 च्यावर लोक मृत्युमुखी पडले. त्यावेळी असा रिपोर्ट आला की, त्या बॉम्बस्फोटाचा प्रमुख सूत्रधार दाऊद इब्राहीम आहे. अनेक नेत्यांनी सांगितले की, आमचे सरकार दाऊद इब्राहीमला दुबईमधून फरफटत घेऊन येईल. असा दावा करणारी जी आघाडी होती ती आज तिकडे गेली. परंतु त्यावेळी त्यांच्याकडून काम झ ाले नाही. आणि दाऊद इब्राहीम आपल्या मस्तीत लपला आहे. याठिकाणी महत्वाची बाब सांगितली पाहिजे की, केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयातील आय.एस.आय. डिव्हिजनबाबत माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे दहशतवादी संघटीत गुन्हेगारांकडे प्रचंड काळा पैसा असून त्याच्या माध्यमातून आमच्या देशातील दहशतवादी कसे पोसले जातात, त्यांना खतपाणी कसे घातले जाते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 19:05

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

आतंकवादामध्ये मग तो हिंदू असो, मुसलमान असो त्याला जातधर्म नसतो. आतंकवाद म्हणजे आतंकवाद असतो. या आतंकवाद्यांना भर चौकामध्ये गोळ्या घालून ठार केले पाहिजे. यांना सुळावर चढविले पाहिजे.

सभापती महोदय, मी एक राजकारण्याचे उदाहरण देतो. मिनिस्ट्री ऑफ सिव्हील एव्हीएशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांनी बॉम्बस्फोटाच्या संबंधात जेट एअरवेजचे नरेश गोयलच्या संबंधाने लिहिलेले पत्र आहे ते वाचून दाखवितो. "Ministry of Civil Aviation may please refer to their DO No. AV.14015/26/94-ACVL dated 4.1.2002 from Secretary, Ministry of Civil Aviation, addressed to Home Secretary, in the matter of security clearance for the reconstituted Board of M/s. Jet Airways.

Our enquiries conducted so far have revealed certain adverse inputs against Shri Naresh Goyal, Chairman of M/s. Jet Airways (gist of inputs enclosed).

In view of this position, Ministry of Civil Aviation may please consider the proposal keeping all aspects in view and take an appropriate decision. It may further be pointed out that the above input is meant only to facilitate a decision by the Ministry of Civil Aviation and is not to be made public or shared with any private person till the enquiries are in progress." Further it is stated that:

"According to available inputs from investigating agencies, it is revealed that Naresh Goyal and his Jet Airways have been steady recipients of large dubious investments originating from the Gulf Shaikhs and his connections with Shaikhs are believed to have been used repeatedly not only to get direct investments, but also to get a lot of tainted Indian money laundered and recycled into business in India. Much of this kind of money was reportedly generated through smuggling, extortion and similar illegal practices. Inputs further indicate intermittent contacts, between Naresh



SKK/ MAP/ KGS/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Goyal and underworld dons, Chhota Shakeel and Dawood Ibrahim, to settle financial issues." पुढे मी जास्त वाचत □ाही. श्री.□रेश □ोयल , छोटा शकील आणि दाऊद इब्राहिम यांना या देशातील सर्व □ठी मंडळी, ज्यांचे आर्थि□ □्षेत्रामध्ये मोठे □ाव आहे, राज□ीय □्षेत्रामध्ये □ाव आहे, अशा मंडळीं□ा संर□्ष□ देत असतील तर ही परिस्थिती बदलली पाहिजे. हा आतंकवाद देशामध्ये पसरु□ देशाला □ामोहरम □र□याचा प्रयत□ □ेला जात असेल तर □ितीही मोठा मा□ूस असला तरी त्याला सर□ार□ सोडता □मा □ये. आतं□वादाला ते जर मदत □रत असतील तर त्या मंडळीं□ाही भर चौ□ामध्ये □ोळ्या घालू□ ठार □ेले पाहिजे, तरच याला पायबंद बसेल. आतंकवादाला जात,धर्म □ाही □सते, तो आतंकवादच असतो. देशाचे राज□ार□ □र□याचा, दं□ल □िर्मा□ □र□याचा □ी□ प्रयत□ □रु □ये एवढीच या प्रसं□ी वि□ंती □रतो. महाराष्ट्र सर□ार□ हा आतं□वाद मोडू□ □ाढ□यासाठी जीवाचे रा□ □रावे, यासाठी स्वतंत्र पोलीस यंत्र□ा □िर्मा□ □रावी आ□ि या आतं□वाद्यांचा शोध घ्यावा. यासाठी या पोलीस यंत्र□ेमध्ये एक्स्पर्ट पोलीस अधि□ारी घ्यावेत. ते आतं□वादी जमि□ीवर असोत □िं□वा आ□ाशात असोत, त्यां□ा शोधू□ □ाढू□ त्यां□ा धडा शि□वावा, अशी वि□ंती □रु□ माझे भाष□ संपवितो.ध□यवाद.

--

या□ंतर श्री.बरवड .....

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. किल्लेदार 19:10

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, काल संध्याकाळी दिवे लागणीची वेळ होती. सकाळी घरातून आई, बहीण, बाबा, भाऊ जे कोणी कामावर गेले असतील ते संध्याकाळी घरी परत येण्याची वाट त्या त्या कुटुंबातील आई-वडील पाहात होते. अशा वेळी पश्चिम रेल्वेच्या फर्स्ट क्लासमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कल्पनाही नव्हती की, आज फर्स्ट क्लासमध्ये आपल्या बरोबर चक्क यमराज सुध्दा प्रवास करीत आहे. 11 मिनिटांमध्ये सात ठिकाणी जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये असंख्य बालके अनाथ झाली, पोरकी झाली. अनेक आया अपत्यहीन झाल्या. अनेक स्त्रिया विधवा झाल्या. अनेक प्रवाशांना कायमचे अपंगत्व आले. एवढेच नव्हे तर काही प्रवासी कायमचे आंधळे आणि बहिरे झालेले आहेत. एवढे मोठे क्रौर्य का घडले ? हे बॉम्बस्फोट करण्यामध्ये जे अतिरेकी असतील त्यांची संख्या पाच दहा नसेल. 50-100 अतिरेकी मुंबईमध्ये कसे आले ? ते एकत्र कोठे भेटले ? त्यांनी नियोजन कोठे केले ? त्यांनी बॉम्ब कोठून आणले ? हे सर्व चालले असताना या राज्यातील गुप्तचर यंत्रणा कुंभकर्णाची झोप तर घेत नव्हती ना ? या गोष्टीचा त्यांना पत्ता कसा लागला नाही ? शिवाजी पार्कच्या घटनेच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, जर सत्य बाहेर आले तर विरोधकांना पश्चातापाची वेळ येईल. याचा अर्थ त्या ठिकाणी काय घडले आहे हे माननीय गृहमंत्र्यांना माहीत आहे. तुम्हाला जर ते एका दिवसामध्ये कळते तर सात बॉम्बस्फोट होतात त्याची माहिती तुम्हाला कळत नाही काय ? हे तुम्हाला उशिरा कसे कळते ? खरे म्हणजे या दोन वर्षामध्ये ज्या घटना घडलेल्या आहेत त्या घटनांचा क्रम पाहिल्यानंतर त्या घटना माननीय गृहमंत्र्यांनी गांभीर्याने घेतलेल्या नाहीत असे म्हणावेसे वाटते. शिवाजी पार्कची घटना घडली. तसेच मराठवाडयामध्ये आरडीएक्स सापडले. नागपूरमध्ये संघ कार्यालयावर हल्ला झाला. आमदार निवासमध्ये अतिरेकी येतात आणि फ्रेश होऊन जातात. भंगारात बॉम्बशेल सापडतात. बनावट नोटा पकडल्या जातात. भिवंडीमध्ये दंगल झाली. शिवाजी पार्क येथे गणेशमूर्तीची, साईबाबांच्या मूर्तीची विटंबना झाली. स्व. मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेला माती फासली गेली. या घटनांमधून अतिरेक्यांनी अंदाज घेतला की, या राज्याचे गृहखाते किती सापळे आवळते त्याप्रमाणे आपण पुढची मोठी घटना घडवावयाची. या घटनांचे गांभीर्य गृह खात्याने लक्षात घेतले नाही. या अतिरेक्यांच्या लक्षात आले की, माती मऊ आहे, आपण कोपराने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ SBT/ MAP/

श्रीमती कांता नलावडे....

खणावयास हरकत नाही. त्याप्रमाणे त्यांनी आपला घाव घातलेला आहे. या महाराष्ट्रातील माननीय मंत्रिमहोदय आपापसात आरोप प्रत्यारोप करीत आहेत. माननीय मुख्यमंत्री हे मुख्यमंत्रीपद एंजॉय करीत आहेत. माननीय गृहमंत्री डांसबार बंदी आणि गुटखा बंदीवर शेखी मिरवत आहेत. दंगलीमध्ये मृत झालेल्या लोकांना 1 लाख रुपये दिले जात आहेत. टाईम्समध्ये वाचकाचे एक पत्र मी वाचले. शेतकऱ्यांना असे सांगावेसे वाटते की, "त्यांनी आत्महत्या करु नये, त्यांना मरावयाचे असेल तर मुंबईमध्ये येऊन बॉम्बस्फोटामध्ये मरावे, 5 लाख रुपये तरी तुमच्या कुटुंबियांना मिळतील," असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.  ही फार दु:खदायक घटना आहे. नैसर्गिक आपत्ती असो किंवा मानव निर्मित आपत्ती असो त्यातून मुंबईची जनता परत ताठ मानेने उभी राहते. परंतु यामध्ये शासनाने शेखी मिरविण्याचे कारण नाही. कारण तो मुंबईकरांचा मूळ स्वभाव आहे. परंतु 12 मार्च, 1993 ला बॉम्बस्फोट झाले तेव्हापासून मुंबईकर सकाळी कामावर निघतो तेव्हा मी संध्याकाळी सुखरुप घरी परत येईन की, नाही अशी शंका त्याच्या मनामध्ये येते. जेव्हा तो सुखरुप घरी परत येतो तेव्हा त्याला असे वाटते की, आज आतंकवाद्यांची दया होती म्हणून सुखरुप परत आलो. गृहखाते सतर्क आहे म्हणून सुखरुप परत आलो असा ठाम विश्वास त्यांना वाटत नाही. युती शासनाच्या काळामध्ये श्री. गोपीनाथ मुंडे हे गृहमंत्री होते त्यावेळी गुंडांमध्ये त्यांची दहशत होती. आज पाहिले तर दिवसाढवळ्या मुंबईमध्ये दहशत आणि भीती वाटावी असा हा दुर्दैवी प्रकार झालेला आहे. दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते की, हे कृत्य करणारे जिवंत आहेत. कदाचित त्यांनी मुंबईच्या बाहेर पलायन कले असेल. हे नंतर आपल्या लक्षात येणार आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे...)

काल श्रीनगरमध्ये देखील बॉम्बस्फोट झाला. काल टी.व्ही.वर राज्याच्या माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले की, श्रीनगरमध्ये झालेला बाम्बस्फोट आणि मुंबईतील रेल्वेगाडयांमध्ये झालेले बॉम्बस्फोट यांचा एकमेकांशी संबंध नाही. कोणत्याही प्रकारची माहिती न घेता असे सांगण्याचा उतावळेपणा माननीय गृहमंत्र्यांनी का केला ? खरे म्हणजे हा नाकर्तेपणा आहे. आज देशामध्ये श्रीनगरपासून मुंबईपर्यन्त बॉम्बस्फोटांची मालिका घडवून आणली जात आहे. श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी जेव्हा भारत सुरक्षा यात्रा काढली त्यावेळी त्यांच्यावर टीका करण्यात आली. त्यांनी भारत सुरक्षा यात्रा काढली होती याचे कारण त्यांना संकटांची चाहूल लागली होती. ज्या राज्यकर्त्याला संकटांची चाहूल लागते तोच खरा राज्यकर्ता असे मानायला हरकत नाही. काल मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांमुळे मुंबईकरांच्या मनात जी दहशत निर्माण झालेली आहे ती कशी दूर करणार, हा प्रश्न आहे. या घडलेल्या प्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारुन माननीय गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे आणि मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. अनामी रॉय यांना पदावरुन ताबडतोब घालवून दिले पाहिजे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपविते.

---

(यानंतर श्रीमती फौजीया खान यांचे हिंदी भाषण)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त ) : सभापति महोदय, पिछले साल जुलाई महीने में मुंबईकर बाढ़ के पानी से जूझ रहा था और आज मुंबईकर वही पानी आँखों से बहा रहा है. इसलिए जुलाई महीने को हम ब्लेकेस्ट डे समझ सकते हैं. मुंबई की लाईफ लाईन समझी जाने वानी लोकल ट्रेन में कल मंगलवार 11 जुलाई को 8 बम विस्फोट हुए. इन घटनाओं में बेकसूर लोगों की जान जाना यह मानवता से खिलवाड़ है. मानवीय दृष्टिकोण से मैं मृतको के प्रति भावभीनी श्रध्दांजलि अर्पित करती हूं और यह प्रार्थना करती हूं कि मृतक के परिवारजनों को फिर से खड़ा रहने की शक्ति प्रदान करें.

सभापति महोदय, कल जो बम विस्फोट की घटना हुई, उसमें जिन लोगों का खून बहा है, उनका खून किस रंग का था, लाल रंग का था, नीला रंग का था या हरा रंग का था ? जिन लोगों के जिस्म के टुकडे-टुकड़े हो गए हैं, वे लोग किस जाति के है,क्या इस घटना को अंजाम देते समय यह देखा गया था ? जो लोग इस दुर्घटना में बच गए, वे किसी विशेष जाति या धर्म के है,क्या यह देखकर उनको बख्शा गया ? ऐसा नहीं हुआ. हजारों लोगों ने प्रशासन की मदद का इंतजार न करते हुए अपने आप स्वयं स्फुर्त होकर मदद की है. मदद करने वाले लोगों ने भी यह नहीं देखा कि पीड़ित व्यक्ति किस धर्म के हैं. वे कौन लोग थे, जो मदद करने के लिए गए ? मदद करने वालों ने क्या यह तय किया था कि वे कौन से धर्म के लोगों की मदद करेंगे ? रक्त दान करने के लिए अस्पताल में कतार में खड़े रहने वाले ने यह नहीं देखा कि पीड़ित व्यक्ति किस जाति या धर्म के है. इससे यह स्पष्ट होता है कि हमारे सभी समाज के लोग स्वयं स्फुर्ति से मदद करने के लिए निकड़ पड़े थे. यही इंसानियत हमने पिछले साल मुंबई में अतिवृष्टि के दौरान पैदा हुए संकट के समय में देखी थी. किसी के प्रति भेदभाव न करते हुए, छोटे-बड़ा न देखते हुए, जात-पात न देखते हुए, हिन्दु-मुस्लिम का विचार न करते हुए, सभी समाज के लोग सहायता करने के लिए दौड़ पड़े थे.यह हमारा समाज है. यह हमारे समाज की मजबूती है, एकता है.यहां सभी समाज के लोग मिल-जुल कर रहते हैं. कल मुंबई में इस हादसे के दौरान लोगों ने जिस हिम्मत और भाईचारे का परिचय देते हुए संकट का मुकाबला किया, उसके लिए मुंबईवासियों को दाद देनी चाहिए. मैं तो यह कहूंगी कि, मुंबईवासियों ने देश की आर्थिक राजधानी को नेस्तनाबूत करने वालों को जो मुंह तोड़ जवाब दिया है, वह देखते हुए शैतानी ताकत दंग रह गई होगी. यह हमारी एकता और भाईचारा ही है कि, जिसका मुकाबला दुनिया

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान.....

की कोई ताकत नहीं कर सकती है. यह बात कई बार मुंबई की जनता ने और हिन्दुस्तान की जनता ने सिध्द कर दी है. कल जो हादसा हुआ, वह इन्टरनेशनल आक्रमण था. स्टेट ऑफ वार था. यह हादसा होने के बाद कुछ क्षण आपने और हमने तकलीफ में गुजारे, यह सोचकर की कहीं कोई हमारा परिचित या रिश्तेदार मृतकों में न हो, घायलों में न हो. यह दर्द और परेशानी हम सब की थी. मैं यह बताना चाहती हूं कि जब पिछले साल अतिवृष्टि हुई और उस समय घरों में पानी घुस गया था तो मेरी एक बहन जो जुहू स्कीम में रहती है, उसने वहां पर एक मारवाड़ी परिवार की मदद की और अपने घर में ठहराया. माननीय सदस्य श्री रावते जी ने भी अपने भाषण में अपना दर्द बयान किया. 1993 में घटित बम विस्फोट की घटना में उनकी पत्नी एवं पुत्र कैसे बाल-बाल बचे, वह उन्होंने बयान किया. मैं यह कहना चाहती हूं कि बम विस्फोट की घटना में जिनके जिस्म के टुकड़े हुए, वे हिन्दु नहीं थें, वे इंसान थें. बम विस्फोट की घटना में जो 400 लोग अपाहिज हुए हैं, वे इंसान हैं. किसी विशेष समाज को सामने रखते हुए बम विस्फोट नहीं किए गए हैं और न ही मदद करने वालों ने देखा कि पीड़ित लोग किस समाज या धर्म के हैं. एक इंसान ने दूसरे इंसान की मदद की. मैं यह कहना चाहती हूं कि इस घटना की जितनी निंदा की जाए कम ही होगी, जितना निषेध किया जाए कम ही होगा. जिस प्रकार से हमने नांदेड़ में बम विस्फोट की घटना होने के बाद भाईचारे का परिचय किया, उसी भाईचारे के साथ, एकता के साथ और एक जुट होकर हमको इस बुराई से लड़ने की जरुरत है. लेकिन दुख की बात यह है कि हम सही अपराधी तक नहीं पहुंच पाते. क्योंकि हमने अपना माईंड सेट किया है. हमने अपना माईंड इस तरह से सेट किया है कि एक ही समाज के लोग आतंकवादी हो सकते हैं दूसरा कोई नहीं हो सकता है.जब इस प्रकार से माईंड सेट करके चलते हैं तो निर्दोष लोग पकड़े जाते हैं.जब निर्दोष लोग पकड़े जाएंगे तो आतंकवाद कैसे रुकेगा ? इसलिए जो माईंड सेट करके रखा गया है, उसे बदलने की जरुरत है. मैं एक उदाहरण देना चाहती हूं. एक जोक है. एक बार एक राजा की बाग से एक हिरण चोरी चला गया था. उस हिरण को खोजने के लिए पुरी दुनिया से पुलिस बुलाई गई. सभी देशों की पुलिस ने हिरण को खोजने की कोशिश की लेकिन हिरण नहीं मिला. लेकिन हमारे देश की पुलिस को एक हाथी आते हुए दिखाई दिया. उस हाथी ने कहा कि हाँ, मैं हिरण हूं. तो उसी तरह कहीं ऐसा न हो कि, हम किसी निर्दोष को पकड़कर के

...3



SGB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 19:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान.....

जबर्दस्ती उसके मुंह से उगलवा ले कि वह आतंकवादी है. ऐसा अगर होगा तो हम सही अपराधी तक नहीं पहुंच पाएंगे. दूसरा एक उदाहरण देना चाहती हूं. एक जोक है. एक बार एक जंगल के बाहर चूहे भाग रहे थे.चूहों से पूछा कि आप सब लोग एक ही जगह क्यों भाग रहे हो, तो चूहों ने कहा कि जंगल के शेर का कत्ल हो गया है और पुलिस को हम पर शक है इसलिए हम भाग रहे हैं. सभापति महोदय, हमें आतंकवाद से जरुर लड़ना है लेकिन जब हम यह माईंड सेट कर लेते है कि मुस्लिम ही है, जो आतंकवादी होते हैं तो मुझे इस बात पर अफसोस जताने की जरुरत महसूस होती है. इस संबंध में यहां नांदेड़ की घटना का संदर्भ दिया जा सकता है. नांदेड़ में हुई घटना के संदर्भ में पुलिस ने बजरंग दल के 16 सदस्यों को गिरफ्तार किया था. इस राज्य में 5-6 जगहों पर बम रखकर साम्प्रदायिक हिंसा फैलाने का प्रयास हुआ था, यह बात जांच में सिध्द हो रही है. नांदेड में राजकोंडावार के घर में जो बम विस्फोट हुआ था, उस घटना की जब जांच हुई तो नकली दाढ़ी और मुस्लिम समाज के लोगों द्वारा पहने जाने वाले कपड़े बरामद हुए थे.समाज में हिंसा भड़काने वाले कौन है, समाज में हिंसा फैलाने वाले किसी भी समाज के हो सकते हैं,इस दृष्टिकोण को ध्यान में रखते हुए, इस हादसे की जांच करने की जरुरत है. अगर इस मामले की जांच वन साईड चलेगी तो सही अपराधी पकड़ा नहीं जाएगा. इसलिए जो माईंड सेट किया गया है, उसे बदलने की जरुरत है. इतना ही मैं कहना चाहती हूं. शुक्रिया.

...

इसके बाद श्री गो-हे का भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ): माननीय सभापती महोदय, या ठिकाणी धर्माच्या नावाचा उल्लेख करुन बोलेले जाते ते योग्य नाही परंतु आता हिंदू समाजाला अतिरेकी होण्याची वेळ आलेली आहे की, काय अशी भावना हिंदू धर्मात निर्माण व्हावयास लागली आहे त्याचे कारण असे आहे की, 1993 पासून ते आतापर्यंत अनेक बॉम्बस्फोट झालेले आहेत. या बॉम्बस्फोटात शेकडो माणसे मेली आणि हजारो माणसे जखमी झालेली आहेत. त्यातील फक्त 5 बॉम्बस्फोटच्या केस उभ्या राहिल्यात, यातील दोन केस निकाली निघाल्या, दोन केस मध्ये शिक्षा झाली आणि बाकीचे सगळे लोक सुटले असे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी गोष्टीच्या आणि जोक्सच्या रुपाने येंथे सांगितलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी "वाघाची कत्ल" झाली आहे असे सांगितले आहे परंतु आज सुध्दा शिवसेनेच्या रुपाने वाघ जिवंत आहे हे मॉ साहेबांच्या पुतळा विटंबनेवरुन सिध्द झालेले आहे. खरे म्हणजे आता हिंदूत्वालाच कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जात आहे. गृहमंत्र्यांनी सुध्दा मॉ साहेबांच्या पुतळा विटंबनेच्या संदर्भात सांगितले आहे की, "तुम्हाला पश्चाताप करावा लागेल असे आरोपी आम्हाला सापडलेले आहेत". तसेच महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी तर सांगितले आहे की, शिवसेनेचाच पुतळा विटबंनेमध्ये हात असावा, त्यामुळे आम्हाला आता असे वाटते की, कालचे बॉम्बस्फोट कोणी घडवून आणले याची आतील गोटातील माहिती माननीय महसूल मंत्र्यांकडे असेल तर त्यांनी ती सभागृहाला द्यावी किंवा मिडीयाला द्यावी. खरे म्हणहजे बॉम्ब स्फोटात चार चौकडी दिसून येतात. एक म्हणजे बॉम्बस्फोटात पुरावे शिल्लक राहत नाहीत. दुसरे म्हणजे बॉम्बस्फोटातील गुन्हेगाराची कोर्टातून सरळसरळ सुटका होते. बॉम्बस्फोटातील सुत्रधार सापडत नाहीत आणि चौथे म्हणजे जर कोणी यामध्ये सापडला तर संबंधित व्यक्ती कशी चांगली आहे हे आरडाओरड करुन सांगितले जाते. असे बॉम्बस्फोटातील चौकडीचे चार सुत्रधार आहेत. या चौकडीचे जे चार सुत्रधार आहेत त्यामध्ये पोलीस आणि शासन अदृष्य रुपात असतात. रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची हमी घेतली जात नाही. काल जेव्हा ही घटना घडली तेव्हा सर्व टेलीफोन जाम झाले होते. आपण नेहमी मिडियाबद्दल बोलत असतो परंतु कालच्या बॉम्बस्फोटात मिडीयाने फार चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे. ज्यावेळेस मिडीयावरुन पाचव्या, सहाव्या, सातव्या बॉम्बस्फोटाची माहिती दिली जात होती त्यावेळेस वाटू लागले की, आता नंतरचे बॉम्बस्फोट हे

.....2

डॉ. नीलम गो-हे......

वरळी, कॉफर्ड मार्केट, मंत्रालय, विधानभवन, आमदार निवासात होतात की, काय असे वाटू लागले. कालच्या घटनेतून जे लोक जिवंत राहिले, खरे म्हणजे दैव बलवत्तर असल्यामुळेच वाचले आहेत. उरलेले जे मुंबईकर वाचले ते दैवाच्या कृपेमुळेच वाचलेले आहेत. साऊथ एशियन पोलीस आणि जजेस यांनी जसे इंटरपोल नेटवर्क असते तशा प्रकारच्या नेटवर्कची मागणी केलेली आहे. काल मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यासंदर्भात मला नेपाळ, दिल्ली या ठिकाणच्या सामाजिक संस्थाकडून फोन आले त्यांनी मुंबईतील बॉम्बस्फोटात मुंबईकरांनी जे काम केलेले आहे त्याच्या संदर्भात कौतुकाचे उद्‌गार काढलेले आहेत. त्यांनी अशी सूचना केली आहे की, बॉम्ब बनविण्याच्या कामात म्हणजे आरडीएक्स मध्ये, अमोनियम नाईट्रेट सारख्या ज्या वस्तु वापरल्या जातात त्या सहज उपलब्ध होणार नाहीत याची काळजी घ्यावयास पाहिजे परंतु त्याची अमंलबजावणी होतांना दिसत नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MAP/ SBT/ 19:30

डॉ.नीलम गो-हे.....

मी फक्त मुद्दे मांडत आहे. तेव्हा आपण मला आणखी एक-दोन मिनिटे वाढवून द्यावीत अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, संपूर्ण कॅनडा पार्लमेंट अतिरेक्यांनी ताब्यात घेऊन सरकार चालविण्याचा प्रयत्न केला होता, परंतु कॅनडा पोलिसांनी अतिरेक्यांचा हेतू सफल होऊ दिला नाही. न्यूयॉर्क, लंडन तसेच भारतातील पार्लमेंट अतिरेक्यांनी लक्ष्य केले होते. कनिष्क विमान अपहरणातील अतिरेक्यांची आंतरराष्ट्रीय कोर्टात निर्दोष सुटका झाली. सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्री यांचे विरुध्द टीका करते अशातला भाग नाही. आम्ही आजच्या वर्तमानपत्रात केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे स्टेटमेंट वाचले. ते म्हणाले की, मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांनी मुंबईला भेट दिली हे ठीक आहे. परंतु कॉंग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी मुंबईस भेट देण्याची आवश्यकता नव्हती. या ठिकाणी केवळ सहानुभूती व्यक्त करुन भागणार नाही. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आणि आमच्या शेकडो शिवसैनिकांनी त्याठिकाणी जाऊन प्रत्यक्ष मदत केलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करते.

सभापती महोदय, या दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना शासन किती दिवसात मदत देणार आहे याची माहिती आम्हाला कळली पाहिजे. कारण मागील एका दुर्घटनेत श्रीमती धामणबाई यांना शेवटपर्यंत कोणतीही मदत मिळाली नाही. अखेर त्यांचा मृत्यु झाला. तेव्हा मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना शासन किती कालावधीत मदत देणार आहे याचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी दिले पाहिजे.

सभापती महोदय, काल झालेल्या बॉम्बस्फोटाच्या मालिकेत मुंबईकरांनी जे धैर्य आणि अपार माणुसकीचे दर्शन दाखविले त्याचे मी कौतुक करते. तसेच सर्वच सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे माननीय गृहमंत्री यांनी राजीनामा द्यावा आणि पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांची बदली करावी अशी मी मागणी करते आणि एक शेर सांगते.

सदियों से इंसान ये सुनता आया है, दु:ख की धूप के आगे, सुख का साया है

झूठ तो कातिल ठहरा, उसका क्या रोना, सच ने भी इंसान का खून बहाया है.

यह कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

......

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, प्रत्येक सन्माननीय सदस्यास किती वेळ द्यावा याबाबत आपण निर्णय घेणार आहात, परंतु पक्षाच्या प्रतोदांनी जी नावे दिलेली आहेत त्यांनाच बोलण्याची संधी द्यावी. कारण एका पक्षाचे 12 सदस्य असतील तर 12 सदस्यांना बोलू देऊ नये अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, त्यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. नियम 97 अन्वये ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना दिलेल्या आहेत, त्या प्रत्येक सन्माननीय सदस्याला बोलू द्यावे, असा संकेत आहे. ज्यावेळी दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून बोलण्यासाठी नावे येतात, त्यावेळी आपण मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह सत्ताधारी पक्षाला आणि विरोधी पक्षाला निम्मा निम्मा वेळ वाटून देतो अशी पध्दत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे भाषण करतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, काल, दिनांक 11 जुलै, 2006 रोजी पश्चिम रेल्वेवर दिवसाढवळ्या अतिरेक्यांनी ओळीने सात बॉम्बस्फोट घडविले. त्यामध्ये 200 निष्पाप चाकरमान्यांचा बळी गेला. जवळ जवळ 650 जण जखमी झाले. त्यांचे आयुष्य पुढे कसे जाणार आहे याचा त्यांना अंदाज नाही. अतिरेकी दिवसाढवळ्या अमोनियम नायट्रेंट आणतात...

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे...

दिवसाढवळया ट्रेनमध्ये प्रवेश करतात आणि ओळीने एका-एका स्टेशनवर टाईम लावून निष्पाप लोकांचे बळी घेतात, ही घटना म्हणजे महाराष्ट्र शासनाचीच नव्हे तर संपूर्ण भारत देशाची सुध्दा आहे. आज पोलीस खात्याचे, इंटेलिजन्स खात्याचे धिंडवडे संपूर्ण जगभर निघाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री म्हणतात की, आम्हाला याची माहिती होती, फक्त वेळ माहीत नव्हती. त्यामुळे याबाबतीत माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, आपण या अतिरेक्यांच्या बाबतीत एक जी.आर. काढावा की, आपल्याला जर बॉम्बस्फोट करावयाचा असेल तर त्याची तारीख, वेळ व जागा आम्हाला कळवावी. म्हणजे त्याठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटातून आम्ही आपणांस एक्झंमशन देऊ, आम्ही आपल्याला पकडणार नाहीत वा आपल्यावर कारवाई करणार नाहीत, अशा प्रकारचा जी.आर. काढण्याची वेळ आता आलेली आहे. याठिकाणी आताच माननीय श्री.गडकरी साहेबांनी सांगितले की, सन 1990 पासून आत्तापर्यंत जवळपास 110 बॉम्बस्फोट झाले. युतीच्या काळात किती बॉम्बस्फोट झाली याची मी माहिती घेतली. युतीच्या काळात फक्त दोनच बॉम्बस्फोट झाले व उर्वरित 108 बॉम्बस्फोट हे काँग्रेसच्या राजवटीत झाले. अतिरेक्यांना असे बॉम्बहल्ले करण्यास काँग्रेसचीच राजवट कशी पचणी पडली, हे मला समजत नाही. आपल्याच राजवटीमध्ये बॉम्बहल्ले का होतात ? याचे आत्मपरिक्षण काँग्रेस पक्षाने करावे, अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, ज्यावेळी दि.12.5.1993 रोजी मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये 257 च्यावर लोक मरण पावले व त्यामध्ये जवळपास 1400 कोटी रुपयांचे नुकसान झाले. या खटल्याला 13 वर्षे होऊनही अजून त्याचा निकाल लागलेला नाही. त्यातील आरोपींना शिक्षा झालेली नाही. त्यामध्ये एकूण 124 आरोपी असून त्यातील 22 आरोपी अजूनही फरारी आहेत व त्यातील एक आरोपी श्री.संजय दत्त हा सिनेनट आहे. तो आज दिवसाढवळया नाचत-गात आहे. या खटल्याचा निकाल 13 वर्षे होऊन गेले तरी होत नसेल तर कसे व्हायचे ? आपण गरीब शेतकऱ्यांच्या जमिनीचा लिलाव मात्र दोन-तीन महिन्यांमध्ये काढता. तसेच, बँकेच्याबाबतीतही 6 महिन्यांमध्ये निकाल दिला पाहिजे असे म्हणता, बँकांची वसुली झाली पाहिजे असे म्हणता. सभापती महोदय, बॉम्बस्फोटानंतर एका तासामध्येही आपली यंत्रणा पोहचू शकत नाही, हे योग्य नाही. मुंबईकरांच्या धैर्याचे कौतुक करुन मी त्यांना यानिमित्ताने धन्यवाद देऊ इच्छितो. तसेच, मुंबईतील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे...

ॲटोरिक्षावाल्यांनी जखमींना मोफत रुग्णालयामध्ये नेऊन पोहचविले, त्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देऊ इच्छितो. सभापती महोदय, ज्यावेळी नागपूरमध्ये गोवारी हत्याकांड झाले होते, त्यावेळी नैतिक जबाबदारी स्वीकारुन एका मंत्र्याने राजीनामा दिला होता. ज्या ज्या वेळी अशा घटना घडल्या त्या त्यावेळी त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारुन मंत्र्यांनी राजीनामा दिलेला आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे..........

सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय आपण हे करणार आहात काय ? आपण अशा प्रकारची नैतिक जबाबदारी स्वीकारणार आहात काय ? त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त यांना घरी बसविण्याची कारवाई करणार आहात काय ? हे सर्व आपण करावे, अशी विनंती करतो आणि पुन्हा एकदा अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये म्हणून जे जे करता येईल ते सर्व आपण करावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

------------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदविधर मतदारसंघ) : सभापती महोदय, मी या ठिकाणी बोलण्याचा अट्टाहास यासाठी करीत आहे की, ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य, श्री.अनिल परब हे रुळावर मदतीसाठी होते त्याचप्रमाणे काल घटना घडली त्यावेळपासून ते आज दुपारी साडेचार वाजेपर्यन्त मी आपद्ग्रस्तांच्या मदतकार्यासाठी व्ही.एन.देसाई रुग्णालय आणि कुपर रुग्णालय येथे अडकलो होतो. आज या चर्चेच्या निमित्ताने एक प्रश्न मी विचारु इच्छितो की, 'आजतक' या दूरदर्शन वाहिनीने एक महिन्यापूर्वी अशी बातमी दिली होती की, मुंबईमध्ये लष्करी प्रशिक्षण घेतलेले 4 अतिरेकी आलेले असून येत्या दोन महिन्यांमध्ये ते मुंबईमध्ये भयानक उत्पात घडविणार आहेत. अशी माहिती मिळूनही आपण याबाबत कारवाई का केली नाही किंवा यासंबंधी वाच्यता का केली नाही ? दुर्देवाने कायदा व सुव्यवस्थेचा ढोल काल फुटलेला आहे, असे अतिशय खेदाने सांगावेसे वाटते. मुंबईची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आहे असे आमचे मुळीच म्हणणे नाही. ज्या डिझॅस्टर मॅनेजमेंटचा उल्लेख या ठिकाणी केला जातो ते डिझॅस्टर मॅनेजमेंट काल मुंबई शहरात टोटल फेल्यूअर होते. मुंबई शहर म्हटले की, येथील नागरिकांची सोशीकता, सहनशिलता, सर्व विसरुन कामाला लागणारे असे सर्व बोलले जाते. पण या सहनशिलतेचा, सोशिकतेचा किती अंत आपण पाहणार आहोत ? म्हणून मला या ठिकाणी शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, या मुंबईकरांच्या सोशिकतेचा, सहनशिलतेचा अधिक अंत पाहू नये. काल जी परिस्थिती होती त्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले आहे. पण आज जर मुंबईची सर्व रुग्णालये आपण पाहिली तर सर्व रुग्णालये रिकामी झालेली आहेत. कुपर रुग्णालयात आज केवळ 3, भगवती रुग्णालयात 4, केईएम रुग्णालयात 26 आणि सायन रुग्णालयात केवळ 36 रुग्ण आजमितीस आहेत. हे चांगले आहे की वाईट, याचा विचार आपण करावयाचा आहे. या रुग्णांनी खाजगी रुग्णालयांचा आसरा घेतला कारण शासकीय रुग्णालयांमध्ये चांगली सुविधा उपलब्ध नव्हती. त्या रुग्णांना ॲफॉर्डेबल होते म्हणून त्यांनी खाजगी रुग्णालयांमध्ये जाणे स्वीकारले. आज मोठमोठया खाजगी रुग्णालयांनी सहदयता दाखविल्यामुळे रात्री 10 वाजेनंतर तेथील रुग्णांनी पटापट खाजगी रुग्णालयामध्ये जाणे पसंत केले. जे.जे.हॉस्पिटलचा या सर्व परिस्थितीत काय रोल होता ? ज्या रुग्णालयाला आपण key रुग्णालय म्हणून संबोधतो त्या रुग्णालयाचा रोल शुन्य होता. जे. जे. हॉस्पिटलमधून एकही डॉक्टर

..3.........

SRR/ MAP/ SBT/ KGS/

डॉ.दीपक सावंत..........

मदतीसाठी आलेला नाही, हे जाणीवपूर्वक मी या ठिकाणी सांगतो आहे. व्ही.एन.देसाई रुग्णालयात स्टिचिंग मटेरियल नव्हते, हिमोसिल हे औषध उपलब्ध नव्हते. Is it Diasaster Management ? त्या ठिकाणी एकही ॲम्ब्युलन्स रस्त्यावर चालण्याच्या अवस्थेतील नव्हती. मी हे मुद्दाम निदर्शनास आणून देतो की, 6 लोक कुपर हॅास्पिटलमधून केईएम हॅास्पिटलमध्ये हलवितांना मृत्युमुखी पडलेले आहेत. ज्याला आपण 'गोल्डन अवर' म्हणतो तो हेड एंज्युरी झालेल्या रुग्णांमध्ये महत्वाचा काळ असतो. त्या ठिकाणी एकाही ॲम्ब्युलन्समध्ये ट्रामाकेअर युनिट नव्हते. त्याचप्रमाणे एकही ट्राफिक पोलीस रस्त्यावर दिसत नव्हता. एकाही हॅास्पिटलमध्ये सिटीस्कॅनची व्यवस्था उपलब्ध नाही. या ठिकाणी मात्र आरोग्य मंत्री आम्हाला सांगतात की, सिटीस्कॅन मशील उपलब्ध करुन दिलेले आहे. केवळ जखमींना किंवा मृतांना 5 लाख रुपये आर्थिक मदत देऊन चालणार आहे काय ? ज्याची बहिण गेली त्याला बहिण, ज्याचा भाऊ गेला त्याला भाऊ, ज्याचा मुलगा गेला त्याला मुलगा, ज्यांचा नवरा गेला त्यांना नवरा तुम्ही आणून देणार आहात काय ? या 5 लाख रुपयांमध्ये त्यांचे काय होणार आहे ? ज्यांचे या हल्लात हात गेले, पाय गेले, जे अपंग झाले आहेत त्यांना शेवटपर्यन्त 5 लाख रुपये पुरणार आहेत काय ? म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, ज्यांना कायमचे अपंगत्व आलेले आहे त्यांना यापेक्षा अधिक कॅाम्पेनसेशन मिळणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ......... 19:45

डॉ.दिपक सावंत .............

स्फोटात सापडलेले सर्वच्या सर्व लोक आज बहिरे झालेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी तेथे जाऊन पाहणी करावी. कदाचित टेम्पररी हिअरिंग लॉस-डिप्पनॉक मेमरी रिपेअर करण्याची आवश्यकता आहे. यासाठी पुढचे सहा महिने आपल्याला काढावे लागतील. सायन हॉस्पिटलमध्ये ई.एन.टी. सर्जन 12.00 वाजेपर्यंत आलेले नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. डिझास्टर मॅनेजमेंटमधील महत्वाचा घटक हा कम्युनिकेशन आहे. डिझास्टर मॅनेजमेंटमधील कम्युनिकेशन बंद होते. शिवसेनेच्या लोकांनी घरोघरी जाऊन निरोप पोहचविण्याचे काम केलेले आहे. शिवसेनेच्या लोकांनी सायकलवरुन भायंदरपर्यंत जाऊन निरोप पोहचविलेले आहेत. त्यावेळी कम्युनिकेशन होत नव्हते, कारण मोबाईल नेटवर्क बंद होते. दिनांक 26 जुलैला देखील मोबाईल सेवा बंद होती. मोबाईल सेवा रात्री 9.00 वाजता सुरु झाली. दुसरी गोष्ट म्हणजे प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी मॉरच्युरिज असणे आवश्यक आहे. सुपर स्पेशालीटी हॉस्पिटलमध्ये आज सकाळी 8.00 वाजेपर्यंत 28 प्रेते जमिनीवर पडलेली होती. यासाठी आपण काय करणार आहात, असा माझा प्रश्न आहे. ॲम्बुलन्सची व्यवस्था, ट्रॅफिक कन्जेक्शन, औषधांची कमतरता होती. मी एवढेच सांगतो की, हॉस्पिटलमध्ये डिझास्टर मॅनेजमेंट टोटल फेल्युअर होते. ही जबाबदारी कोणाची आहे ? ही जबाबदारी जशी महानगरपालिकेची आहे, तशीच ती शासनाची देखील आहे. शासनाकडे डिझास्टर मॅनेजमेंट प्लॅन आहे. अशा घडलेल्या प्रसंगी पूर्वीच्या मंत्र्यांनी राजीनामे दिलेले आहेत. प्रसंग ओळखून आपण सुध्दा राजीनामा देणार काय ? आपण मंत्री पदाचा राजीनामा द्यावा, अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहामध्ये चार तास अतिशय गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. सभागृहामध्ये ज्या मुद्यांचा उल्लेख करण्यात आला त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे अशा गंभीर प्रसंगी आपदग्रस्तांना आणि बॉम्बस्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या, जखमी झालेल्या सर्व व्यक्तींना मदत करण्याचे काम ज्या व्यक्तींनी, सेवाभावी संस्थांनी, सामाजिक संस्थांनी केले ते खरोखरच कौतूकास्पद आहे. त्यांना धन्यवाद देणे आवश्यक आहे. या घटनेबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी माहिती दिलेली आहे. आता पर्यंत किती बॉम्बस्फोट झाले, बॉम्बस्फोट कोणत्या तारखेला झाले, कोणत्या बॉम्बस्फोटामध्ये किती लोक मृत्यूमुखी पडले ही सर्व माहिती सभागृहासमोर आलेली आहे. याचा अर्थ सद्या मुंबईमध्ये बॉम्बस्फोट ही रेग्युलर घटना झालेली आहे. बॉम्बस्फोटाची घटना या शहरामध्ये वारंवार घडत असेल तर शासनाने यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करणे गरजेचे आहे. ज्या घटना घडलेल्या आहेत त्यातून लोक सावरण्याचा प्रयत्न करीत आहेत. शासनाकडून त्यांना मदत देण्याचा प्रयत्न होत आहे. सेवाभावी संस्था पुढे येत आहेत, लोक मदत करीत आहेत हे सर्व ठीक आहे.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

परंतु भविष्यात अशा प्रकारच्या घटना होणार नाहीत यासाठी आपण सतर्क राहून याबाबतीत आपणास काही उपाययोजना करता येतील काय याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, या गंभीय विषयाची चर्चा होत असताना या ठिकाणी हाही मुद्दा पुढे आलेला आहे की, या संदर्भात खरोखरी ज्यांच्यावर काही जबाबदारी आहे, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, पण जे आपली ही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडू शकलेले नाहीत तेव्हा त्यांचा यामध्ये खरोखरी काही दोष आहे काय ? ते अधिकारी खरोखरी कार्यक्षम आहेत काय? याचाही विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. ज्यामध्ये एखादा संघ पराभूत होतो तेव्हा त्या पराभवाची सगळी जबाबदारी त्या संघनायकावर, कप्तानावर असते त्याप्रमाणे जो अधिकारी आपली जबाबदारी पार पाडण्यास अकार्यक्षम ठरला असेल त्यांच्याबाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी आपण त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्यांची बदली करता येईल काय ? त्यांच्या जागी नवीन अधिकारी आणता येईल काय याचाही विचार करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, या आपत्तीमध्ये जे मृत्यूमुखी पडले आहेत, त्या निष्पाप व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याचे शासनाने घोषित केले आहे ती मदत त्यांना लौकरात लवकर मिळावी तसेच ती भरघोस मिळावी. आता सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उल्लेख केला आहे की, या तुटपुंज्या मदतीवर त्यांना संपूर्ण आयुष्य निभावून काढणे कठीण जाणार आहे. सभापती महोदय, मागील बॉम्बस्फोटामध्ये अशाच प्रकारे श्री.चंद्रकांत ज्ञानदेव आल्हाट हा मुलगा मृत्युमुखी पडला होता. पण त्याच्या पालकांना अद्याप जाहीर झालेली मदत मिळालेली नाही ही व्यथा आजच्याच अंकात छापून आलेली आहे. तेव्हा ज्यांचा काहीही दोष नसताना त्यांच्या कुटुंबियांवर ही आपत्ती कोसळली आहे त्यांच्याबाबतीत सहानुभूतीने विचार व्हावा एवढे बोलून मी भाषण संपवितो.

*****

....... 4सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, खरे म्हणजे अतिरेक्यांनी ठरवून, नोटीस देऊन 200 जणांची हत्या केलेली आहे. ...

( सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी खाली बसून काही बोलतात...)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपण पहिल्या रांगेमध्ये बसलेले ज्येष्ठ सदस्य आहेत, माननीय विरोधी पक्षनेता आहेत, त्यांनी नकळत हे पथ्य पाळले तर मग पाठीमागील बाकांवरील सदस्यांना देखील काही स्कोप मिळू शकेल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी एका विशिष्ट गोष्टीकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांची लक्ष वेधू इच्छितो. कारण या हल्ल्याची पुरेशी कल्पना जवळपास 4 वर्षापासून वेगवेगळ्या स्तरावरून राज्य सरकारला दिली जात होती. अशा प्रकारच्या अतिरेकी चळवळीचे केंद्र संभाजी नगर झालेले आहे याची तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्यात महाराष्ट्र सरकारला वेगळी नोटीस दिलेली होती. तेव्हा या निमित्ताने माझा सवाल असा आहे की, ही नोटीस दिल्यानंतर तेथे ॲण्टी टेररिस्ट स्क्वॅडची शाखा आपण का दिली नाही ? ही योजना आपण केली असती तर आजचा प्रसंग आला नसता. कारण सिमीने 6 डिसेंबर नंतर मोर्चा काढला होता आणि तो मोर्चा पोलीस वसाहतीमध्ये घुसून गोंधळ घातला होता. तेव्हा तेथील तत्कालीन सी.पी. श्री. श्रीपाद कुलकर्णी यांनी तेथील सर्वांना ठोकून काढले होते. पण त्याच श्री.श्रीपाद कुलकर्णी यांना तेथून काही दिवसात बदलण्यात आले. त्या श्री.श्रीपाद कुलकर्णी आता हयात नाहीत. पण त्यांना निवृत्त होतानाही ही बोच होती की, मी माझ्या पोलीस दलाचे संरक्षण करीत असताना मला रजेवर पाठवून माझी बदली नासिक येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये करण्यात आली. सभापती महोदय, हे येथेच थांबले आहे असे नाही. क्रांती चौकामध्ये एक मशीद आहे. ती मशीद नाही असे माझे स्वत:चे मत आहे. हायकोर्टाने देखील तसे सांगितले आहे. इतकेच काय पण आदरणीय श्री.गोविंदभाई श्रॉफ यांनी देखील हे सांगितले होते. .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... 4डी 1 ..

श्री. श्री□ांत जोशी ...

श्री. □ोविंदभाई श्रॉफ यांचे समाजवादी □ते म्ह□ू□ मोठे □ाव आहे. त्यां□ी रस्त्याच्या मा□ी□ी□रिता उपोष□ □ेले. □ेली 70 वर्षे याठि□ा□ी मी राहात असू□ □ो□तीही प्रार्थ□ा होत □ाही असे त्यां□ी सां□ितले. परंतु सेक्युलॅरिझमच्या □ावा□ाली हे सर□ार झु□ले. त्याठि□ा□ी 10 □ोटी रुपये देऊ□ पूल बांध□यात आला,परतु ए□ छोटयाशा रस्त्याचे रुंदी□र□ □र□यात आले □ाही. अशाप्र□ारची भूमि□ा राज्य सर□ार□े घेतली. हे अतिरे□ी संभाजी□□रमधील आश्रयदात्यां□डे ये□ार होते अशाप्र□ारची माहिती पोलिसां□ा मिळाली होती. ते आश्रयदाते □ो□ आहेत ही □ोष्ट लपू□ राह□े शक्य □ाही. आप□ संभाजी□□रमधील □ो□त्याही पा□ाच्या टपरीवर □ेलात तर पा□वाले त्यांची □ावे सां□तील. आज सभाजी□□रमध्ये □क्याच्या शेजारी असलेल्या □ी□श □□रमध्ये दुबईच्या शे□ मंडळींच्या माल□ीच्या मोठ मोठया इमारती उभ्या आहेत. त्यासंबंधी पा□ाच्या टपरीवर □ेहमी चर्चा होत असते. राजरोसप□े अतिरे□ी त्याठि□ा□ी येऊ□ राहात असतात. त्यांचे वे□वे□ळ्या लो□ांशी □म्युनि□े□श□ आहे. त्यामध्ये जावेद □ुरेशी या □□रसेव□ाचे □ाव घेतले जाते. लोटा□ारंजाचे, □ि□हाडपुराचे, रेहमा□िया □ॉल□ीचे □ाव घेतले जाते. □ाही दिवसापूर्वी ए.टी.एस. चे लो□ त्याठि□ा□ी धाड टा□□यासाठी □ेले असतां□ा तेथील माजी महापौर व □□रसेव□ असलेल्या व्यक्तीला पोलीस दलातील □ाही लो□ां□ी माहिती दिल्या□ंतर तो त्या ठि□ा□ाहू□ परा□ंदा झाला. शेवटपर्यंत तो ए.टी.एस. च्या जबाबासाठी सापडू श□ला □ाही. अशाप्र□ारची अत्यंत घात□ माहिती माझ्या ए□ा पोलीस मित्रा□े मला दिली. तेथील □ाही राज□ीय प□ां□ा वेठीस धरु□ □ाही राज□ीय पुढारी अतिरेक्यां□ा मदत □रीत असतात. अशाप्र□ारची स्थिती संभाजी□□रमध्ये आहे. या मुंबईतील बॉम्बस्फोटाचे ब्रे□ माले□ाव □िं□ा औरं□ाबादमध्ये आहे. अशाप्र□ारचे ए□ बॅड टेररिस्ट ट्रॅं□ि□ तयार झाले आहे, अशाप्र□ारची माहिती आहे. माझा सां□□याचा उद्देश एवढाच आहे □ी, या □ोष्टी आपल्याला टाळता आल्या असत्या. □िमा□ या□ंतर सुध्दा प्रचंड घातपाताचे प्र□ार होतील ते मोडू□ □ाढ□याची इच्छाशक्ती, ता□द तुमच्यामध्ये आहे □ाय? हा महत्वाचा प्रश्□ आहे. आपल्यामध्ये ती इच्छाशक्ती दिसत □सू□ आप□ □ुठेतरी राज□ीय दबावा□ाली □ाम□रीत आहात अशाप्र□ारची चर्चा संपू□र्□ मराठवाडयात सुरु आहे. औरं□ाबादचे एस.पी. श्री. ब्रिजेशसिं□ यां□ी अतिरेक्यां□ा प□डतां□ा विशेष चला□ी दा□विली. परंतु वर्ष पू□र्□ हो□याच्या आत त्यांची बदली □ा □र□यात आली? याचे उत्तर आप□ दे□ार □ाय? ज्यांचे अतिरेक्यांशी संबंध आहेत, अशा लो□ांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4D 2

DGS/ MAP/ KGS/ 19:55

श्री. श्रीकांत जोशी....

राज□ीय दडप□ामुळे, स्थानि□□ आमदारांच्या दडप□ामुळे त्या एस.पी.ंची बदली वेळेपूर्वी □र□यात आली. मे महि□यामध्ये अतिरे□ी सापडल्या□ंतर जू□ महि□यामध्ये □र□ □सतां□ा आप□ त्यांची तड□ाफड□ी बदली □रु□ टा□ता. पोलीस दलाचे म□ोधैर्य आप□ □से वाढवि□ार? आज पोलीस दलातील चां□ले पोलीस अधि□ारी त्याठि□ा□ी आपले पोस्टीं□ □रु□ घे□यास तयार होत □ाहीत. आप□ जर त्याठि□ा□ी सं□ा□ीय प्र□ाली बसविली असती तर परदेशामधू□ ये□ाऱ्या टेलिफो□ □ॉल्सचे विश्लेष□ □रता आले असते . अशाप्र□ारे आप□ संभाजी□ारमधील अतिरे□ी चळवळ मोडू□ □ाढली तर मुंबई आ□ि महाराष्ट्रावर हो□ारे आ□म□ सहज थांबवि□े शक्य आहे, हे आप□ □र□ार □ाय? □ाहीतर यापुढील □ाळात हो□ाऱ्या घातपाताला आप□ व्यक्तिश: जबाबदार आहात अशाप्र□ारची मा□सि□ता तयार झालीतर त्यामध्ये □र □ाय आहे हे आप□ आम्हाला समजावू□ सां□ावे. एवढे बोलू□ माझे भाष□ संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, कालचा दिवस राज्याच्या दृष्टीने अत्यंत वाईट दिवस होता. जवळ जवळ 183 निरपराध लोकांना मृत्युमुखी व्हावे लागले आणि 714 लोकांना जखमी व्हावे लागले. अशा घटना या मुंबईमध्ये वारंवार घडलेल्या आहेत. परंतु काल घडलेली घटना बघितल्यानंतर अतिरेक्यांनी जी तांत्रिकता वापरली यावरुन जागतिक स्तरावर अतिरेकी कारवाया करणारा तज्ज्ञ गट याच्या पाठिशी असावा हे निश्चित होते. काल खार येथे सायंकाळी 6.24 वाजता पहिला बॉम्बस्फोट झाला, त्यानंतर बांद्रा येथे 6.24 वाजता, जोगेश्वरी येथे 6.25 वाजता, माहिम यथे 6.26 वाजता, मीरा रोड येथे 6.29 वाजता, माटुंगा येथे 6.30 वाजता, आणि बोरिवली येथे 6.35 वाजता बॉम्बस्फोट झाला. फक्त 11 मिनिटांच्या कालावधीमध्ये हे स्फोट झाले. या स्फोटासंबंधी आज दुपारी 3 वाजेपर्यंतची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामध्ये एकूण ठार झ ालेल्या व्यक्ती 183 आहेत, आणि जखमी झालेल्या व्यक्ती 714 आहेत. ठार झालेल्या 183 पैकी 123 व्यक्तींची ओळख आतापर्यंत पटली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

72 व्यक्तींचे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आलेले आहेत. 56 मृतदेहांची ओळख पटलेली नाही. 183 लोक जे ठार झालेले आहेत, त्यापैकी 154 लोक हे मुंबईचे रहाणारे आहेत आणि ठाणे शहरातील 29 आहेत. जखमी झालेले 714 लोक आहेत. त्यामध्ेय 614 हे मुंबईचे आहेत आणि 90 हे ठाणे शहरातील आहेत. कालच्या घटनेमध्ये मोठी मनुष्यहानी झालेली आहे. निरपराध लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागलेले आहे. □ल आप□या सद□चे □म□ज □सदार वसंत चव्हा□ यांच्या दु:□द □□मुळे स्थ□ ठेवले होते. वसंत चव्हा□ यांच्या अंत्यविधीला उपस्थित रहा□ासाठी मी पु□ाला जा□ाचा □□□ घेतला होता. त्याप्रमा□ मी जायला □□लो, ठा□ येथील □डी पुलापर्य□ जात असतां□ ती□ बॉम्बस्फोट घट□च्या माहिती मला □ळवि□ात आली. सभापती महोदय, मी तेथू□ परत ये□ाचा □□□ घेऊ□,माहीम येथील बॉम्बस्फोट स्थळाला भेट दे□ाचा □□□ घेतला. मला पोलिस अधि□ऱ्यां□डू□ □ळवि□ात आले □, त्या ठि□□ आताच पोलीस पोहोचलेले आहेत, उप□□री □ड्या अचा□□ बंद झालेल्या आहेत, लो□ंची घरी जा□ाची वेळ असल्यामुळे रस्त्यावर लो□ंची □र्दी आहे, त्या ठि□□ पोलीस संर□□ची व्यवस्था □ही, तेव्हा घाई □रु □□, असे मला पोलीस अधि□ऱ्यां□डू□ □ळवि□ात आले. तरीही मी त्या ठि□□ जा□ाचा □□□ घेतला. बॉम्बस्फोट झाल्या□र 20-22 मि□टां□ माहीम येथे पोहोचलो होतो. त्या ठि□□ उत्स्फूर्तप□ □ही पोलीस आ□ शे□डो तरु□ ज□मी झालेल्या लो□□ ॲब्युल□मध्ये घालत होते, मृत झालेल्या व्यक्तीं□ प्लॅटफॉर्मवर आ□□ ठेवत होते. हे □म तरु□ उत्स्फूर्तप□ □रीत होते. मला □ही लो□□ ओळ□ले. त्या लो□□ "भारत माती □ जय", अशा घोष□ द्यायला सुरुवात □रु□ उत्स्फूर्तप□□ □माला सुरुवात □ली. दुसऱ्या डब्यामध्ये बॉम्ब अस□ाची शक्यता आहे,असे पोलीस त्यां□ सां□ होते. परंतु बॉम्ब असला तरी आपल्याला इजा हो□र, याची पर्वा □□ला □्हती. ए□ज□ दुसऱ्याला मदत □र□ाच्या भूमि□□ मदत □रीत होता. मी विधा□सभा सभा□□तही सां□ले □, अमेरि□मध्ये प्रसिध्द हो□ऱ्या ए□ दै□□□ ज□तील स□ळया महा□□रांचा सर्व्हे □लेला होता. त्यामध्ये "मुंबई हे उर्मट लो□चे शहर" अशापध्दती□ मुंबईची संभाव□ त्यां□ □ली होती. परंतु □लची परिस्थिती त्यां□ पाहिली असती तर त्याना लिहावे ला□ले असते □, स□ळया ज□□ पहावे, अशी मुंबई शहरातील □□रि□मध्ये सहृदयता भरलेली आहे, हे त्यां□ दिसू□ आले असते. ज□त □ठेही □सेल इत□ ए□मे□□ मदत □र□ाची मा□स□ त्यांना पहायला मिळाली असती. इत□ □म

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु...

मुंबईतील तरु□ां□ी □ले, मी त्यांचे स□ळी अभि□ंद□ □ले, आता पु□्हा ए□दा अभि□ंद□ □रतो. रस्त्यावरील वाह□ांच्या वाहतु□मध्ये अडथळा होता, तो दूर □र□यासाठी तरु□ □ा□वेश □सता□ आप□ ज□ू वाहतू□ पोलीसच आहोत, अशी भूमि□ घेऊ□ रस्त्यावरील वाहतू□ सुरळित □र□याचा प्रयत□ □रीत होते. ही घट□ घडल्या□ंतर प्रत्य□ात हॉस्पिटलमध्ये ज□मीं□ स्ट्रेचरवरु□ □ेल्या□ंतर, त्यां□ औषधे आ□ू□ दे□यापर्यंतची मदत लो□ सेवाभावी वृत्ती□ □रीत होते, असे वातावर□ स□ळी□डे पहायला मिळाले. ही घडलेली घट□ राज्याच्या दृष्टी□ अत्यंत दुर्दैवी आहे. □ल्या वर्षभरातील विचार □ला तर प्रत्ये□ वेळी आपल्यालाच यश मिळालेले आहे. □ल ए□मेव यश हे या अतिरेक्यां□ मिळालेले आहे. वर्षभरामध्ये घडलेल्या घट□ पाहिल्या तर साधी इ□फॉर्मेश□ मिळाली □ी, आपल्या राज्यातू□ आरडीएक्स बाहेर जा□याची शक्यता आहे, या माहितीवर □ं□ताही पोलिसां□ □टाळा □ □रता □ा□पूर, औरं□ाबादच्या आजूबाजूला अडीच महि□ सातत्या□ ल□ ठेवू□ वाह□ांची तपास□ी चि□ाटी□ □लेली आहे. तपास□ी □रत असता□ ए□ वाह□ 120 □िमी.वे□ा□ धावू□ पळ□याचा प्रयत□ □रत असता□, पोलिसां□ त्याचा पाठला□ केला.

या□ंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

प्रचंड प्रमाणावर शस्त्रे पकडली गेली. मला सगळ्या गोष्टींचा उलगडा करता येणार नाही. परंतु ही शस्त्रे कोठे जाणार होती ? ही शस्त्रे काश्मीरला जाणार होती की गुजरातला जाणार होती ? गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी साहेबांनी 10 लाख रुपयांचे बक्षिस दिले. यापेक्षा यातील पुढचे बारकावे मी सदनासमोर आणू इच्छित नाही, काही गुपिते उघड करु इच्छित नाही. परंतु महाराष्ट्रातील पोलीस दलाने महाराष्ट्राच्या जनतेचेच रक्षण केले असे नाही तर शेजारच्या राज्याच्या जनतेचेही रक्षण केलेले आहे. फक्त महाराष्ट्रातून शस्त्रे पास होणार आहेत एवढी एक माहिती मिळाल्याबरोबर पोलीस दलाने शेजारच्या राज्यातील जनतेचे प्राण वाचविण्याचे काम सुध्दा अडीच महिने सतत जागता पहारा ठेऊन केलेले आहे. सात आठ महिन्यांपूर्वी मला आणि माननीय मुख्यमंत्र्यांना थेट दिल्लीला बोलविण्यात आले. माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रम ठरले होते. माझेही कार्यक्रम ठरले होते. सर्व कार्यक्रम रद्द करा आणि तातडीने उद्या 1.00 वाजता भेटा असा संदेश आला. आम्ही दोघेही दिल्लीला गेलो. आम्हाला संवेदनशील अशी तीन ठिकाणे सांगण्यात आली. त्यातील एक ठिकाण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यालय हे होते. या घटनेला आठ आठ महिने झ ाालेले होते. मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांना विनंती केली होती की, तुम्हाला तेथील सिक्युरिटी वाढवावी लागेल. आमच्याकडे वेगळे लोक आहेत, लोकांना त्रास होईल असे सांगण्यात आले. एखादा प्रसंग घडल्यावर लोक म्हणतात की, त्रास झाला तरी चालेल पण ज्यावेळी सिक्युरिटी कडक केली जाते त्यावेळी लोकांना त्रास होतो. लोकांना त्रास झाला तरी चालेल, लोकांना आमच्या वतीने विनंती करा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयातील लोकांना सांगा, अशी विनंती मी श्री. गडकरी साहेबांना केली होती. एखादी माहिती मिळाल्यानंतर सात आठ महिने सातत्याने पाळत ठेवणे हे सुध्दा जिकिरीचे काम आहे. माणसे एकदोन महिने वाट बघतात आणि पुन्हा पहारा किंवा देखरेखीचे काम आपोआप ढिले पडत असते. परंतु पोलिसांनी धोका पत्करलेला नव्हता. त्या ठिकाणी अतिरेकी आल्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता चार अतिरेक्यांना गोळ्या घालून ठार मारुन त्यांच्याकडील शस्त्रे पोलिसांनी जप्त केलेली आहेत. गोळ्या घालण्यामध्ये पोलीस मागे पडले नव्हते. पोलिसांनी त्याचे काम चोखपणाने केले परंतु दुर्दैवाने एवढे चांगले काम केल्यानंतरही त्या ठिकाणी एक स्वयंघोषित सत्यशोधन कमिटी उठली आणि त्यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. आर.आर.पाटील ....

सांगितले की, हा पोलिसांचा बनाव होता. चांगले काम करणाऱ्यांचे नेहमी डिमॉरलायझेशन केले जाते. पोलीस आपल्या पोलिसी कायद्याचे पालन करतात. न्यायालये, मानवी हक्क आयोग, लोकप्रतिनिधी या सर्व बंधनात राहून पोलिसांना आपले काम करावे लागते. इच्छा असताना अनेक वेळा काही गोष्टी करता येत नाहीत. ज्यावेळी देशाच्या संरक्षणाबाबतची माहिती असते अशा कोणत्याही गोष्टीमध्ये तडजोड केली जात नाही. अशावेळी पोलिसांच्या कामामध्ये हस्तक्षेप केला जात नाही. त्यासाठी वेगळ्या आदेशाची गरज भासत नाही. जरुर असेल त्याप्रमाणे पोलीस आपली शस्त्रे वापरतात. कालच्या सगळ्या बॉम्बस्फोटाच्या घटना पाहिल्यानंतर आपणच हुशार असतो असे नाही तर शस्त्रू सुध्दा हुशार असतात. असा प्रश्न विचारला जातो की, वारंवार मुंबईवरच हल्ला का केला जातो ? अशी शंका व्यक्त केली जाते की, मुंबईची भूमी भुसभुशीत आहे आणि येथील कायदा व सुव्यवस्था ढिली आहे, लोक ढिले आहेत त्यामुळे लोकांनी या ठिकाणी येऊन बॉम्बस्फोट केले तरी चालतील म्हणून ते येत आहेत. हे खरे कारण नाही. जे बॉम्बस्फोट करण्यासाठी येत आहेत ते मरणाची तयारी ठेऊन, मेलो तरी चालेल म्हणून दहशतवादी हल्ला करण्याच्या उद्देशाने येत आहेत. हे हल्ले करण्याच्या कामी हेच ठिकाण का निवडले जाते ? याचे कारण असे की, कोणताही शत्रू युध्दामध्ये शक्तीस्थळावर हल्ले करतात. या ठिकाणी येऊन दऱ्याखोऱ्यांमध्ये बॉम्ब फोडले तर बॉम्ब फोडणाऱ्यांचेच नुकसान होईल. त्यामध्ये महाराष्ट्राचे आणि देशाचे नुकसान होणार नाही. मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई देशाची औद्योगिक राजधानी आहे. देशावर हल्ला करणाऱ्यांना देशाची शक्तीस्थळे दुबळी करावयाची असतात. म्हणूनच मुंबईला उद्दिष्ट केले जाते. मुंबईला उद्दिष्ट करण्याचे दुसरे कोणतेही कारण नाही. काही वेळा त्यांना यश मिळते तर काही वेळा पोलिसांना यश मिळते. परंतु या सगळया घटनांकडे पोलिसांचे कमी लक्ष आहे असे बिलकुल नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ MAP/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 20:10

(श्री. आर.आर.पाटील...)

गेल्या वर्षभरामध्ये मुंबईतील आणखी दोन घटना मी बघितल्या. फोन नंबर मिळाल्यानंतर पोलिसांनी ताबडतोबीने अतिरेक्यांना ताब्यात घेतलेले आहे. थोडीशी माहिती मिळाल्या बरोबर मुंबई पोलिसांनी आपले कौशल्य दाखविलेले आहे.तीन साडेतीन महिन्यांपूर्वी मुंबई पोलिसांनी अतिरेक्यांचा दिल्लीपासून पाठलाग करीत त्यांना मुंबईमध्ये शस्त्रास्त्रानिशी पकडलेले आहे. संधी मिळेल तेव्हा पोलीस आपले कर्तव्य चोखपणे बजावत आहेत. मी नेहमीच या सदनामध्ये सांगत आलो आहे की, या राज्याची लोकसंख्या वाढत आहे, अनेक प्रकारचे गुन्हे वाढत आहेत, मात्र त्या प्रमाणात पोलीस दलाची संख्या कधीच वाढलेली नाही. या सदनामध्येच नाही तर विधानसभेमध्ये देखील आपण कांदा आणि टोमॅटोच्या संदर्भात जेवढी चर्चा केली तेवढी चर्चा पोलीस दलाच्या आधुनिकतेवर कधी केलेली आहे असे मला वाटत नाही. नेहमीच कमी बजेटमध्ये पोलीस दलाला काम करावे लागते. आमच्याकडे नवे टेक्निक आले की ते आमच्या आधी अतिरेक्यांना प्राप्त होते. पोलीस दलासाठी आधुनिक टेक्निक घ्यावयाचे म्हटले तर त्यासाठी पहिल्यांदा रेट कॉन्ट्रॅक्टची यादी तयार करुन ते घ्यावे लागते, त्यासाठी टेंडर काढावे लागते. या सर्व प्रोसेस पूर्ण होईपर्यन्त त्याच्या पुढचे टेक्निक अतिरेक्यांना प्राप्त झालेले असते. असेल ते टेक्निक घेऊन पोलिसांना अतिरेक्यांशी सामना करावा लागतो. पोलीस दलाच्याही अडचणी आहेत. आवश्यक तेवढे मनुष्यबळ पोलीस दलाला कधीच मिळत नाही. राज्यामध्ये 55 हजार पोलिसांची भरती केली पाहिजे असे एका तज्ज्ञांच्या कमिटीने रिपोर्ट दिला. दुस-या एका कमिटीने 90 हजार पोलीस भरती केले पाहिजेत असे सांगितले. ज्या वेळी भरतीचा प्रश्न येतो त्यावेळी त्यासाठी लागणारे अर्थसहाय्य पोलीस दलाला कधीच दिले गेले नाही असे आतापर्यन्तच्या पाहणीमध्ये दिसून आलेले आहे. कोण विरोधक आहेत आणि कोण सत्ताधारी आहेत, हा प्रश्न येथे गौण आहे. शेवटी या राज्यातील 10 कोटी जनतेच्या सुरक्षेचा हा प्रश्न आहे. पहिल्यांदा या राज्यातील माणूस जिवंत राहिला पाहिजे. राज्यातील पाटबंधारेसारख्या कामांना प्राधान्य देत असताना पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या कामाला देखील प्राधान्य दिले गेले पाहिजे हे या कालच्या घटनेपासून आपण ठरविले पाहिजे. भविष्यामध्ये राज्याचे पोलीस दल हे आधुनिक असे बनविले पाहिजे, पोलीस दलाची संख्या वाढविली पाहिजे. एकाच वेळी राज्याच्या पोलीस दलामध्ये 11 हजार पोलिसांची भरती करण्याचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

निर्णय यापूर्वी कधीच घेतला नव्हता. हा निर्णय अंमलात आणण्यासाठी माननीय वित्तमंत्र्यांनी केलेल्या सहकार्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. 11 हजार पोलिसांच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मध्यंतरी एमपीएससीच्या माध्यमातून पीएसआयच्या 1200 पदासाठी परीक्षा घेतली गेली होती. ती पदे भरण्यासाठी तीन वर्षे लागली. आता ते कामही मार्गी लागलेले आहे. ही भरती जेव्हा केली जाते त्यावेळी त्यांना ट्रेनिंग देऊन त्यांची प्रत्यक्ष पोस्टींग होई पर्यन्त तीन वर्षाचा कालावधी जातो. एका बाजूला पदे कमी आहेत. ती वाढत नाहीत. दुस-या बाजूने केन्द्राने देखील वेगळी भूमिका घेतलेली आहे. राज्यातील सर्व एअरपोर्टवरील सुरक्षा व्यवस्था राज्याच्या पोलिसांकडे होती. आता ती सुरक्षा व्यवस्था सीआयएसएफकडे देण्यात आलेली आहे. तेथील मनुष्यबळ मुंबई पुणे येथे वापरता येईल यादृष्टीने एअरपोर्टवरील सुरक्षा व्यवस्था सीआयएसएफकडे देण्यास आम्ही होकार दिला. पोर्टमध्ये देखील केन्द्राने त्यांची सुरक्षा यंत्रणा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तेथील मनुष्यबळ देखील आम्हाला अन्यत्र वापरता आले. सनमाननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, दोन वर्षापूर्वी केन्द्र सरकारने रेल्वेच्या संदर्भात एक कायदा करुन तेथील सुरक्षा व्यवस्था आरपीएफला देण्याचा निर्णय घेतला आणि प्रवाशांच्या तसेच त्यांच्या सामानाच्या तपासणीचे काम रेल्वे सुरक्षा बलाकडे सुपूर्द करण्यात आले. असे सर्व असताना दुर्दैवाने हे सांगावे लागत आहे की, पोलिसांची संख्या कमी आहे. मला आठवते की, एक वर्षापूर्वी मुंबईतील रेल्वे पोलिसांच्या संख्येबाबत रेल्वे सी.पी. माझ्याकडे आले होते.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MAP/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 20:15

श्री.आर.आर.पाटील........

आणि त्यांनी फार आर्जवी भाषेत मला पोलीस दल वाढवून दिले पाहिजे, महिलांवरील गुन्हे रेल्वेमध्ये वाढत आहेत असे सांगितले. आम्ही फार उदार झालो आणि 300 होमगार्डस् त्यांना उपलब्ध करुन दिले. मुंबईतील कोणतेही पोलीस बल कमी करावयाचे म्हटले तर तेथील सुरक्षेचे प्रश्न आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने 300 होमगार्डस् देऊन ते कशी सुरक्षा करणार होते हाही महत्वाचा प्रश्न आहे. या सुरक्षा बलाकडे प्रवाशांची देखरेख आणि तपास आहे. केंद्र शासनाच्या पोलिसांकडे सुरक्षा आहे. तेथे जीआरपीएफ हे राज्य सरकारचे रेल्वे पोलीस दल आहे. हेही तेथे काम करतात. यांच्याकडून माहिती घेतली असता मुंबईमध्ये हायएस्ट 65 लाख लोकांनी एका दिवसात प्रवास केल्याची माहिती मिळाली. 65 लाख लोक जेथे प्रवास करतात तेथे पोलिसांची संख्या फक्त 3400 आहे. या 3400 मधील काही रजेवर, काही आजारी, काही कामानिमित्त दुसरीकडे असतात आणि किती मनुष्यबळ उपलब्ध होते हे पाहिले तर साधारणत: एका पोलिसाच्या वाट्याला 2000 प्रवासी येतात. यातही ज्या पीक वेळा आहेत म्हणजे सकाळी कार्यालयात येण्याच्या आणि सायंकाळी घरी जाण्याच्या वेळी लोंढेच्या लोंढे, लोटच्या लोट रेल्वे स्टेशनमध्ये घुसतात. रेल्वे लोकल्स सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी पाहिल्या आहेत. हजारो माणसे दाटीवाटीने आत घुसतात आणि लोकल इच्छित स्थळी पोहोचल्या की, तितकीच माणसे मोठया संख्येने त्या स्टेशनमधून बाहेर पडतात. संरक्षणाच्या दृष्टीने इतके कमी मनुष्यबळ आहे की, हे मनुष्यबळ कोणी तक्रार नोंदवायला आले तरी त्याची तक्रार नोंदवून घेण्याच्या कामात गुंतून पडेल. इतक्या लोकांवर आपण इतक्या छोट्या मनुष्यबळाच्या आधारे देखरेखही ठेवू शकत नाही.

सभापती महोदय, जे विमानाने प्रवास करतात ती माणसे एक तास अगोदर एअरपोर्टवर जातात. तीन-तीन वेळा सिक्युरिटी चेक केली जाते. तेथे चांगल्या पध्दतीने तपासूनच विमानतळावर सोडले जाते. तेच तत्व रेल्वे प्रवाशांच्या बाबतीत लावावयाचे ठरविले तर कल्पना करा, किती मोठ्या रांगा लागतील? एका माणसाच्या तपासाला किती वेळ लागेल? आज मुंबईतील लोकांचे जीवन पाहिले तर रेल्वे प्रवासामध्ये त्यांचे दिवसातील चार तास जातात. दोन तास यायला आणि दोन तास जायला. आठ तास काम करण्यामध्ये जातात. काही लोकांना त्यांच्या स्टेशनपासून पुढे सुध्दा बसने प्रवास करावा लागतो. इतकी स्ट्रिक्ट सिक्युरिटी चेक ठेवली तर माझ्याकडे मागणी येईल की, एकवेळ मरण परवडले पण सिक्युरिटी चेक नको. इतक्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

मोठया रांगा लागतील. विमानतळाएवढी सुरक्षा व्यवस्था ठेवायची म्हटले तर त्यासाठी किती मनुष्यबळ लागेल याचा विचार करावा लागेल. इतकी रेल्वे स्टेशन्स आहेत, ही सगळी यंत्रणा आजपर्यंत उभी केलेली नाही. कमी मनुष्यबळाच्या आधारावर नशिबाच्या जोरावर सुरक्षा चालू आहे. शत्रुला मी हुशार यासाठी म्हटले की, त्यांनी नेमके ओळखले. आमचे मनुष्यबळ नेमके कुठे कमी आहे, नेमकी जास्त गर्दी कुठे आहे, कमी जागेमध्ये जास्त लोक कुठे आहेत हे त्यांनी अचूकपणाने ओळखून मुंबईची लाईफलाईन असलेली रेल्वे उद्ध्वस्त केली आहे. यापुढील काळामध्ये आजच रेल्वेच्या चेअरमनबरोबर झालेल्या बैठकीमध्ये आणि काल रात्री रेल्वेमंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत एक निर्णय घेण्यात आला. मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासून रेल्वे स्टेशनमध्ये सोडण्याचा निर्णय कालच्या बैठकीत घेण्यात आला. लवकरच ही व्यवस्था रेल्वे स्टेशन्सवर केली जाईल. गर्दीच्या वेळी गैरसोय होऊ नये म्हणून रॅण्डम पध्दतीने, संशय येईल अशा लोकांची रॅण्डम तपासणी हॅण्ड मेटल डिटेक्टरने करायची व्यवस्था करणार आहोत. ही व्यवस्था रेल्वेमार्फत दिली जाणार आहे. यासाठी मनुष्यबळ पोलीस दलाकडून उपलब्ध करुन देणार आहोत. बॉम्ब तपासासाठी आज डॉग स्क्वॉड कमी आहे. इतक्या मोठ्या रेल्वे यंत्रणेकडे दोन डॉग स्क्वॉड आहेत. ती संख्या वाढविण्याचा निर्णय आजच्या बैठकीमध्ये घेण्यात आला. त्यांच्याकडून हे काम करुन घेणार आहोत. त्यासाठी मनुष्यबळ महाराष्ट्र पोलिसांकडून देणार आहोत. एका बाजुने बळ कमी होते आणि दुसऱ्या बाजुने ही जबाबदारी विमानतळासारखी घेणार म्हटल्यावर तेथे काही उणिवा राहतील आणि नेमके तेच सॉफ्ट टार्गेट काल करण्यात आले. तेथील मनुष्यबळ वाढविण्याच्या दृष्टीने रेल्वे मंत्र्यांना काल विनंती केली की, एअरपोर्ट ॲथॉरिटीसारखी पूर्ण सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे काम रेल्वेने आपल्याकडे घ्यावे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, जर रेल्वे विभाग ही जबाबदारी घेणार नसेल तर आम्ही मुंबईतील जनतेला वा-यावर सोडणार नाही . यासाठी वाटले तर बजेटमध्ये तरतूद करुन काही पैसे उपलब्ध करु आणि हे काम आम्ही आमच्याकडे घेऊ. यासंदर्भातील कायदा जरी पार्लमेंटने केलेला असला तरी जबाबदारी म्हणून महाराष्ट्र सरकार हे काम करेल. आम्ही आमची जबाबदारी टाळणार नाही. परंतु केंद्रसरकारने यातून मार्ग काढून देऊ असे धोरण घेतलेले आहे. काल बॉम्बस्फोट झाले ही गोष्ट खरी आहे. ज्या ज्या वेळी बॉम्बस्फोटाच्या संदर्भात इंटेलिजन्स ब्युरोकडून माहिती मिळाली त्या त्या वेळी कठोर स्वरुपाची कारवाई सातत्याने करण्यात आली. परंतु कालच्या घटनेची सुतराम कल्पना आली नव्हती, कुठलीही शंका व्यक्त केली गेली नव्हती. थोडासा अंदाज चुकला किंवा त्यामध्ये काही उणिवा राहिल्या्त, या सर्व गोष्टीचा शोध पुढील तपासात दिसून येईलच. कालच्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भातील काही माहिती समोर यावयास सुरुवात झाली आहे. काल काही तास असा प्रश्न पडला की, नेमका या गोष्टीचा तपास कोणी करावयाचा? केंद्रशासनाच्या कायद्या प्रमाणे या घटनेचा तपास रेल्वे पोलिसांनी करणे आवश्यक होते. परंतु 200 माणसे मृत्युमूखी पडलेली असतांना या घटनेचा तपास एटीएस करतील असा निर्णय घेण्यात आला. एटीएसकडे सुध्दा मनुष्यबळ अपूर्ण आहे. पहिल्या दोन तासात एटीएस प्रमुखांना बसवून सांगण्यात आले की, तुम्हाला मुंबई पोलीस दलातील जे चांगले माणसे वाटतात, ज्यांना बॉम्बस्फोटाच्या तपासाची माहिती आहे अशी आपण जी माणसे मागाल, जे अधिकारी मागाल ते त्वरीत देण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला. यासाठी 16 एटीएस चे पथक तयार करण्यात आले. सात घटनांची नोंद झाल्यामुळे प्रत्येक गुन्हयासाठी एक पथक असे 16 पथक तयार करण्यात आले. ही पथके केवळ पावणेदोन तासात तयार करण्यात आले व त्यानुसार हे पथक तीन तासात पोहचले व कामाला त्वरीत सुरुवात झाली. माझी खात्री आहे की, मुंबई पोलीस गुन्हेगांरापर्यंत नक्कीच पोहचतील. शक्यता आहे इथले हात असतील आणि देशाच्या बाहेर बसून मेंदू या बॉम्बस्फोटाचे काम करीत असेल. अशा बाम्बस्फोटामध्ये काम करणा-याचे हात कलम करण्याचे आणि मेंदू ठेचण्याचे काम हे शासन केल्या शिवाय राहणार नाही. सभापती महोदय, हा हल्ला केवळ रेल्वेवर झाला नाही असे नाही तर अतिरेक्यांनी जी कारवाई केली ती बघता अतिरेक्यांनी संपूर्ण देशाचे वातावरण दुषित

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

करण्याचे काम केलेले आहे, दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम केलेले आहे, सामाजिक बंधूभाव बिघडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज सकाळी विरोधी पक्षाच्या नेत्यांबरोबर, गट नेत्यांबरोबर जी बैठक झाली त्यासंदर्भात मला दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. त्यांनी या घटनेत राजकारण आणले नाही. सभापती महोदय, हा हल्ला केवळ दोनशे लोकांवर झाला नव्हता, हा महाराष्ट्रावर हल्ला झाला नव्हता तर हा हल्ला देशाच्या सार्वभौमत्वावर झाला होता. या घटनेतून आपण एकतेचे दर्शन घडवून आणलेले आहे, संपूर्ण देशांची एकता आपण दाखवून दिलेली आहे. त्यामुळे अशा प्रकारे अतिरेक्यांनी कितीही प्रयत्न केले तरी अतिरेक्यांचा हेतू साध्य होऊ शकणार नाही असा संदेश अतिरेक्यांना देण्याचे काम आपण सगळयांनी केलेले आहे. कालच्या घटनेचे विरोधी पक्षाने राजकारण केले नाही, या घटनेच्या संदर्भात विरोधी पक्षाला काळे झेंडे घेऊन निषेध करता आला असता परंतु विरोधी पक्षाने जो मोठेपणा दाखविला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. देशाचे संरक्षण, शांतता आणि संयमाने काम करण्याची शक्ती जीवनामध्ये काही प्रसंगानुरुप येत असते. परंतु यामध्ये एखादा दिवस वाईट सुध्दा येत असतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

पोलिसांनी नागपूरमध्ये संघ कार्यालयावर होणारा हल्ला उधळून लावला त्यावेळी माझे अभिनंदन करण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा पकडला म्हणून गुजरात राज्याचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी माझे अभिनंदन करुन दहा लाख रुपये बक्षिस दिले. नेहमीच यश मिळणाऱ्या माणसाला कधी कधी अशाप्रकारच्या प्रसंगामुळे, विरोधकांना यश मिळून जाते. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, अशाप्रकारच्या घटनेमुळे पोलीस दल नाउमेद होणार नाही. अतिरेक्यांना धडा शिकविल्याशिवाय शांत आणि संयमाची भूमिका घेतली जाणार नाही. राज्यातील पोलीस दलामध्ये जीवावर उदार होऊन काम करणारे अनेक जवान आहेत. कालच्या घटनेनंतर त्या गटामध्ये काम करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केलेली आहे. त्यांची नेमणूक आवश्यकतेप्रमाणे केली जाईल.

सभापती महोदय, माझा राजीनामा मागणे हे मी समजू शकतो, त्यांनी आज राजीनामा मागितला नाही, तर मग माझा राजीनामा मागण्याची संधी कधी मिळणार ? विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी माझा राजीनामा मागितला,त्याचबरोबर पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांचा देखील राजीनामा मागितला. खरे म्हणजे त्यांनी ॲडमिनिस्ट्रेशनची बाब समजून घ्यावयास पाहिजे होती. रेल्वेचे ज्युरिडिक्शन वेगळे आहे. रेल्वेसाठी वेगळा सी.पी. आहे. रेल्वेसाठी वेगळा स्टाफ आहे. परंतु ही माहिती न घेता श्री.अनामी रॉय यांचा देखील राजीनामा मागण्यात आला. त्यांचा याठिक्णी संबंध नाही.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, केंद्रीय गृहमंत्र्यांनी सहा महिन्यापूर्वी कल्पना दिली होती आणि गृहमंत्री म्हणतात की, त्यांचा संबंध नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल केंद्रीय गृहमंत्र्यांनी आमच्यासमोर सांगितले की, "देशभरात काही ठिकाणी अतिरेकी कारवाया करणार आहेत,परंतु ठिकाण आणि वेळ यासंबंधी माहिती नव्हती." काही वेळेला परफेक्ट माहिती मिळते. यामध्ये पोलिसांची चूक आहे असे मी म्हणत नाही. मुंबईतील हा रेल्वे ट्रॅक गुजरात राज्यापर्यंत जातो. मुंबईत आपले बारकाईने लक्ष आहे. अतिरेकी मुंबईत येतील आणि बॉम्ब तयार करुन लोकलमध्ये बॉम्ब ठेवतील असे आजही

..2..

श्री.आर.आर.पाटील.......

पोलिसांना वाटत नाही. परंतु या सर्व गोष्टींवर आजच प्रतिक्रिया देणे योग्य नाही. या तपासाचा क्ल्यू लागला आहे. या प्रकरणी जो कोणी माहिती देईल आणि ती माहिती खरी ठरल्यास त्याला 25 लाख रुपयांचे बक्षिस देण्यात येईल. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. चांगल्या गोष्टींकरिता लोकांनी पोलिसांना सहकार्य केले पाहिजे.

सभापती महोदय, काल झालेल्या बॉम्बस्फोटाच्या दुर्घटनेत जे लोक जखमी झाले आहेत त्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल. महानगरपालिकेच्या हॉस्पीटलमध्ये रात्रौ दहानंतर गर्दी कमी व्हावयास लागली आहे.

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 20:30

श्री.आर.आर.पाटील...

मी काल सायन हॉस्पीटलमध्ये जाऊन भेट दिली व पाहणी केली. त्याठिकाणी कोणाचे हात तुटलेले आहेत तर कुणाचे पाय तुटलेले आहेत, ते वर लटकवून ठेवलेले आहेत, त्यातून रक्त वाहत होते. असे का लटकून ठेवले असे विचारले असता तेथील डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की, आतमध्ये ऑपरेशन थिअटर पूर्ण भरलेले आहे. मधले ऑपरेशन्स झाल्यानंतर त्यांना आम्ही मध्ये घेऊ, असे त्यांनी सांगितले. यावर मी त्यांना विचारले की, तोपर्यंत त्यांचे रक्त भरपूर जाणार. याबाबत त्यांनी सांगितले की, आपल्याकडे ऑपरेशन्स थिअटर कमी आहेत. त्याठिकाणाहून आल्यानंतर ताबडतोबीने 10 मिनिटांमध्ये आम्ही निर्णय घेतला. ज्या रुग्णालयामध्ये ऑपरेशन्स थिअटर नाहीत त्याठिकाणी लोकांचे फारच रक्त वाहत होते व त्यांची मोठया प्रमाणात ओरड होत होती, त्याठिकाणी एवढी भयानक परिस्थिती होती की, त्याचे वर्णन स्मृती पटलावर कसे बसवायचे हेही अडचणीचे होते. त्यावेळी आम्ही त्वरित निर्णय घेतला की, लोकांच्या म्हणण्यानुसार त्यांना ज्या खाजगी रुग्णालयातून उपचार घ्यावयाचे असतील ते त्यांनी घ्यावेत, त्याचा खर्च राज्य सरकारमार्फत दिला जाईल. रात्री 10 नंतर ज्या ज्या हॉस्पीटलमध्ये 20 पेक्षा अधिक रुग्ण होते, त्या त्या ठिकाणी आम्ही एक वॉर्ड ऑफिसर, डेप्युटी ऑफीसर लेवलचा अधिकारी प्रत्यक्षात ठेवला होता. याठिकाणी कोणी तरी सांगितले की, मंत्री, केंद्रीय मंत्री फिरले परंतु शासनाचा एकही अधिकार किंवा कर्मचारी रस्त्यावर आला नव्हता. परंतु ही गोष्ट खरी नाही. डेप्युटी सेक्रेटरी, सेक्रेटरी, चिफ सेक्रेटरी असे सर्व- जण मिळून आम्ही पहाटे 4.00 पर्यंत फिरत होतो. आरोग्य खात्यापासून ते पोलीस खात्याचे तसेच विविध खात्याचे अधिकारी निश्चितपणे कामावर हजर होते. आम्ही सर्वजण पहाटे साडे चार वाजता घरी गेलो. आम्ही सर्वजण प्रत्यक्ष मदतीमध्ये होतो. खाजगी दवाखान्यांमध्ये चांगल्या सोयी उपलब्ध असतात म्हणून त्यांची मागणी होणे हे स्वाभाविकच आहे. तसेच एअर पोर्टमधील बैठकीमध्येही आणखी काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. रेल्वेमंत्र्यांनी हे कबूल केले की, रेल्वेनेसुध्दा आणखी थोडीशी सुरक्षा द्यावयास पाहिजे होती. याबाबतीत रेल्वेनेसुध्दा प्रत्येकाला मदत देण्याचे घोषित केले आहे. जखमींना प्रत्येकी एक लाख रुपये आणि मृतांना प्रत्येकी 5 लाख रुपये आणि कॉम्पेन्सेशनवर तातडीने नोकरी दिली जाणार आहे. अशा प्रकारे त्यांच्या वतीने आणि सरकारच्या वतीने घोषणा करण्यात आलेली आहे. लोकांना मिळणारी मदत ही भरीव स्वरुपाची असेल. याठिकाणी विचारणा करण्यात आली की, ही

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

मदत किती दिवसांमध्ये मिळेल ? कारण बऱ्याचवेळा मृत्यू पावलेल्यांना बराच काळ मदत मिळत नाही. याबाबतीत सांगू इच्छितो की, रेल्वेने त्यांचे अधिकारी येथेच ठेवलेले आहेत. सगळयांची मदत वाटून झाल्यानंतर येत्या दोन-तीन दिवसांमध्ये मदतीला सुरुवात होईल. त्यांचे पत्ते वगैरे घेण्याचे काम चालू आहे. त्यांच्या मदतीबरोबरच राज्य सरकारची मदतसुध्दा आपल्या जी.आर. प्रमाणे दिली जाणार आहे. तीसुध्दा तातडीने देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना मदत लवकर देण्यात येईल. असा प्रसंग अमेरिकेतही घडलेला होता, लंडनमधील मेट्रोमध्ये घडलेला आहे. त्यामुळे एकूणच याबाबतीत वेगळा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. चेचेना येथेही अशा प्रकारचा प्रसंग झालेला आहे. अशा पुढारलेल्या राष्ट्रांमध्येही असे प्रसंग घडलेले आहेत. कालच्या घटनेबद्दल अमेरिकेपासून जगातील बहुतेक राष्ट्रांनी निषेध व्यक्त केला आहे. जागतिक स्तरावरील वाढणारा हा आतंकवाद सगळयांनी एकत्रित येऊन मोडून काढला पाहिजे. सगळयांनी एकत्रित येऊन हा लोकशाहीवरील हल्ला परतवून लावण्याची आवश्यकता आहे. या तपासाबाबत दिल्ली सरकारची मदत घ्यावी लागणार आहे, त्यांनीही मदत देण्याचे कबूल केले आहे. यापुढे जाऊन जागतिक स्तरावर कुठल्या संस्थेची मदत घ्यावी लागली तर तीसुध्दा घेण्याची तयारी राज्य सरकारने दाखवलेली आहे. खऱ्या गुन्हेगारांपर्यंत राज्याचे आणि देशाचे हात पोहचतील, हे मी याठिकाणी सांगू इच्छितो. आपण पोलिसांना फक्त थोडीशी उसंत देण्याची नक्कीच आवश्यकता आहे. काल आणि आज विरोधी पक्षाच्या लोकांनी याबाबतीत राजकीय भांडवल न करता साथ व सहकार्य देण्याची भूमिका घेतली. याबाबतीत दिल्ली सरकारनेही मदत करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...............

14 तारखेला स्वत: पंतप्रधान जखमींची विचारपूस करण्यासाठी येथे येणार आहेत. पूर्णपणे गांभीर्याने या बाबीकडे राज्य सरकार बघत आहे व लवकरात लकवर रिलिफ मिळेल, असे मी सदनाचा निदर्शनास आणून देऊ इच्छितो. एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, न्यूयॉर्क येथे हल्ला झ ाला ते शहर सावरण्यासाठी 15 तास लागले, लंडन येथे बॉम्बस्फोट झाला अजून बघितले तर रेल्वेमध्ये जातांना प्रवासी घाबरतात, मुंबईमध्ये मात्र 4 तासाच्या आत अतिशय निर्भिडपणे हे शहर पूर्ववत झाले. कुठेतरी राहिलेली उणिव आहे तीही दूर करता येईल, मार्ग काढता येईल. या घटनेचा कुठेही राजकीय लाभ न उठविता अतिरेक्यांचा हेतू आपल्या वागण्याने, आपल्या बोलण्याने सफल होऊ नये, अशा पध्दतीची आपल्या सर्वांकडूनच अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 2/3 महत्वाचे प्रश्न उपस्थित केले. सन 1992-93 मध्ये बॉम्बस्फोट घडले परंतु त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही. ही गोष्ट खरी आहे की, सन 1993 साली घटना घडली, आरोपपत्र सादर झाले, सगळया साक्षी-जबाबाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु, साडेतीन वर्ष झाले तरी या केसचे जजमेंट मिळालेले नाही. राज्य सरकारमार्फत चिफ जस्टिस यांना विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर हा निकाल लवकरात लवकर लागावा, अतिरेक्यांना जरब बसावी म्हणून गरज भासली तर सुप्रिम कोर्टामध्ये देखील जाण्याची भूमिका राज्य सरकारमार्फत स्वीकारली जाईल. या सगळया घटनेचा तपास सीबीआय मार्फत केला जात होता, राज्याच्या पोलीस दलामार्फत नाही, ही बाब देखील सन्माननीय सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावी. सीबीआयमार्फत वेगळे चार्जशिट दाखल करण्यात आलेले आहे व निकाल हायकोर्टाने द्यावयाचा आहे. या ज्या राज्य सरकारच्या मर्यादा आहेत त्या समजावून घेतल्या पाहिजेत. यामध्ये जे जे राज्य सरकारला करावे लागेल ते राज्य सरकारमार्फत केले जाईल. व गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा होईल, हे पाहिले जाईल. बॉम्बस्फोटासारख्या घटनेमध्ये रुटिन कोर्टामध्ये न जाता फास्टट्रॅक कोर्ट निर्माण केले जातील. निश्चित कालमर्यादेत व लवकरात लवकर निर्णय झाले पाहिजेत, गुन्हेगारांना जरब बसली पाहिजे, अशा प्रकारची भूमिका स्वीकारली पाहिजे. लंडन येथे स्फोट झाला त्यावेळी मी सर्व घटना दूरचित्रवाणीवर पाहिली. मी थोडासा विषयाच्या बाहेर जाऊन बोलत आहे. तेथील पंतप्रधान त्यावेळी शहरात उपस्थित नव्हते. ते जेंव्हा आले त्यावेळी त्यांनी सरळ मंत्रिमंडळाची एक बैठक घेतली, घटनेचा निषेध केला आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..............

ही जबाबदारी पोलिसांची आहे, असे सांगून निघून गेले. टी.व्ही.मध्ये वारंवारं मी बघत होतो, कोणतीही डेड बॅाडी चॅनलवरुन दाखविण्यात येत नव्हती, अस्ताव्यस्त झालेले मृतदेह दाखविण्यात येत नव्हते. वर्तमानपत्रांनी कोणतेही फोटो दिले नाहीत. सगळे रस्ते पोलिसांसाठी मोकळे सोडण्यात आले होते. पोलिसांनी एकदा अनाऊंन्स केले आणि लोकांनी सर्व रस्ता मोकळा करुन दिला, रस्त्यावरील दुकांनाचा लोकांनी आसरा घेतला व रस्ते पोलिसांसाठी मोकळे केले गेले. तेथील विरोधकांनी पंतप्रधानांचा राजीनामा मागितला नाही, पोलीस कर्मचा-यांचा राजीनामा मागितला नाही. हे सर्व करीत असतांना पोलिसांना शंका आली म्हणून पोलिसांनी एका माणसावर गोळीबार केला आणि तो त्यात ठार झाला. 2 दिवसानंतर असे निष्पन्न झाले की, तो माणूस निष्पाप होता. पोलीस कमिशनर यांनी नंतर दिलगीरी व्यक्त केली. पोलीस दलामध्ये लगेच याची रिॲक्शन आली, की योग्य पध्दतीने काम करीत असतांना एखादी चूक झाली, अशी चूक भविष्यातही होऊ शकेल, अशा चुकीसाठी माफी मागावी लागत असेल तर आम्ही काम का करावे ? ही चूक लक्षात आल्यानंतर दुस-या दिवशी पोलीस आयुक्तांनी घोषणा केली की, काल मागितलेली दिलगीरी चुकीची होती, या पुढच्या काळामध्ये कायदेशीर काम करीत असतांना एखादा निरपराध माणूस मेला तरी आम्हाला पर्वा नाही. असे झाल्यानंतरही पोलिसांना कुणीही जाब विचारला नाही.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 20:40

श्री.आर.आर.पाटील ..........

पण येथे थोडीशी चूक झाली ही गोष्ट खरी आहे. तुमच्या काही मतांशी मी निश्चितपणे सहमत आहे. धाडसाने काम करीत असतांना, चांगुलपणाने काम करीत असतांना एखाद्या वेळी चूक होते त्याला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली पाहिजे. चांगल्या हितासाठी चूक होत असेल तर त्याला पाठीशी घालण्याची भूमिका राज्य सरकारमार्फत स्वीकारली जाईल. या घटनेचे राजकीय भांडवल न करता सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या चांगल्या आहेत. रेल्वेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्याकडे मनुष्यबळ कमी आहे. आपल्याला त्याकडे लक्ष द्यावे लागेल. केंद्र सरकारकडून सुध्दा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. रेल्वेची सुरक्षा चांगली केली जाईल आणि सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची संधी मिळेल त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल याची मी ग्वाही देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. माननीय गृहमंत्र्यांनी त्या प्रश्नांची उत्तरे दिलेली नाहीत. हा बॉम्बस्फोट होण्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये ज्या घटना घडल्या, औरंगाबाद पासून मालेगाव, मनमाड, येवला, नागपूरचे संघ कार्यालय, भिवंडीमध्ये घडलेली घटना, शिवाजी पार्कमध्ये स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयास चिखल फासला या सर्व घटनांच्या साखळीवरुन तुमच्या गुप्तचर यंत्रणेच्या लक्षात या घटना आल्या नाहीत काय ? आणि आल्या असतील तर गुप्तचर खात्याने अतिरेक्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कोणती उपाययोजना केली होती ? भिवंडीच्या घटनेमध्ये अबू आझमी यांनी जे आव्हान केले त्याचाही उल्लेख झाला. त्यासंदर्भात तुम्ही काय करणार आहात ? ती जागा तुमची होती. त्या जागेवर पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु झाले. बांधकाम सुरु झाल्यानंतर ते थांबविण्यात आले. आपण 8 दिवसांचा अवधी दिला होता. आता 8 दिवस पूर्ण होऊन गेले आहेत. मागच्या 5-6 महिन्यांमध्ये महाराष्ट्रातील स्थिती खिळखिळी करण्याचा वेगवेगळया माध्यमातून प्रयत्न चालला होता त्यावर लक्ष ठेऊन पोलिसांना सतर्क करुन हा बॉम्बस्फोट रोखता आला नसता काय? याचे उत्तर गृहमंत्र्यांनी दिलेले नाही. भिवंडीच्या दंगलीसंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मदरसांना सर्टिफिकेट दिले जात आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. ज्या पोलिसांनी चांगले काम केले त्यांच्यावर केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. याही प्रश्नांची

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 20:40

श्री.पांडुरंग फुंडकर .........

उत्तरे आलेली नाहीत. माननीय गृहमंत्र्यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. कालच्या बॉम्बस्फोटाचा तपास किती दिवस चालणार आहे ? सन 1993 च्या घटनेचा निकाल हायकोर्टावर आणि सी.बी.आय.वर ढकलून तुम्ही मोकले झालात. 13 वर्षे बॉम्बस्फोटाच्या केसेस चालणार असतील तर कालच्या घटनेचा तपास किती दिवस चालणार आहे. 10 वर्षे खटला चालवून लोकांना ही घटना तुम्ही विसरावयास लावणार आहात काय ? यासंबंधी माननीय गृहमंत्र्यांनी खुलासा केला पाहिजे. या झालेल्या बॉम्बस्फोटाची जबाबदारी कोण घेणार आहे ?

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण यावर सहा तास चर्चा केलेली आहे ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर येथे गोवारींची हत्या झाली त्यावेळी तत्कालीन मुख्यमत्री श्री.पवार साहेबांनी 114 आदिवासी सोडले आणि सन्माननीय मंत्री श्री.पिचड यांना बळी दिले. आता या राज्याचे गृहमंत्री म्हणून सन्माननीय श्री.आर.आर.पाटील हे आहेत आणि ते जबाबदार आहेत तेव्हा या बॉम्बस्फोटांचे परिमार्जन ते घेणार आहेत की नाही ? त्यांची यामध्ये काही नैतिक जबाबदारी आहे की नाही ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी कोठलीही नवी प्रथा, जबाबदारी येथे पाडू इच्छित नाही. मी काही लालबहादूर शास्त्री नाही वा अन्य कोणी मोठा नेता आहे. तरीही कोणाच्या कालावधीमध्ये संसदेवर हल्ला झाला किंवा बॉम्बस्फोट झाले आणि त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान तसेच गृहमंत्र्यांनी काय भूमिका त्या संदर्भात घेतली होती हे मी तपासून पाहतो आणि मग काय ते ठरवितो.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. ...

( विरोधी पक्ष सदस्य निषेधाच्या घोषणा देत सभात्याग करतात. .. )

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या, गुरूवार दिनांक 13 जुलै 2006 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाही 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत घेण्यात येईल आणि या बैठकीमध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा तसेच शासकीय विधेयके घेण्यात येतील आणि त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 46 मिनिटांनी, गुरूवार दिनांक 13 जुलै 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही